मनोहर ग्रंथमाला प्रकाशन १ लें

# तिरंगी नवमतवाद

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

१९३७

किंमत दहा आणे

प्रकाशक
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला
१९६।३३ सदाशिव, पुणें

मुद्रक
वि. गं. केतकर
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना
६२४ सदाशिव, पुणें

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १ | केवळ प्रास्ताविक | १ |
| २ | कांहीं आक्षेप व उत्तरें | ७ |
| ३ | थोडेंसें हेतुसंशोधन | १४ |
| ४ | कांहीं शब्दांचा अर्थ | २० |
| ५ | साध्यसाधन विचार | २९ |
| ६ | कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (१) | ३६ |
| ७ | कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (२) | ४४ |
| ८ | कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (३) | ५२ |
| ९ | कम्यूनिस्ट राज्यपद्धति | ५८ |
| १० | कम्यूनिस्ट रशियांतील अंतर्व्यवस्था | ६५ |
| ११ | रशियांतील आर्थिक अंतर्व्यवस्था (१) | ७२ |
| १२ | रशियांतील आर्थिक अंतर्व्यवस्था (२) | ७९ |
| १३ | रशियांतील समाजस्थिति (१) | ८६ |
| १४ | रशियांतील समाजस्थिति (२) | ९३ |
| १५ | कम्यूनिस्ट हा असा असतो ! | १०१ |
| १६ | प्रयोग साधणार कीं फसणार ? | ११० |
| १७ | आतां थोडी चर्चा | ११७ |
| १८ | राज्यसंस्थाविषयक खरें ध्येय कोणतें ? | १२५ |
| १९ | आर्थिक व्यवहार व व्यक्तिस्वातंत्र्य | १३२ |
| २० | मालकी हक्काचा विकास | १३९ |
| २१ | रशियांत खरा साम्यवाद आहे का ? | १४८ |

# पुणें अ. वि. गृहाचा खुलासा

श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं केसरींतून "तिरंगी नवमतवादाची चर्चा" ही लेखमाला लिहून प्रसिद्ध केली. त्याच वेळीं त्या लेखमालेचें महत्त्व सार्वत्रिक मान्य झालें होतें. जे नवे नवे वाद समाजांत उत्पन्न होत आहेत त्यांची इतकी बारीक व इतक्या सोप्या भाषेंत छाननी इतरत्र क्वचितच पाहावयास मिळेल. म्हणून सदर लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्यास वाचकांस ती उपयुक्त वाटेल व हा विषय समजून घेणारांस त्याचा फार चांगला उपयोग होईल असें वाटल्यावरून आम्ही ती पुस्तक-रूपानें प्रसिद्ध करण्याची तयारी दर्शवितांच तीस श्री. तात्यासाहेब केळकरांनीं मोठ्या आनंदानें मान्यता दिली याबद्दल आम्ही श्री. तात्यासाहेब केळकरांचे फार आभारी आहों.

श्री. तात्यासाहेब केळकरांनीं खास संस्थेकरतां लिहून दिलेलें 'तरुण हिंदू नागरिक' हें पुस्तक "तुभ्यमिदं न मम" अशा स्वरूपानें दिलें. म्हणजे त्या पुस्तकाचे सर्व हक्क संस्थेस अर्पण केले आहेत. त्याच पद्धतीनें हेंहि पुस्तक त्यांनीं पुणें अ. वि. गृहास सर्वस्वीं अर्पण केलेलें असून त्याच्या कोणत्याहि भाषेंत कितीहि आवृत्ती काढण्याचा अधिकार संस्थेचा आहे. तथापि या पुस्तकाची फक्त मराठी प्रथमावृत्ति प्रकाशित करण्याचा अधिकार आम्ही श्री. तात्यासाहेबांचे पुतणे श्री. मनोहर महादेव केळकर यांस दिला असून त्याप्रमाणें सदर पुस्तकाची प्रथम मराठी आवृत्ति त्यांनीं आपल्या मालेतर्फे प्रसिद्ध केली आहे.

विद्याभवन, ६२४ सदाशिव,<br>पुणें, ता. १।१।३७

**त्रि. गं. केतकर**<br>व्यवस्थापक पुणें अनाथ विद्यार्थी गृह.

# प्रकाशकाचे दोन शब्द

'समाजसत्तावाद' 'साम्यवाद' वगैरे विविध नांवांनीं ओळखलें जाणारे पण मुख्यतः कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर कमीजास्त प्रमाणांत आधारलेले विचारप्रवाह जगाच्या इतर भागांप्रमाणें हिंदुस्थानांतहि पसरत आहेत व गेल्या पांचसहा वर्षांत महाराष्ट्रांत हे विचार अनेक रीतींनीं अनेकांच्या थोड्याबहुत परिचयाचे झाले आहेत यांत शंका नाहीं. नवविचारांची लाट कुठल्याहि काळांत साहजिकपणेंच नव्या दमाच्या तरुण पिढीचीं मनें भारून टाकते आणि याच न्यायानें बुद्धिमंत महाराष्ट्रांत देखील मार्क्सवाद गेल्या अवघ्या पांचसहा वर्षांत तरुण पिढीपुरता तरी हां हां म्हणतां पसरला. परंतु या विचारसरणीच्या प्रचाराचीं साधनें म्हणजे कुठें कुठें असणारीं Study Circles आणि इंग्रजी पुस्तकें, हीं बहुजनसमाजाच्या आंवाक्यांतलीं नसल्यानें ज्या समाजाचें वकीलपत्र या वादानें घेतलें आहे तो समाजच काय पण इंग्रजी न जाणणारा मध्यम स्थितींतील बहुजनसमाजहि या बाबतींत अगदींच अनभिज्ञ राहिला आहे. आतां कदाचित् कोणी असा आक्षेप घेईल कीं, व्याख्यानांनीं कांहींच का प्रचार झाला नसेल ? त्याला उत्तर हेंच कीं प्रचाराकरितां दिलेल्या व्याख्यानांनीं एकादा विचार लोकांच्या गळीं तितका नीट उतरत नाहीं. व्याख्यानाच्या हाकेनें जाग येईल पण त्यामुळें कुठल्याहि विचाराचें त्यांतून समाजवादासारख्या अगदीं नवीन विचाराचें आकलन समाजाला नीटपणें होईलच असें नव्हे. शिवाय कुठलीहि गोष्ट बोलण्यापेक्षां लिहिण्याचा प्रसंग आला म्हणजे कुठलाहि विचार तोलून मापून पाहिला जातो. आणि या दृष्टीनें या विषयावर सुबोध पुस्तकें लिहिणें जरूरच होतें.

सरासरी दीड वर्षापूर्वी कांहीं साम्यवादी विचारसरणीच्या पुरस्कर्त्यांचे तत्संबंधीं कांहीं मुद्यांवर विचार ऐकण्याचा व त्यांजबरोबर प्रसंगोपात्त चर्चा करण्याचा योग आला असतां "तुम्ही मंडळींनीं या विषयावर सुबोध भाषेंत लेख लिहून आपले विचार जनतेपुढें मांडावेत" अशी सूचना तात्यासाहेबांनीं

त्या वेळीं अनेक वेळां केली. पुढें या विषयाचा स्वतः निरनिराळे ग्रंथ वाचून त्यांनीं व्यासंग केला आणि केसरीच्या वाचकांकरितां स्वतः या विषयावर लेखमाला सुरू केली. ती आज आम्ही पुस्तकरूपानें एकत्र छापून प्रसिद्ध करीत आहोंत.

या लेखमालेला 'तिरंगी नवमतवाद' हें नांव देण्याचा लेखकाचा हेतू त्यांनीं आरंभींच्या लेखांत दिलाच आहे; आणि तात्यासाहेबांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अतिव्याप्ति, अव्याप्तीचे दोष शक्य तितके टाळून समाजवादाच्या दोन्ही बाजू मांडल्यामुळें हा विषय काय आहे तो कळावयाची वाचकांची उत्तम सोय झालेली आहे. जोंपर्यंत सगळ्यांना इंग्रजी वाचतां येत नाहीं, व ज्यांना येतें त्यांना वेळेच्या अगर पैशाच्या अभावीं सगळीं पुस्तकें वाचणें शक्य नसतें, तोंपर्यंत अधिकारी ग्रंथांच्या आधारानें लिहिलेली व दोन्ही बाजू मांडणारी असली लेखमाला एक मोठी अडचण तरी दूर करूं शकेल. अशा एखाद्या पुस्तकाच्या अभावीं मार्क्सिझम, बूर्ज्वा लेबर, सोव्हिएट हिस्टॉरिकल इंटरप्रिटेशन वगैरे शब्द रोज कानांवरून जात असूनहि त्यांचा उलगडा होत नाहीं. गॉर्कीच्या उत्सवाच्या जाहिराती वाचूनहि गॉर्की हें काय असतें ? फळ असतें कीं फूल असतें यासंबंधींहि बहुजनसमाज अडाणीच राहतो, तो प्रसंग तरी अशा पुस्तकांमुळें टळूं शकेल.

मनोहर ग्रंथमालेतर्फे प्रसिद्ध होणारें हें पहिलें पुस्तक आहे. महाराष्ट्राच्या आवडत्या अशा दुसऱ्या एका ग्रंथकाराचें एक पुस्तक लवकरच आमचें दुसरें प्रकाशन म्हणून प्रसिद्ध होईल. महाराष्ट्र जनतेला मनोहर ग्रंथमालेची सेवा आवडेल अशी आमची खात्री आहे.

पुणें, ता. १४।१२।३६ **मनोहर महादेव केळकर**

# तिरंगी नवमतवाद

## १. केवळ प्रास्ताविक

परवां माझा एक स्नेही सहज म्हणाला--" काय पीडा पाहा ! दर नव्या पिढीला एखादा नवा वाद रंगत असतो. हल्लींच्या पिढीला सोशियालिझम–कम्यूनिझमच्या वादाला देवानें वरदान दिलेलें दिसतें. देव झाले तरी थोडे कलहप्रिय नाहींत हो ! वास्तविक युगपरिवर्तन व्हावयाचें तर त्यांनींच सत्य सरळ सांगून टाकावें म्हणजे मनुष्यकलह वांचेल. हा तिरंगी नवमतवादच घ्या ना. भावी युगांत त्याचा अवतार होणार तर देवांनीं स्पष्टच सांगून टाकावें कीं, 'बाबांनो ! सोशियालिझम-कम्यूनिझम हाच नवा आर्थिक व सामाजिक युगधर्म आहे. मुकाटयानें त्याला स्वीकारण्याची तयारी करा पाहूं. भांडूं नका.' ज्या देवाला अशा क्रांत्या घडवून आणण्याची शक्ति आहे त्याला त्यांची वर्दी देण्याचीही शक्ति खास आहे ! पण त्या शक्तीचा उपयोग देव करील तर ना ! मग त्यांचें कलहप्रिय हें वर्णन सार्थ कसें होईल ?"

मी म्हणालों, " पण देवानें ही वर्दी हिंदुस्थानाला द्यावयाची तर ती कशी द्यावी म्हणतोस ? "

तो म्हणाला, " मला खालीलप्रमाणें कल्पना करण्यांत मौज वाटते. भावी काळांत उत्पात होणार हें दर्शविण्याकरितां धूमकेतूचा उदय देव करवितो ! पण त्याऐवजीं त्यानें यापुढें आकाशलेख व आकाशवाणी यांचा उपयोग करावा. धूमकेतू पुष्कळ वेळां अस्पष्ट असतो; अवेळींही उगवतो. माणसें झोंपेंत असतात. कोण उठून तो पाहणार ? ज्योतिषी मुद्दाम दुर्बिणी लावून पाहतात ; पण श्रद्धाळू माणसें तो दिसला तरी डोळ्यांवर हात

धरतात. शेंडे नक्षत्राकडे माणसानें डोळेझांक केली म्हणून तें उगवावयाचें, किंवा लोकांच्या समजुतीप्रमाणें आपला वाईट गुण करावयाचें, थोडेंच राहतें म्हणा ! उलट पाहण्याची इच्छा आहे त्याला सुद्धां तें हटकून चांगलें स्पष्ट दिसत नाहीं. मनुष्याला भविष्यज्ञान करविण्याचे हे मार्ग देवानें आतां टाकून दिले पाहिजेत. त्याच्या अस्तित्वाविषयीं शंका घेणें ज्या मानानें अधिक, त्या मानानें तें पटवून देण्याचे उपायही देवानें अधिक परिणामकारक व प्रभावी असे योजावयास लागलें पाहिजे ना ! "

" मग ऐकूं दे तरी आपली योजना देवाला काय सुचवावयाची आहे ती ! " मीं विचारलें.

माझा मित्र म्हणाला, "आकाशांत इंद्रधनुष्य उगवतें त्याप्रमाणें, सर्व जग पाहील अशा मोठ्या अक्षरांची कमानदार भव्य रंगीबेरंगी जाहिरात देवानें दररोज दिवसा व रात्रीं लावून, सोशियालिझम-कम्यूनिझमचें सत्य काय आहे, हें जगाला कांहीं दिवस सांगावें. घरोघर रेडियोचीं ध्वनियंत्रें बसविलीं गेलीं आहेत त्यांतून रोज ठरल्या वेळीं या सत्याचा उपदेश सुरू व्हावा, व त्या वेळीं इतर सर्व गाणें बजावणें ऐकूं यायचें बंद व्हावें. ज्या गरिबांच्या घरीं रेडियो बसविले नसतील त्यांच्या घरांना वळचणी तरी खास आहेत. त्यांचा उपयोग रेडियोसारखा देवानें करावा. ज्यांना घरें नाहींत, जे उघड्यावर पडून राहतात, त्यांची वळचण आकाश हीच ! म्हणून त्यांना तेथून संदेश ऐकूं यावे. उद्यां गणपतिउत्सव सुरू होतील, तेव्हां गणपतीनें आपल्या शुंडामुखानें सत्य जाहीर करावें, उगाच एर भाकड वक्त्यांचीं व्याख्यानें कशाला हवीं ? आणि इतकें उघड बोलायचें नसेल तर, देवळांत भक्त भजक येतात तेव्हां गाभाऱ्यांतील सिंहनादाचा उपयोग याच कामाकडे करावा."

त्यावर मी म्हणालों, " तुझी कल्पना मोठी रम्य आहे खरी. पण देव म्हणतो, मला भौतिक सृष्टिसाधन आवडत नाहीं. शेंडे नक्षत्र बिचारें अहेतुक अकल्पित उगवतें व त्याचा उगीच भलताच अर्थ लोक करतात. मी रक्ताचे पाऊस पाडीत नाहीं. मी संदेश सांगण्याकडे कोल्ह्यांच्या हुकीहुकीचा उपयोग कधीं करीत नाहीं. मनुष्याशीं बोलण्याचें, त्यांना सत्य सांगण्याचें, एकच साधन अधिकृत असें मीं हल्लीं ठेवलें आहे. तें स्वतः

मनुष्याची बुद्धि, विचारशक्ति व विवेकशक्ति. तेंच माझें तारायंत्र. तोच माझा टेलिफोन. तोच माझा रेडियो. तोच माझा फोनोग्राफ. माणसानें माझा संदेश ऐकण्याकरितां, असल्या भौतिक यंत्राकडे कान लांब करून बसण्यापेक्षां, फक्त आपल्या बुद्धीवरचे पट खोलावे. म्हणजे त्याला माझे संदेश ऐकू येतील. ग्रहण हें कुठें दिसतें, कुठें दिसत नाहीं; तसा माझा दिव्य बुद्धिसंदेश कुठें ऐकू येईल, कुठें ऐकू येणार नाहीं असें होणार नाहीं. तो प्रत्येक मनुष्य ऐकूं शकेल. मात्र त्यानें मुद्दाम बुद्धीच्या कानांत बोळे घालूं नयेत किंवा आपलें स्वतःचें तोंड समजून दुसऱ्याच्या तोंडाशीं कान देऊं नये."

यावर माझा मित्र म्हणाला, "कींव येते बिचाऱ्या माणसांची. सोशियालिझम म्हटलें कीं कोण पण भितात!"

मी म्हणालों, "कोठें झालें तरी असेंच आहे. लोक कोणतेंहि नवें सत्य मनानें समजून घेण्याऐवजीं त्याच्या नुसत्या नामोच्चारानेंच भितात! ज्याचा अर्थ कळत नाहीं तें जसें पवित्र, त्याप्रमाणें ज्याचा अर्थ कळत नाहीं तें भयंकर, असाही मनुष्यानें मनाशीं संकेत केलेला दिसतो. रानांत प्रत्यक्ष वाघ न दिसतां 'वाघ' असा नुसता शब्द उच्चारला तरी कांहीं लोक भितात. तसेंच सोशियालिझम–कम्यूनिझमचें झालें आहे. एखाद्या भरल्या सभेंत नुमता 'साप' असा शब्द कोणी उच्चारण्याचा अवकाश! कीं सगळी सभा उधळते. आणि बुजऱ्या बैलांचें खिल्लार सैरावैरा धांवावें तसें लोक वाट सांपडेल तिकडे पळूं लागतात. तसें सोशियालिझम–कम्यूनिझम या शब्दांचें झालें आहे. पूर्वीं 'स्वदेशी' किंवा 'टिळक' या शब्दांचा परिणाम सरकारी अधिकाऱ्यांवर होई, तसा आतां सोशियालिझम–कम्यूनिझम या शब्दांचा जनतेवर होऊं लागला आहे! सोशियालिस्ट–कम्यूनिस्ट हीं सदरें सरकारनें मनानें गुन्हेगार जातींच्या यादींत घातलीं आहेत, तर लोकसमजांत ते दोन शब्द शिव्यांसारखे झाले आहेत."

माझा मित्र म्हणाला, "लोकांचा हा दोष खराच. पण या बनावटींत स्वतः सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट या लोकांचाही दोष नाहीं असें मात्र नाहीं. किंबहुना या प्रकरणीं अनिष्ट प्राप्तींत त्यांचा वाटा अर्ध्याहून अधिक आहे, असें मी म्हणेन. वास्तविक ज्या लोकांना आपला सिद्धांत जनतेला पटवून द्यायचा असतो त्यांच्यावरच, तो विनाकारण अप्रिय न होऊं देण्याची खबर-

दारी घेण्याची जबाबदारी असते. पण येथें पाहावें तों साराच उलटा प्रकार ! 'विनाकारण' हा शब्द मीं जाणूनबुजून योजला आहे. कारण हे लोक कांहीं कांहीं बाबतींत थोडी अधिक सावधगिरी घेतील तर त्यांना व त्यांच्या शिकवणीला निष्कारण येणारी अप्रियता टळेल. हे लोक केवळ आपला वेष व भाषा यांनींच अर्धें रान उठवतात. मतप्रतिपादनाच्या हक्काविषयीं पूर्ण स्वातंत्र्याचा आग्रह धरणें अगदीं रास्त. पण वेष, भाषा आणि कांहींसा आचारही, यांच्या बाबतींत 'लोकविरुद्ध' असेल तें हटकून करणें ही त्यांची सांप्रदायिक रीतच होऊन बसली आहे ! रामदास म्हणतात, "वेष असावा बावळा। परि अंतरीं नाना कळा।" पण येथें पाहावें तों त्याच्या अगदीं उलट प्रकार होतो. कम्यूनिझमला सकृत् दर्शनींच लोकांना भिण्याचें मुख्य कारण तिचा खाजगी धनसंपत्तीवरील हल्ला. पण त्याच्याच जोडीचें दुसरें कारण हें कीं, हा हल्ला यशस्वी करावयाचा तर तोही पाशवी शक्तीच्या बळावर करण्याची कम्यूनिस्टांची धमकी."

गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे. दरवडे आपणाला लुटणें पुरवेल. पण फिरून लूट करावयाची ती स्वतःला निर्भय स्थितींत करतां यावी म्हणून लुटीनंतर लुटला गेलेल्यानें मोकाट धावत, पळत, व आरडतओरडत जाऊन गांव जागा करून आपल्या मागें लावूं नये म्हणून, दरवडेखोर आधीं त्याचें हातपाय कांपणार किंवा खूनही करणार. ही अत्याचाराची भीतीही जमेस धरावी लागते.

पण समजा उद्यां शांततावादी, अनत्याचारवादी महात्मा गांधींनीं जर या कल्पना भावी सुधारणेचे सिद्धांत म्हणून लोकांपुढें मांडले तर ते इतकेसे बिचकावयाचे नाहींत. तसेंच स्वतः गांधी नव्हेत पण दुसरा कोणी साधा माणूस, डोक्यावर गांधी टोपी, गळ्यांत वैष्णव सांप्रदायी तुळसीमाला, आणि हातांत सूत काढावयाची चाती घेऊन वरील सिद्धांताचा प्रचार करण्यास निघाला तरीदेखील लोक भिणार नाहींत. पण सोशियालिस्ट किंवा कम्यूनिस्ट लोकांच्या सिद्धांतापेक्षां त्यांच्या तोंडच्या भाषेला व आविर्भावांनाच लोक खरोखर अधिक भितात. कारण ही भाषा, खरेशास्त्र्यांच्या एका काव्यांतील "जाळिन, पोळिन, नाशिन, नेईन सर्व लया दाविन कोप कसा असतो मम भूवलया !" यासारखी असते. किंवा कविवर्य तांबे यांच्या

'रुद्रास आव्हान' या कवितेंतील "खणखणत शृंग ये, डमडमत डमरु ये" यासारखी असते !

सोशियालिझम-कम्यूनिझम म्हणजे काय यांचें खरें ज्ञान करून घेतल्याशिवाय लोक त्यांना भितात हा त्यांचा दोष असेल. पण हें खरें ज्ञान होण्याकरितां लागणारें स्पष्ट, साधें व सोदाहरण विवेचन, या नवमताचे प्रचारक तरी कोठें करतात ? आतां कदाचित् त्यांच्या-त्यांच्यांतच सिद्धांताविषयीं एकमत झालेलें नाहीं हेंही एक कारण असेल. पण मतप्रतिपादनाचे सिद्धांत स्पष्ट व रेखीव आंखीव न मांडल्यामुळें घोटाळा होतो, व पायांत पाय अडखळतात, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. या त्यांच्या शिकवणींत दाखल्याकरितां प्रायः कांहीं ठराविक परदेशाकडे अंगुलिनिर्देश करण्यांत येतो पण परक्यांच्यांतलें वाईट व भेसूर तेवढेंच पाहण्याकडे सामान्य लोकांची प्रवृत्ति असते हें लक्षांत घेऊन, या नवमताच्या प्रचारकांनीं कोणतीही उपपत्ति किंवा सिद्धांत हिंदुस्थानचें उदाहरण घेऊन समजावून देण्याचा प्रयत्न करावा. याला थोडी कल्पनाशक्ति चालवावी लागेल. पण या देशाच्या हिताकरितांच नवमतसिद्धांत सांगावयाचा तर या देशस्थितीच्या भाषेंतच तो सांगणें प्राप्त नव्हे काय ?

आजकाल नवमतवाद व त्यांतल्या त्यांत सोशियालिझम–कम्यूनिझम, हे शब्द ज्याच्या त्याच्या तोंडीं आहेत. त्या शब्दांतच दर्शविल्याप्रमाणें त्या मताबद्दल वादही सुरू आहेत. वाद या शब्दाचा अगदीं शेवटचा रूढार्थ म्हणजे भांडणतंटा. तेथपर्यंतही या वादाची मजल गेली आहे. पण वाईट इतकेंच वाटतें कीं, नवमत या शब्दांत काय काय गोष्टी आहेत किंवा अवश्य येऊं शकतात याचा सूक्ष्म विचार झाल्याशिवायच प्रायः हें भांडण होत असतें.

कुलपी गोळ्याचा नुसता धक्का लागल्यानेंच युद्धांत शिपाई मरतो. कुलपी गोळा फुटल्यावर त्यांतून काय पदार्थ बाहेर पडतात हें कळण्यापर्यंत तो जिवंतच राहात नाहीं. त्याप्रमाणें नवमतवादांतील फेकाफेक उलटसुलट होत आहे. नवमतवाल्यांना वाटतें कीं, जुनीं पुराणीं सुप्रतिष्ठित मतें उराशीं बाळगणाऱ्या लोकांवर नवमत हा कुलपी शब्द फेकला गेला म्हणजे त्याच्या नुसत्या धक्क्यानें ते चकित होतील, चकितपणामुळें बलहीन होतील, आणि

मग त्या कुलपी गोळ्यांतील मतें आपण त्यांना तपशीलवार सांगून पटवून देऊं. पहिली लढाई जिंकणें म्हणजे निम्में युद्ध जिंकणें ही रणनीतीच आहे.

पण त्याच्या उलट प्रतिपक्षानेंही याच रणनीतीचा जो प्रकार करून दाखवावा तो मात्र लोकांकडून होत नाहीं. हा प्रकार म्हणजे लोकांनीं नवमतवाद्यांची अशी खात्री करून द्यावी कीं, "तुमच्या या नवमतवादाच्या कुलपी गोळ्यानें धक्का खाऊन बेशुद्ध न होण्याचा आमचा निश्चय आहे. नवमतवाद म्हटला तरी असें त्यांत काय भयंकर आहे कीं त्याच्या नुसत्या नांवानें आम्हीं भ्यावें ? तुम्ही आम्हाला खूप बुजवूं पाहाल. पण आम्ही बुजलों पाहिजे ना ? मनुष्य सावध नसतां कोणीं त्याच्या दंडावर बुक्की मारली तर ती त्याला लागते. पण मनुष्य जेव्हां जाणूनबुजून दंड आवळून उभा राहतो तेव्हां, तो दंडावर बुक्क्या मारून घेणें हा एक प्रकारें खेळच करतो. या बुक्क्यांनीं उलट त्याच्या दंडाचे स्नायू घट्टच होतात. पिसें डकविलेलें चिंध्यांचें कोंबडें कोणीं अंगावर फेंकलें तर त्याची चोच लागेल म्हणून भिऊं नये. तर, "येऊं दे कोंबडें अंगावर, त्याचीं पिसें उपटून काढून तें सोंग मी उघडकीस आणीन" असें म्हणावें. आणि नवमतवादाची तपशीलवर चर्चा जेव्हां पुढें आपण करूं तेव्हां हें दिसून येईल कीं, कृत्रिम कोंबड्याच्या अंगावरचीं पिसें जशीं तेव्हांच काढतां येतात तशींच नवमतवादांतील कांहीं कांहीं मतें टिकणारीं नाहींत, चांगलीं असतील तीं टिकतील.

असो. दोष समजून सांगणाराचा किंवा समजून घेणाराचा यांपैकीं कोणाचाही असला तरी, आज नवमतवादाची चर्चा निर्विकार होत नाहीं आणि प्रस्तुतचा लेख लिहिण्याचा माझा हेतु अशी निर्विकार चर्चा व्हावी इतकाच आहे.

ज्याला नवमतवाद म्हणतात, त्याला तूर्त तरी पुष्कळसें सिद्धांतिक किंवा तात्त्विकच स्वरूप आहे. त्याचा प्रत्यक्ष व्यवहार किंवा अंमल होणें ही गोष्ट घडावयाची तरी ती दूरची असून, त्यापूर्वी अनेक कल्पनागम्य बिकट घटना घडून आल्या पाहिजेत. त्या घडून येतील तेव्हांच या नवमतवादांतील गुणांचा लाभ किंवा दोषांची हानि आपल्याला अनुभवावी लागेल. तूर्त 'दिल्ली तो बहोत दूर है' असें म्हणतां येण्यासारखें आहे, तथापि त्या दिल्लीला जाण्याच्या मार्गावर आपण असल्याकारणानें, ती दिल्ली आज

कशी आहे, किंवा आपण पोहोंचूं तेव्हां कशी असेल, याची माहिती मिळविणें व त्या प्रवासाचे सुखद मार्ग कोणते याचा तपास करणें, हें आपलें पहिलें काम आहे. मात्र हें बोलणें शंकित मनाचें दिसलें तरी, नवमतवादाचा अवतार पुढें कांहीं अंशांनीं व कांहीं स्वरूपांत होणार व तो आपणाला स्वीकारावा लागणार, याविषयीं प्रस्तुत लेखकाला मुळींच शंका नाहीं. सर्वच जग व त्याबरोबर आपण हिंदुस्थानचे लोकही प्रवाहपतित आहों प्रवाहाबरोबर वाहत जाऊं; ती कोणी प्रगति म्हणतील किंवा कोणी प्रतिगति म्हणतील, हें ज्याचें त्याचें मत झालें. वाहत जात असतां आपण योग्य तो प्रतिकारही करूंच. परंतु कालांतरानें हिंदी समाजाची आहे ही स्थिति टिकणार नाहीं, ती बदलेल. याविषयीं कोणाही विचारी मनाला शंका घेतां येणार नाहीं.

---

# २. कांहीं आक्षेप व उत्तरें

नवीन उदयाला येऊं पाहणारे कांहीं सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट कसे बोलतात व वागतात याचा उल्लेख मागें केला आहे. आणि ते नेहमीं देतात तें रशियाचें उदाहरणही किती भीतिप्रद वाटतें हें सांगावयास नको. पण कम्यूनिस्टांच्या भाषेच्या उग्रपणाचें प्रायश्चित्त तात्त्विक सिद्धांतांना लावणें योग्य नाहीं.

नवमतवाद्यांच्या तात्त्विक व व्यावहारिक कार्यक्रमाचें विवेचन पुढें करण्यांत येईलच. येथें इतकेंच सांगतों कीं, "अत्याचार किंवा घातपात यांच्याशिवाय या नवमतवादांतील विचारक्रांति जनतेच्या पदरांत पडली तर ती आम्हांला नको" असें मात्र हे नवमतवादी म्हणत नाहींत !

म. गांधीं यांनीं 'अहिंसा' व्रताचा प्रचार करतांना असें म्हटल्याचें स्मरतें कीं, "हिंसेनें मिळणारें स्वराज्यदेखील मी टाकून देईन. तो रुधिरप्रदिग्ध भोग पापी असून यशाला जाणारा नाहीं." पण नवमतवादी लोक 'हिंसे'चें स्तोम अशा हटवादानें माजवीत नाहींत. ते इतकेंच म्हणतात कीं, अहिंसेनें आमचें ध्येय सिद्धीला गेलें तर तें सोन्याहून पिवळें, तें आम्ही टाकणार नाहीं." पण मनुष्यस्वभाव जगभर कसा आहे, हातची सत्ता घालविण्याच्या वेळीं मनुष्य खळखळ कशी करतो, आणि दुसऱ्याला अत्याचारी म्हणत असतां स्वत: अत्याचार करण्याला तो किती तयार असतो, हें माहीत असल्यानें नवमतवादी इतकेंच म्हणतो कीं, "अहिंसेनें मिळालें तरी वाहवा, हिंसा करून मिळवावें लागलें तरी वाहवा. पण जें मिळवावयाचें तें मिळविण्याचा आमचा निश्चय मात्र अढळ आहे."

रशियांत घडलेल्या गोष्टींची आठवण हिंदुस्थानांतले लोक अजून विसरले नाहींत. पण ते असा विचार करीत नाहींत कीं पूर्वीं जेव्हां राजसत्ता प्रबळ होती तेव्हां अत्याचार किती झाले? तसेंच लक्षावधी लोक नाहक बळी देणारें गेलें महायुद्ध हें कोणाच्या महत्त्वाकांक्षेमुळें झालें? राजे लोकांच्या कीं जनतेच्या? आज कम्यूनिझमच्या विरुद्ध लढाई करणाऱ्या हिटलरच्या राज्यांत किंवा मुसलोनीच्या राज्यांत जुलूम व अत्याचार हे काय थोडे होतात? गुलामगिरीच्या पूर्वीच्या युगांत मालकांनीं गुलामांना कसें काय वागविलें? हिंदुस्थानांतल्या आमच्या संस्थानांत काय स्थिति होती व आहेही! तात्पर्य, ज्यांच्या हातीं राजसत्ता होती त्यांनीं ती राखण्याकरितां किंवा गाजविण्याकरितां जर अत्याचार केले, तर ज्यांना ती राजसत्ता मिळवावयाची ते "आम्ही शांततेचींच साधनें वापरूं" अशी शपथ कशी घेतील? "विषारी डांस गुलाबपाण्यानेंच मारूं, फ्लिट वापरणारच नाहीं," अशी कडक शपथ ते कां घेतील?

याचा आमचा अर्थ 'कम्यूनिस्टांचे अत्याचार समर्थनीय आहेत' असा मुळींच नाहीं! त्रिवार नाहीं नाहीं नाहीं! पण म्हणणें इतकें कीं सोशियालिस्ट–कम्यूनिस्ट यांच्या तत्त्वांचा व सिद्धांतांचा विचार करतांना, तें समजून घेतांना, त्यांच्या हातून घडणारे अत्याचार डोळ्यांपुढें आणून कोणीं आपली दृष्टि दूषित करूं नये. अत्याचारांना योग्य तीं नांवें ठेवीतच का

होईना पण, अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांच्या निर्भेळ दृष्टीनें आणि जगाचा जुना इतिहास लक्षांत घेऊन, निदान त्यांच्या सिद्धांतांची छाननी करण्याला तयारी दर्शविणें हेंच न्यायाचें होईल. अशा निर्भेळ दृष्टीनें त्यांच्या सिद्धांतांतील दोष दाखविले जातील तेच खरे दोष. असे दोषही कांहीं थोडे नाहींत. आणि खरी वादभूमि या सिद्धांतांचे गुणावगुण व शक्याशक्यता हीच होय.

बरें, कांग्रेस क्रीडच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या दृष्टीनें, कांग्रेसनें व प्रत्येक कांग्रेसवाल्यानें, म्हणजे ज्याला परकी सत्ता या देशांत नको त्यानें, खालीलप्रमाणें मनाचें समाधान करून घेण्याला काय हरकत ? प्रथम देश स्वतंत्र केल्याशिवाय सोशियालिस्टांना-कम्यूनिस्टांना आपली नवी योजना प्रस्थापित करतां येत नाहीं खास. मग आधीं हिंदुस्थानच्या लोकांना राजकीय स्वातंत्र्य तर मिळूं दे, मग पाहतां येईल ! दशरथाला पुत्रशोकाचा शाप झाला तेव्हां तो म्हणाला असेल कीं, " हा शाप नसून मला निपुत्रिकाला ही अर्धी अधिक इष्टापत्तीच आहे. आधीं पुत्र होईल मग पुत्रशोक होईल ! " मार्कंडेयाच्या बापाला असाच शाप होता; पण पुढें ईश्वराच्या कृपेनें तो पूर्णायुषी झाला कीं नाहीं ? सावित्रीनें अल्पायुषी वर प्रथम स्वीकारून मग त्याला यमपाशांतून सोडविलाच कीं नाहीं ? तात्पर्य, भांडवलशाहींतल्याही, पण खऱ्या स्वातंत्र्यवादी लोकांना कम्यूनिझमला आज सुरुवातीलाच हरकत घेण्याचें कारण दिसत नाहीं, गरिबांविषयीं तर बोलायलाच नको. त्यांना कम्यूनिझम केव्हांही इष्टच ! पण त्यांनीं देखील थोडी सबूर करावी. भांडवलशाहीच्या मरणाआधीं तिचें सरण रचून सुतकी पोषाक धारण करूं नये.

सोशियालिझमच्या गुणदोषांची चर्चा करण्याला लागण्यापूर्वी सोशियालिझमचा प्रश्न इतका नेटाला लागण्याचीं कारणें काय आहेत याचा विचार कोणासही प्रथम करावा लागेल. आणि मग वाटेल तर त्यानें म्हणावें कीं, (१) हीं कारणें खरीं नाहींत. (२) त्यांना दुसरी बाजू आहे. (३) शिवाय कारणें खरीं म्हटलीं तरी सोशियालिझम हाच खरा उपाय आहे असें ठरत नाहीं. त्यानें म्हणावें कीं (४) कारणें खरीं असून तीं नैसर्गिक असलीं तर त्यांचा परिहारही नैसर्गिक रीतीनें होऊं शकतो.

या चौथ्या उत्तरापुरतेंच प्रथम पाहूं. बाकिच्यांचा विचार थोडा

अधिक विस्तृत करावा लागेल. या चवथ्या उत्तराविषयीं विरोधी पक्षाचें म्हणणें असें:—"सृष्टिक्रम दिसतो असाच आहे. आणि यांतील मुख्य तत्त्व म्हटलें म्हणजे प्रतिक्रियेचें. आजची स्थिति ही आज वाईट ठरो. पण ती प्रथम निर्माण होण्याला सुरुवात झाली तेव्हां प्रतिक्रियारूप सुधारणा म्हणूनच ती पुढें आली. मग आजच्या स्थितींत जर कांहीं दोषांची अतिशयोक्ति झाली असेल तर फिरून रीतीप्रमाणें त्या विरुद्धही प्रतिक्रिया होईलच. तीं करणें हें देशादेशांतील प्रातिनिधिक व सत्ताधारी पार्लमेंट, विधिमंडळें, यांचें कामच आहे. सोशियालिस्टांनीं हें काम त्या मंडळांकडून करवून घ्यावें."

पण याला सोशियालिस्ट–कम्यूनिस्ट जें उत्तर देतात तें असें :— "हीं पार्लमेंट व विधिमंडळें आतां या सुधारणेच्या कामाला नालायक ठरलीं आहेत. त्यांचा साधा कार्यक्रम पाहिला तरी तो इतका विलंबाचा, जिकीरीचा व कंटाळवाणा असतो कीं कोणीही सुधारणावादी त्यापुढें हात टेकतो व म्हणून निराश होतो. विधिमंडळाचा कार्यक्रम म्हणजे कायद्याचीं बिलें पुढें आणणें, त्यांची सिलेक्ट कमिटयांकडून चर्चा करणें, त्यांवर लोकमत अजमावणें, त्यांचे दुरुस्त मसुदे तयार करणें, त्यांची ठराविक दोनतीन काय असतील तीं वाचनें होणें, विरोधी पक्षानें उभारलेल्या उपसूचनांचीं अरण्यें तोडणें, बहुमत मिळविणें, गफलत न होऊं देणें व शेवटीं राजाची संमति मिळविणें—या चक्रव्युहांतून कोणतेंही खाजगी बिल शिरसलामत बाहेर पडणें अशक्य होतें. अनुकूल प्रयत्न करणारे बेदम होतात, उलट विरोध करणें ही एक कला किंवा खेळ ठरून विरोधक लोकांना तो पूर्णपणें रंगवितां येतो."

"आणि अशीं सुधारणेचीं बिलें स्वतः सरकारनेंच तयार करून मांडावीं म्हटलें तर तिकडूनही अडचण अशी कीं, सरकार हा एक शब्द झाला तरी प्रधानमंडळ हें दहाविसांचें मिळून बनलेलें असतें. त्यांच्यामध्यें तत्त्वाची, तपशिलाची व धोरणाची एकवाक्यता होईल तेव्हां तें स्वतःचें म्हणून बिल पुढें आणणार. पण हें होईतों दरम्यान दुसरेंच कांहीं तरी एखादें चित्ताकर्षक, चिंताजनक, किंवा घालमेलीचें परराष्ट्रीय राजकारण उपस्थित झालें म्हणजे, घरचा सर्व मामुली कारभार करण्यावर

प्रधान मंडळाची दिखाऊ हालचाल संपून जाते. आणि सर्व वेळ लक्ष व गुप्त कारवाया या पाहुण्या आगंतुकाच्या परामर्शाकडे खर्च होतात. रस्त्यांतील एकादी ओरड किंवा हूल कानावर आली म्हणजे घरांतील सर्व मुलामाणसांना दटावून " गप्प बसा रे ऐकूं दे काय आहे तें " असें म्हणून घरधनी त्यांना थांबवितो. त्याप्रमाणें परराष्ट्रीय राजकारणाची ओरड किंवा हूल उठली कीं, देशाभिमानाच्या नांवाखालीं प्रधानमंडळ आपल्या प्रतिपक्षालाही गप्प बसण्याविषयीं विनंति करतें; व प्रतिपक्षीहि स्वतःला देशाभिमानी म्हणविणारे असल्यामुळें दाक्षिण्यबुद्धीनें त्यांना ती विनंति मान्य करावी लागते. इतक्यांत प्रधानमंडळाचा एखाद्या बाबतींत पार्लमेंटरी पराभव झाला म्हणजे त्याला राजीनामा देण्याचें, व नवीन निवडणुका करविण्याचें, निमित्त सांपडतें. त्यामुळें एक नवीनच खळबळ उत्पन्न होऊन जुन्या प्रश्नांचे धागेदोरे सगळे तुटून जाऊन प्रयत्नानें ते पुन जोडावे लागतात.

" प्रत्यक्ष नवीन निवडणुकीच न झाल्या तरी प्रधानमंडळाचा अधिकार खरोखरच कसा औटघटकेचा असतो हें फरान्समध्यें आज अनेक वर्षें दिसून येतच आहे. आणि नव्या निवडणुकी म्हणजे नव्या सृष्टीची मुळापासून उत्पत्ति असा शास्त्रार्थ असला तरी, जी नवीन सृष्टिरचना नव्या निवडणुकीनंतर होते तीही ' धाता यथा पूर्वं अकल्पयत् ' या सूत्रानुरूपच होते. मजूरवर्ग कनिष्ठवर्ग यांना विलायतेंत मतदारसंघाच्या पटावर इतकें प्रचंड बहुमत आहे कीं, त्यांच्या वांट्याला पार्लमेंटांतील सुमारें दोनतृतीयांश जागा याव्या ! म्हणजे वाटेल तें करण्याला बहुमत कायमचें सिद्ध व्हावें ! पण युद्धानंतर या वर्गाला प्रधानपदाचा अधिकार व बहुमताचें पाठबळ एकदांच लाभलें व तेंही फार दिवस टिकलें नाहीं. या अशाच एका उलथापालथींत, हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणांचें वांग्याचें भूत किंवा गणपतीचें माकड गोलमेज परिषदेंत कसें झालें, याचा अनुभव आलाच आहे. पण हिंदुस्थानचें नांव कोणीं घेतलें म्हणजे सर्व अनुदार पक्षांनीं एकवटून आवळून बसावें ही सोज्वळ सूचना जशी परिणामकारक ठरते, तशीच सोशियालिझम कम्यूनिझम यांचें नांव, किंवा उलट हिटलर मुसलोनी यांच्या फॅसिझमचें नांव घेतल्याबरोबर वरील सूचनाही तशीच परिणामकारक होते, अशा

रीतीनें परराष्ट्रीय व साम्राज्यशाही राजकारणाच्या नगाऱ्यापुढें राष्ट्रांतील आर्थिक, सामाजिक सुधारणेची टिमकी कोणासही ऐकूं येईनाशी झाली आहे• सोशियालिझमचा प्रश्न आज नेटाला लागण्याचें खरें कारण हें आहे. "

अशा रीतीनें, सामोपचारवादी—म्हणजे शांततेच्या मार्गानेंच आणि पार्लमेंटरी पद्धतीनें हव्या त्या सुधारणा राष्ट्रांत घडवून आणाव्या असें म्हणणाऱ्या—एकाच पक्षांतील दोन लोकांचें उलटसुलट म्हणणें काय हें सांगितलें. अर्थात् सामोपचाराची आशा सुटली म्हणजे बंड किंवा क्रांति हा उपाय कोणालाही सहज सुचतो. मग तो केव्हां व कसा अंमलांत यावयाचा तो येवो ! पण क्रांति म्हटली तरी प्रायः तिला दोन तोंडें असतात. तीं दोन तोंडें विरुद्ध दिशेला वळलेलीं असतात. पण मौज ही कीं, दोहों-नाही एक गोष्ट समान साधारण असते, ती ही कीं, पार्लमेंटरी राज्य-पद्धतीला कुलूप लावून तिची किल्ली एका हातांत व धार लावलेली तरवार दुसऱ्या हातांत अशा झोटिंगशहाचा अवतार दुतोंडया क्रांतींतून उभा राहतो• " सामाजिक, आर्थिक सुधारणा पार्लमेंटच्या हातून होत नाहींत म्हणून तिला बाजूला ठेवून जनतेच्या हिताकरितां एकतंत्री अंमल गाजवून त्या सुधारणा घडवून आणूं या " असें एकाचें म्हणणें ; आणि दुसऱ्याचें म्हणणें असें कीं, " तुम्ही अशी क्रांति कराल तर तुमचा सारासार विचार सुटेल, तुम्ही शक्तिमदानें बेभान व्हाल, योग्य मर्यादांचें अतिक्रमण कराल, लोकांना हव्या त्या सुधारणा करून न थांबतां फार पुढें जाऊन लोकांना नकोत किंवा त्यांना पचणार नाहींत अशाही सुधारणा तुम्ही जुलमानें त्यांच्यावर लादाल, म्हणून आधींच खबरदारी घेऊन, जनतेच्या हिताकरतांच पण तिच्या हातचें पार्लमेंटरी कारभाराचें खेळणें तूर्त काढून घेऊन, एकतंत्री कारभार चालविण्याला झोटिंगशहा उभा करूं या. तुमचा सामोपचार सुटला तर आमचाही सुटेल. तुम्ही क्रांति करूं पाहाल तर आम्हीही उलट बाजूनें क्रांति करूं. कारण क्रियेला प्रतिक्रिया हेंच योग्य उत्तर ठरतें. "

पण अशा या उत्तरप्रत्युत्तरांत, मूळच्या म्हणजे सोशियालिझमच्या रास्त गाऱ्हाण्यांची कांहींच तड लागत नाहीं म्हणून क्रांति करणारे क्रांतीचा उद्योग काय करावयाचा तो करीत राहीनात का ? त्यांना कोण थांब-विणार ? पण तात्त्विक विचार करणें, योग्यायोग्य ठरविणें हें तुम्हां आम्हां

सामान्य माणसांना, म्हणजे ज्यांना कोणत्याच बाजूची क्रांति इष्ट वाटत नाहीं त्यांना साधतां येण्यासारखें आहे. रशियांत क्रांति झाली; आणि स्पेनमध्यें होऊं घातली आहे; पण इतक्यांतच उलट युरोपांतील सहा कोटी प्रजा या सबबीवर पार्लमेंटरी पद्धतीला मुकून झोटिंगशहांच्या हातीं गेली आहे. फरान्स आज शें-दीडशें वर्षें रिपब्लिक राज्यपद्धतीचा अंमल करीत असतां सोशियालिस्ट मताचें असें पहिलें प्रधानमंडळ यंदांच नुकतें कोठें तेथें अधिकारारूढ झालें. विलायतेंत पार्लमेंटमध्यें बिचारा एकच सच्चा कम्यूनिस्ट मॅक्सटन दिसतो, तर उलट पार्लमेंटबाहेर ओस्वाल्ड मॉस्लेसारखा एखादा फॅसिस्ट, फॅसिझमची घोषणा आतांच करूं लागला आहे.

क्रांतीची ही अशी स्थिति खुद्द इंग्लंडांतच असल्यामुळें, हिंदुस्थानांत क्रांति घडून येणार केव्हां व ती घडवून आणणार कोण याचा विचार करण्याचें आज कारणच नाहीं ! सोशियालिझम, कम्यूनिझम या शब्दांचा नुसता उच्चार हल्लीं कोठें हिंदुस्थानांत होऊं लागला आहे, तोंच एकीकडून सरकार व दुसरीकडून खुद्द कांग्रेसही त्या मताला विरोध करावयास पुढें आली आहे. अशा या झुंजांतून सोशियालिझम–कम्यूनिझमचें मत म्हणे वाढणार ! तें आपल्या देशांतील बहुसंख्य शेतकरी वर्गाला पटणार ! त्यांचे प्रतिनिधी कांग्रेसवाल्यांना जिंकणार ! किंवा अशस्त्र, सशस्त्र, निःशस्त्र, असे बंडाला उभे राहून क्रांति करणार ! स्वराज्य मिळवणार ! आज ज्याला खाजगी मालकीच्या सनातन संवयीमुळें टीचभर शेत–जमीनीचा तुकडा हा जो गळ्यांतल्या मंतरलेल्या सोन्याच्या ताईतासारखा वाटतो तो ताईत आमचा शेतकरी आपल्या हातानें तोडून फेकून देणार ! आणि कम्यूनिझमचें नवें क्रांतिकारक तत्त्वज्ञान पटवून घेऊन आर्थिक व्यवहारांत सामुदायिक समाजसत्ता निर्माण करणार ! ही गोष्ट कल्पनागम्य व प्रतिभारम्य असली तरी ती फार दूरची वाटत नाहीं काय? ती घडून येण्यापूर्वीं लोकमतांतील समुद्राच्या जागीं कोरडीं वाळवंटें आणि घाटमाथ्यावरील अरण्याच्या जागीं समुद्र व्हावे लागतील. अशा स्थितींत भावी अभाविताचा विचार करण्यापेक्षां जगांतल्या व हिंदुस्थानांतल्या सिद्ध आर्थिक स्थितीची चिकित्सा निर्विकार मनानें करणें हें जितकें सुलभ तितकें श्रेयस्करही ठरणार नाहीं काय?

# ३. थोडेंसें हेतुसंशोधन

सोशियालिझमचा जन्म कशांत झाला असेल ? व्यक्तिस्वार्थांत कीं परार्थबुद्धींत ? याचें उत्तर परार्थबुद्धींत असेंच दिलें पाहिजे. सोशियालिझम हें एक तत्त्वज्ञान आहे. समाजशास्त्रांतर्गत अर्थशास्त्रांतलें का होईना पण तें तत्त्वज्ञानच. आणि कोणत्याही तत्त्वज्ञानाचा जन्म कोणाही व्यक्तीच्या स्वार्थांत झालेला तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत आढळत नाहीं.

अद्वैत खरें कीं द्वैत खरें कीं विशिष्टाद्वैत खरें ? याचें कोणतेंही उत्तर खरें ठरलें तरी त्यामुळें कोणाच्याही खिशांतला एक रुपया जात नाहीं कीं येत नाहीं. जी गोष्ट तत्त्वज्ञानाची तीच भौतिक विज्ञानाची. सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरतो, किंवा पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, यापैकीं कोणतेंही खरें ठरलें तरी त्यापासून कुणाचा स्वार्थ साधला ? किंवा बिघडला ? कदाचित् कोणी असें म्हणूं शकेल कीं, पृथ्वी ही सूर्याभोंवतीं फिरते असें ठरल्यानें पृथ्वीला कमीपणा येतो. म्हणजे पर्यायानें पृथ्वीवर राहणाऱ्या, आणि ईश्वराचे सर्वांत लाडके म्हणवून घेणाऱ्या आम्हां मानवांना कमीपणा येतो. पण येथें स्वार्थाचा संबंध दिसला तरी त्या स्वार्थाची व्याप्ति पृथ्वीएवढी तरी मोठी खरी ! कोणच्या साडेतीन हात देहाएवढीच नव्हे !

आतां अर्थशास्त्रांतलें तत्त्वज्ञान मात्र कदाचित् इतकें निरपेक्ष म्हणतां येणार नाहीं. सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरतो हें खरें किंवा खोटें ठरविण्यांत संपत्तीचा कांहींच संबंध येत नाहीं; पण आर्थिक मालमत्ता ही खाजगी हक्कानें उपभोगतां यावी कीं ती सर्व समाजाची ठरावी यांत प्रत्यक्ष संपत्तीचा संबंध येतो कीं नाहीं ? होय येतो, तरी पण लक्षांत ठेवा, कीं आपण अगदीं प्रथमच जो प्रश्न उपस्थित केला त्याचें उत्तर असेंच द्यावें लागतें कीं, सोशियालिझमचा संबंध संपत्तीशीं येत असला तरी तो वाद उपस्थित करणाऱ्या व्यक्तीच्या स्वार्थाशीं आलेला नाहीं.

पण यावर असें म्हणतां येईल कीं यांत प्रत्यक्ष व्यक्तिस्वार्थच नसला तर कदाचित् वर्गाचा स्वार्थ असेल. आणि ज्यांत वर्गाचा तरी स्वार्थ आहे

तें तत्त्वज्ञान अगदींच निरपेक्ष म्हणतां येणार नाहीं. वाङ्मयकलेसंबंधानें अपटन सिंकलेअर म्हणतोच कीं नाहीं कीं, "होमरचें इलियड काय किंवा वाल्मिकीचें रामायण काय, तीं काव्यें लिहिणारा वर्ग वरिष्ठ वर्गाचा बडेजाव करणारा होता." तीं लिहिणाराला कोणा राज्यपदस्थ भांडवलशहानें किती रुपये बक्षीस किंवा किती गांव इनाम दिले याचा ठावठिकाणा सिंकलेअरला लागलेला नाहीं. पण तो इतकें तरी म्हणणारच कीं, वरिष्ठ वर्गाच्या तेजोबलानें-ऐश्वर्यानें डोळे दिपून गेलेल्या भाटचारणांनीं तीं काव्यें लिहिलेलीं आहेत. त्यांत राजवर्णनें खुलविण्याकरितां शब्दसंपत्ति किती ओतली आहे ती पाहा! पण त्या काळींही गरीब व दरिद्री लोक व दास्यसंबंधांत जखडलेले मजूर होते त्यांच्या दुःखाचें-आपत्तीचें वर्णन करण्याकडे एक शब्द तरी खर्ची पडला आहे काय ?

पण सोशियालिझमचा पुरस्कार करणारांमध्यें गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत अनेक प्रकारचे बुद्धिमान् लोक आजवर सामील झालेले आढळतील वर्गस्वार्थाचा आरोप लागू पडावयाचा तर केवळ गरिबांनींच गरिबांकरितां मागण्या केल्या असें दिसून यायला पाहिजे. पण तसें दिसून येत नाहीं. 'सोशियालिझम'चा एक निंदास्पद अर्थ असा कीं, "ज्यांच्याजवळ जें कांहीं तरी आहे तें सर्व लुबाडून घ्यायचें व ज्याजवळ तें मुळींच नाहीं, किंवा असलेंच तर फार थोडें आहे, त्यांना तें फुकट वांटून द्यावयाचें" हें जें तत्त्व त्याचें नांव सोशियालिझम! पण असलें निंदास्पद वर्णन हें खऱ्या सत्यसंशोधनाचें फळ होऊं शकत नाहीं. कारण सोशियालिझमच्या इतिहासांत असेंही आढळतें कीं, कित्येक सुखवस्तु अशाही विचारवंतांनीं त्याचा पुरस्कार केला आहे, तर उलट कित्येक स्वतः दरिद्री असणाऱ्या विचारवंतांनीं त्याला विरोध केला आहे! तत्त्वज्ञानाला व्यक्तिस्वार्थ किंवा वर्गस्वार्थ यांचा हेतु लावणें ही टीका ग्राम्य प्रकारची ठरेल.

रेमंड पोस्टगेट नांवाचा ग्रंथकार 'राज्यक्रांत्या कशा कराव्या' या पुस्तकांत म्हणतो—

"........It is not to the individual interest of any one of the devoted and long suffering propagandists; who keep the Socialist and trade union movements alive.

A'most any one of them could have done better for himself by turning his talents and energy to his own personal advancement. But socialism, the interest of the proletariat, has assumed for him the appearance of eternal truth, and he can do no other than struggle on its behalf."

[ How to make a Revolution P. 31 ]

पंडित जवाहरलाल किंवा श्री. मसानी किंवा पटवर्धन बंधु हे सोशियालिझमचा पुरस्कार करतात ते कांहीं बेकार आहेत व त्यांची चूल खोळंबली आहे म्हणून नव्हे. पण त्याबरोबर आपण हेंही म्हणावयास तयार झालें पाहिजे कीं, जर सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास किंवा सर फिरोज सेठना किंवा श्री. वालचंद हिराचंद हे सोशियालिझमला विरोध करीत असतील तर, तोही स्वतःच्या व्यक्तिगत किंवा वर्गगत स्वार्थाच्या क्षुद्रबुद्धीनें नव्हे. तर ते जेव्हां आपलें मत सांगतात तेव्हां एकंदरीनें समाजाचें हित व प्रगति लक्षांत घेऊनच स्वतःला वाटतें तें सांगतात, असें आपण कां न म्हणावें?

आज आपण सोशियालिझमचा पुरस्कार केला म्हणजे—फार काय संप केला सत्याग्रह केला म्हणजे—लगेच आपल्या पगारांत, रोजमुऱ्यांत वाढ होईल असें सामान्य गिरणमजूर व्यक्तीही समजत नाहीं. आणि मजुरांचा वर्ग म्हणून असला तरी त्या वर्गापैकीं ज्यांचे खिशांत उद्यां या चळवळीनें चार पैसे अधिक पडतील अशा निश्चित व्यक्तिहि त्यांच्या डोळ्यांपुढें असत नाहींत.

उद्यां श्रीमंतांना सर्वस्वीं लुबाडलें आणि त्यांची सर्व संपत्ति गरिबांना मिळून वांटली, तरी प्रत्येक गरिबाच्या पदरांत किती अधिक द्रव्यसंपत्ति पडेल आणि ती त्याला किती दिवस पुरेल हा हिशोब सामान्य समंजसपणा असणाऱ्या मजुराला भिकाऱ्यालाही कळण्यासारखा आहे. सुप्रसिद्ध कोट्याधीश रॉकफेलर याची एक मौजेची गोष्ट सांगतात ती अशी. सन १८४८ च्या बंडांत एकदां रॉकफेलरला दोघां प्रशियन दरोडेखोरांनीं गांठलें, व "तुझ्याजवळ काय असेल नसेल तें दे नाहीं तर तुझा जीव घेतों" अशी धमकी दाखविली. त्यांची थोडी थट्टा करावी म्हणून हजरजबाबी रॉकफेलर त्यांना म्हणाला, 'तुम्ही हें मजजवळ कोणत्या हक्कानें मागतां?' दरोडेखोर

म्हणाले, 'आम्ही लटारू म्हणून मागत नाहीं. समाजांत गरीब आणि श्रीमंत असा भेद असणें न्यायाचें नाहीं. आम्ही मागतों तें सोशियालिझमच्या तत्त्वाच्या आधारानें.' रॉकफेलर म्हणाला, 'तर मग मी तुम्हांस मजजवळ या क्षणीं आहे तेवढेंच देऊन भागणार नाहीं. माझी म्हणून जितकी संपत्ति आहे तितकी सर्वच्या सर्व मीं तुम्हांला देऊन टाकणें योग्य होईल. आणि सामाजिक न्यायाचीच गोष्ट सांगतां तर ती मी आनंदानें देईनही. पण तुम्हांला ती दिली तर तुम्ही तिचें काय कराल हें सांगा.' दरोडेखोरांनाही न्यायबुद्धीचा आविर्भाव आणूनच बोलणें प्राप्त झालें. ते म्हणाले, 'ती सर्व समाजाला वांटून टाकूं; सर्वांचाच सारखा हिस्सा तींत आहे.' रॉकफेलर म्हणाला, 'ठीक आहे. मजजवळ सहा कोटी डॉलर आहेत. आपल्या देशांत लोकसंख्या किती आहे?' दरोडेखोर म्हणाले, 'तीन कोटी असें ऐकतों.' रॉकफेलर म्हणाला, 'बरोबर. हे सहा कोटी डॉलर तीन कोटी लोकांत वांटले तर प्रत्येकाला दोन दोन डॉलरच वांटणीला येतील कीं नाहीं? घ्या तर मग हे दोन दोन डॉलर तुम्हा एकेकाला म्हणजे तुमची वांटणी पुरी झाली. बाकीचे लोक मजकडे मागावयाला येतील तेव्हां त्यांचें देणें मग मी देऊन टाकीन.'

रॉकफेलरच्या खिशांत त्या वेळीं शें–पन्नास डॉलर तरी सहज असणार हें माहीत असतांही, रॉकफेलरचा हा युक्तिवाद ऐकून हे सोशियालिस्ट दरोडेखोर बहुधा निरुत्तर झाले असावेत. पण या प्रसंगीं प्रत्यक्षांत काय घडलें याचा यापुढें जाऊन विचार करणें कदाचित् अरसिकपणाचें होईल. कारण प्रासंगिक दंतकथेंतील सत्याची सत्त्वपरीक्षा कोणीं करूं नये असें शास्त्रच आहे. तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें कीं, सोशियालिझमच्या तत्त्वानें राष्ट्रांतील संपत्तीचा हिशेब व वांटणी करण्याला कोणी बसलें तर, समतेचें तत्त्व व्यक्तिशः आणणाराला तें शेवटीं दगाच देईल; त्या वांटणींत येणाऱ्या रुपया आठ आण्यांच्या उबेवर जन्माची दारिद्र्याची हुडहुडी निभणार नाहीं, हें साधारण अक्कल असलेल्या सोशियालिस्टालाही माहीत असतें. आणि त्याला हें माहीत असतें हें आपणालाही पण माहीत असावें! तें माहीत असल्यावर सोशियालिझमच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारावर व्यक्तिस्वार्थाचा

आरोप तरी करण्यास आपण तयार होणार नाहीं. फार–फारच तर त्यास वर्गाचा स्वार्थ म्हणतां येईल.

पण वर्गाचा स्वार्थ सुटला आहे कोणाला ? आणि वर्ग झाला तरी तो समाजाचाच एक घटक किंवा ती एक समाजाचीच लहान प्रतिमा नव्हे काय ? स्वतः एकट्या एकेरी व्यक्तीचा स्वार्थ हाच काय तो नीतिशास्त्रांत दोषी ठरतो. तसला स्वार्थ नाहीं असें ठरलें म्हणजे मग, ज्याचा आपण अभिमान धरला तो वर्ग कितीही लहान असला तरी तो अभिमान दोषास्पद ठरत नाहीं. व्यापक क्षेत्र दृष्टीपुढें ठेवणें हें मानसिक औदार्याचें लक्षण असेल. पण एकंदर विश्वास व्यापील एवढी मोठी साम्यबुद्धि आजवर जगांत कोणालाही खरी लाभली असेल असें म्हणवतच नाहीं. जगभर सूर्यप्रकाश पडला असला तरी अखेर आपल्या दोन डोळ्यांनीं जेवढा आपणाला आंत घेतां येईल तितकाच तो आपला खरा. डोळे वटारले किंवा फाडले म्हणून कांहीं सगळा सूर्यप्रकाश त्यांत सामावणार नाहीं. उलट ईश्वरानें सबंध दोन डोळे दिले असतां ते नीट उघडून जगाकडे न पाहणें, जगाला इतका दृष्टिप्रसाद फार मोठा होतो म्हणून एक डोळा मिटून दुसऱ्याच्या एका कोपऱ्यांतून जगाकडे पाहणें, हा मात्र कृपणपणा होईल.

व्यवहारबुद्धीनें पाहिलें तर स्वार्थ व परमार्थ यांच्या दरम्यान परार्थ हा एक सोयीचा टप्पा माणसाला झेंपण्यासारखा असतो. आणि हें जें पर तें फक्त स्वतःच्या व्यक्तीपलीकडचें असलें म्हणजे पुरे तें आपल्या लगतच्या वर्गांतलें असलें तरी त्या परार्थ बुद्धीचें पुण्य परमार्थाच्या पुण्यासारखेंच भरेल. एकीकडे केवळ आत्मव्यक्तीचा अभिमान धरणें हा कृपणपणा ठरतो; तर ‘ हें विश्वचि माझें घर ’ असें म्हणणें निरर्थक भोंदूपणाचें अव्यवहार्य ठरतें. अशा वेळीं या दरम्यान जगांत, समाजांत जे निरनिराळे लहानमोठे गट किंवा वर्ग असतात त्यांशीं तादात्म्य पावन, संकुचित कां होईना पण तितकी परार्थपर बुद्धि मनुष्यानें प्रगट केली, तर त्याला कोणीं नांवें ठेवूं नयेत. त्यानें तें सगळ्या समाजाचेंच हित पाहिलें असें ठरतें.

पण सोशियालिस्ट लोक म्हणतात त्याप्रमाणें येथून तेथून सर्व इतिहास म्हणजे वर्ग ‘कलहा’चें चरित्र हें म्हणणें मात्र शास्त्रशुद्ध नाहीं. निदान इतिहासाचा अर्थ केवळ तसा असल्याचें मी मानीत नाहीं. सृष्टींत प्रेम आधीं व द्वेष

नंतर असाच भावनांचा क्रम लागत असल्याकारणानें, इतिहासाला वर्ग-कलहाच्या तामस गुणाचें चरित्र म्हणण्यापेक्षां वर्गप्रेमाच्या, वर्गाभिमानाच्या; राजस गुणाचें चरित्र म्हटलें तर तें अधिक यथार्थ वाटतें. कोणत्याही मनुष्यामध्यें परार्थ साधण्याची शक्ति मर्यादितच असणार म्हणून, ती त्यानें कोठें खर्चावी या अवघड प्रश्नाचें उत्तर माझ्या मतें असें आहे कीं, ज्या ठिकाणीं त्याच्या निःस्वार्थी बुद्धीप्रमाणें ती शक्ति अधिकांत अधिक सुलभप्रद होईल तेथेंच पाय रोंवून त्यानें ती खर्च करावी. म्हणजे त्यानें आपलें कर्तव्य केलें अशी भरणापावती त्याला मिळूं शकेल.

या तत्त्वाला अनुसरूनच जगांतला व्यवहार आज घडत असल्याचें दिसतें. आपणाभोंवतीं जात्यभिमान किती पसरला आहे हें आपण पाहा-तोंच. पण ती प्रथम जातिप्रेमाची खूण आहे ! जातिद्वेष हें त्याला दुसरें नांव प्रतियोगित्वामुळें मिळतें हें खरें. पण जो ग्रंथ जातिप्रेमाच्या सांकेतिक लिपीच्या गुरुकिल्लीनें समग्र सान्वय सार्थ लावतां येतो, तो लावून समजून घेण्याला जातिद्वेषाची किल्लीच कां लावावी हें कळत नाहीं. दुसऱ्याचें वाईट केल्यानें आपलें चांगलें होतेंच असें नाहीं, तर आपलें चांगलें करण्याच्या विधायक प्रयत्नानेंच झालें तर आपलें अधिक चांगलें होतें, हें सामान्य विचारी माणसाला कळण्यासारखें आहे.

जगांतील विषमतेचा द्वेष केल्यानें कलह माजून एकवार प्रळय करतां आला तरी, त्यानंतर जी नवी सृष्टि पुन्हां उत्पन्न होईल तींत पुन्हां वैषम्य निर्माण होणारच नाहीं अशी खात्री कोण देऊं शकेल ? तेव्हां सुवर्णयुगाच्या या असाध्य गोष्टीवर सर्व भर देऊन द्वेषाच्या तामस गुणाचें पाप पदरीं पाडून घेण्यापेक्षां, प्रेमाच्या अभिमानाचें, राजस गुणाचें पुण्य पदरीं पाडून घेतलेलें काय वाईट ? सोशियालिस्ट वगैरे लोकांना माझें मनापासूनचें सांगणें असें आहे कीं, त्यांनीं आपल्या तत्त्वांचा प्रचार करितांना, वर्गकलहाच्या निशाणाचा हत्ती आघाडीला चालवून तो प्रचार करूं नये. त्या निशाणा-वर वर्गप्रेमाचें चिन्ह त्यांनीं रंगवावें. त्यानेंही तेच कार्यभाग होण्यासारखा आहे. प्रेम व द्वेष, अभिमान व दुःस्वास या दोन्ही जरी प्राथमिक भावना असल्या तरी प्रारंभ प्रेमापासून व अभिमानापासून होतो; म्हणजे या प्रेमाचा किंवा अभिमानाचा विघात होण्याचा प्रसंग नक्की येईल

तेथेंच तदितर भावना अनुभवाला येतात आणि कार्य करूं लागतात. जगाच्या इतिहासाचा अर्थ कार्ल मार्क्स यानें 'वर्गकलहाच्या' दृष्टीनें लावला असला तरी स्वतः त्याच्या मनांत मजूर वर्गाविषयींचें प्रेमच श्रीमान वर्गाच्या द्वेषापेक्षां अधिक व आधींचें असेल असें मला तरी वाटतें. महानुभावित्व हें केवळ द्वेषानें ग्रासलेल्या मनुष्याला लाभणें शक्य नाहीं; प्रेमानें व्यापलेल्या माणसालाच तें अधिक सुलभतेनें मिळेल. नुकतीच व्यालेली मांजरी किंवा गाय प्रथम आपल्या मुलांना प्रेमानें स्तनपान देण्यांत गर्क असते. तिच्या स्वत्वाचा यज्ञ करणें हा तिचा पहिला सात्त्विक उद्योग असतो. आणि त्या पिलांना कोणी हात लावून इजा करण्यास आला असें त्या मातांना वाटेल तेव्हांच त्या आपलीं नखें किंवा शिंगें बाहेर काढतात! कार्लचें तत्त्वज्ञान वर्गकलहाच्या विषारी रंगानें रंगविणारे भाष्यकार त्याच्या अभिजात भूतप्रेमाला अन्याय करतात असें मला वाटतें. असे अनेक समंजस सोशियालिस्ट किंवा कम्यूनिस्ट आढळतात कीं ते आपलें काम दुःखितांचें दुःख आळवूनच अधिक पार पाडण्याची आकांक्षा धरतात आणि हें दुःख निवारण्याकरितां क्रांति घडून आली पाहिजे असें ते म्हणत असले तरी क्रांति घातापातानें–युद्धानेंच मिळविली पाहिजे व मिळवूं असें ते म्हणत नाहींत. शांततेनेंही ती मिळूं शकेल व तसाच प्रयत्न आम्ही प्रथम करूं असें ते म्हणतात. आणि तोच मार्ग अधिक श्रेयस्कर असें कोणीही म्हणेल.

---

# ४. कांहीं शब्दांचा अर्थ

या विषयावरील पहिल्या तीन प्रकरणांत अगदीं प्रास्ताविक असे कांहीं थोडे विचार मीं मांडले, व हें दर्शविलें कीं कोणाचे कितीही गैरसमज

असले व त्या गैरसमजांना दुतर्फी कारणें कोणतींही असलीं, तरी सोशियालिझम व कम्यूनिझम या विषयाची निर्विकार चर्चा होण्याला खरोखर अडचण कांहींच नसावी, म्हणून त्या चर्चेला या प्रकरणापासून प्रारंभ करणार आहें. मी या विषयांतील तज्ज्ञ नाहीं ही भूमिका घेऊनच मी ती चर्चा करणार आहें. माझ्या चर्चेंत मांडलेल्या गोष्टी व मतें याला दुसरी बाजूही असणार असें मी गृहीत धरूनच चाललों आहें. आणि माझी ही चर्चा संपल्यावर ती बाजू कोणा तज्ज्ञानें मांडल्यास मला आनंदच होईल. कारण या लेखनाचा माझा हेतु या विषयाची चर्चा होऊन त्याविषयींचीं साधक-बाधक प्रमाणें वाचकांच्या नजरेसमोर यावीं हाच आहे.

या पुस्तकाला ' तिरंगी नवमतवाद ' असें नांव दिलें आहे. याचें कारण या नवमतवादाला तीन अंगें आहेत. एक राजकीय, दुसरें सामाजिक व तिसरें आर्थिक. नवमतवाद हें एक वाढतें झाड आहे. कोणत्याही झाडाला तिन्ही चारी अंगांनीं नव्या शाखा फुटत असतात. त्याचप्रमाणें या वादालाही त्या फुटूं पाहात आहेत. हा वाद मुख्यतः इंग्रजी वाङ्मयांतून इकडे येऊन प्रसृत होत असल्यामुळें, या नवमताच्या अनेक शाखांचे मिळून दोन मुख्य प्रातिनिधिक शब्द आहेत ते, इंग्रजी शिक्षण घतलेल्याच काय पण तें शिक्षण न घेतलेल्याहि मनुष्याच्या तोंडीं झाले आहेत. आणि जणूं काय त्यांचा अर्थ आपणाला पूर्णपणें समजला आहे अशा झोकानें तो त्या शब्दांचा सर्रास उपयोग करीत असतो. म्हणून प्रथम त्या दोन शब्दांचा अर्थ काय हें पाहूं.

या दोन शब्दांपैकीं ' सोशियालिझम ' हा शब्द अधिक व्यापक अर्थाचा, किंबहुना जातिवाचक आहे. आणि ' कम्यूनिझम ' हा संकुचित् अर्थाचा व व्यक्तिवाचक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रूढार्थानें सोशियालिझम हा शब्द जगांत आज अनेक देशांत पुष्कळ वर्षें स्वीकृत झालेल्या नवमतसिद्धांताचा वाचक आहे, तर कम्यूनिझम हा शब्द, तशाच रूढार्थानें, पण फक्त रशियांत आज प्रत्यक्ष अमलांत असलेल्या राज्यपद्धतीचा वाचक आहे. सोशियालिझम या शब्दाचें मराठी भाषांतर ' साम्यवाद ' ' समतावाद ' ' समाजवाद ' ' समाजसत्तावाद ' यांपैकीं वाटेल त्या शब्दानें ढोबळपणें

करण्यांत येतें. पण ' कम्यूनिझम ' या शब्दाला मराठी प्रतिशब्द अजून घडलेला नाहीं.

इंग्रजी शब्दकोशांत कम्यूनिझम या शब्दाची व्युत्पत्ति देतात ती अशीः 'कॉम' (मूळ लॅटिन कम्) म्हणजे सह, सहवर्तमान, बरोबर. आणि म्यूनिस् म्हणजे बद्ध किंवा मर्यादित. 'कम्' हा उपसर्ग आणि 'म्यूनिस्' हें नाम किंवा विशेषण एकत्र केलें म्हणजे ' एका बंधनानें बांधलेला, मर्यादित झालेला ' असा अर्थ होतो. हें बंधन म्हणजे सहजीवनाचें. हें 'सहजीवन' अर्थात् एकत्र राहण्यानें, काम करण्यानें, अनुभव घेण्यानें, उपभोग घेण्यानें, सहानुभूति दर्शविण्यानें, साहाय्य करण्यानें सिद्ध होतें. आणि युरोपांत फार प्राचीन काळापासून कॉम्यून नांवाची जी संस्था होती तिजमध्यें हें सहजीवन कसें सिद्ध होत असेल याची कल्पना, ग्रामसंस्थेचा पुरातनपासून अनुभव असलेल्या महाराष्ट्रांतील, आम्हां लोकांना यथार्थपणें होण्यासारखी आहे.

कम्युनिझमचा सिद्धांत गेल्या अठरा वर्षांत रशियांत झालेल्या प्रत्यक्ष प्रयोगानें आज जितका पुढें आलेला आहे तितका पूर्वी कधींही आलेला नव्हता. पण या सिद्धांताला पुरातन असें पूर्वचरित्रही आहे व तें पुढें योग्य ठिकाणीं सविस्तर सांगण्यांत येईलच. येथें इतकेंच सांगतों कीं सोशियालिझमची व्यापक कल्पना या कम्यून्सच्या कल्पनेवरून व अनुभवावरून मूळ सुचली व ती पुढें फारच विस्तार पावली.

वर सोशियालिझमचे चार मराठी प्रतिशब्द सांगितले. त्यांचे दोन गट पडतात. पहिल्या गटांत साम्यवाद व समतावाद हे शब्द येतात. यांतील साम्य व समता हे शब्द वस्तुतः एकाच अर्थाचे आहेत. त्या वादाचा मुख्य सिद्धांत असा कीं मनुष्यसमाजांत श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च–नीच, गरीब–श्रीमंत हा भेद उरूं नये. कोणत्याही एका देशांतलाच काय पण सर्व जगांतील मिळून मनुष्य समाज हा वर सांगितलेल्या कम्यूनच्या संस्थेप्रमाणें किंवा एखाद्या ग्रामसंस्थेप्रमाणें सर्वस्वी सहवासी, सहजीवी, सहानुभवी व समानाधिकारी असावा. जगांतील सर्व मालमत्ता ही या विश्वग्रामसंस्थेंतील लोकांची समाईक हक्काची समजली जावी व त्या संस्थेच्या अधिकारतंत्रानें त्या मालमत्तेचा उपयोग व उपभोग समाजांतील सर्व व्यक्तींना समानाधिकारानें व यथान्याय मिळावा.

मनष्यमात्रांत जन्मसिद्ध गुणभेद व शरीरभेद कांहीं असतील; त्याला नाइलाज आहे. त्या सृष्टिकर्मावर मनुष्यांना केव्हांहि नियंत्रण घालतां येत नाहीं. परंतु हे जन्मसिद्ध शरीरभेद व गुणभेद कितीहि व कसेहि असले तरी, मनुष्यत्व, माणुसकी म्हणून जें कांहीं तत्त्व आहे तें मनुष्यमात्राला समान असेंच आहे. म्हणन सृष्टिनिर्मित भेदांमध्यें मनुष्यनिर्मित कृत्रिम भेदांची भर तरी आपण घालूं नये.

एकंदर मनुष्यसमाजाविषयीं किंवा मनुष्य वंशाविषयींची दृष्टि इतकी व्यापक झाली म्हणजे मग व्यक्तिविषयक, कुटुंबविषयक, जातिविषयक, वर्णविषयक, वर्गविषयक प्रश्नांना सहजच गौणपणा येतो. तसेंच या साम्य सिद्धान्तांत समाजाच्या धार्मिक व सामाजिक बाजू सर्व येऊन जातात.

उरले दोन शब्द. समाजवाद व समाजसत्तावाद. त्यांचा अर्थ हा कीं मनुष्य समाजाच्या सहजीवनांतील हें साम्य किंवा ही समता पदरांत पाडून घेण्याचें जें साध्य, तें प्रत्यक्ष साधण्याचें साधन म्हणजे सर्व प्रकारची राजकीय सत्ता 'शासनशक्ति' 'दंडशक्ति' ही समाजाच्याच हातीं राहिली पाहिजे. आणि ती त्याला योग्य दिसेल त्या रीतीनें वापरण्याचा अधिकार असला पाहिजे. हल्लीं ज्या घटनेंत राजकीय सत्ता समाविष्ट असते त्याला आपण सरकार असें म्हणतों. राजकीय सत्ता गाजवील तें सरकार. आणि एकंदर समाज मिळून हें सरकार बनावें, आणि त्यानें समाजांतील व्यक्तीच्या पदरांत ही समता पाडावी, तर सर्व राजकीय सत्ता समाजाच्याच हातीं असली पाहिजे म्हणजे एक तर आधीं राजकीय दृष्टचा समाज हा स्वतंत्र व स्वयंशासित असा असावा, आणि त्याही समाजाची राजकीय सत्ता गाजविणें ती केवळ समाजाच्या नांवावर कोणी गाजवावी असें न होतां, सर्व समाजानें मिळून निवडून किंवा नेमून पसंत करून दिलेल्या अधिकाऱ्यांच्या हातून समाजाच्या आज्ञेप्रमाणेंच गाजविली जावी. वास्तविक सोशियालिझममध्यें समाज–जीवनाची व्यापक कल्पना इतकी स्वयंसिद्ध आहे कीं, सामाजिक व राजकीय हा भेद समाजाच्या अंगांतला म्हणून करण्याचें कारणच नाहीं. पण प्रत्यक्ष व्यवहारामुळें, हा भेद प्रथम करून नंतर तो भेद नाहींसा व्हावा असें सांगावें लागतें.

कसें तें पाहा. हिंदुस्थान हा एक देश समजला जातो. पण त्यांत

अनेक धर्मभेद व जातिभेद असल्यामुळें धार्मिक किंवा सामाजिक दृष्टचा-देखील त्याला अखंड समाज असें म्हणतां येत नाहीं. पण समाजांतील हा भेद विसरून जाऊन हिंदी लोक हे आपणाला एक अखंड समाज म्हणण्याला तयार झाले तरी, त्या समाजाचें फक्त सामाजिक जीवन तेवढें त्याच्या हातीं राहील. पण राजकीय जीवन हें पारतंत्र्यामुळें सर्वस्वी परक्या पांचसहा हजार मैल दूर असलेल्या एका समाजाच्या हातीं आहे. म्हणून हिंदुस्थानांत जर खऱ्या अर्थानें सोशियालिझम, म्हणजे संपूर्ण संयुक्त समाजजीवन, हिंदी लोकांच्या अनुभवाला यावयाचें तर प्रथम त्यांनीं राजकीय दृष्टचा स्वतंत्र झालें पाहिजे; आणि मग स्वतंत्र समाज-सत्ता चालवून हिंदुस्थानांतील धार्मिक व सामाजिक जीवनांत एकसूत्रता आणली पाहिजे.

यापुढचें उदाहरण इंग्लंडचें. त्यांतील जनता राजकीय दृष्टचा स्वतंत्र आहे. म्हणजे इंग्रज लोकांवर कोणा परकी लोकांचें राज्य नाहीं. त्यांची राजकीय सत्ता स्वयंपूर्ण आहे. परंतु या स्वकीय शासित देशांतही राजा व प्रजा हा भेद आहे. इतकेंच नव्हे तर श्रेष्ठवर्ग व कनिष्ठ वर्ग असा भेद आहे व तद्दर्शक दोन कायदेमंडळेंही आहेत. इंग्लंडांत लोकांनीं निवडून दिलेलें पार्लमेंट म्हणून असलें, तरी त्याला खरें प्रातिनिधिक स्वरूप नाहीं. खालच्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्यांचा बिघाड वरच्या कायदेमंडळाला करतां येतो. आणि दोन्ही कायदेमंडळांनीं मिळून कायदा केला तरी "मी त्याला मान्यता देत नाहीं" असें म्हणून राजाला तो कायदा धुडकावून लावतां येतो! यामुळें इंग्रज समाजाचें सामाजिक जीवन व राजकीय जीवन यांची समव्याप्ति होऊं शकत नाहीं. तसेंच संपत्तीच्या दृष्टीनें श्रेष्ठ व कनिष्ठ वर्ग इग्लंडांत आहेत. त्याप्रमाणें धर्मजीवनांतही सरकारी धर्मपंथ वेगळा व खाजगी स्वतंत्र धर्मपंथ वेगळे असा भेद आहे. जन्मसिद्ध जाति हिंदु-स्थानाप्रमाणें इंग्लंडांत नसल्या तरी, संपत्तिभेदानें बनलेल्या वर्गांत सामाजिक श्रेष्ठकनिष्ठ भावही दृग्गोचर होतो. आणि सोशियालिझमचें जें मुख्य तत्त्व म्हणजे देशांतील एकंदर मालमत्ता ही सर्व समाजाच्या मिळून मालकीची असावी, तें तर मुळींच नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचें स्तोम व त्याबरोबरच भांडवलशाहीचें स्तोम इंग्लंडाइतकें आज जगांत दुसऱ्या कोणत्याही देशामध्यें

माजलेलें आढळणार नाहीं. अशा रीतीनें सोशियालिझमच्या दृष्टीनें इंग्लंडचा नंबर, स्वातंत्र्यामुळ हिंदुस्थानच्या वर असला तरी, रशियाखालीं लागतो.

इंग्लंडच्या वरचा नंबर मिळालेले प्रजासत्ताक (रिपब्लिकन) देश आज युरोपांत बरेच आहेत, व अमेरिका ही तर आज दीडशें वर्षें पूर्ण लोकसत्ताक आहे. तथापि तेथेंही देशांतील सर्व मालमत्ता सरकारच्या मालकीची नाहीं. या दृष्टीनें या देशांचाही नंबर रशियाच्या खालींच लागतो. फक्त रशिया हा एकच देश असा आहे कीं, त्यांत सोशियालिझमचीं बरींचशीं तात्त्विक अंगें सिद्ध झालेलीं आहेत. पण तेथेंही अजून एक वाण आहे; ती ही कीं, खरी राजकीय सत्ता ही नांवानें समाजाची असली तरी, वस्तुतः एका विवक्षित व्यक्तिसंघानें आपल्या हातीं ठेवली आहे. ही सत्ता जनतेमध्यें संक्रमित करण्याकरितां, व एकतंत्रीपणाचें स्वरूप काढून टाकण्याकरितां, लोकसत्ताक राज्याचें प्रतीक म्हणजे जें पार्लमेंट तें स्थापन करण्याचा उद्योग हल्लीं रशियांत सुरू आहे. तो पूर्ण झाला म्हणजे आर्थिक व राजकीय या दोन्ही दृष्टींनीं रशियांतील समाज हा खराखुरा सहजीवी होईल.

पण सोशियालिझमच्या सिद्धांताचें अंतिम म्हणून आणखी एक स्वरूप उरतेंच. त्या स्वरूपांत सरकार हा शब्ददेखील उतरतां कामा नये. कम्यूनिस्ट रशिया झाला तरी त्यांत पूर्ण सामाजिक अद्वैत प्रतीत होऊं शकत नाहीं. कारण स्वातंत्र्याच्या ब्रह्माला 'सरकार' संस्थेची माया किंवा उपाधि जडलेली राहतेच. तीही उपाधि जेव्हां नष्ट होईल तेव्हांच रशियन समाजाला खऱ्या कैवल्याचा आनंद लाभेल. सोशियालिझमच्या अंतर्गत असलेल्या या अंतिम सिद्धांताला 'अनार्किझम' हें पारिभाषिक नांव आहे. या 'इझम'मध्यें सरकाररूपी संस्था, म्हणजे जनतेवर राजकीय नियंत्रण घालणारी संस्था, अखेर वाळून वाळून सुकून सुकून अदृश्य व्हावी असें मत प्रतिपादिलेलें असतें. गर्भाच्या संरक्षणाकरितांच कां होईना पण त्यावर 'वारेचें' वेष्टन असतें. पण तें वेष्टन निघून गेलें म्हणजे मगच प्राणिमात्राचा खरा जन्म होतो असें मानतात. त्याप्रमाणें एकंदर समाज हा व्यक्तिदृष्ट्या अनियंत्रित पण समाजदृष्ट्या संघटित असा बनला म्हणजे सोशियालिझमचें परमोच्च ध्येय सिद्ध झालें.

असो. अशा रीतीनें कम्यूनिझम, व विशेषतः रशियांत प्रकट झालेला

कम्यूनिझम, हा सोशियालिझमचा एक गुणविशिष्ट प्रकार आहे. पण सोशियालिझमच्या सिद्धांताप्रमाणें देश व राष्ट्र या मर्यादा कृत्रिम असून एकंदर मनुष्यसमाज हेंच एक अखंड कुटुंब ठरतें. आणि तें खरेंच आहे. कारण जगांत आज छपन्न देश आहेत पण त्या सर्वांतून आपण हिंडलों तर सृष्टीनें घालून दिलेली अशी मर्यादा त्यांच्यामध्यें कोठेंच आढळणार नाहीं. ती मर्यादा बोलून चालून कृत्रिम. म्हणूनच ती दर्शविण्याकरितां हद्दीचे दगड किंवा लांकडी पाटद्या लावाव्या लागतात. किंवा सरहद्दीवर तारेचीं कुंपणेंहि घालावीं लागतात. हे दगड, या पाटद्या व हीं कुंपणें काढून टाकून सरहद्दीच्या या कृत्रिम खुणा, रेघा पुसून टाकल्या, म्हणजे पृथ्वीवरचा एकंदर मनुष्यसमाज हें एक अविभक्त कुटुंबच ठरणार नाहीं काय ? आणि हें विश्वकुटुंब एखाद्या कम्यूनप्रमाणें म्हणजे ग्रामसंस्थेप्रमाणें सर्वस्वीं सहजीवी करावें, बाहेरील सरहद्दीप्रमाणेंच आंतील धर्म, पंथ, ‘ जाती, वर्ग यांच्यांतील सरहद्दीही नाहींशा कराव्या, आणि सर्व पृथ्वीवर कम्यूनिझम हा एकच मनुष्यधर्म चालू करावा अशी आकांक्षा रशियन कम्यूनिस्ट लोकांनीं बाळगली आहे.

तथापि रशियाबाहेर सर्वत्र पसरलेली भांडवलशाही व वर्गभेद आपल्या रशियांतील कार्याला देखील अप्रत्यक्षपणें विरोधी व विघातक ठरतात. येवढ्याकरितांच बाहेरच्या जगावर आक्रमण करावें असें नाहीं, तर कम्यूनिझमचें जें उच्च ध्येय आमच्या मनांत उदित झालें आहे, व ज्याचा लाभ आपण आज रशिअन जनतेला करून दिला आहे, तें परमोच्च ध्येय गुरु होऊन सर्व जगाला शिकवावें व त्याच्या हातून तें प्रत्यक्ष अमलांत आणावें अशी उमेद रशिअन कम्यूनिस्ट आज बाळगून आहेत. सर्व पृथ्वी ही अखंड व अविभाज्य मानली पाहिजे, राष्ट्रांच्या नांवानें तिजवर स्थलमर्यादा घालणें म्हणजे जिवंत शरीराचे तुकडे करण्यासारखें आहे, ही विचारसरणी उच्च तत्त्वज्ञानाच्या पायरीवर बसण्यासारखी नाहीं असें कोणीं म्हणावें ?

आम्ही हिंदुधर्मीय लोक जर मनुष्यव्यक्तीचा एकंदर सृष्टिकारणाशीं व सृष्टिशरीराशीं म्हणजे ब्रह्माशीं अभेद मानतों, तर रशिअन कम्यनिस्टांनीं मनुष्येतर सर्व सृष्टि सोडून फक्त मनुष्यमात्रापुरता तो अभेद किंवा तें ऐक्य संकुचित केलें तर त्यांनीं आम्हा वेदांती हिंदुधर्मीयांपेक्षां तरी अधिक

व्यावहारिक तारतम्य दाखविलें हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आणि काल हा निरवधि आणि पृथ्वी ही विपुल आहे असें कविवर्य भवभूतीनें सांगितलेंच आहे. तेव्हां भविष्यकाळीं सोशियालिझमचें किंवा कम्यूनिझमचें हें तत्त्व सर्व जगाला व्यापून टाकणार नाहीं हें तरी कोणीं सांगावें ? सर्व संकल्पाचें व सर्व विकल्पाचें अधिष्टान मनुष्याचें मन हेंच एक आहे. आणि मनुष्यवंशाचा इतिहास आजवर झाला हा थोडा व यापुढें व्हावयाचा तोच अधिक असें मानणें तर्कशुद्ध असल्यानें, आजवर झाले इतकेच काय ते जीवनप्रयोग, यापुढें ते अधिक होणार नाहींत असें कोणालाही म्हणतां येणार नाहीं.

वास्तविक खुद्द रशियांत अकल्पित रीतीनें कम्यनिस्ट लोकांना जय मिळाल्यामुळें, त्यांचा पुढारी लेनिन याला अशी आशा वाटूं लागली होती कीं, अनेक युरोपीय देशांत मजूर व सोशियालिस्ट पक्षांनीं यापूर्वींच डोकें वर काढलें आहे त्याअर्थीं ते रशियाच्या या उदाहरणानें स्फर्ति पावून आपल्या राष्ट्रांतून एकदम क्रांति करतील. जर्मनी, इटली वगैरे देशांतून तर सोशल डेमोक्रॅट पक्ष युद्धानंतर उदयाला येऊन हा आतां राज्यसत्ता घेतो कीं काय असा रंग दिसून येत होता. पण जर्मनी, इटली या दोन देशांत अखेर उलट प्रतिक्रिया होऊन जनतेचें तोंड फॅसिझमकडे वळलें आणि लेनिनची मोठी निराशा झाली. इंग्लंड हें सोशियालिझमच्या दृष्टीनें सर्वांत मागसलेलें राष्ट्र; तेथेंही कम्यूनिस्ट पक्ष स्थापन होण्यापर्यंत मजल गेली होती. पण रॅम्से मॅक्डोनाल्डप्रभृति मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांना कॉन्झर्व्हेटिव्ह व लिबरल पक्ष, देशाभिमानाच्या सबबीवर वश करून घेऊं शकले. यामुळें इंग्लंडनें स्वत: तर बंड केलेंच नाहीं. पण रशियांतील कम्यूनिस्ट बंडाचा पाडाव व्हावा म्हणून, त्याच्या शत्रूंना पैसा व दारुगोळा पुरविला, रशियन सरकारावर बहिष्कार घातला, आणि इंग्लंडांत या कारणानें संप वगैरे होण्याची भीति दिसतांच जालीम उपाय योजले. अशा रीतीनें युरोपीय राष्ट्रांतून आपणाला साहाय्य तर मिळत नाहींच, पण उलट चढाईचा विरोध न झाला तर आपण मिळविली, असें वाटून लेनिननें हळूहळू आपलें धोरण बदलून अल्पसंतुष्टता स्वीकारली. आणि युरोपीय राष्ट्रांनींहि ही रशियन आग आतां बाहेर फारशी पसरूं शकत नाहीं असें

पाहिल्यावर, तो रशिया व ती आग एकमेकांचें काय वाटेल तें करोत, आपणाला झळ लागली नाहीं म्हणजे झालें, असें म्हणून त्यांनीं रशियावरील स्वारीचा नाद सोडून तटस्थपणा स्वीकारला. याचा परिणाम असा झाला कीं रशियांत कम्यूनिस्ट सरकार आतां सुप्रतिष्ठित झालें असें म्हणन इंग्लंड-सुद्धां अनेक राष्ट्रांनीं रशियावरील बहिष्कार काढून घेतला, आणि उलट त्याच्याशीं व्यापारी तह कसे करतां येतील हें तीं पाहूं लागलीं, लेनिननंतर स्टालिननें या शांततावादी धोरणाचा पुरस्कार केला. पण यामुळें त्याचें ट्रॉट्स्कीशीं बिघडलें व ट्रॉट्स्कीला हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली. अजूनहि ट्रॉट्स्की रशियाबाहेर भटकतोच आहे. स्टालिननें परराष्ट्रांच्या मनांतील संशय सर्वस्वी नष्ट केला नसला तरी, रशियांत कम्यूझिमचा प्रयोग पाहण्याला हवी ती शांतता यानें मिळविली. आणि या शांततेच्या बळावरच सर्व देशभर प्रचंड प्रमाणांत धनोत्पादनाचे पांच पांच वर्षांचे दोन प्रयोग त्याला करून पाहतां आले. पहिल्या प्रयोगांत शेतकरी लोकांकडून थोडासा विरोध झाला. त्यानेंहि तो शहाणपणा शिकला. आणि लेनिनच्या वेळीं रशियन कम्यूनिझमचें जें विध्वंसक स्वरूपच मुख्यतः जगाच्या डोळ्यां-पुढें होतें, त्याचें आतां विधायकांत रूपांतर झालें आहे, आणि स्टालिननें जगाचे डोळे आपल्या प्रयोगाकडे कौतुकपूर्ण दृष्टीनें लावून घेतले आहेत.

असो. अशा रीतीनें सोशियालिझम व कम्यूनिझम या शब्दांचा अर्थ थोडासा स्पष्ट करून सांगितल्यावर या नवमतवादाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक या तीन अंगांपैकीं विशेष कोणत्या अंगाला व कां महत्त्व येतें याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

# ५. साध्यसाधन विचार

कम्यूनिझमच्या सिद्धांताला राजकीय, आर्थिक व सामाजिक अशीं तीन अंगें आहेत. या तीन अंगांपैकीं आर्थिक अंग हें साध्य व राजकीय अंग हें साधन असें कम्यूनिस्ट मानतात. अर्थातच साध्याला महत्त्व अधिक व साधनाला कमी. तिसऱ्या म्हणजे सामाजिक अंगाला ते फारसें महत्त्व देत नाहींत. याचा अर्थ असा कीं, समाजाच्या हातीं राजकीय सत्ता आली म्हणजे मग सामाजिक सुधारणा हवी तशी करून घेतां येते हें त्यांना माहीत आहे. किंबहुना सामाजिक सुधारणा ती काय करावयाची ? व्यक्तिमात्रानें मनःपूत आचरण करावें; त्यानें फक्त दुसऱ्याच्या समान हक्कावर अतिक्रमण करूं नये म्हणजे झालें. व्यक्तिमात्राच्या सुखसोई, त्याची शिक्षण-संस्कृति इत्यादि हितकारक गोष्टींची जबाबदारी त्याच्याकरितां समाजानें पत्करलेलीच आहे. त्याकरितां त्यानें चळवळ करण्याचें कारण नाहीं, फक्त त्यानें समाजसरकारशीं सहकारिता करून तें हित पदरांत पाडून घ्यावें म्हणजे झालें. खरा महत्त्वाचा मतभेद व्हावयाचा तर तो समाजाच्या आर्थिक व्यवस्थेसंबंधीं. पण सर्व प्रकारची मालमिळकत व धनोत्पत्तीचीं साधनें हीं एकदां—जुलुमानें कां होईना—सरकारचीं झालीं म्हणजे मग मतभेद उरलाच तर ती किरकोळ तपशिलाच्या बाबतींतच व्हावयाचा.

कम्यूनिझमची जी आर्थिक बाजू तें कम्यूनिस्टांचें साध्य असें वर म्हटलें. परंतु या 'आर्थिक' शब्दाचा अर्थ मात्र ते फार विस्तृत करतात. तो असा कीं, सध्यां आर्थिक योजनेमळें व्यक्तिमात्राला हल्लींहून अधिक भौतिक सुख लाभेल इतकेंच नव्हे, तर त्याची इतकी सर्वांगीण सुधारणा होईल कीं तो एक नवाच मनुष्य बनेल; तो जुन्या जगांतला मनुष्य म्हणून ओळखूं देखील येणार नाहीं. तो जींत नांदेल ती एका नव्याच युगांतील संस्कृति असें म्हणावें लागेल. फार पुरातन काळीं हिंदी, आर्यन, खाल्डियन, इजिप्शियन, सुमेरियन, चिनी इत्यादि संस्कृती होऊन गेल्या. त्यानंतर ख्रिस्ती सुधारणेचें युग झालें. या सर्व सुधारणा धर्मावर आधारलेल्या होत्या. पण युरोप

खंडांत पंधराव्या शतकापासून पुढें झालेल्या सुधारणा त्या धर्मावर आधारलेल्या नसून पुष्कळशा अर्थशास्त्रावर आधारलेल्या होत्या. भौतिक शास्त्रांची वाढ, दिगंत वसाहतीच्या साम्राज्यांची स्थापना व भरभराट, गुलामगिरीचा नाश, भांडवलशाहीचा धुडगूस, उदारमतवादाचा प्रसार, व्यक्तिस्वातंत्र्याचा उत्कर्ष, गरीब व मजूर वर्ग यांचा परामर्श इत्यादि कारणांनीं जी वेगवेगळी ठळक परिस्थिति जगांत अवतरली त्या प्रत्येकीला एकेका परिच्छिन्न संस्कृतीचें स्वरूप असून, तिच्या कारणानें त्या त्या काळाला तत्तद्‌गुणलक्षित युग असें नांव देण्याला हरकत नाहीं. ओळखीकरितां इतिहासकारांनीं तशीं नांवें दिलेलीहि आढळतात. त्या सर्वांनंतर राजकीय संस्कृतीच्या दृष्टीनें (डेमॉक्रसीचें) लोकशाहीचें युग झालें, आणि आतां फॉसिझमचें युग अवतरूं पाहात आहे. पण कम्यूनिझमचे पुरस्कर्ते म्हणतात कीं आमच्या या नव्या संस्कृतीनें तशाच प्रकारचें, म्हणजे स्पष्ट लक्षण, असें कम्यूनिस्ट नांवाचें युग अवतरणार आहे.

या नवयुगाचीं मुख्य लक्षणें त्यांच्या मतें खालीलप्रमाणें असतील: ( १ ) नफेबाजीचा पूर्ण नाश होईल. ( २ ) एकंदर समाज डोळ्यांपुढें आणून त्याच्या गरजा लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकार अवश्य त्या पदार्थांची निपज करण्याच्या प्रचंड योजना तयार करून त्या अमलांत आणील. ( ३ ) सर्व प्रकारचा श्रेष्ठ–कनिष्ठ भाव नष्ट होऊन संपत्ति सुखसोई इत्यादिकांचा उपयोग सर्वांना सारखा मिळेल. ( ४ ) लोकमतप्रदर्शनाची अपूर्व पद्धति निर्माण होईल. ( ५ ) समाजांतील पुढारीपण हा एक सर्वस्वी निःस्वार्थ धंदा ठरून, बुद्धिमान लोक तो धंदा जन्माचा म्हणून स्वीकारण्यांत भूषण मानूं लागतील. ( ६ ) विज्ञानशास्त्र व कला यांची उपासना उत्कट भक्तिपूर्ण रीतीनें होईल. ( ७ ) धर्मवेडाला व ईश्वरावरील अंधश्रद्धेला गचांडी मिळेल. आणि ( ८ ) सद्‌गुणपूर्ण अशा आदर्श मानवी जीवनाचा धडा निर्माण करून जगापुढें अखंड अनुसरण्याकरितां मांडला जाईल.

आतां 'ही सर्व भाषा भविष्याची' झाली असा यावर अगदीं सोपा स्वस्ता आक्षेप घेतां येण्यासारखा आहे. आणि फरेंच राज्यक्रांतीच्या प्रारंभीं काय काय आशा उत्पन्न झाल्या, पण तिचा शेवट कसा करुणास्पद झाला हें जसें जगानें पाहिलें, तसेंच तुमच्या या कम्यूनिस्ट ांतीचेंही होणार नाहीं

कशावरून? असें विचारतां येण्यासारखें आहे, पण त्यावर कम्यूनिस्टांचें उत्तर असें आहे कीं आक्षेपकांचा हा आक्षेप पुष्कळसा द्वेषमूलक व मत्सरमूलक असाच आहे. भविष्यकाळीं काय होईल हें कोण खात्रीनें सांगणार? पण, रशियांत कम्यूनिझम स्थापन झाल्यापासून तिच्या शत्रूंनीं रोज एक एक अशुभ भविष्य वर्तवीत जावें आणि तें तें खोटें पडावें असें होत आलें आहे खास! अवघ्या अठरा वर्षांच्या काळांत, पूर्वीं कोणीं करून दाखविल्या नसतील अशा गोष्टी रशियानें सुरू केल्या व त्या अजून अबाधित चालू राहिल्या आहेत. यावरून पुढें होतील त्याहि तशाच चालू राहतील असें अनुमान करण्याला काय हरकत! भूकंपानें उध्वस्त होऊन पाताळांत गेलेल्या जागेवर राजवाडा उठावा तसें १९१७ च्या अराजक क्रांतींतून रशियानें विधायक पराक्रम उभे केले. जवळ जवळ अराजकाच्या वाळूचा किल्ला बांधला तो पोलादी किल्ल्यासारखा टिकून आहे, इतकेंच नव्हे तर त्याकडे पाहणाराच्या मनांत तो भीतीच उत्पन्न करतो. सर्व देशांचीं सरकारें रशियाची राज्य-व्यवस्था सुप्रतिष्ठित झाली अशी कबूली देऊन त्याची मैत्री व सहकारिता लाभावी अशी याचना करतात. त्याला कर्जें देऊं म्हणतात, आमच्याशीं व्यापारी तह करा म्हणतात; आणखी तें रशियानें काय करावें? असा दावा कम्यूनिस्ट सांगतात.

असो. कम्यूनिझमच्या तीन अंगांपैकीं कम्यूनिस्ट हे आर्थिक अंगाला किती महत्त्व देतात, आणि त्या अंगांतूनच सामाजिक सुपरिणाम पदरांत पडण्याची आशा कशी बाळगतात हें सांगून झालें. पण उरलेल्या तिसऱ्या म्हणजे राजकीय अंगासंबंधानें त्यांचें काय म्हणणें आहे हें पाहूं. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें कीं, "रशियांतील एका विशिष्ट वर्गाच्या हातीं राज्यसत्ता कायमची न राहील तर वरीलपैकीं कोणतेच हेतु साध्य होणार नाहींत." वास्तविक कम्यूनिझमचा मौलिक हेतु समाज हा सर्वस्वी वर्गरहित करावा असा असतां, अंतिम राज्यसत्ता 'विशिष्ट वर्गाच्या' हातीं राहावी असें जें ते म्हणतात तें परस्परविरोधी नाहीं काय? पण त्याला त्यांचें उत्तर हें कीं, "समाजांत इतर म्हणजे सामाजिक स्वरूपाचे वर्ग न उरले तरी, राज्यसत्ता हातीं ठेवून ती चालविणारा असा एक वर्ग राहिलाच पाहिजे."

त्या वर्गांतील लोक जातीनें, धर्मानें, वर्णानें, धंद्यानें ओळखले जाणारे

नसतील. पण कम्यूनिझमचें ध्येय अखंड डोळयांपुढें ठेवणारे, त्याला इमानदार राहणारे, व त्या ध्येयाच्या बचावाकरितां अंतिम राज्यसत्ता कांहीं थोड्या व्यक्तींच्याच हातीं राहिली पाहिजे या राजकीय तत्वज्ञानावर निष्ठा ठेवणारे, अशा वर्णनानें या विशिष्ट वर्गांतील लोक ओळखले जातील. ही एक प्रकारची फॅसिझम किंवा झोटिंगशाहीच म्हणा हवी तर. पण एकंदर कम्यूनिस्ट समाजाचा गाळीव अर्क किंवा त्याचें सहस्रपुटी सत्त्व ज्यांच्या अंतरंगांत भरलें, भिनलें आहे अशीं निवडक माणसें राज्यसत्ता आपल्या हातीं ठेवतील तरच तीं कम्यूनिझम टिकवूं शकतील. नाहीं तर तिचा नाश होईल. आणि तितक्याच महत्त्वाची दुसरी एक गोष्ट आनुषंगिक पण अवश्य म्हणून सांगावयाची तर, या राज्यसत्ताशील वर्गानं अत्याचार करण्याला मुळींच भितां कामा नये !

कम्यूनिझमच्या राज्यांत मनुष्याचा उदय होईल. नराचा नारायण होईल. पण असे नारायणहि सर्वच कांहीं राज्याधिकार चालवावयाला योग्य, लायक ठरणार नाहींत. ती लायकी असणारी जात कांहीं वेगळीच आहे. तेथें अस्सलच पाहिजे. कमअस्सल चालणार नाहीं. एरा गबाळांचें तें काम नाहीं. मग या अस्सल कमअस्सल भेदामुळें समाज निवर्ग वर्गरहित करण्याचें आमचें बोलणें झूट म्हणाना! चालेल.. जसा आदि तसा अंत! वर्गभेदानें आरंभ झाला. वर्गवैषम्य दिसून आलें. वर्गकलह माजला. वर्गयुद्ध होऊं लागलें. अशा क्रमानें क्रान्तीपर्यंत मजल गेली असतां, निदान त्या क्रांतीच्या काळांत तरी विजय मिळविणारा वर्ग म्हणून असतोच. आणि या विजयी वर्गाच्या हातींच राज्यसत्ता पुढेही राहिली पाहिजे. अर्थात् या कल्पनेचा विरोध दिसून येतो तो मुख्यतः प्रचलित रूढ डेमॉक्रसीच्या राज्यपद्धतीशीं. कारण या डेमॉक्रसी पद्धतीच्या तळाशीं विशिष्ट वर्गाचें गुप्त वर्चस्व प्रतीत होत असेल व खेळ करीत असेल तरी, तेथें राज्यसत्ता हातीं धरणाऱ्या लोकांचा 'वर्ग' असा निदश होत नाहीं! पण वर्गसमर्थनाचाही उघड दोष, राज्यसत्ता स्वाधीन ठेवण्यापुरता कम्यनिस्ट लोक कबूल करण्यास कचरत नाहींत.

कॉ. ट्रॉट्स्की आपल्या रशियन क्रांतीच्या इतिहासांत लिहितो:

"A single government, the necessary condition of

stability in any regime, is preserved so long as the ruling class succeeds in putting over its economic and political forms upon the whole of society as the only form possible.'

क्रांति घडून येण्याला, ती टिकून राहण्याला व ती यशस्वी होण्याला संघटना अवश्य. आणि संघटना म्हटली म्हणजे क्रांतीवर निष्ठा असणाऱ्या अशाच निवडक लोकांचा वर्ग बनला पाहिजे. त्या वर्गांतील लोकांना, इतर एखाद्या वर्गांतल्या लोकांप्रमाणेंच, परस्परांविषयीं जिव्हाळा वाटला पाहिजे। त्यांनीं आपले आर्थिक व राजकीय विचार व सिद्धांत जनतेच्या मानगुटील. बसून दडपून अंमलांत आणले पाहिजेत व शिकविले पाहिजेत. आणि तेच सिद्धांत खरे; इतर खोटे असें त्यांच्याच काय पण जगाच्याही प्रत्ययाला आणून दिलें पाहिजे. मग हें सर्व करण्याकरितां अत्याचार करावे लागले तरी हरकत नाहीं!

अत्याचार करावे लागोत वा न लागोत, पण उत्क्रांतीची कल्पना मोडून देऊन राज्यसत्तेवर आधारलेल्या क्रांतीचीच मूर्ति डोळ्यांपुढें ठेवून खऱ्या कम्यूनिस्टानें चाललें पाहिजे. "क्रांतीनेंच होणारी गोष्ट हळुहळू उत्क्रांतीनें, विकासानें, सुधारणेनें होण्यासारखी असली, आणि कम्यूनिस्टां-खेरीज इतर वर्गांकडून त्या कामीं मदत होण्यासारखी असली, तर ती कां न घ्यावी? ती घेतल्यानें कायमच्या वर्गकलहाची आपत्ति न राहतां, सर्व जनता मिळूनच कम्यूनिझमच्या नव्या आर्थिक संस्कृतीचें युग जगांत अवतरवील तर काय वाईट?" अशा शंका मोठमोठ्या सोशियालिस्टांना आल्या आहेत व त्याप्रमाणें त्यांनीं मोठमोठ्या कम्यूनिस्टांना प्रश्न विचारलेहि आहेत. पण त्यांचीं उत्तरें नकारात्मक देण्यांत आलीं आहेत.

इंग्लंडांतील सुप्रसिद्ध लेखक एच. जी. वेल्स हा पूर्णपणें नवमतवादी आहे. रशियांतल्या आजच्या कम्यूनिझमच्या पुढें अनेक मजला जाऊन कल्प-नेनें त्यानें समाजजीवनाचीं हृदयंगम अशीं चित्रें ग्रंथांतून रंगविलीं आहेत. असा हा ग्रंथकार दोनच वर्षांपूर्वीं रशियांत गेला होता, तेव्हां कम्यूनिझमचा विद्यमान शंकराचार्य किंवा खलीफ किंवा पोप जो स्टालिन त्याची वेल्सनें मुलाखत घेतली. त्या वेळीं त्यांच्यामध्यें झालेलें संभाषण 'नेशन' पत्रांत छापलें आहे. तें वाचलें असतां आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक साध्य साध-

ण्याचे साधन या दृष्टीनें, एकतंत्री जुलमी वर्गनिष्ठ राज्यसत्तेला कम्यूनिस्ट लोक किती महत्त्व देतात हें चांगलें कळून येण्यासारखें आहे. या संभाषणांत राजकीय सत्तेसंबंधीं स्टालिन म्हणतो--" तुम्हांला जर जगाची पुनर्घटना करावयाची असेल तर राजकीय सत्ता तुम्हांला आपल्या हातीं ठेवल्यावांचून गत्यंतर नाहीं. इतरही कांहीं जाणते समाजहितचिंतक वर्ग असतात. आणि ते फार तर राज्यसत्ता आपल्या हातीं घेणाऱ्या वर्गाच्या हाताला हात लावून थोडेंबहुत साहाय्य करतील. पण या इतर वर्गांच्या हातून जग बदलण्याचें कार्य प्रत्यक्ष होणार नाहीं. पूर्वीं झालें तरी भांडवलवाल्या वर्गानें आपल्या हातीं राज्यसत्ता ठेवली म्हणूनच नफेबाजीच्या आपल्या ध्येयाला त्याला सफलता देतां आली. तशीच यापुढें कामगार म्हटल्या जाणाऱ्या वर्गानें ती सत्ता आपल्या हातीं ठेवली पाहिजे. या वर्गानें हवी तर इतर मध्यमबुद्धि जीवितज्ञ शास्त्रनिपुण अशा वर्गाची मदत घ्यावी. ती उपयोगीही पडेल, नाहीं असें नाहीं. पण या मध्यम तज्ज्ञ वर्गाला इतिहासांत पुढारीपणाचें सत्ताधीशत्वाचें–स्थान कधींहि मिळालेलें नाहीं."

स्टालिन यानें 'प्रॉब्लेम ऑफ लेनिनिझम' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो :

" The scientific concept of dictatorship means nothing more nor less than power, which directly rests on violence, which is not limited by any law or any absolute rules. Dictatorship means unlimited power resting on violence and not on law."

याचा अर्थ " झोटिंगशाहीचा सिद्धांत हा एक शास्त्रीय सिद्धांत आहे. त्या सिद्धांताचें तात्पर्य हें कीं, झोटिंग म्हणून जो अधिकारारूढ होऊं इच्छित असेल, किंवा ज्याला अधिकारारूढता टिकविण्याची इच्छा असेल, त्यानें दंडशक्तीचें उपासक बनलें पाहिजे. या दंडशक्तीचें प्रतीक किंवा चिन्ह अत्याचार हें असतें; तिला कोणत्याही कायद्याचें किंवा नीतिशास्त्रविषयक नियमांचें बंधन पड शकत नाहीं. झोटिंगशाही म्हणजे अमर्यादित राजकीय

सत्ता; व तिचा आधार सार्वजनिक कायदा हा नसून झोटिंगशाहाची इच्छा व ती इच्छा पूर्ण करण्याला जरूर तितके अत्याचार किंवा रक्तपात."

एच्. जी. वेल्स यानें स्टालिनची मुलाखत घेतल्याचें वर लिहिलें आहे तींतही स्टालिननें वेल्सला असें सांगितलें कीं, "एक समाजपद्धति बदलून तिच्या जागीं दुसरी आणण्याचें कार्य फार भानगडीचें व क्रांतीच्या स्वरूपाचें असतें. कारण इमारत कितीहि जुनी झाली, मोडकळीस आली तरी ती सर्वच्या सर्व आपोआप कोसळून पडत नाहीं. कदाचित् वरचे उंच भाग कोसळतात, आंत सहज शिरण्याजोगी मोठीं भगदाडें पडतात. तथापि त्या जागीं नवी इमारत बांधणाराला हातांत खोरीं, कुदळी, पहारी घेऊनच जुने अवशेष पाडावे लागतात." स्टालिन असेंहि म्हणूं शकला असता कीं पायाच्या वरची इमारत एक वेळ आपोआप कोसळून पडेल, पण पायाचे दगड हे तरी कांहीं आपोआप उखडून निघणार नाहींत. मग ते काढण्याला तुम्ही अत्याचार म्हणणार कीं काय? मात्र कोणत्याहि जुन्या पायावर कोणतीहि नवी इमारत होऊंच शकत नाहीं असें स्टालिनच्या या म्हणण्यांत गृहीत धरलेलें आहे. आणि तें सर्वस्वीं बरोबर आहे असें मानलें तर, स्टालिनचें इतर बोलणें सयुक्तिक आहे असें म्हणावें लागतें!

या संवादांत स्टालिननें इंग्लंडच्या राज्यक्रांतीचा आधार देऊन असें म्हटलें आहे कीं, "ऑलिव्हर क्रॉम्वेल हा कांहीं अधार्मिक .नास्तिक नव्हता. पण त्याला देखील अत्याचारी मार्गाचा अवलंब करून राजाचा शिरच्छेद करावा लागला आणि शेंकडों लोकांचीं डोकीं उडवावीं लागलीं. या अत्याचारांना पुढें कायदेशीर, सनदशीर असें म्हणण्याची रीत पडली. पण आम्ही केलेल्या अत्याचारांनाहि उद्यां असेंच नांव इतिहासकार देऊं शकतील. कोणतेंही महत्त्वाचें राष्ट्रीय कार्य करावयाचें तर त्याला एक मुख्य सैन्य, एक दुय्यम सैन्य, एक तटबंदी आणि एक क्रांतिकारक शिपायांचा वर्ग हीं साधनें लागतात. क्रांतिकारकांच्या दुय्यम सैन्यांत बुद्धिमान्, शास्त्रज्ञ, यांत्रिक वगैरे लोकांची भरती हळुहळू करून घेतां येईल. पण मुख्य सैन्य क्रांतिकारक वर्ग हेंच होय. या सैन्याचें तात्त्विक हत्यार क्रांति आणि भौतिक हत्यार प्रत्यक्ष शस्त्रास्त्रें दारुगोळा इत्यादि सर्व लष्करी सरंजाम. या अशा सशस्त्र

सैन्यानें प्रथम राजसत्ता काबीज करावयाची आणि नंतर मग समाज-सुधारणेला हात घालावयाचा असा क्रमच लागतो. ”

वरील सर्व विवेचनावरून हें दिसून येईल कीं, कम्यूनिस्ट तत्त्वज्ञानी हे कम्यूनिझमच्या राजकीय अंगाला साधन समजत असले तरी, एका दृष्टीनें कम्यूनिझमचें दुसरें अंग म्हणजे समाजाची आर्थिक व सामाजिक पुनर्घटनारूपी जें साध्य त्यापेक्षांही साधनाला अधिक महत्त्व देतात. समाज-सुस्थितीचें साधन क्रांति, क्रांतीचें साधन राजसत्ता, राज्यसत्तेचें साधन बलोपासना व रक्तपात. अशी या तत्त्वज्ञानाची सांखळी आहे. प्रथम आपल्या देशांत क्रांति करतांना, मग ती टिकवितांना व मग जगांतील इतर देशांत तिचा प्रसार करतांना, याच सांखळीचा उपयोग केला पाहिजे हें क्रमप्राप्तच ठरतें !

ही गोष्ट रशियांतील झाली. पण हिंदुस्थानसारख्या देशांतील लोक कम्यूनिझमच्या तीन अंगांपैकीं कोणत्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहतात आणि ते कम्यूनिझमला संमति देतील तर त्यांतल्या त्यांत कोणत्या अंगाला किती देतील, हा प्रश्न स्वतंत्र असून हा लेख संपवितांना तिचा विचार करण्यांत येईल. त्याआधीं आतां कम्यूनिझमचा–सोशियालिझमचा–थोडा पूर्वेतिहास पाहूं.

---

# ६. कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (१)

कम्यूनिझमला अपूर्व मत किंवा नवमत असें कोणी म्हटल्यास त्याला कम्यूनिस्टांची फारशी तक्रार नाहीं. कदाचित् ते त्याचें भूषणच मानतील. पण नवमत हा शब्द निंदार्थी कोणी लावल्यास ते उलटा मोहरा करून म्हणतील कीं, या नव्या मताला जुन्या इतिहासांतील दाखले सांपडणार नाहींतच असें नाहीं. नवें हेंही पुष्कळ वेळां जुनेंच असतें. मात्र तें जुनें

लोकांच्या स्मरणांतून इतकें निघून गेलेलें असतें कीं, तें कोणत्याहि कारणानें पुन्हां प्रगट झालें म्हणजे अगदीं नवें असेंच त्यांना वाटतें. म्हणून नव्याची जुन्या स्वरूपांत ओळख देण्याकरतां ऐतिहासिक दाखले द्यावे लागतात. आणि ते पाहिले म्हणजे मग लोक चकित होऊन आपल्या ठिकाणीं म्हणतात, "अरे ! हें तर जुनेंच दिसतें. मग याला नांवें कशीं ठेवावीं ?" "कम्यूनिझमचे जुने दाखले किती काळापूर्वींचे तुम्हांला दाखविले म्हणजे मग तर ती जुनीच कल्पना आहे ही कबुली तुम्ही द्याल ?" असें सोशियालिस्ट किंवा कम्यूनिस्ट यांना, त्यांच्या सनातनी विरोधकांना, सहज विचारतां येण्यासारखें आहे. आणि कोणीं कितीहि प्राचीन काळच्या दाखल्याची मागणी केली तरी ती त्यांना पुरवितां येण्यासारखी आहे.

याचें कारण असें कीं, मनुष्याचें मन भौतिक ज्ञानानें व अनुभवानें दिवसेंदिवस अधिक समृद्ध होत जात आहे हें खरें असलें तरी, प्राचीन मनुष्याच्या मनाची प्रतिभा अर्वाचीनाच्या प्रतिभेला हार जाणारी नव्हती. एकच उदाहरण द्यावयाचें तर तें विमानविद्येचें देतां येईल. तें असें कीं, आज अधिकांत अधिक चमत्कार म्हणजे बिनतारी विजेच्या साहाय्यानें, सारथी किंवा वाहक आंत नसलेलीं विमानें दुरून चालवितां येतील अशी कल्पना प्रयोगसिद्ध होण्याच्या मार्गाला आहे. पण प्राचीन काळच्या कविवर्णनावरून तरी बिनतारी विजेच्याही पुढें जाऊन केवळ मानसिक शक्तीनें विमानें चालविलीं जात होतीं असें दिसतेंच कीं नाहीं ? फक्त आतां एखादा मार्कोनी, एडिंगटन, टॉमसन यानें म्हणावयाचें उरलें आहे कीं, जें कार्य विद्युत्शक्ति करते तेंच मनःप्रेरणेनेंहि होऊं शकतें किंवा शकेल ! एडिंगटननें विश्वांत जडांश कांहींच नसून तें सर्व मनोमय आहे असा सिद्धांत पुढें मांडलाच आहे कीं नाहीं ? पण अर्थातच दाखले दाखवा असें कोणी म्हणेल तरच त्याला हें उत्तर समजावें.

स्वतः कम्यूनिस्ट हे जुन्या दाखल्यावर आपला नवमतवादी सिद्धांत आधारूं इच्छित नाहींत. त्यांना ऐतिहासिक दृष्टि आहे, यामुळें त्यांना कम्यूनिझमचे जुने दाखले दाखवितां येतील. पण ती ऐतिहासिक दृष्टिच त्यांना हेंहि शिकविते कीं, त्या जुन्या दाखल्यांना कम्यूनिझमच्या नव्या कल्पनांना फारसा मेळ घालतां येणार नाहीं. याचीं मुख्य कारणें दोन.

कम्यूनिझमचे म्हणजे एकरूप जीवनाचे जुने नमुने आढळतात. ते कुटुंबसंस्थेच्या किंवा धर्मसंस्थेच्या अनुरोधानें. कम्यूनिस्टांना या दोनहि संस्था पुढें चालवावयाच्या नाहींत. नव्या एकरूप जीवनाची त्यांची कल्पना मुख्यतः आर्थिक व्यवस्था आणि राज्यसत्ता यांच्यावर आधारली जाणार. त्यांना हेंहि माहित आहे कीं, मनुष्यसमाज हा आतां जगभर पसरलेला असून तो सर्व जगांत मिळून एकजीव केला पाहिजे. अर्थात् हें प्रचंड कार्य घडवून आणावयाचें तर त्याचीं साधनें जुन्या दाखल्यांतून घेतां येण्यासारखीं नाहींत. असो. तथापि, आम्ही जे जुने दाखले म्हणून देणार ते कम्यूनिझमच्या पूर्वींच्या कल्पना काय होत्या हें सहज वाचकांच्या लक्षांत यावें एवढ्याकरतांच देणार. केवळ त्या दाखल्यांवरून साधक किंवा बाधक असें कांहींच विवेचन आम्हांला येथें करावयाचें नाहीं.

प्रथम यूरोप खंडाच्या इतिहासांत सोशियालिझम कम्यूनिझमसंबंधीं काय जुने दाखले मिळतात ते पाहूं. युरोपमधील सर्वांत जुनी संस्कृति ग्रीक. सर्वांत जुना तत्त्वज्ञानी प्लेटो. तो प्रतिभासंपन्न असल्यामुळें त्यानें 'रिपब्लिक' नामक प्रबंधांत त्याच्या मताप्रमाणें नमुनेदार समाज कसा असावा याचें एक चित्र कल्पनेनें रंगविलें. त्यांत प्रथम गुलाम वेगळे काढून उरलेल्या स्वतंत्र समाजापैकीं कांहीं थोड्या जाणत्या तत्त्ववेत्त्यांच्या हातीं सत्ता दिली आहे. पण सत्तेवरोबर जबाबदारी आलीच. ती अशी कीं, "या थोड्या अभिजात विद्वान् लोकांनीं स्वतःला समाजसंरक्षक असें मानून, सामान्य माणसाहून अधिक सद्‌गुणी व स्वार्थत्यागी राहिलें पाहिजे. त्यांनीं वनस्पत्याहार ठेवला पाहिजे. संपत्तीचा अभिलाष करितां कामा नये. रत्नसुवर्णादि पदार्थ त्याज्य मानले पाहिजेत" इत्यादि. या विशिष्ट वर्गाच्या संबंधानेंच कम्यूनिझमची कल्पना प्लेटोनें रंगविली आहे. समत्व, समता, सामुदायिक सत्तेची व उपभोगाची आवड हे गुण या शिष्ट मंडळाच्या अंगीं असावे असें प्लेटो म्हणतो. "पण इतर समाज किंवा बहुजन समान हा सामान्य मनुष्यस्वाभावाप्रमाणें व वागणार. म्हणजे त्याला लोभबुद्धि, व्यक्तिविषयक सत्तेची आवड, संपत्तीची आवड हीं सुटावयाचीं नाहींत. तो व्यापारधंदा करणार, चढाओढ लावणार, पैसा मिळविणार व सांभाळून संग्रहीं ठेवणार. या गोष्टी प्लेटोनें गृहीतच धरल्या आहेत. फक्त वरील थोड्या लोकांनीं मठवासी महंतांप्रमाणें अवि-

वाहित राहून जेवणखाण एकत्र करावें. आणि रणांगणावर छावणींत शिपाई जसे एकजीव राहतात तसें राहावें असा दंडक त्यांच्याकरितां त्यानें घालून दिला आहे. या लोकांनीं स्वतः त्यागाचें उदाहरण घालून देऊन, परदेशाचा व्यापार व व्याजबट्टा यांना आळा घालून, जनतेलाहि मितव्ययी, निर्लोभी ठेवण्याचा प्रयत्न करावा. "

"अति श्रीमंती व अति दारिद्र्य हे दोनहि सारखेच दोष होत. संपत्तीची निपज होत राहणारच. पण ती थोडया गुणी जनांकडून व्हावी, व त्यांनींच अत्यंत काटकसरीनें राहावें. असें केल्यानेंहि संपत्तीचा संग्रह टळत नाहीं हें उघड ठरतें. तथापि राज्यांत अशा रीतीनें संपत्ति जमली असली तरी ती सरकारी असूं नये, या थोड्या गुणी लोकांच्या हातींच राहावी, म्हणजे तिचा दुरुपयोग होणार नाहीं असें प्लेटो म्हणतो. गुणविभाग व श्रमविभाग यांच्या कारणानें व कलहानें सरकार ही संस्था किंवा राष्ट्र ही घटना निर्माण होते. तथापि गुणविकास व श्रमविभाग यांत सरकारनें हात न घालतां व्यक्तिमात्राला स्वातंत्र्य दिलें तरच रुचिवैचित्र्य व सुंदर पदार्थांची उत्पत्ति हीं साधतील. प्लेटो 'सरकार' या संस्थेचा जेव्हां उल्लेख करतो तेव्हां त्याचा कल राजकीय सत्तेपेक्षां सामाजिक सत्तेकडे अधिक असतो. स्त्रियांना योग्य तें स्थान देणें व मुलांना योग्य तें शिक्षण देणें या गोष्टींबद्दल गुणिजन पालक मंडळ जबाबदार असतें. यामुळें त्याला त्यापुरती समाजावर सत्ता गाजवितां आलीच पाहिजे. प्लेटो हा गुलामगिरीला मान्यता देतोच, पण चातुर्वर्ण्य व वर्गव्यवस्थाहि मान्य करतो.

पण हें बोलून चालून सुखस्वप्न होतें; तें गंधर्व नगरी किंवा नवलपूर यांत आढळणारें होतें. त्याचा अनुभव प्रत्यक्ष प्लेटोच्या वेळीं कोणीच घेतला नाहीं. आणि त्याच्या मागोमाग त्याचा शिष्य ॲरिस्टॉट्ल् यानें तर कम्यूनिझमचें हें मनोराज्य अव्यवहार्य म्हणून हास्यास्पद ठरविण्यास कमी केलें नाहीं. तो म्हणतो " जुन्या लोकांचा अनुभव या मठवासी कम्यूनिझमच्या विरुद्ध आहे. ही कल्पना खरोखर चांगली असती तर त्यांनीं नसता का तिचा स्वीकार केला ? विश्वबंधुत्वाची कल्पना झूट आहे. सगळ्यांचा बंधु तो खरा कोणाचाच बंधु नसतो. व्यक्तिनिष्ठ गुण तोच खरा टिकाऊ व प्रभावी गुण. सामाजिक सत्तेपेक्षां व्यक्तिस्वातंत्र्यानेंच एकंदरीनें समाजाचें

हित अधिक साधतें. विश्वबंधुत्वाप्रमाणेंच, समाजांतील स्त्रिया व मुलें हीं समाईक मानल्यानें खरी प्रेमभावना शिल्लक उरूंच शकत नाहीं. व्यक्तीला स्वतःपुरती सत्ता व मत्ता हीच अधिक समजते पटते व त्याला कार्यक्षम व कार्यकुशल करूं शकते.

ॲरिस्टॉट्ल् म्हणतो, " कदाचित् फार जुन्या काळीं जेव्हां कुटुंब किंवा घराणें हेंच राष्ट्र असेल, म्हणजे राष्ट्राची व्याप्ति इतकी संकुचित असेल व जीवनाचा उद्योग केवळ शेती व धनगर-गिरी, गौळी-गिरी हाच असेल तेव्हां कम्यूनिझम शक्य असेल. पण समाज किंचित् मोठा झाला कीं श्रमविभाग, विषमता, गुणधर्मवैचित्र्य हीं प्रभावी होऊं लागतात. केवळ सामुदायिक हित व सामुदायिक सुखसाधन हा हेतु मनुष्याला आपले श्रेष्ठ गुण प्रगट करण्याला पुरे पडेनासा होतो आणि कम्यूनिझमची पद्धति सुरू असली तरी ती नष्ट होते. जें सर्वांचें तें कुणाचेंच नव्हे. संपत्ति एकवट आपली मानणें व उपभोगणें हें शक्यच नाहीं. रणांगणावर काय होत असेल तें असो; पण चार प्रवासी एकत्र प्रवासाला निघाले तरी खाण्यापिण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीवरून भांडतात. मग समाईक मिळकत व समाईक जनानखाना यांची गोष्ट तर बोलूंच नका! मनुष्य हा स्वभावानेंच तुसडा व दुष्ट आहे. आणि त्याच्या रागालोभाच्या अतिशयोक्तीमुळें केव्हां अनिष्ट प्रकार घडलेले पाहिले, म्हणजे मग प्लेटोसारख्या सज्जनाना विषाद वाटून ते गंधर्व-नगरींतील समाजाचीं काल्पनिक चित्रें रंगवूं लागतात. पण त्यांत अर्थ काय? जीं माणसें व्यक्तिशः अशीं सदोष त्यांना सामुदायिक जीवन काय होय? तें कसें समजणार व कसें आवडणार? आणि अशी कोणती मध्यवर्ती सत्ता आहे कीं ती त्यांच्याकडून सामुदायिक जीवन जबरदस्तीनें नांदवून घेऊं शकेल? सेव्य–सेवक, श्रेष्ठ–कनिष्ठ हे भाव काढून टाकणें शक्यच नाहीं.

" मनुष्याचें साध्य आपल्यांतले उत्तम गुण प्रगट करणें हें आहे. म्हणून संपत्ति व उद्योगविरहित असा थोडाबहुत काळ त्याला अवश्य पाहिजे. तथापि द्रव्यसंपत्ति हें केवळ साधन मानलें पाहिजे. या दृष्टीनें सामान्य माणसाची व श्रेष्ठ माणसाची कल्पना वेगळी असणार व ती वेगळी असली पाहिजे." गुलाम संस्था व स्त्रीदाक्षिण्य यांसंबंधीं ॲरिस्टॉट्ल्चे

विचार प्लेटोसारखेच आहेत. प्लेटोप्रमाणेंच दुकानदारी, नफेबाजी व व्याजबट्टा यांच्याविरुद्ध ऑरिस्टॉट्ल्चें मत आहे. अथापि "नवीन करण्यापेक्षां चालीनें चालत आलेलें अधिक ठाकठीक व व्यवहार्य असेल तेंच करावें, संन्यासवृत्ति किंवा लोभमूलक, स्वार्थमूलक प्रवृत्ति या दोहोंची अतिशयोक्ति टाळून, सुवर्णमध्याचा बिंदु साधावा असें तो म्हणतो. व्यक्तीला स्वातंत्र्य पाहिजे पण व्यक्ति ही समाजांतली व समाजाचीच असल्यामुळें समाजाच्या कक्षेंत व काबूंतच राहिली पाहिजे."

प्लेटो, ऑरिस्टॉट्ल् यांच्याशिवाय इतरहि कित्येक ग्रीक विचारवंतांनीं सोशियालिझमच्या स्वरूपाचीं मतें अंशतः अंगिकारलीं होतीं असें इतिहास सांगतो. मिनॉस, लायकरगस, रॉम्युलस या ग्रीक व लॅटिन स्मृतिकारांनीं व कायदेपंडितांनीं सोशियालिझमच्या एका तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल केला होता. तें तत्त्व म्हणजे समाजाची नवी रचना करण्याच्या दृष्टीनें, एकेक कुटुंब किंवा एकेक व्यक्ति घेऊन तिला राज्यांतील जमिनीचा सारखा तुकडा वांटून दिला. परंतु पुढील इतिहास असें सांगतो कीं ही वांटणी फार वेळ अंमलांत राहिली नाहीं. त्याचें कारण हें कीं जमीन हीच मुख्यतः मालमत्तेची बाब असे. एकेका अविभक्त कुटुंबाची घटना परंपरेनें चालू राहील तर मूळच्या वांटणींत फेरबदल होणार नाहीं. पण प्रत्यक्ष मालमत्तेची वांटणी न करतां तिचा सामायिक उपभोग सर्व समाजानें मिळून घेणें हा सोशियालिझमचा दुसरा एक मार्ग होऊं शकतो. आणि हा मार्ग सुचविणारे असे अनेक विचारवंत जुन्या काळीं युरोपांत होऊन गेले.

रोमचा नाश होण्याच्या सुमारास एक ख्रिस्ती धर्ममंडळ स्थापण्यांत आलें. त्याची उपपत्ति मनुष्यदेहाप्रमाणें मानण्यांत आली होती. म्हणजे 'अनेक अवयव पण एकच प्राण.' त्याप्रमाणें या नव्या मंडळाचे सभासद अनेक पण त्यांचा सहानुभवी आत्मा एकच म्हणून मंडळाचें सर्व कांहीं हें मंडळांतील प्रत्येकाचें मानण्यांत येई. ख्रिस्ति कॅनन लॉप्रमाणें असें ठरविण्यांत आलें होतें कीं, सर्व मनुष्यसमाज हीं जर ईश्वराचीं लेंकरें तर सर्व पृथ्वी ही त्या लेंकरांची 'समाईक' मिळकतच असली पाहिजे. म्हणून हें माझें घर, हें माझें शेत असें कोणी म्हणूं नये. सर्व संपत्ति अविभाज्य असतां तिचे विभाग करणें हा मनुष्याचा अधःपात होय. आतां संसारी मनुष्याला

हें ध्येय फार जड वाटलें तरी, निदान जे लोक धर्ममंडळाची दीक्षा घेतात त्यांनीं तरी हें ध्येय स्वीकारलें व पाळलें पाहिजे. या धर्ममंडळाच्या लोकांनीं श्रम करूनच चरितार्थ चालवावा, आपल्या कामाकरितां गुलाम मजूर म्हणून लावूं नयेत, जो गुलाम ख्रिस्ती धर्म स्वीकारील त्याला गुलामगिरींतून मुक्त करावें, व्याजबट्टा करूं नये, द्रव्यसंग्रह करूं नये इत्यादि. पण पुढें रोमन बादशहा हा स्वतः ख्रिस्ती झाला, त्याबरोबर इतर पुष्कळ लोकही ख्रिस्ती झाले. आणि ख्रिस्ती समाज संख्येनें वाढूं लागल्याबरोबर विश्वबंधुत्व, कम्यूनिझम वगैरे सिद्धांतांची व्याप्ति मर्यादित होऊं लागून, संसारी व संन्यासी असे ख्रिस्ती समाजांतच दोन तट पडले. कम्यूनिझमची व्याप्ति या संन्यासी वर्गापुरतीच उरली, आणि पुढें तर ख्रिस्ती बादशहांच्या अमदानींत कम्यूनिझमचें नांवहि ऐकूं येईनासें झालें.

मध्ययुगांत गण व संघ होते; पण ते व्यापाराच्या व्यवहारापुरते असत. त्यांना कम्यूनिझमचें स्वरूप नव्हतें. या गणांतील किंवा संघांतील व्यापारी लोकमताला मान देऊन ठरलेले शिस्तीचे नियम पाळीत व त्यामुळें धंद्याच्या दृष्टीनें त्यांचा फायदाहि होई. कारण उघड चढाओढीला बळी न पडतां, ज्या त्या धंद्यांतील लोकांनीं आपल्या हिताच्या दृष्टीनें एकी व संघटना केली तर तें अंतीं सर्वांना लाभदायकच ठरतें. शिवाय कोणी शिस्त मोडली, नियम सोडून वागला, तर तो संघ त्यावर बहिष्काराचें शस्त्र उगारी. आणि सामाजिक बहिष्कार हा राजदंडापेक्षांहि अधिक जाचक होतो हें सर्वत्र अनुभवाला येतें. हे व्यापारी संघ निर्माण होण्यापूर्वीं व ते अमलांत असतां जुन्या इतिहास काळीं यूरोपखंडांतील सर्व देशांतून अनियंत्रित राजसत्ता प्रभावी होती. आणि अनियंत्रित राजसत्ता ही व्यक्तिस्वातंत्र्याला बाधक होते तशीच समाजस्वातंत्र्यालाहि बाधक होते. एकतंत्री सत्ता ही प्रायः ती सत्ता धारण करणाऱ्या किंवा त्याच्या किंवा ऋणानुबंधी लोकांकरिताच अंमलांत यावयाची हें ठरलेलेंच. अर्थात् व्यक्तिस्वातंत्र्यहि नाहीं व समाजस्वातंत्र्यहि नाहीं. यामुळें अशा परिस्थितींत सोशियालिझमची किंवा कम्यूनिझमची कल्पना प्रभावी कशी होणार?

मात्र या कालांतहि प्रतिभासंपन्न लोक गप्प बसलेले नव्हते.

उदाहरणार्थ १६ व्या शतकांत ग्लंडमध्यें होऊन गेलेल्या सर टॉमस मोर या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्यानें प्लेटोप्रमाणेंच 'युटोपिया' (यक्षनगरीचा कारभार) या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत सामुदायिक स्वामित्व, सत्ता व उपभोग या तत्त्वांची आपल्या कल्पने-प्रमाणें मांडणी केलेली आहे. या वेळीं इंग्लंडवर असलेला राजा कोणाहि व्यक्तीचे नाक कान खुशाल कापीत असे ! आणि स्वतः सर टॉमस मोर हा राणीच्या अवकृपेला पात्र झाला तेव्हां शिरच्छेदाची त्याला शिक्षा भोगावी लागली. प्लेटोप्रमाणेंच सर टॉमस मोर हा माणसानें गरजा थोड्या ठेवाव्या असें म्हणणारा आहे. तो सोन्यारुप्यापेक्षां लोखंडाला अधिक मान देतो. "प्रत्येक मनुष्यानें शेतकीचा धंदा प्रथम आवश्य शिकलाच पाहिजे, मग त्याला इतर एकादा धंदा शिकण्याला समाजाची परवानगी मिळेल. समाज-रक्षकांनीं हें पाहिलें पाहिजे कीं, समाजांतला कोणताहि मनुष्य निरुद्योगी राहतां कामा नये. तसेंच त्याला प्रमाणाबाहेर श्रमही पडूं नयेत. दिवसांतून मजुराला सहा तासांपलीकडे काम देऊं नये ! असें केल्यानें त्याला आपली सांस्कृतिक सुधारणा करण्याला व करमणुकीला वेळ मिळेल. मुळींच श्रम न करणारे असे हजारों ऐदी असतात, त्यांना कामाला लावलें तर इतर लाखों लोकांची जिवापाड मेहनत वांचेल. आणि धनोत्पादन कमी न होतां उलट भरपूर वाढलच. खासगी मालमिळकत उरूं न दिली तरच हे ऐदी लोक काम करूं लागतील; सर्व मालमत्तेवर एकंदर समाजाचीच मालकी राहिली पाहिजे." इ. तथापि प्लेटोच्या व थॉमस मोरच्या कम्यनिझममध्यें एक फरक आहे. तो हा कीं प्लेटो कुटुंबव्यवस्थाच नसावी असें म्हणतो तर मोरच्या मतें कुटुंब हाच समाजाचा मुख्य सुटा घटक असला पाहिजे. दुसरें असें कीं, प्लेटोचा झोक गरजा कमी करण्याकडे होता तर टॉमस मोरच्या मतें मनुष्याची समृद्धि कांहीं किमान मर्यादेखालीं जातांच कामा नये ! मात्र संपत्तिपलीकडे आध्यात्मिक संस्कृति म्हणून कांहीं आहे व ती अधिक उच्च दर्जाची मानावी हें दोघांनाही सारखेंच मान्य आहे. प्लेटो गुलामगिरीला संमति देतो आणि कनिष्ठ व मजूर वर्गाकडे त्याचें लक्षच सहसा जात नाहीं, तर टॉमस मोरचें सर्व लक्ष या वर्गाचा दुःखपरिहार व उन्नति करण्याकडे आहे ! कारण विलायतेंतील जमीनदार भांडवलशाहा त्याच्या

वेळीं आपले गुण पाघळूं लागले होते. तात्पर्य, ख्रिश्चन कम्यूनिझम नंतर हजार-दीड हजार वर्षांनीं सर टॉमस मोर यानें फिरून कम्यूनिझमचें तत्त्व लोकांच्या पुढें मांडलें. आणि प्रथम त्याच्याच ग्रंथांत आजच्या सोशियालिझमचीं कांहीं कांहीं तत्त्वें ठळकपणें मांडलेलीं नजरेस पडतात.

---

# ७. कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (२)

लॉक हा इंग्रज तत्त्ववेत्ता म्हणतो, " मूळच्या सृष्टिनियमाप्रमाणें सर्व सृष्टिजात हें समाजाच्या सामायिक मालकीचें होतें. पण स्वतः श्रम करण्यामुळेंच त्याचा उपभोग घेण्याचा हक्क मनुष्याला प्राप्त होत होता. व्यक्तीनें केलेल्या श्रमानें मिळालेली एवढीच मिळकत त्याची स्वतःची. समुद्रांत मासे पुष्कळ आहेत व प्रत्येक मनुष्याला ते आपले आहेत, असें म्हणतां येईल; पण तसें म्हणून उपयोग काय ? तो श्रमानें व कौशल्यानें जितके मासे पकडील तितकेच त्याला खावयाला मिळतील. एरवी हावऱ्या अधाशासारखें सर्व जग माझें असें म्हणून काय उपयोग ? समुद्रांतील माशाप्रमाणें जमिनीचाहि उपयोग समजावा. जमीन पिकविण्याला श्रम करावे लागतात, औतें तयार करावीं लागतात. यामुळें या औतांच्या साहाय्यानें व आपल्या श्रमानें मनुष्य जितक्या जमिनीची लागवड स्वतः करूं शकेल तितकीच जमीन त्याची मिळकत होईल. स्वतःला लागवडीखालीं आणतां न येणारी जमीन त्याच्या संग्रहीं असली तरी तिच्यावर त्यानें मालकी सांगणें हें न्यायाचें नाहीं. आणि असें झालें तरच जगांतली जमीन सर्वांना पुरेल. कोणालाहि कमी पडणार नाहीं. "

लॉक हा समाजजीवनाला व्यक्तीपासून प्रारंभ करतो, तथापि सृष्टीच्या नियमाप्रमाणेंच सर्वांच्या हातून वर्तन झालें पाहिजे म्हणून सरकार ही संस्था अस्तित्वांत येते असें तो म्हणतो. सामाजिक जीवन व राजकीय जीवन

हीं सर्वस्वीं एकत्र आहेत असें तो मानीत नाहीं. लॉकचा सोशियालिझम कांहीं अंशीं प्लेटोसारखा आहे. तरी पण सृष्टिनियमांच्या कल्पनेच्या दृष्टीनें त्याचें व पुढें येणारा लिबरल अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ याचें अधिक साम्य आहे. " सुरवातीला श्रम हाच मिळकतीचा हक्क होता. तरी पण राजसंस्था व कायदे परिणत झाल्यावर तो हक्क कायद्यानेंहि मान्य केला म्हणूनच कायदा त्याचें संरक्षण करूं शकतो. तसेंच विनिमयाचें साधन म्हणून पैसा निर्माण झाल्यामुळें मनुष्याला पैशाच्या रूपानें राहणाऱ्या संपत्तीचा वाटेल तितका संग्रह करतां येऊं लागला आणि तिजवर व्यक्तीचा हक्क कायदेशीर ठरूं लागला."

यानंतर डेव्हिड ह्यूम हा इंग्रज तत्त्ववेत्ता पुढें आला. त्याच्या मतें " अर्थशास्त्रदृष्टचा संपत्तीचा संबंध वर्तमान, भूत व भविष्य या तिन्हीहि काळांशीं येतो. पूर्वीच्या श्रमांनीं उत्पन्न केलेली संपत्ति मनुष्य आज उपभोगतो व त्यांतलीच भावी उपयोगाकरितां संग्रहीं ठेवतो. कारण संपत्तीचें खरें सुख केवळ क्षणिक गरज भागल्यानें पुरें लाभत नाहीं. संपत्ति ही कायमची शक्ति आहे, व तिचा उपयोग हवा तेव्हां करतां येणें हें मनुष्याला सोईचें व इष्ट असतें. मात्र हवें तेव्हां याचा अर्थ वाटेल तितक्या लांबच्या भविष्यकाळीं असा नाहीं. फार पुढील काळीं किंवा अगदीं दूरच्या देशीं आपलें नुकसान होणार असलें तरी मनुष्याला त्याची चिंता वाटत नाहीं. ह्यूम म्हणतो, " तीस वर्षांनंतर एखाद्या माणसाला तुझी स्थिति दुःखी होईल असें म्हटलें तर तो म्हणेल, ठीक आहे, पाहून घेईन ! तीस वर्षें कोणीं पाहिलीं ? "

रॉबर्ट ओएनप्रमाणें ह्यूम हा आर्थिक परिस्थितीला सर्वस्वीं महत्त्व देत नाहीं. इच्छाशक्तीलाहि तो थोडेंबहुत महत्त्व देतो. तथापि सर्वच रान इच्छाशक्तीला मोकळें सोडलें तर भांडवलशाहीचे हल्लींचे दुष्परिणाम होतील हेंहि त्याला माहित असल्यामुळें तिला कायद्याचें बंधन कोठें तरी असणें योग्य असें तो कबूल करतो. यापुरता पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्यवादी ॲडम स्मिथ याच्याशीं त्याचा मतभेद दिसून येतो. ह्यूमच्या मतें श्रम म्हणजे नुसते शारीरिक श्रम नव्हेत तर बौद्धिक श्रमहि त्यांत येतात. ह्यूमच्या काळीं संपत्तीच्या वांटणीविषयीं कांहीं नवीन सिद्धांत पुढें येऊं लागले होते. परंतु मनुष्य

हा स्वतंत्र जन्माला आला असला तरी त्याला इतर कोणाच्याहि बरोबरीचे समान हक्क आहेत असें म्हणतां येत नाहीं, असें ह्यूमचें मत होतें. त्याला देखील मजुरांची स्थिति सुधारावयास हवी होती. आणि युरोपांतील इतर देशांपेक्षां इंग्लंडांत गरिबांची काळजी अधिक घेतली जाते, याचा उल्लेख त्यानें अभिमानानें केला आहे. ह्यूमच्या मतें "साध्या गरजांच्या माणसांवर नियंत्रणाची गरज नसते. ते समाजाचें कोणतेंही नुकसान न करतां नियंत्रणा-शिवाय जन्म काढूं शकतील. परंतु हक्क व गरजा या बेसुमार वाढल्यानें नियंत्रणाची आवश्यकता, उत्पन्न होते. एका मनुष्याच्या अन्यायी, वासनेच्या पूर्तीमुळें दहांच्या तोंडची भाकरी जाते हें खरें. यामुळें कांहीं बाबतींत गरीब व श्रीमंत यांना सारखें वागविलें पाहिजे." स्पार्टा व रोम येथील प्राचीन राज्यांत जमिनीची सारखी वांटणी मधूनमधून करण्यांत आली असें इति-हास सांगतो, त्यामुळें अशी वांटणी व्यवहार्य आहे असा भास होतो. परंतु ह्यूमच्या मतें त्याच्या स्वतःच्या काळच्या समाजस्थितींत अशी समान हक्काची वांटणी शक्य नव्हती. ती करावयाला गेल्यास उद्योग श्रमसायास करण्याची मनुष्याची अंतःस्फूर्ति कमी होईल व राष्ट्राची संपत्ति घटेल."

सोशियालिझम, कम्यूनिझमच्या कल्पनेचा उगम १८ व्या शतकांत युरोपांत सुरू झाला तो मात्र तेथपासून आतांपर्यंत एकसारखा वाढतच आहे.

डिरेक्टरेटच्या अंमलाखालीं फरान्स देश असतां बेब्रूफनें १७९५ सालीं साम्यवादी संघ काढला व फरान्समधील शेतजमिनीची वांटणी सारखी व्हावी असें मत प्रतिपादिलें. त्याचें ब्रीदवाक्य असें होतें : 'निसर्गानें सृष्टिनिर्मित सर्व गोष्टींचा उपभोग समान घेण्याचा हक्क प्रत्येक मनुष्याला दिलेला आहे.' पण अखेर प्रत्येक मनुष्याचा मरण्याचा जो समान हक्क तोच व तोहि विषम रीतीनें म्हणजे शिरच्छेद होऊन बेब्रूफला मिळाला ! फरेंच राज्यक्रांतीमधील तीन तत्त्वें प्रथम प्रसिद्धीस आलीं, तरी त्या तत्त्वांची खरी ओळख फरेंच समाजाला किती थोडी होती, व तीहि किती थोडा वेळ-टिकली, हें फरेंच राज्यक्रांतीच्या कोणत्याहि इतिहासांत वाचावयास मिळेल. फरेंच राज्यक्रांतीच्या वेळीं सर्व प्रकारच्या नव्या कल्पनांना ऊत आला त्यांत कम्यूनिझमचीहि एक होती. मात्र ती सगळया फरेंच क्रांतिकारक जन-

तेला पसंत पडलेली नव्हती. बेबूफ नांवाच्या ज्या एका मनुष्यानें ती काढली त्याला वेडापिसा अशी संज्ञा मिळाली, व ती कल्पना अमलांत आणण्याच्या त्याच्या प्रयत्नाला कट असें नांव मिळून लष्करी सैन्याच्या मदतीनें त्याची संघटना मोडून टाकण्यांत आली. फ्रेंच राज्यक्रांतींत वरिष्ठ वर्गाचा नाश झाला नाहीं. उमराव, धर्माधिकारी व पळपुटे या लोकांच्या जमिनी सरकारनें जप्त करून फार थोड्या किंमतींना विकायला काढल्या. पण अगदीं कनिष्ठ वर्गाजवळ त्या विकत घेण्याचें साधन नव्हतें. मध्यम वर्गांतल्या श्रीमतांनीं त्या विकत घेतल्या तशाच शेतकऱ्यांनीं; पण अगदीं कनिष्ठ वर्ग होता तो तसाच दरिद्री राहिला. सन १७९५ मध्यें बेबूफनें जमीन मिळकतीच्या या व्यवहाराविरुद्ध चळवळ सुरू केली. त्याच्या अनुयायांना 'ईक्वलस' 'लेव्हलरस' असें म्हणत. पूर्वी रोमन इतिहासांत ग्रॅकस नांवाच्या शांततावादी क्रांतिकारकानें जमिनीची वांटणी करून समता स्थापण्याचा प्रयत्न केला होता. त्याला अनुसरून बेबूफ हा स्वःतला ग्रॅकस म्हणवून घेई. त्याचें तत्त्व असें होतें कीं जनतेंत नुसती तात्त्विक समता असून उपयोगी नाहीं तर आर्थिक समता पाहिजे. अत्याचारी टेररिस्ट गटानें त्याच्याशीं संगनमत केलें. दोघांचा मिळून रॅडिकल सोशियालिस्ट नांवाचा एक राजकीय पक्षच बनला. त्याचा उघड हेतु क्रांति करून राज्यसत्ता हातीं घेऊन सोशियालिझम स्थापावी असा होता. पँथिअन नांवाच्या क्लबच्या द्वारें तो मतप्रसार करी. 'समान सुख' हा त्याच्या व्याख्यानाचा विषय असे. हळुहळू कामकरी वर्ग त्याच्या निशाणाखालीं जमूं लागला. पक्षाचें संख्याबळ वाढलें. पण सरकारनें पाहिलें कीं अजून बेबूफला खऱ्या जनतेचा पाठिंबा नाहीं मग तूर्तच त्याच्यावर प्रहार करा कशाला ? पण पॅरिसचें पोलिस बेबूफला वश होत चाललें आहे असें पाहतांच, कार्नोनें पँथिअन क्लबवर हात उचलला. नेपोलियननें क्लब मोडन टाकला, आणि अनेक अनुयायांसह बेबूफला कैद करण्यांत आलें. तथापि बेबूफचा समतावाद जमिनींत गाडला गेला नाहीं.

सेंट सायमन नांवाचा एक तत्त्वज्ञ सन १८२५ च्या पूर्वी होऊन गेला. त्यालाहि सोशियालिस्ट कम्यूनिस्टच म्हणतात. त्याचें अर्थशास्त्र धार्मिक तत्त्वज्ञानावर रचलेलें होतें. पण समाजांत सर्वस्वी समानता असते किंवा

नांदते असें तो म्हणत नाहीं. तो म्हणतो “ प्रत्येक मनुष्यानें काम केलेंच पाहिजे. पण कांहीं अधिक गुणवान् कांहीं कमी गुणवान् लोक असतात, यामुळें त्यांच्या योगानें श्रेष्ठकनिष्ठतेची एक शिडी किंवा सोपानपरंपरा बनते. यामुळें त्यांच्या श्रमाचें फल सारखें असूं शकत नाहीं. म्हणून त्यांना मोबदलाहि सारखाच द्यावा म्हणणें रास्त नाहीं. मात्र कोणाला त्याचे गुण पाहून कोणत्या कामावर नेमावें हें सरकारनें ठरवावें व त्याच्या लायकीप्रमाणें त्याला पगार द्यावा. अर्थात् सामाजिक वैषम्य हें संपत्तिनिष्ठ न मानतां गुण-निष्ठ असेंच मानलें पाहिजे. आणि अशा प्रकारचें वैषम्य समाजांत असण्याला हरकत नाहीं. तथापि गुणाप्रमाणें पाहून नेमलेला कामकरी हा एखाद्या सरकारी खात्यांतील नोकराप्रमाणें सरकारी कामाकरितां म्हणजेच समाजाच्या कामाकरितां नेमलेला आहे, तो स्वतःच्या फायद्याकरितां नेमलेला नाहीं, असें मानण्यांत यावें. अशी वृत्ति माणसांची राहिल्यास कारखानदार, भांडवलवाले, पेढीवाले उरण्यास हरकत नाहीं. समाजाचा आर्थिक कारभार करण्याचा अधिकार सहजच त्यांच्याकडे जाईल. मात्र शास्त्रज्ञ आणि धर्मज्ञ यांचा दर्जा संपत्ति निर्माण करणाऱ्या या लोकांहून वरचा असें समजण्यांत यावें. कामावरून लायकी व लायकीप्रमाणें मोबदला हें सेंट सायमनचें तत्त्व होतें. पण या लायकीचें फळ मनुष्याला फक्त हयातींतच मिळावें. त्याच्या वार-सांना तें फळ भोगण्याचा हक्क नाहीं असेंहि त्यांचें तत्त्व होतें ! तो म्हणे कीं “ राज्यक्रांतीचा एवढा गवगवा झाला, कीर्ति झाली पण श्रीमान् लोक, जमीनदार वगैरे वर्गांतील वारसदारी ही कांहीं त्या राज्यक्रांतीनें मोडली नाहीं. संपत्तीची वारसदारी उरली नाहीं तरी गुणांची वारसदारी म्हणून असते व ती मान्य करावी लागते. पण वारस हा वारस म्हणून नव्हे तर गुणवान् म्हणून सरकारनें समाजानें त्याला लायकीप्रमाणें काम व मोब-दला द्यावा असें तो म्हणे. सेंट सायमन याच्या तत्त्वज्ञानाचा पगडा फ्रेंच लोकांवर एक पिढीपर्यंत राहिला होता.

रॉबर्ट ओएन हा १७७१ सालीं जन्मला व १८५७ सालीं मेला. त्यालाहि सोशियालिस्टच म्हणतात. पण तो क्रांतिकारक नव्हता, इतकेंच नव्हे तर नुसता सुधारणावादी असल्यामुळें समाजांतील विषमता घालविण्याचा प्रयत्न वरिष्ठ वर्गानें आपलें कर्तव्य म्हणून करावा असें त्यांचें मत होतें. ही

विषमता काढून टाकणें याविषयीं कनिष्ठांच्या हक्काच्या भाषेनें तो फारसें बोलत नसे. मात्र मजूरवर्गाचीं दुःखें कमी होण्याचे त्यानें अनेक प्रयत्न केले. उदाहरणार्थ, तो स्वतः श्रीमंत कारखानदार असतां मजुरांच्या कामाचे तास कमी करणें, लहान मुलांमुलींना कामाला न लावणें, मजूरवर्गाच्या सहकारी पतपेढ्या, धर्मपंथविरहित शिक्षणसंस्था, मजुरांकरितां सेव्हिंग बँक इत्यादि नव्या कल्पनांचे प्रयोग त्यानें यशस्वी करून दाखविले. त्याची दृष्टि वर्गकलहापेक्षां न्याय्य कर्तव्याची असे. त्यानें १८३६ सालीं अमेरिकेंत कम्यूनिस्टिक पद्धतीची एक सोसायटी काढून पाहिली. परंतु तो त्याचा प्रयोग यशस्वी झाला नाहीं.

१८४८ सालीं कॅबे यानें अमेरिकेंत एक कम्यूनिस्ट स्वरूपाची संस्था काढली होती. सर टॉमस मोरचें अनुकरण करून त्यानें ' इकार्या ' नांवाचा ग्रंथ लिहून त्यांत, इकार्यिम लोक कम्युनिझमचें तत्त्व स्वीकारतील तर ते कसे वागतील याचें कल्पनाचित्र चांगलें रंगविलें होतें; व त्या कल्पनेचाच प्रयोग करून पाहण्याकरितां वरील संस्था त्यानें काढविली. तिच्या कांहीं शाखाहि स्थापल्या गेल्या; पण लवकरच अंतःकलहानें तिचा नाश झाला. १८४८ सालीं सर्व युरोपभर एकतंत्री राज्यपद्धतीविरुद्ध बंडें झालीं. एखाद्या ठिकाणींच राजसत्ता उलथून पडली, पण इतर ठिकाणीं जुलमी राजांनीं प्रजेला कॉन्स्टिटयूशन म्हणजे नियमबद्ध राज्यघटना देण्याचें तोंडानें कबूल केलें. फ्रेंच राजक्रांतीप्रमाणें या क्रांतीच्या धामधुमींत जनतेचा राजसत्तेवर प्रहार झाला. पण सोशियालिझम किंवा कम्यूनिझमच्या कल्पनांचा उपक्रम झाला नाहीं. आधीं राजसत्ता मर्यादित व्हावी, ती प्रजेच्या हातीं पुष्कळशी यावी, व तिच्या साहाय्यानेंच सोशियालिझम स्थापितां आल्यास पाहूं असा विचार तत्कालीन जनतावादी लोकांनी केला असावा. आणि कार्ल मार्क्सनें तर १७८९, १८३० व १८४८ इत्यादि वर्षीं ज्या क्रांत्या झाल्या त्यांना "भांडवलशाहीच्या हितवर्धनाकरितां झालेल्या" असें उघड दूषण दिलेलें आढळतें.

यानंतर क्रमानें कार्ल मार्क्स, एंजेल हे येतात. पण त्यांच्या तत्त्वज्ञानाचा खुलासा व विचार स्वतंत्र रीतीनें करावयाचाच आहे. म्हणून या ठिकाणीं त्याच्याविषयीं विशेष न सांगतां महायुद्धापर्यंत पुढे आलेल्या

आणखी इतर सोशियालिस्ट पक्षांचें थोडक्यांत समालोचन करूं, तें असें. १८५० सालीं बेल्जममध्यें कॉलिन्स नांवाचा एक अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें 'कलेक्टिव्हिझम' चें तत्त्व पुढें आणलें. त्याचें मत असें कीं, संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें म्हणजे जमीन व भांडवल हीं समाजाच्या समाईक मालकीचीं असावीं. पण त्यांच्या योगानें उत्पन्न होणारी संपत्ति ही ज्यानें त्यानें आपल्या खासगी मालकीची ठेवण्याला हरकत नाहीं. मात्र वांटणीच्या कामीं न्याय्य बुद्धीनें अवश्य तेथें समाजाला हात घालतां यावा. कॉलिन्स याचा रोख बहुतेक शेतकीच्या उत्पन्नावर होता. या प्रश्नाकडे केवळ तात्त्विक दृष्टीनें न पाहतां, समाजविकासाच्या इतिहासांत प्रत्यक्ष काय घडून आलें आहे व कोणती शक्ति प्रभावी झाली आहे हें तो पाही. विकास म्हणजे अर्थात् प्रगति आलीच. या प्रगतींत सर्व तऱ्हेचे उद्योग मोठ्या प्रमाणावर अधिकाधिक होऊं लागले. यामुळें अशा कारखान्यांच्या मालकांच्या हातीं व्यक्तिशः अधिक संपत्ति येऊं लागली. यामुळें वैषम्य वाढत गेलें आणि सामुदायिक उत्पादनाप्रमाणें सामुदायिक मालकीचीहि कल्पना आपोआप पुढें आली. पण नक्की याच मुद्यावर आजची 'कम्यूनिझम' व जुनी 'कलेक्टिव्हिझम' यांच्या स्वरूपांत फरक आहे.

कलेक्टिव्हिस्ट लोकांच्या मनांत लहानसहान खाजगी मालकाबद्दल म्हणजे गरीब मालकाबद्दल एक प्रकारची सहानुभूति होती. परंतु उत्पादनाचीं झालीं तरी सर्व साधनें सामुदायिक मालकीचीं व्हावीं असें म्हटलें म्हणजे खाजगी जमिनी वगैरे जप्त करणें ओघानेंच येतें. यामुळें या सहानुभूतीला अर्थातच कमीपणा येतो. म्हणून कलेक्टिव्हिस्ट पंथांतले सौम्य स्वभावाचे लोक असें म्हणत कीं, ज्यांच्या खाजगी जमिनी वगैरे काढून घ्यावयाच्या त्यांना कांहीं तरी मोबदला हा दिलाच पाहिजे. अर्थात् जे हा मोबदला घेऊन सुखानें आपली मिळकत देतील तेवढ्यांनाच तो मोबदला द्यावा. उत्पादनाच्या सामुदायिक मालकीच्या साधनांचा उपयोग ट्रेड युनियन, मजूरसंघ, यांच्यामार्फत करावा. त्यांनीं सर्व उत्पन्न सरकारी खजिन्यांत भरावें. मग सरकारी अधिकारी योग्य खर्च वजा घालून जो नफा उरेल तो त्या मजूर संघांना परत देईल. तो त्यांनीं आपापसांत वटून घ्यावा. कलेक्टिव्हिझम ही या अंशापुरती कम्यूनिझमसारखी आहे. मिळकत

शेवटीं खाजगी झाली तरी अल्प प्रमाणांत होईल. म्हणून अल्प प्रमाणांत असणारी विषमता उपेक्षणीय समजावी. निदान व्याजवट्टा, रोजन्दारीची मजुरी वगैरे गोष्टी तरी या पद्धतीनें वांचतील. शिवाय या पद्धतीनें निरुद्योगीपणा व परोपजीवित्व हीं नाहींशीं होतील. उलट मजुरांना हल्लीं पडणारे श्रम अतिशय कमी होतील. कलेक्टिव्हिस्टांच्या मतें प्रत्येकानें सहाच काय पण चार तास काम जरी रोज केलें तरी तें पुरे होईल! दीन दुबळ्यांना अर्थातच समाजानें पोसावयाचें. "अस्सल कम्यूनिस्ट पद्धतीनें समाजाची जी एक प्रकारची सक्ति व्यक्तीवर होते ती आमच्या पद्धतींत नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व्यक्तिव्यवहार हीं अबाधित राहतात, आणि गुणनाश व वैचित्र्यनाश होत नाहीं" असें कलेक्टिव्हिस्ट म्हणतात.

ग्रॅकस म्हणवून घेणाऱ्या बेबूफचा पुनर्जन्म ब्लँकी नांवाच्या क्रांतिकारकानें १८७१ सालीं करविला. त्याला अनार्किस्ट म्हणत. पॅरिसच्या कम्यूनवर त्याचें वर्चस्व प्रस्थापित झालें होतें. या कम्यूननें कामगार वर्गाच्या साहाय्यानें राज्यसत्ता जवळ जवळ पन्नास वर्षें आपल्या हातांत ठेवली होती. तिनें सोशियालिझम स्थापण्याचे अनेक प्रयत्न केले होते; व तिसऱ्या नेपोलियनला तिनेंच उलथून टाकलें. ब्लँकी यानें बेबूफचीं तत्त्वेंच डोळ्यांपुढें ठेवलीं होतीं. त्याच्या उद्देशपत्रिकेंत सर्वसाधारण सोशियालिझमचीं सर्व मुख्य तत्त्वें गोंविलीं होतीं. रशियन क्रांतिकारकांना १९१७ सालीं राज्यसत्ता हातीं आल्यानें आपल्या कल्पना अमलांत आणतां आल्या; पण ब्लँकीला राज्यसत्ता काबीज करतां न आल्यामुळें त्याला सोशियालिझमची स्थापना करतां आली नाहीं.

# ८. कम्यूनिझमचा पूर्वेतिहास (३)

मागील दोन प्रकरणांत कम्यूनिझमचा युरोपांतील पूर्वेतिहास सांगितला. आतां आशिया खंडांत काय स्थिति होती हें पाहूं. ख्रिश्चन सोसायटयां-संबंधानें पूर्वी उल्लेख आलाच आहे; तथापि ख्रिस्ती धर्म हा आशिया खंडांत जन्म पावला म्हणून ख्रिस्त व त्याचे शिष्य यांनीं केलेल्या सहजीवनाच्या कल्पनेच्या प्रचाराचा उगम आशिया खंडांतलाच म्हणावा लागतो. यहुदी धर्माचा संस्थापक मोझेस यानेंहि कम्यूनिझमपैकीं खाजगी मिळकतीच्या निषेधाच्या तत्त्वांचा पुरस्कार उघड केलेला आहे. तो म्हणतो, " जमीन ही माझी म्हणजे देवाची आहे, माणसाची नाहीं. म्हणून तिची कायमविक्री कोणालाहि करतां येत नाहीं. सात वर्षांहून अधिक काळ जमिनीचें स्वामित्व कोणाकडे राहात नाहीं." हिब्रू भविष्यवाद्यांनीं मौल्यवान संपत्ति व खाजगी मिळकत यांवर बरेच कोरडे ओढले आहेत. या उपदेशाप्रमाणें ज्यू, ख्रिश्चन वगैरे लोकांच्या कांहीं लहान लहान मंडळ्या सहजीवनाच्या तत्त्वानें राहणाऱ्या प्राचीन काळीं होत्या. पोपच्या हातीं धर्मसत्ता गेल्यापासून खाजगी मिळकत ही पवित्र व पुनीत झाली. तथापि त्यापूर्वीच्या धर्मगुरूंनीं कम्यू-निझमला पक्षपात दाखविला होता यांत शंका नाहीं. आणि रशिया हा निम्माशिम्मा आशिया खंडांतील मानला तर डुखोबोर जातीच्या रशियनांनीं आजच्या कम्यूनिस्टांच्या पूर्वी खाजगी मिळकत ही निषिद्ध मानली होती. यामुळें ती आशिया खंडाच्या खातीं जमा धरण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानासंबंधानें पाहतां महाभारत व स्मृतिग्रंथ यांत अराजकाचे जे उल्लेख आढळतात ते अगदीं प्राथमिक समाजस्थितीसंबंधीं असल्यामुळें, त्या समाजांत सहजीवनाचे कांहीं प्रकार अमलांत असतील अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं. बुद्धाचा उपदेश तर या कामीं प्रसिद्धच आहे. वासनांचा उच्छेद करावयाचा तर प्रथम संपत्तीचा त्याग हीच गोष्ट पुढें येते. आणि बुद्ध संघ व विहार यांतील लोकांचें जीवन गरीब भिक्षूंचें व कम्यूनिस्ट पद्धतीचें होतें हें उघड आहे. हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या प्राचीन लहान-सहान वसाहतींत सहजीवनपद्धति चालू असणें हें शक्य आहे.

हिंदुस्थान हा देश प्राचीन काळापासून सर्वस्वीं कृषिप्रधान. त्याची

सर्व संपत्ति शेतींतूनच उत्पन्न झालेली. आणि आज विसाव्या शतकांतहि ती स्थिति फारशी बदललेली नाहीं. गेल्या शंभर वर्षांतच इकडे कारखानदारीला सुरवात झाली. तथापि यूरोप अमेरिकेंतील देशांच्या मानानें या बाजूची औद्योगिक प्रगति हिंदुस्थानांत फारशी झालेली नाहीं. म्हणून हिंदुस्थानांत प्राचीन काळीं साम्यवादाचे दाखले हुडकावयाचे तर ते जमिनीच्या मालकी–वहिवाटींतच आढळतील.

चाणक्याच्या अर्थशास्त्रांत किंवा स्मृतिग्रंथांत जमिनीचें स्वामित्व एकंदर समाजाचें मिळून होतें असें आढळत नाहीं. व्यापारी लोकांचे संघ किंवा गण होते व त्यांचे आपापसांतील संबंध काय असावे याविषयीं अर्थशास्त्रांत थोडाबहुत उल्लेख आढळतो. पण कृषिसंपत्ति सामुदायिक सत्तेखालीं असल्याचें दिसून येत नाहीं. सर हेन्री मेन यानें ' ग्रामसंस्था ' नामक आपल्या पुस्तकांत असें मत दिलें आहे कीं, प्राचीन ग्रामव्यवस्थेचा मुख्य आधार जमिनीची समाईक मालकी यावर होता. पण तें मत विवादित आहे. मेन म्हणतो, " कोणत्याहि गांवांतील शेतीजमिनीचे विभाग करून ते लागवडीस देणें, त्यांची कांहीं कालानें पुन्हां पुन्हां वेगळी वांटणी करणें, आणि जमिनीच्या वहिवाटीसंबंधानें उत्पन्न होणाऱ्या तंटयाबखेडयांचा निवाडा करणें या तीनहि गोष्टी हिंदुस्थानांत सामुदायिक सत्तेनें होत असत. त्यावरून जमिनीचें स्वामित्व सामुदायिक होतें हें ठरूं पाहातें! एकाद्या वेळीं एकाद्या जमिनीच्या तुकडयाची प्रत्यक्ष वहिवाट व्यक्तीकडे किंवा कुटुंबाकडे असो; सर्व गांव मिळून समाईक रीतीनें आउतें ठेवून, बियाणें देऊन, गडी लावून, लागवड करीत असो; तरी पण कालांतरानें जमिनीची फिरून वेगळी वांटणी होई. याचा अर्थ लागवड करण्याच्या जमिनीवर त्या व्यक्तीची किंवा कुटुंबाची खासगी मालकी कायमची नसे. व्यक्तिगत मालकीचे हक्क पुढें निर्माण झाले, व ते झाले तेव्हांच जमीन धारण करण्याविषयींचे कायदे होऊं लागले. सगळ्या गांवच्या समाईक मालकीची जमीन असेल तेव्हां जमीन धारण करणें याला अर्थच राहात नाहीं. गांवचे गांवाबाहेरचे हे भेदहि पुढें झालेले आहेत. मनुष्यसमाजाच्या इतिहासांत प्रथम सर्व जातींकडे मिळून, नंतर कुटुंबाकडे मिळून व शेवटीं एकएका व्यक्तीकडे अशा क्रमानें भूमीचें स्वामित्व असल्याचें आढळतें." पण मेनच्या या

मताविरुद्ध बेडन पॉवेल याचें मत आहे. त्यानें हिंदुस्थानांतील जमीन धारण करण्याच्या निरनिराळ्या पद्धती या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांत त्यानें सर हेन्री मेनचें मत नापसंत केलें आहे.

बनारस हिंदु विद्यापीठाचे प्रो. अनंतराव अळतेकर यांनीं ' पश्चिम हिंदुस्थानांतील ग्राममंडळें ' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यांनींही सर हेन्री मेन यांच्याशीं आपला मतभेद प्रगट केला आहे. ते म्हणतात : "मेन साहेबांच्या मतें उत्तर हिंदुस्थानांतली ग्रामसंघटना हाच खरा प्राचीन ग्रामसंघटनेचा नमुना असून तो सर्व हिंदुस्थानभर होता. आणि युरोपांतल्या टयूटॉनिक देशांतहि तोच होता, हें या संघटनेच्या अस्तित्वाचें प्रत्यंतर !" या पुढें ते आणखी म्हणतात कीं, " रयतवारी पद्धति जरी पुढें अंमलांत आली तरी ती मूळच्या सामुदायिक सत्ताप्रकारांतून निघालेली आहे. पण हा इतिहास कदाचित् युरोपांतील ग्रामसंस्थांचा असेल पश्चिम हिंदुस्थानांतला नाहीं. वैदिक काळापूर्वीं केव्हां जमिनीची मालकी सामुदायिक असेल तर असो. पण खुद्द वेदांतले ऊर्वरासा क्षेत्रासा उर्वराजित् अशा शब्दांवरून जमीन ही व्यक्तीच्या मालकीची असें सिद्ध होतें. बौद्ध जातककालीं हीच स्थिति होती. मौर्यकालींहि तेंच होतें, हें अर्थशास्त्रावरून दिसतें. स्मृतिग्रंथांवरूनही रयतवारी म्हणजे व्यक्तिगत स्वामित्वच दिसून येतें. समाईक खातें व सरकारी देण्याची समाईक जबाबदारी असली तरी मालकी समाईकच असते असें नाहीं. अमर्याद जबाबदारीच्या पतपेढयांमध्यें कर्ज परत देण्याची जबाबदारी सर्वांची मिळून आणि म्हणून त्यांपैकीं वाटेल त्याची असते. पण यावरून त्यांच्या जमिनीची मालकी समाईक ठरत नाहीं. अविभक्त कुटुंबांत वांटण्या होण्याच्या आधीं मिळकत समाईक असते, पण याचा अर्थ तींत प्रत्येकाचा मालकी हिस्सा ठरलेला नसतो असें नाहीं. चतुःसीमापूर्वक सरसनिरस वांटण्या झालेल्या नसतात, धडेवांटप झालेलें नसतें इतकेंच काय तें. आपल्या मालकीचा तुकडा अमुक हा असें नंबराच्या नकाशावर दाखवितां येत नसेल, पण सबंध नंबरांत कोठें तरी आहे असें प्रत्येक समाईक खातेदार मानीत असतो. मूळ रयतवारी पद्धतीनें जमीन धारण करणारा एक मालक असला तरी पुढें त्याचा वंश वाढल्यानें पण त्याच्या वंशजांत दर पिढीला धडेवांटप न झाल्यानें

सामुदायिक मालकीचा भास उत्पन्न होतो. पण तोही कुटुंबापुरता. सर्व गांवच्या गांवानें समाईक पद्धतीनें गांवांतील सर्व जमीनची जमीन धारण केलेली आहे असें आढळणार नाहीं.

महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत तर गुजराथ–काठेवाडप्रमाणें हा भास होण्याची स्थितीहि आढळत नाहीं. रयतवारी पद्धतींत व्यक्तिशः रयत हाच जमिनीचा तुटक व खरा मालक असतो, सरकार मालक नसतें. सरकारचा हक्क फक्त सारा ( कर ) वसूल करण्यापुरता असतो. सरकार–देणें थकलें तर जमीन सरकारजमा होते; याचा अर्थ जमीन मूळ सरकारची होती तीच सरकारकडे परत गेली असा नव्हे. उदाहरणार्थ, सावकार कर्ज-फेडींत जमीन घेतो ती त्याला कर्जाचा मोबदला म्हणून घ्यावी लागते. ती मूळची कुळाच्या मालकीचीच असते. त्याचप्रमाणें साराबाकी थकल्या-मुळें जमीन सरकार–जमा होते तेथेंही सरकार सावकाराप्रमाणें जमीन कर्जफेडींत घेतें; कुळाला खंडानें दिलेली जमीन जमीनदार परत आपल्याकडे मालकी हक्कानें घेतो तसें नव्हे. मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायांत खालील श्लोक आहे—

'स्थाणुछेदस्य केदारं आहुः शल्यवतो मृगम् '

म्हणजे ज्या जमिनीची मशागत जो करील ती त्याची जमीन व जो पारधी आपल्या बाणानें हरीण मारील तो हरीण त्या पारध्याचा. आठव्या अध्यायांत राजाला भूमीचा ' अधिपति ' म्हटलें आहे. पण त्याचा अर्थ फक्त पालन करणारा असाच आहे, स्वामी असा नाहीं. राज्यांतील लोक ही राजाची ' प्रजा ' म्हणतात, तरी वाच्यार्थानें ती राजाची औरस संतति असा अर्थ होत नाहीं, त्याप्रमाणें पृथ्वीपति, भूपति याचाही अर्थ लक्षणेनें पालन करणारा असाच घेतला पाहिजे.

गांवगाडा या सुप्रसिद्ध पुस्तकाचा कर्ता म्हणतो :— " राजानें रयतेच्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा भागधेय (कर) म्हणून घ्यावा, असा सरसकट धारा पडला असावा. म्हणूनच ' षष्ठांशवृत्ति ' हा राजाचा प्रतिशब्द होऊन बसला. हिंदू राजांचे अमलांत काळी (शेतजमीन) पुष्कळ व कुणबी थोडे होते. तेव्हां गतकुळी किंवा बेवारशी जमिनीची लागण

जो करी तोच तिजवर वारसा सांगे, आणि सरकारला तिजबद्दल लढाई वगैरे धामधुमीच्या काळीं, पिकाची चौथाई आणि एरवींच्या सामसुमीच्या वेळीं साहोत्रा देई; याप्रमाणें करभार घेऊन राजे प्रजापालन करीत. ज्याला त्याला स्वकष्टार्जित संपत्तीचा भोगवटा घेण्याची सोय करून देत. पुढें राजकारण वाढत जातां जातां मुसलमानी रियासतींत जमिनीची पूर्ण मालकी राजानें आपल्याकडे ओढली असावी. कारण 'खुल्क खुदाका मुल्क पादशहाका (विश्व परमेश्वराचें आणि मुलूख राजाचा) बेटी बापाची, जमीन बादशहाची ' ह्याप्रमाणें लोक बोलूं लागले."

इनामदार सरंजामदार यांचे हक्क सरकारच्या हक्कांचेच अंश होत. आणि इनामदार, सरंजामदार यांना फक्त शेतावरील सरकारी साऱ्याचा अंश किंवा फार तर सबंध सारा घेण्याचा हक्क असतो पण जमिनीवर हक्क नसतो. याचाच अर्थ सरकाराचाही हक्क साऱ्यापुरताच आहे, जमिनीवर नाहीं. गुजराथ-काठेवाडमध्यें भागदारी पद्धत आहे तिचें कारण या जमिनी बाहेरून आलेल्या गिराशियांनीं स्थानिक लोकांपासून जुलूमजबरदस्तीनें काढून घेऊन आपल्या केल्या व त्या गिराशियांच्या वंशांत प्रत्यक्ष वांटणी न होतां चालत राहिल्या. भागदारींत शेंकडों लोक असतात, म्हणून सर हेन्री मेन म्हणतो त्याप्रमाणें, ती सामुदायिक सामाजिक मालकीची जमीन असा भास होतो पण तो खरा प्रकार नव्हे.

जमिनीची मालकी, भूस्वामित्व, मुळांत सरकारी हा सिद्धांत ब्रिटिश सरकारनें पुढें आणलेला आहे. पूर्वीचे हिंदु राजे असा हक्क सांगत नसत. अर्थशास्त्रांत जमिनीच्या मालकाचा ती विकण्याचा हक्क कबूल केला आहे. जैमिनीच्या पूर्वमीमांसा–दर्शनांत असें सांगितलें आहे कीं, विश्वजित यज्ञांत राजाला भूमीचें दान देतां येत नाहीं. कारण भूमीवर त्याचें स्वामित्व नसतें.

ग्रामसंस्थेंतील पांढरी जमीन वसाहतीची. ती अर्थातच व्यक्तींच्या मालकीची असते. काळ्या जमिनीचा प्रकार हा वर सांगितला. आतां पुरातन काळापासून दरएक गांवाला गायरान, गुरचरण, कुरण अशा स्वरूपाच्या कांहीं ठराविक जमिनी सामुदायिक मालकीच्या म्हणजे गांवाऱ्या मालकीच्या असत. कांहीं मर्यादेपर्यंत जंगलही सामुदायिक असूं शकतें. पण या

चार प्रकारच्या जमिनी व्यक्तीच्या मालकीच्या नसण्याचें कारण त्यांची वांटणी न करतां त्यांची वहिवाट व उपभोग सामुदायिक पद्धतीनें अधिक चांगला घेतां येतो. गुरांना कोठेंहि चरायला मिळालें किंवा शेतकऱ्याला कोठेंहि टहाळा कवळ मिळालें म्हणजे त्याचें काम भागतें. पिकाच्या जमिनीची गोष्ट तशी नाहीं आणि घराखालच्या जमिनीची तर नाहींच नाहीं.

हिंदुस्थानांतील भूमीच्या स्वामित्वाची परंपरा ही अशी आहे. म्हणजे ती राजाची नाहीं किंवा सामुदायिक मालकीचीहि नाहीं. तर व्यक्तिशः मालकीची आहे. म्हणून सोशियालिस्टांना या बाबतीत त्यांना अनुकूल असा जुना दाखला मिळूं शकणार नाहीं. आतां यापुढें सत्तेच्या बळावर काय वाटेल तें करावें हें वेगळें.

सरकारच्या मालकीची जमीन म्हणजे बहुधा पडित, खराब, राजीनामा देऊन सरकारांत घातलेली, बेवारशी, नदीनाल्यांच्या पाण्यापुरानें नवी बनलेली म्हणजे बिनवारशीच, लँड ॲक्विझिशनच्या कायद्यानें म्हणजे मोबदला देऊन पण सक्तीनें विकत घेतलेली इत्यादि, जंगल, गुरचरणें इत्यादि जमिनी व्यक्तीच्या मालकीच्या नसल्या तर सगळ्या गावच्या मिळून असतील. पण त्यामुळें त्या सरकारी नव्हत. जमिनी मूळ कुळांच्या मालकीच्या असतां जुलूमजबरदस्तीनें कोणीं त्या कबजांत घेतल्या व कालांतरें त्या सरकारी कागदोपत्रीं त्यांच्या मालकीच्या म्हणून दाखल झाल्या तरी त्यामुळें व्यक्तिस्वामित्वाचा सिद्धांत नाकबूल करतां येणार नाहीं. याचें तात्पर्य, सोशियालिस्ट, कम्यूनिस्टांना असें म्हणतां येणार नाहीं कीं संपत्तीच्या उत्पादनाचें मुख्य साधन जी लागवडीची शेतजमीन ती आधींच सरकारच्या म्हणजे समाजाच्या मालकीचीच आहे. त्यामुळें तो मालकी अधिकार फक्त अमलांत आणला या बाबतींतला समाजसत्तावादाचा प्रश्न सुटला! सगळे गांवकागदपत्र नुसतें फाडून टाकले म्हणजे सामुदायिक शेतीच्या योजना चालू करण्याला वाट मोकळी झाली. पण हें बोलण्याइतकें करण्यांत सोपें नाही. आज व्यक्तिशः शेतकऱ्यांची हलाखी इतकी झाली आहे कीं, एकादे वेळीं हा सारा भरणें नको, आणि जें पीक जमिनींतून कापून नेण्याला पिकाच्या किंमतीपेक्षां अधिक खर्च लागतो तें पीक पेरणेंही नको म्हणून जमीन सोडून द्यावी व मोकळें व्हावें असें त्याला

वाटतें. पण हें त्याचें वैराग्य शैक्षणिक व स्मशानवैराग्याच्या जातींतलेंच आहे, खरें नव्हे. उद्यां समजा त्याला सामुदायिक शेती अधिक फायदेशीर होते हें अनुभवानें कळून आलें तर, आणि आवर्षण पडलें तरी स्वदेशी सरकार उपाशी मरूं देत नाहीं असें दिसून आलें, सामुदायिक स्वामित्वाची कल्पना तो मान्यही करील. पण आज खेडगांवांत जाऊन जमीन सक्तीनें बिनमोबदला खालसा करून सोशियालिझमची गोष्ट बोलेल तर त्याला बहुधा मारच खावा लागेल, किंवा सरकार ही गोष्ट एकदम करील तर शेतकऱ्यांचें बंड होईल, शेतकऱ्यांना सोशियालिझमच्या फायद्याचें नुसतें तात्त्विकच नव्हे तर अनुभवसिद्ध शिक्षण हळुहळूच द्यायला पाहिजे आहे.

---

# १. कम्यूनिस्ट राज्यपद्धति

प्रस्तुत लेखांतील तिरंगी नवमतवाद म्हणजे मुख्यत: सोशियालिझम, कम्यूनिझम यांनीं प्रचारांत आणलेलें नवीन मत. तिरंगी हा शब्द या मताच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक या तीन अंगांना उद्देशून योजला आहे. पूर्वीच्या आठ प्रकरणांत हें नवमत कोणत्या कारणानें जोरांत पुढें आलें हें थोडें सांगितलें, तें मत पुढें आणणाऱ्या पुढाऱ्यांच्या हेतूची थोडी चिकित्सा केली, आणि या नवमताला प्राचीन, अर्वाचीन काळांत दाखले कशा प्रकारचे सांपडूं शकतात हें सांगितलें. यानंतर आतां रशियामध्यें कम्यूनिझमची जी पद्धति प्रत्यक्ष अमलांत आहे, तिची थोडीशी माहिती देतों. या विषयावर अलीकडे इंग्रजी भाषेंत बरेच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. मराठींतही या विषयाची माहिती नवमतवादी तरुण मंडळी संघटित प्रयत्न करून देत आहेत. तथापि वाचकांना हें सर्व वाङ्मय बाहेरगांवीं वाचण्याला मिळत नाहीं. म्हणून, पण केवळ संक्षेपानें, त्यांतील ढोबळ माहिती देण्याचा आमचा विचार आहे.

प्रथम राजकीय, नंतर आर्थिक व नंतर सामाजिक असा क्रम योजला आहे.

अपरिचित वाचकाला प्रथमच हा प्रश्न सुचतो कीं, रशियांत आज अराजक म्हणतात तें चालू आहे कीं, कांहीं संघटित स्थायिक स्वरूपाची राज्यपद्धति सुरू आहे? या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत असे. रशियांत आज अराजक नाहीं. चालतेंबोलतें, कर्तेसवर्ते असें सर्वांगपरिपूर्ण राज्य तेथें स्थापलें गेलें आहे. १९१७ च्या सुमारास महायुद्धांत रशियाचा पराभव झाल्यानंतर प्रथम कांहीं दिवस रशियांत मूर्तिमंत अराजक निर्माण झालें होतें हें खरें आहे, तो प्रकार असा. झार पदच्युत झाला, बंदींत पडला. प्रधानमंडळ जागेवर उरलें नाहीं. सरकारी कचेऱ्या ओसाड पडल्या. त्यांचा ताबा घेतां येईल त्यानें घ्यावा, मनाला येतील ते हुकूम सोडावे, पण त्यांचा अंमल होऊं नये अशी स्थिति झाली. लष्करी शिपायांनीं हत्यारें काखेंत मारून रणांगणाकडे पाठ फिरवून राज्यसत्तेच्या मुख्य केंद्राकडे मोर्चा वळवला. पोलिसांना हुकूम देणारा कोणी उरला नाहीं. रयत व शेतकरी आश्चर्यचकित होऊन गोंधळून गेले! सुखवस्तु लोकांना लूटमारीपासून आपलें रक्षण कसें करावें हें समजेना.

मुख्य राज्ययंत्र पकडून आपण शिरजोर व्हावें अशाविषयीं क्रांतिकारक, प्रति–क्रांतिकारक, प्रति–प्रति क्रांतिकारक अशा पुढाऱ्यांचे प्रयत्न हातीं मिळेल तें सैन्य घेऊन सुरू झाले. संप, दंगेधोपे सुरू होऊन शेतकरी, शिपाई, कामकरी यांचे संघ बनूं लागले, कत्तली झाल्या. असें होतां होतां १९१७ च्या एप्रिलमध्यें लेनिन, झिनोव्हिएफ, ट्रॉट्स्की वगैरे प्रमुख बोल्शेव्हिक पुढारी परदेशांतून रशियांत शिरले. मेमध्यें रशियन राजधानींत सोव्हिएटनें तात्पुरतें संयुक्त प्रधानमंडळ बनविलें. पण पुढें तेंहि उलथून पडून लेनिननें कम्यूनिस्ट सरकारची स्थापना केली, आणि तेथपासून तेंच सरकार अजून सत्ताधीश आहे.

१९१८ च्या प्रारंभीं ही घटना घडून आली. या गोष्टीला अठरा वर्षें पुरीं झालीं. एवढ्या काळांत कम्यूनिस्ट पार्टीनें राज्यव्यवस्थेचीं अवश्य तीं सर्व खातीं उघडून राज्यकारभार सुस्थिर व संघटित केला आहे. तो इतका कीं, आतां रशियांत प्रतिक्रांतीचें उघड नांवही ऐकूं येत नाहीं. रशियन सरकारचे वकील प्रत्येक परराष्ट्राच्या दरबारीं घेतले गेले आहेत. रशियन सर-

कारला सर्वतोपरी मान्यता परराष्ट्रांकडून मिळन व्यापारी-राजकारणी सर्व प्रकारचे तह परस्परांत होऊं लागले आहेत. रशियानें सैन्यबळ इतकें तयार केलें आहे कीं, त्यावर आपण होऊन स्वारी करण्याची हिंमत कोणीहि धरीत नाहीं. उलट रशियाच कम्यूनिझमच्या मतप्रचारार्थ परदेशावर स्वारी करतो कीं काय अशी ज्याला त्याला भीति उत्पन्न झाली आहे. इतकेंच नव्हे तर आजमितीला असा एकहि देश नाहीं कीं ज्यामध्यें रशियानें आपला मतप्रसार करण्याकरितां गुप्त दूत व पैसा पाठवून स्थानिक चळवळी उत्पन्न केल्या नाहींत !

कम्यूनिस्ट राज्ययंत्र सुप्रतिष्ठित झाल्याचें याहून आणखी चांगलें गमक हें कीं, देशसंरक्षणाकरितां म्हणून सगळें राष्ट्रच्या राष्ट्र लष्करी शिक्षण घेत असलें तरी शेतकी, व्यापार, उद्योगधंदा करण्याला जी शांतता व सुरक्षितता लागते ती आपणाला लाभली; अशा विश्वासानें वरील उद्योगांकडे लोक आपलें सर्व लक्ष आस्थेनें देऊं लागले आहेत. सर्वांत शेवटची म्हणून सांगण्याची गोष्ट ही कीं, एकंदर रशियन जनतेवर कम्यूनिझमच्या तत्त्वांचा पगडा बसून आपल्या आयुष्यांतच अगदीं देखत देखत ही अपूर्व क्रांति कशी घडून आली, आणि जवळ जवळ मनुष्यस्वभावच उलटाच्या पालटा व्हावा असें आचारविचारांचें परिवर्तन कसें घडून आलें, याचें कौतुक व आश्चर्य करण्यांत ही जनता आपल्या ठिकाणीं गर्क व गुंग होऊन गेली आहे. आपण आरशापुढें उभें राहावें पण प्रतिबिंबरूपानें भलतेंच तोंड दिसावें असा अनुभव रशियन जनतेला आज येत आहे.

तात्पर्य, रशियांत आज अराजक नाहीं इतकेंच नव्हे, तर स्थायिक व सुप्रतिष्ठित असें राज्य चाललें आहे. अठरा वर्षांपूर्वीं रशियांतील अराजकाच्या वार्ता जगभर लोक ऐकत होते त्या कित्येकांच्या कानांतून अजून गेलेल्या नसाव्या ! पण त्याला कम्यूनिस्ट सरकार काय करणार ? शिमगा गेला तरी कवित्व उरतें म्हणतात. पण तें कवित्व तोंडांत घोळत असल्यामुळें अजून शिमगा चालूच आहे असें कोणाला वाटलें तर त्याला काय उपाय ? किंवा याहून चांगली उपमा द्यावयाची तर ती अशी कीं, कोटयवधि मैलांवरचे तारे स्थानभ्रष्ट झाले तरी, त्यापासून सुटलेले किरण नंतरहि बऱ्याच काळापर्यंत प्रेक्षकांच्या डोळयांवर पडत असतात. म्हणून तारा आपल्या जागींच आहे असें त्यांना वाटतें, पण हा भ्रम असतो.

यानंतर पुढचा प्रश्न असा कीं रशियांत आज सुस्थिर व सुसंघटित राज्य आहे कबूल. पण त्याचा प्रकार कोणता ? याचें उत्तर असें कीं हा प्रकार जुन्या राज्यघटना ग्रंथांतून सांपडणारा नाहीं तो अगदीं नवा बनाव आहे. आतां या बनावांतहि कांहीं कांहीं जुन्या राज्यघटनांची ओळख थोडी थोडी पटते, मात्र तंतोतंत हुबेहूब असा दाखला कोणताच मिळत नाहीं. आपल्या साधारण परिचयाच्या राज्यपद्धती म्हटल्या म्हणजे राजसत्ताक किंवा लोकसत्ताक. पैकीं पहिल्या प्रकारची ओळख अशा रीतीनें पटते कीं, रशियांत आज नांवानें राजा नसतां जवळ जवळ तितकाच अनियंत्रित राज्याधिकार (ऐश्वर्य नव्हे !) भोगणारा अमूर्त डिक्टेटर आहे. आणि लोकसत्ताक राज्यप्रकाराची खूण अशी पटते कीं, शिरोभागीं कोणी डिक्टे-टर असला तरी त्याच्या अधिकाराला संमति अगदीं सरहद्दीच्या खेड्यांतल्या खेड्यांतील लोकांपासून मिळण्याची व्यवस्था आहे. या राज्यपद्धतीला "प्रोलेटेरियेट डिक्टेटरशिप" असें नांव आहे.

याचा अर्थ समजेलसा सांगणें जवळ जवळ दुरापास्तच होय. याचें कारण असें : सर्व देशभर लोकनियुक्त अशा सोव्हिएट संस्थांचें प्रचंड जाळ पसरलेलें आहे. आणि प्रत्येक खालच्या प्रतीच्या सोव्हिएट्समधून वरच्या सोव्हिएटकडे कांहीं प्रतिनिधी पाठविले जातात. अशा रीतीनें तळापासून माथ्यापर्यंत निवडणुकीच्या व्यवहारानें मनोऱ्याची किंवा गोपुराची शीग भरली जाते. तरी पण या सर्व रचनेंत खरी राजकीय सत्ता अमुक एके ठिकाणीं केंद्रीभूत झाली आहे असा अंगुलिनिर्देश करून दाखवितां येत नाहीं.

पण या सर्व गुंतागुतीच्या घटनेच्या बाहेर व तिच्याशीं समांतर अशी दुसरी एक घटना रशियांत वावरत आहे. आणि मौज ही कीं, खरी सत्ता अशी या दुसऱ्या घटनेंतच आहे ! सर्व कांहीं करून स्वतः नामानिराळें असावें असा प्रकार या दुसऱ्या घटनेचा आहे. ती घटना म्हणजे कम्यूनिस्ट पार्टी; व ही पार्टी म्हणजे एक विशिष्ट शपथा घेतलेल्या क्रांतिकारकांचें मंडळ आहे म्हटलें तर त्याला कायदेशीर अधिष्ठान कांहींच नाहीं. पण म्हटलें तर कोणत्याहि गोष्टीला कायदेशीरपणा आणून देणाऱ्या सर्व रशियन काय-द्यांचें जनकत्वच मुळीं या मंडळाकडे असतें ! म्हटलें तर हें मंडळ प्रगट आहे,

पण म्हटलें तर त्याचा सर्व कारभार जवळजवळ गुप्तपणासारखाच चालतो ! म्हटलें तर हें मंडळ वीस किंवा तीस लक्ष व्यक्तींचें बनलेलें आहे. पण म्हटलें, तर त्यांतल्या कांहीं थोडचा व्यक्तीच इतक्या प्रबळ असतात कीं, सर्व सूत्रें वरपासून खालपर्यंत त्याच चालवितात. या मंडळाच्या हुकूमांना किंवा निकालांना कायदेशीर स्वरूप असें कांहींच नसतें. फार काय हे हुकूम कदाचित कागदावर लिहिलेहि जात नसतील; व लिहिलेंच तर त्यांना हुकूम हें नांव नसेल. तरी पण हें मंडळ (म्हणजे त्यांतील पुढारी) तोंडची हवा सोडल्याप्रमाणें सहज बोलून केवळ सल्लामसलत या साळसूद नांवाखालीं ज्या सूचना करतात त्यांचा अंमल शिक्कामोर्तब केलेल्या हुकूमापेक्षां अधिक हमखास व करडा होतो.

रशियन जनतेचें सूत्र कम्यूनिस्ट पार्टीच्या हातीं. पार्टीचें सूत्र तिच्यांतील पांच चार पुढाऱ्यांच्या हातीं. व त्या पांच चार पुढाऱ्यांचें सूत्र आज स्टालिनच्या हातीं. पण फिरून स्टालिन असें म्हणण्याला मोकळाच कीं, मी सोव्हिएट–कॉंग्रेसचा अध्यक्ष नाहीं, किंवा कम्यूनिस्ट मंडळाचा अध्यक्ष नाहीं, फार तर मला पार्टीचा जनरल सेक्रेटरी असें म्हणतां येईल. आपण डिक्टेटर नाहीं असें स्टालिननें वेळोवेळीं मोठ्यानें गर्जून सांगितलेलें आहे. अधिकार कोणाचा ? सत्ता कोणाची ? स्टालिन म्हणतो, " अधिकार, सत्ता सर्व जनतेची. पुढारी विनयशीलपणें अदबीनें सुचवितात. लोक पूर्ण विचार करून तें ऐकतात. लोक असे कांहीं दुधखुळे आहेत कीं काय कीं आम्हां मूठभर लोकांचें त्यांनीं निमूटपणें ऐकावें ? मग माझ्या एकटचा व्यक्तीची काय कथा ? " याचा अर्थ आपण सर्व समजतोंच. पण दुसरेपक्षीं त्याला उपाय तरी काय ? आज महात्मा गांधी यांना कॉंग्रेस घटनेंत चार आणेवाल्या सभासदापलीकडे कायदेशीर स्थान नाहीं. पण कॉंग्रेसचीं सूत्रें आजहि पुष्कळशीं त्यांच्या तंत्रानें चालतातच कीं नाहीं ? टिळकांनीं काढलेल्या कित्येक संस्थांतून स्वतः टिळकांचें स्थान सामान्य सभासदाइतकेंच असतां, त्यांच्या पुढारीपणानेंच सर्व गोष्टी होत असतच कीं नाहीं ? स्वतः अनुयायांची तक्रार नसेल तर केवळ तिऱ्हाईताला, पुढाऱ्यावर डिक्टेटरीच्या अभिलाषाचा आरोप करतां येत नाहीं.

असो, पण स्वतः स्टालिनच हें कबूल करतो कीं, " रशियांत जी डिक्टेटरशिप आहे, ती नांवानें जनतेची असली तरी प्रत्यक्षपणें कम्यूनिस्ट पार्टीचीच आहे. " शिवाय स्वतः कम्यूनिस्ट लोकच जर रशियन राज्यघटना प्रकाराला ' डिक्टेटरशिप ' हें नांव देतात तर लोकांनीं तोच शब्द घेऊन व त्यांतून निघेल तितका अनुकूल अर्थ काढून त्या घटनेला एक प्रकारें दूषण दिलें, म्हणजे हा खऱ्या लोकशाहीचा प्रकार नव्हे असें म्हटलें, तर त्याला हरकत घेणें रास्त होणार नाहीं. सिडने वेब म्हणतो, " डिक्टेटरशिप या शब्दाइतका दुसरा कोणताच शब्द बोल्शेव्हिक लोकांना प्रिय नाहींसा दिसतो! पण हा डिक्टेटर आपल्याला काय इष्ट असेल त्याविषयीं जनतेची समजूत पाडून पटवून देऊनच करून घेतो. जुलूमजबरदस्ती करीत नाहीं! " म्हणण्याचा झोंक असा कीं, या बाबतींत रशियाचा प्रकार वेगळा आणि जर्मनी, इटली यांतील डिक्टेटरशिपचा प्रकार वेगळा!

या म्हणण्यांत तथ्य आहे तें इतकेंच कीं, जर्मनी, इटली या देशांत खुद्द कायद्यानेंच हिटलरला, मुसोलिनीला सुलतानी हक्क दिलेले आहेत तसें रशियांत नाहीं. फासिस्ट पार्टी व कम्यूनिस्ट पार्टी यांच्यांतही असा भेद आहे. अमेरिकेंत पूर्ण स्वरूपांत डेमॉक्रसी नांदत आहे असें आपण म्हणतों. पण तेथेंहि प्रत्यक्ष राज्यघटनेच्या कायद्यानेंच अमेरिकन प्रेसिडेंटला सुलतानशाहीचे कांहीं हक्क दिलेले आहेत. हेच हक्क बजावून सोशियालिझमच्या कांहीं तत्त्वांचा प्रयोग अध्यक्ष रूझवेल्ट यानें करून पाहण्याचा डाव टाकला होता. पण वरिष्ठ न्यायकोर्टानें तो फेटाळून लावला.

रशियन लोक विभूतिभजक आहेत. यामुळेंच ते अधिकारस्थानापेक्षां व्यक्तींनाच महत्त्व देतात. पूर्वींच्या लेनिनप्रमाणेंच स्टालिनलाहि १९२७ पासून ते आपला उद्धारकर्ता देव असें मानतात. ट्रॉट्स्की हाही असाच एक देव होता. पण देवादेवांतही स्पर्धा व चुरस असतेच ना! यामुळें स्टालिन देवानें ट्रॉट्स्की देवाला रशियांतून हुसकून जगभर एखाद्या भणंगभिकाऱ्याप्रमाणें, किंवा लपतछपत आश्रय घेणाऱ्या गुन्हेगाराप्रमाणें, भटकावयाला लावलें आहे. असो, स्टालिन हा डिक्टेटर नाहीं हें मान्य केलें तरी ' डिक्टेटरशिप ऑफ दि प्रोलेटेरिअट ' याचा अर्थ सांगावयाचा राहिला आहे. पण तो सागणें खरोखर फार कठिण आहे.

सिडने वेबसारखा रशियन कम्यूनिझमचा हौशी पुरस्कर्ता इंग्रज आढळणें कठिण. पण तो आपल्या पुस्तकांत म्हणतो—"या दोन शब्दांचा अर्थ मला करतांच येत नाहीं. ते परस्परविरोधी आहेत" हा शब्दप्रयोग मार्क्सनें प्रथम उपयोगांत आणला. पैकीं डिक्टेटर म्हणजे सुलतान किंवा हुकूमशाहा हें प्रसिद्धच आहे. आणि प्रोलेटेरिअट म्हणजे राष्ट्रांतील श्रमोपजीवी कामकरी वर्ग. हा वर्गच कोणत्याहि देशांत बहुसंख्य असावयाचा. आणि रशियांत तो तसा असल्यामुळें बहुसंख्य लोकांच्या मताप्रमाणें तेथील राज्यकारभार चालतो असें सरळ म्हणतां येईल! तसें म्हटलें म्हणजे तो डेमॉक्रसीचा एक ठराविक रास्त असा प्रकार होईल. मग त्यांत वाईट तें काय? असें असतां डिक्टेटरशिप हेंच नांव अजून चालविण्याचा आग्रह कम्यूनिस्ट धरतात; याचा अर्थ हाच कीं, सरळ डेमॉक्रसी म्हणण्याला त्यांचें मनच त्यांना खातें आहे. खोटें भासवितांना देखील खरें लपविण्याचें त्यांना साधलें नाहीं. किंवा तें न आवडण्याइतके ते प्रामाणिक आहेत असें वाटेल तर म्हणा! वरून देखावा कांहीं असला तरी जुलूमजबरदस्तीनें, धाकदपटशहानें, अत्याचारानें मनचें करावयाचें हेंच कम्यूनिस्ट पार्टीचें आद्य सूत्र आहे. जुलूम लोकांच्या हिताकरितांच करावयाचा! जुलूम करणारांना स्वत: व्यक्तिस्वार्थ साधावयाचा नसतो हें अगदीं खरें. पण राजकीय व आर्थिक नवमतवादाच्या बाबतींत रशियांतील लोकांना खरेंखुरें व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं! या गुलामगिरीचा वचपा कम्यूनिस्ट पार्टीनें लोकांना धार्मिक किंवा निदान सामाजिक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य देऊन कसा भरून काढला आहे हें नवमतवादाच्या तिसऱ्या (सामाजिक) रंगाची चर्चा करतांना सांगण्यांत येईलच. पण आतां रशियांतील विद्यमान राज्यपद्धतीची माहिती आम्हांस द्यावयाची आहे त्यापुरतें या 'डिक्टेटरशिप'चें वर्णन केलें.

पण मुख्य सूत्रचालकता कोणाच्या हातीं आहे व ती कशा उपायांनीं अमलांत येते हा विचार बाजूला ठेवला, म्हणजे मग बाकी सर्व प्रचंड राज्ययंत्र लोकमतप्रदर्शन व निवडणुकी यांच्या मार्गानेंच चालतें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्यासंबंधीं माहिती पुढील प्रकरणांत देऊं.

# १०. कम्यूनिस्ट रशियांतलि अंतर्व्यवस्था

ज्या ' प्रोलेटेरिएट ' ला म्हणजे कामकरी वर्गाला जनतेंतील मुख्य घटक असें कम्यूनिस्ट पार्टीनें ठरविलें, त्याच्या मामुली प्राथमिक घटनेला सोव्हिएट असें नांव आहे. सोव्हिएट हा एक प्रकारचा संघ आहे. तो अगदीं प्रथम रशियाच्या राजधानींत १९०५ सालीं, संप यशस्वी करण्याचें साधन म्हणून, उपयोगांत आणण्यांत आला. १९१७ सालीं त्याचें कार्य संपापलीकडे जाऊन तो संघ राजकीय विषयांवर ठराव करून मत प्रगट करूं लागला. क्रमानें त्याला लोकनियुक्त प्रातिनिधिक संस्थेचें स्वरूप येऊं लागलें. प्रथमपासूनच तो संघ कामकरी वर्गाचा असल्यामुळें, भांडवलवाले, दुकानदार, जमीनदार, सुखवस्तु इत्यादि लोक त्यांतून सहजच वगळले गेले. १९०५ सालीं झारशाहींत सोव्हिएट संस्था निष्ठुरपणें चिरडल्या गेल्या. पण १९१७ सालच्या क्रांतींत लेनिनप्रभृति कम्यूनिस्ट पुढाऱ्यांनीं या सोव्हिएट संस्थाच हातीं धरून त्यांजकडून क्रांतीला सहाय्य घेतलें.

सोव्हिएट संस्थांचें पहिलें ध्येय डेमोक्रॅटिक पद्धतीचें कायदेमंडळ रशियाला मिळवून द्यावें, इतकेंच होतें. कामकऱ्यांचें पाहून लष्करी शिपायांनीं व त्यानंतर शेतकरी वर्गानें आपलींहि सोव्हिएट मंडळें बनविलीं. लेनिनला हें आयतेंच साधन हातांशीं मिळालें. आणि आतां क्रांति हातीं आली असें दिसून येतांच, लेनिननें डिमॉक्रसीच्या ध्येयाचें रूपांतर कम्यूनिझममध्यें केलें. यांत त्याला स्वतः त्याच्याहि कल्पनेबाहेर यश आलें. सोव्हिएटमधील लोक हत्यारबंद, प्रत्यक्ष जनतेमधील म्हणून जनतेचें खरें दुःख जाणणारे, बहुसंख्य समाजाचे प्रतिनिधी, निवडणुकीचें तत्त्व मनाला पटलेले, सामुदायिक कार्यक्रम आवडणारे, अतिशय श्रमक्षम—या सर्व दृष्टींनीं पाहतां त्यांनीं डेमॉक्रसीचें ध्येय ठेवलें तरी त्यांची डेमॉक्रसी भांडवलशाहीच्या खाकेंत असणाऱ्या डेमॉक्रसीसारखी राहणार नाहीं. ती कोणतीहि सुधारणा, क्रांतीच्या स्वरूपाची देखील, मनांत आलें तर तडकाफडकी करून टाकील, असें कम्यूनिस्ट पुढाऱ्यांना वाटून त्यांनीं सोव्हिएट संस्थांनाच पुढारीपण दिलें. पण युक्ति इतकीच केली कीं, लोकनियुक्त कायदेमंडळाकडे राज्यसत्ता न

ठेवतां सोव्हिएट कांग्रेसकडे ठेवून घेतली. एकाच बैठकींत या कॉंग्रेसनें आपलीं कार्यकारी मंडळें नेमलीं; जर्मनीशीं युद्ध थांबविलें; सर्व जमीन खाजगी मालकीतून काढून घेतली. आणि रशिया हें स्थलवाचक जुनें नांव काढून टाकून सोव्हिएट रिपब्लिक्स् हें गुणवाचक नांव त्या जागीं घेतलें. जुन्या रशियाला ' यूनियन ऑफ सोशियालिस्ट सोव्हिएट रिपब्लिक्स् ' असें हल्लींचें नांव आहे. यांत रशिया असा स्थलवाचक शब्दहि सोव्हिएटच्या मागें घेतलेला नाहीं हें लक्षांत घेण्याजोगें आहे. याचें कारण असें कीं, कम्यूनिझमच्या तत्त्वाप्रमाणें स्थळनिर्मित, जातिनिर्मित, वंशनिर्मित भेद खरे नाहींत. सर्व मनुष्यसमाज हा एकच अखंड वर्ग आहे. त्याचें परमोच्च ध्येय कम्यूनिझमच्या तत्त्वांत सांगितल्याप्रमाणें आहे. म्हणजे उद्यां सर्व जगभर या तत्त्वांनीं चालणारा एकच समाज होणार आहे. मग आज उगीच रशिया हें स्थलवाचक मर्यादित नांव घेऊन या परमोच्च ध्येयाला उगीच नाट किंवा गालबोट कां लावा ? रशिया या शब्दाऐवजीं कम्यूनिस्ट सरकारें यूनियन ऑफ सोव्हिएट रिपब्लिक्स् हें लांबलचक नांव लावतात. पण सोईकरितां आपण तूर्त रशिया हा जुना परिचित शब्दच वापरूं.

समांतर रीतीनें रशियांत वावरत असणाऱ्या सोव्हिएटस् व कम्यूनिस्ट पार्टी या दोन घटनांचा संबंध कोणत्या शब्दांनीं वर्णावा ! लोकनियुक्त संघांचें प्रचंड जाळें अगदीं खालपासून अगदीं वरपर्यंत विणलें गेलेलें असतां, आणि दिखाऊ सर्व राज्यसत्ता लोकनियुक्त वरिष्ठ कायदेमंडळाला असतां, खरी खरी वरिष्ठ व कार्यकारी राज्यसत्ता कम्यूनिस्ट पार्टीच्या हातीं (The Sovereignty lies in the Communist Party.) असा रशियासंबंधानें राज्यशास्त्रज्ञांचा शेरा नोंदला जातो. सोळा कोटी लोक कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचतात, पण त्यांना नाचविणारी कम्यूनिस्ट पार्टी अवघी तीस लक्ष लोकांची आहे ! या चमत्कारवर्णनाला राज्यशास्त्रांतली कोणती परिभाषा समर्पक ठरेल ? कोणती नाहीं. फक्त ' नमुना न्यारा ! ' असें म्हणूनच निर्वाह करावा लागणार.

पण लोकपरिचित भाषेनें या दोन घटनांच्या संबंधाची कल्पना थोडी-बहुत आणून देतां येईल ती अशी:—वहिमी गुन्हेगार आपण मोकळे आहों अशा समजुतीनें व्यवहार करीत असतो. पण त्याच्या पाठीमागें बिनपोषा-

खाचा सरकारी गुप्त पोलीस नजर ठेवून चालत असतो: आणि त्याच्या खिशांत पकड वॉरंट व हातबेड्या असतातच कीं नाहीं ? एखाद्या वेड्या माणसाचें वेड कितपत गेलें आहे हें पाहण्याकरितां वेड्यांच्या इस्पितळाचा अधिकारी " इमारतीबाहेर जाऊन खुशाल हिंड जा, तूं मोकळा आहेस " असें त्यांतल्या एखाद्याला सांगतो. पण त्याच्यामागें त्याला न कळत इस्पितळाचा शिपाईहि दुरून टेहळणी करण्याकरितां पाठवितो. मुलाला वाटतें कीं मैदानावर किंवा राजमार्गावर आपण अगदीं स्वैरपणें हिंडतों बागडतों आहों. पण त्याचा सांभाळ करणारी अय्या किंवा भय्या त्याच्या पाठीचा कधींच जात नाहीं ! किंवा तत्त्वज्ञानाच्या भाषेनें बोलावयाचें तर, मनुष्याला वाटतें कीं मला इच्छा–स्वातंत्र्य भरपूर आहे. म्हणून तो कर्तेपणाचा अहंकार गाजवीत असतो. पण नियती किंवा कर्म हें त्याच्यामागें अदृश्य रूपानें राहून त्याला नकळत मागें ओढत असतें किंवा पुढें ढकलीत असतें. तसाच कांहींसा प्रकार डिक्टेटरशिप ऑफ धि प्रोलेटेरिअट आणि कम्यूनिस्ट पार्टी यांच्या संबंधाचा आहे, असें म्हणणें गैर होईल काय ?

असो. अशा दुहेरी राजकीय चौकटींत बसलेल्या सोव्हिएट–कम्यूनिस्ट रशियामध्यें कोणत्या प्रकारची राजकीय संघटना केली आहे हें आतां पाहूं.

सोव्हिएट रशियाचें क्षेत्रफळ साडेब्यायंशीं स्क्वेअर मैल आणि लोकसंख्या साडेसोळा कोटी आहे. रशियांत एकंदर सात लोकसत्ताक सोव्हिएट राज्यें असून, त्या सर्वांचें मिळून एकच संयुक्त कम्यूनिस्ट राष्ट्र होतें. १९१८ पासून या संघांत एकेक सोव्हिएट राज्य येऊन मिळत गेलें. आणि 'संयुक्त राष्ट्रां'ची घटना १९२४ च्या फेब्रुवारींत झाली. या संघांचें एक मुख्य मध्यवर्ति कार्यकारी मंडळ, आणि पीपल्स कॉमिसारस नांवाच्या प्रधानांचें एक मंत्रिमंडळ आहे. कार्यकारी मंडळ हें सोव्हिएट संघाकडून निवडलें जातें. संघाच्या बैठकी मधून मधून होतात. त्या होण्याच्या दरम्यान कार्यकारी मंडळाकडे राष्ट्राची सर्व सत्ता असते. वर्षांतून त्याच्या तीन बैठकी होतात. सात उपसंघानीं मिळून निवडून दिलेले असे ६०७ सभासद आहेत. आणि कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटीज म्हणून दुसरी एक सभा आहे. तिचे १५० सभासद आहेत. कोणचाहि कायदा होणें तर तो या दोन्ही सभांनीं मिळून पास करावा लागतो. तसेंच स्टँडिंग कमिटी या नांवाचें

सत्तावीस सभासदांचें एक मंडळ आहे. युनियन कौन्सिलमध्यें सोळा मंत्री, एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतो. तसेंच दोन कायमचीं 'तपासनीस' कमिशनें आहेत. एकाचें नांव 'सोव्हिएट कंट्रोल कमिशन' व दुसऱ्याचें नांव 'कम्यूनिस्ट पार्टी कंट्रोल कमिशन.'

१९३५ च्या फेब्रुवारींत एक राज्यघटना समिती नेमण्यांत येऊन तिजकडे मुख्य कायदेमंडळाची घटना आणि मतदार व मतदान यांची तपशीलवार योजना करण्याचें काम दिलें होतें. त्याचा रिपोर्ट हल्लीं तयार झाला असून त्याप्रमाणें बहुधा लवकरच कांहीं फेरफार घडून येतील असें वाटतें. हल्लीं निवडणुकीमध्यें जाहीर रीतीनें म्हणजे हात वर करून मतें द्यावीं लागतात. त्याऐवजीं यापुढें कोणाला न दाखवितां गुप्तपणें मतें नोंदण्याचा अधिकार मतदाराला मिळेल. तसेंच मुख्य कायदेमंडळाच्या निवडणुकी हल्लीं-प्रमाणें पायरीपायरीनें न होतां, इंग्लंडच्या पार्लमेंटरी निवडणुकीप्रमाणें होतील. म्हणजे अंतिम स्वरूपाचे मतदारसंघ बनवून त्यांना थेट वरिष्ठ कायदेमंडळाचा सभासद निवडून देतां येईल. शहरें व खेडीं यांना निवडणुकींत दिलेल्या जागांचें प्रमाण हल्लीं विषम आहे, तें सम व नियमबद्ध करण्यांत येईल. कम्यूनिस्ट सांघिक राष्ट्राचे सात उपसंघ म्हणून सांगितले त्या प्रत्येकाला त्याचे स्वतंत्र असे पुष्कळसे अधिकार आहेत. पण कांहीं अधिकार फक्त सांघिक सरकारलाच आहेत. म्हणजे हें एक प्रकारचें 'फेडरेशन' आहे.

या फेडरेशनशीं समांतर असणाऱ्या कम्यूनिस्ट पार्टीचें 'कॉंग्रेस' म्हणून एक वरिष्ठ मंडळ आहे; या पार्टीच्या परिषदा मधून मधून होतात तेव्हां पार्टीचे मुख्य व दुय्यम अधिकारी निवडले जातात. सोव्हिएट सरकार व कम्यूनिस्ट पार्टी या दोहोंमध्यें असणारे असे साधारण सभासद कांहीं असतात; व या दोन समांतर रुळांवर चालणाऱ्या गाड्यांना जोडणारे दांडे म्हणजेच हे सभासद होत. राज्यकारभाराच्या प्रत्येक खात्यावर अधिष्ठित झालेला अधिकारी हा कम्यूनिस्ट पार्टीचा कोणी तरी वजनदार सभासद असतोच. याशिवाय प्रत्येक सांघिक कारखाना, प्रत्येक शेतकी संघ, यांच्या ठिकाणीं कम्यूनिस्ट पार्टीचें एकेक लहानसें केंद्र असतें आणि या कारखानदारींत व शेतीच्या कारभारांत काय व्हावें, काय न व्हावें, ह्यांच्या सूचना किंवा आज्ञा मुख्य कम्यूनिस्ट पार्टीकडून या लहान केंद्रांच्या द्वारें वर

खालीं संक्रमित होतात. अशा रीतीनें, पार्टीबाहेर चाललेल्या राष्ट्रांतील एकंदर सरकारी कामावर व शेतकरी, व्यापार, उद्योगधंदा इत्यादि व्यवहारांवर, कम्यूनिस्ट पार्टीचा छाप व वचक बसण्याची व्यवस्था पार्टीनें केली आहे. शहरांत जशी एकेका मोहल्ल्यांत एकेक पोलिस चौकी असते, व बाहेर दोन तीन गांवें मिळून एखादें पोलिस ठाणें असतें, आणि त्याकरवीं सर्व बंदोबस्त ठेवला जातो; किंवा मुम्बईसारख्या शहरांत मधून मधून रस्त्यावर पाणी शिंपडण्याला किंवा आग विझविण्याला वॉटर प्लग किंवा फायर प्लग असतात, तशाच प्रकारचीं हीं कम्यूनिस्ट पार्टीचीं केंद्रें सर्व देशभर पसरलेलीं असून, पार्टीच्या दृष्टीनें एकंदर समाजजीवनावर नजर व देखरेख ठेवणें, हीं कार्यें या केंद्रांकडून करवून घेतलीं जातात.

जनतेंत मुख्य तीन वर्गांचे लोक म्हणजे शेतकरी, कामकरी, व धारकरी म्हणजे शिपाई हे होत. या प्रत्येक वर्गानें आपापलीं कम्यूनिस्ट मंडळें व सोव्हिएट मंडळें बनविलेलीं असतात; व कांहीं मर्यादेपर्यंत त्यांचे अधिकार स्वयंपूर्ण असतात. नगर सोव्हिएटमधून दर पंचवीस हजार मतदारांना एक प्रतिनिधि या हिशेबानें कायदेमंडळाचे सभासद निवडले जातात. प्रांतिक कायदेमंडळांत हें प्रमाण दर सव्वा लक्ष रहिवाशांना एक प्रतिनिधि असें पडतें. जो कोणी अठरा वर्षें वयाचा असेल, मग तो कोणत्याहि धर्माचा वंशाचा स्त्रीपुरुष असो, तो मताधिकाराला पात्र होतो. मात्र शिपाई व खलाशी यांना सैन्यांतील—आरमारांतील नोकरी करणें व खाजगी रहिवाश्यांना आपल्या श्रमानें आपली उपजीविका करणें, यांवरून मताधिकार मिळतो. पण ज्यांना मताधिकार नाहीं असे कांहीं वर्ग निवडून काढून मतदारींतून वगळले जातात. उदा.—आपल्या फायद्याकरितां नोकर नेमून त्यांना राबवून काम घेणारे. श्रमसायासाखेरीज इतर रीतीनें ज्यांच्या पदरांत संपत्ति पडते असे आयतखाऊ सुखवस्तु लोक. धर्माधिकार चालविणारे पुरोहित किंवा मठवासी किंवा महंत. जुन्या जुलमी झारशाहींत पोलिसखात्यांत काम केलेले शिपाई किंवा हेर! जुन्या राजघराण्याशीं अगदीं दूरचाहि संबंध पोंचविणारे लोक इत्यादि!

या बहिष्कृत लोकांना खड्यासारखें वगळून त्यांच्यावर सर्व प्रकारें

बहिष्कार घातलेला असतो. फक्त तीं माणसासारखीं माणसें म्हणूनच त्यांचे जन्मसिद्ध हक्क मात्र काढून घेतलेले नसतात. कायदा त्यांचें रक्षण सामान्यतः करील; राज्यकारभारांत भाग घेण्याच्या दृष्टीनें ते अस्पृश्य, पतित, चांडाळ यांसारखे दूर ठेवण्यांत येतात. यांच्या जोडीला पण इतर कारणांकरितां मतदानाच्या अधिकारांतून वगळलेले असे इतरहि कांहीं वर्ग आहेत. ते म्हणजे—पालनकर्त्यांच्या ताब्यांत असलेलीं अज्ञान मुलें, वेडेपिसे भ्रमिष्ट म्हणून डॉक्टरांनीं ठरविलेले लोक, व फौजदारी न्यायकोर्टांनीं शिक्षा करून अपात्र ठरविलेले गुन्हेगार लोक! यावरून अपात्रतेच्या दावणीला बांधलेल्यांमध्यें, सृष्टीचा कोप झालेल्या लोकांप्रमाणें, कम्यूनिस्ट पार्टीचा कोप झालेले हेहि कसे जोडीदार झाले आहेत हें दिसून येईल. मात्र सांघिक शेती व कारखानदारी ही कम्यूनिस्ट पार्टीच्या मतांप्रमाणें चालू असून, त्या उद्योगांत, त्या कामाकरितां, त्या हेतूनें जर त्यांतील एकाद्यानें गडी मजूर वगैरे कामाला लावले तर त्याच्या मतदारीचा हक्क जात नाहीं. खाजगी व्याजबट्टा करणारांना मत नाहीं. पण सरकारी सेव्हिंग बँका किंवा कर्जरोखे यांच्यावरील व्याज घेणाऱ्याचा हा हक्क जात नाहीं.

सोव्हिएटच्या कायद्यानें रशियांतील सर्व जमिनीवर सरकारचें म्हणजे समाजाचें स्वामित्व प्रस्थापित केलें गेलें आहे. सर्व अरण्यें, वनें, उपवनें, खाणी, महत्त्वाचे जलप्रवाह, जमिनीला चिकटून नेहमीं राहणारे सर्व तऱ्हेचे पदार्थ व सर्व तऱ्हेचे समाजोपयोगी पशू, जनावरें हीं देखील रशियांत राष्ट्रीय मालकीचीं ठरविण्यांत आलीं आहेत. सर्व प्रकारचे कारखाने, आगगाड्या, विमानें, जलवाहनें हीं सरकारच्या मालकीचीं करण्यांत आलीं आहेत. परंतु सरकारकडून तीं भाड्यानें वगैरे घेऊन वहिवाटण्यास कोणी श्रमोपजीवी लोकांचे संघ किंवा सहकारी संघ पुढें येतील, तर त्यांना तीं भाड्यानें देण्यांत येतात. क्रांतीच्या पूर्वीचें झारशाहींतलें सरकारी धर्मखातें १९१८ च्या जानेवारींत बुडविण्यांत आलें व धर्माधिकाऱ्याकडील बहुतेक मिळकती सरकारजमा करण्यांत आल्या. सरकारी खात्यांप्रमाणें शिक्षण देण्याच्या संस्थांचाहि संबंध धर्मसंस्थेपासून तोडण्यांत आला. तथापि १९२९ च्या कायद्यानें खाजगी मनुष्यांना, फक्त खाजगी रीतीनें आपल्या धर्माप्रमाणें आचारण करतां येतें. मात्र धर्माविरुद्ध

कोणत्याहि प्रकारची उघड चळवळ करण्याला सर्रास परवानगी देण्यांत आली आहे ! जर्मनीप्रमाणें कम्यूनिस्ट पार्टीनें ज्यू लोकांवर हत्यार धरलेलें नाहीं. रशियांत सुमारें तीस लक्ष ज्यू असावेत. क्रांतीमध्यें ज्यू लोकांची पुष्कळ दुर्दशा झाली. क्रांतीला ज्यू लोकांनीं फारशी प्रतिक्रिया केली नाहीं. जर्मनींत तर ज्यू लोक हे कम्यूनिझमचे पक्षपाती, अशा अंदेशानें हिटलरनें त्यांचा छळ चालविला आहे. उलट कम्यूनिस्ट पार्टीनें त्या लोकांच्या वसाहती निवडक प्रांतांत व्यवस्थेशीर रीतीनें करून दिल्या आहेत.

मुलांनीं लहानपणापासून शिक्षण घेण्याची सक्ति रशियांत करण्यांत येते. जेथें सरकारी शाळा नाहींत तेथें खाजगी शाळांना परवानगी देण्यांत येते. आठ ते सतरा वर्षेपर्यंत वयाच्या एकंदर मुलांपैकीं शेंकडा अठ्याण्णव इतकीं मुलें या सक्तीमुळें प्राथमिक शिक्षण घेत आहेत ! विद्यार्थ्यांमध्यें स्त्री व पुरुष असा भेद मुळींच करण्यांत येत नाहीं. लहान मोठे तरुण एकत्रच शिक्षण घेतात ! या वरिष्ठ शिक्षणांत पुस्तकी शिक्षणापेक्षां धंदे-शिक्षणाकडे अधिक लक्ष दिलें जातें. सुमारें दहा लक्ष मुलें उद्योगधंद्याच्या शाळेंत जातात. अकरा लक्ष मुलें कारखान्यांना जोडलेल्या शाळेंत शिकतात. कामकऱ्यांनीं चालविलेल्या शाळांतून साडेचार लक्ष मुलें शिकतात. इतर प्रकारचें वरिष्ठ शिक्षण घेणारीं मुलें पांच लक्षांवर आहेत. जुन्या राजवटींत नऊ विद्यापीठें होतीं. हल्लीं त्यांची संख्या पुष्कळच वाढली आहे.

न्यायदानाचें काम सर्वत्र बहुधा एकाच नियमानें चालतें. तथापि प्रत्येक उपसोव्हिएटला कांहीं फरक आपापल्या प्रांतापुरता करण्याचा अधिकार आहे. सर्वांवर मिळून एक वरिष्ठ कोर्ट आहे. सरकारी कोर्टाशिवाय लोकांचीं म्हणून न्यायकोर्टें सर्वत्र असतात. तीं असेसरांच्या मदतीनें न्यायदानाचें काम करतात. त्यावर सरकारी कोर्टांची देखरेख असते. याशिवाय मजूर वर्गाकरितां म्हणून, शेतकरी वर्गाकरितां म्हणून, सरकारी खात्यांतील वाद तोडण्याकरितां म्हणून, लष्करी लोकांचा इनसाफ करण्याकरितां म्हणून, व सरकारी नोकरींतील गुन्हेगारीचा इनसाफ करण्याकरितां म्हणून स्पेशल कोर्टेंहि आहेत.

रशियाच्या उत्पन्नाचें चालू सालचें बजेट सात हजार आठशें एकाहत्तर कोटी रुबल्स व खर्चाचेंही बजेट तितकेंच आहे. पैकीं चवदाशें

एक्यायंशीं कोटी रुबल्स लष्कर व आरमार ह्यावर खर्च व्हावयाचे असून, राष्ट्रीय आर्थिक संघटनेकरितां सदतीसशें अठ्ठावन कोटी रुबल्स खर्च व्हावयाचे आहेत. १९१७ सालीं रशियाला बत्तीसशें तीस कोटी रुबल्सचें कर्ज होतें. १९३३ सालचा आंकडा दहा अब्ज रुबल्सचा आहे. रशियानें नाकबल केलेलें परराष्ट्रांचें कर्ज बहुधा यांत येत नाहीं. १९१८ सालीं रशियानें, इतर क्रांतीबरोबर, आपण परराष्ट्रीय कर्ज कोणाचेंच देणार नाहीं असा जाहीरनामाच काढला ! रशियाचें सैन्य व आरमार किती आहे याचे आंकडे देण्याचें कारण नाहीं. सक्तीचें लष्करी शिक्षण आहे, आणि रशिया आज कोणत्याहि राष्ट्राशीं लढण्याला तयार आहे, एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे.

---

# ११. रशियांतील आर्थिक अंतर्व्यवस्था (१)

यानंतर आतां सोव्हिएट रशियांत आर्थिक स्वरूपाची नवी व्यवस्था कशी काय घडली आहे हें पाहूं.

धनोत्पादनाच्या दृष्टीनें रशियांत गेल्या वीस-बावीस वर्षांत फार फरक पडला आहे. राष्ट्रांतील एकंदर वार्षिक संपत्तीच्या उत्पादनापैकीं १९१३ सालीं शेतीच्या उत्पन्नाचें प्रमाण सत्तावन टक्के व उद्योगधंद्यांचें बेचाळीस टक्के होतें. १९३४ सालीं शेतीचें प्रमाण सत्तावन्नावरून एकविसावर खालीं आलें, पण उद्योगधंद्यांचें प्रमाण बेचाळिसापासून अठ्याहत्तरापर्यंत वर गेलें. हल्लीं शेतीचा बहुतेक कारभार सरकारी किंवा सांघिक सामुदायिक असा चालतो. फुटकळ व्यक्तिशः असा फार चालत नाहीं. सर्व परदेशी व्यापार सरकारच्या खास मालकीचा आहे. फक्त सरकारी योजनेप्रमाणें, पाहून खाजगी व्यापारी संघांना परदेशीय व्यापाराचे परवाने देण्यांत येतात. बँकांचा धंदा सर्वस्वीं सरकारच्या हातीं आहे. तसेंच वाहतुकीचे मार्ग व

साधनें, तार व पोस्ट यासंबंधानें सांगावयासच नको. बिनतारी संदेश, रेडिओ, ब्रॉड कास्टिंग आणि करमणुकीचीं सर्व साधनें हीं सरकारी मालकीचींच आहेत.

सांघिक शेतकी कारखान्यांतील लोक आपल्या सभा भरवून व्यक्तिशः कोणी काय काम करावें, गटागटांनीं काय काम करावें, हें आपापसांत चर्चा करून ठरवितात. निरनिराळ्या संघांमध्यें कोण अधिक चांगलें काम करतो, कोण अधिक माल उत्पन्न करतो, याविषयीं चढाओढी व शर्यतीहि लागतात. पण त्यांत एकमेकांचें नुकसान करण्याचा हेतु नसतो. उलट सोव्हिएट सरकारच्या उत्तेजनानें ' शॉक ब्रिगेड्स ' नांवाच्या कामकऱ्यांच्या टोळ्या अशाकरितां तयार राहतात कीं, जेथें एखाद्या संघाचें कांहीं उणें पडेल, तेथें त्यांनीं ताबडतोब जाऊन काय उणीव असेल ती भरून काढावी. सामुदायिक कारखानदारीचें तत्त्व प्रचारांत असलें तरी, एक–एकटचा कुटुंबाला किंवा प्रसंगविशेषीं एकेका व्यक्तीलाहि, काम तोडून दिल्यानें मुख्य तत्त्वाला बाध येतो असें समजत नाहींत. कारण असें फुटकळ काम नेमून दिलें तरी '' माझे श्रम, माझा माल व माझा नफा " ही भावना उरत नाहीं. अशा फुटकळ रीतीनें काम करणारे लोक कांहीं थोडेथोडके नाहींत, ते स्त्री–पुरुष मिळून दीड कोटी तरी असतील. शिवाय कांहीं उद्योगधंदे विशेषत: शहरांतून चालणारे असे असतात कीं, ते फुटकळच करावे लागतात.

पण एकंदरीनें दृष्टि ही ठेवण्यांत येते कीं, कोणतेंहि काम किंवा उद्योगधंदा शक्य तितका सामुदायिक पद्धतीनेंच करावा. हक्क मिळविणें यांत सामुदायिक दृष्टि आहे. तसेंच आपापल्या वर्गांतील लोकांच्या दु:खाचा परिहार करण्यामध्येंहि. स्वत:चें काम करून घेऊन शिवाय या संघांना सरकारी कारभारावर वजन पताडां येतें. सामुदायिक कामकाजाच्या तत्त्वाचा इतक्या जोरानें प्रसार होत असला तरी जुन्या पद्धतीनें म्हणजे स्वत:च्या फायद्याकरितां काम करणाऱ्या लोकांची संख्याहि कांहीं थोडी नाहीं. पण कवाईत शिकलेले शंभर शिपाई हे जसे विस्कळीत अशा एक हजार बाजारबुणग्यांना भारी होतात, त्याप्रमाणें सरकारी कारभारावर किंवा धोरणावर वजन पाडून परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनें, हे स्वतंत्र काम करणारे लोक फार

हलके ठरतात. ट्रेड यूनियनवाले संघ किंवा शिपायांचे संघ यांची मिळूनच खरी डिक्टेटरशिप आहे. शिवाय आपल्यापुरतें किंवा फुटकळ काम करणाराला इतरांचे मानानें हक्क कमी, त्यांना सरकारी मदत कमी, व कम्यूनिस्ट पार्टीच्या अवकृपेंतले म्हणून लोकदृष्टचा त्यांना अब्रूहि कमी! हें तारतम्य लक्षांत घतलें म्हणजे रशियांतील खरी वस्तुस्थिति सांगण्याला हरकत नाहीं. ती ही कीं, धनोत्पादनाचीं साधनें खाजगी मालकीचीं नसावीं या तत्त्वाकडे रशिया झुकत असला तरी तें तत्त्व आज शेंकडा शंभर इतकें अमलांत नाहीं. ह्या तत्त्वाला अजून पुष्कळ जागा भरून काढावयाची आहे. रशियांत सरकार हाच सर्व जनतेला काम पुरविणारा एक व अद्वितीय असा धनी किंवा मालक आहे हीहि समजूत खरी नाहीं. तसेंच सर्व कामगिरी अगदीं एकाच पद्धतीनें होत आहे हेंहि खरें नाहीं. अजून, रशियांत वैचित्र्य व जुन्या पद्धतीचे नमुने किती तरी आहेत. पण नवी म्हणून जी पद्धति रशियांत सुरू झाली आहे ती कांहीं लोकांनीं जुलमानें पत्करली तरी कांहींनीं हौसेनेंच पत्करली आहे; व ती नवी पद्धत फायदेशीर झाल्याची त्यांची कबुली आहे.

भाई मसानी यांनीं लिहिलेल्या छोटचा पुस्तकांत आर्मिनिया प्रांतांतील पारकर नांवाच्या एका खेडचांतील प्रत्यक्ष पाहिली, ऐकलेली हकीकत दिली आहे ती अशी—"युद्धापूर्वीं या गांवांतील बहुतेक जमीन जमीनदारांच्या मालकीची होती. स्वतःच्या मालकीची जमीन असणारेहि कांहीं शेतकरी होते. पण त्यांची जमीन चरितार्थाला पुरेशी नसल्यामुळें त्यांना जमीनदाराची जमीन खंडानें घ्यावी लागे. आणि त्याकरितां जमीनदाराला उत्पन्नाच्या प्राप्तीपैकीं तीन हिस्से देऊन फक्त एक हिस्सा आपण घेऊन संतुष्ट राहावें लागे! युद्धानंतर क्रांतीला विरोध करणारांत सामील झाल्यामुळें या गांवच्या जमीनदारांच्या जमीनी सरकारजमा झाल्या. त्यांतील कांहींवर सरकारी 'मॉडेल फार्म्स' (नमुनेदार शेतें) करण्यांत येऊन, बाकी जमीन गांवच्या कुळांत वांटून देण्यांत आली. १९२९ पर्यंत या गांवांत सामुदायिक शेती सुरू झाली नव्हती. पण त्या सालीं गांवांतल्या तीनशें कुटुंबांपैकीं सुमारें तिसांनीं सामुदायिक शेती आरंभिली. या तीस कुटुंबांचीं शेतीचीं सर्व औतें, हत्यारें, घोडे, बैल हीं सामुदायिक मालकीचीं करण्यांत आलीं. फक्त शेळयामेंढया, गाई,

कोंबडीं हीं पूर्वीप्रमाणें खासगी मालकीचीं म्हणूनच राहिलीं. पुढील सालीं साठ कुटुंबांनीं नवीन तत्त्व स्वीकारलें. १९३१ सालीं दीडशें कुटुंबें संघांत आलीं. त्याच्या पुढील सालीं दोनशेंचाळीस कुटुंबें आलीं. सामुदायिक शेतीला विरोध करणारे लोक ग्रामकंटक समजून त्यांजवर बहिष्कार घातला गेला. पूर्वीं सहाशें खंडी कापूस पिकत असे तेथें सामुदायिक शेतीमुळें सोळाशें खंडी पिकूं लागला. अर्थात् ट्रॅक्टर वगैरे यंत्रसामुग्रीची मदत सरकारकडून झाली होती. एकर दोन एकर जमिनींत शेती करावयाची तर त्याला ट्रॅक्टर वगैरे मिळून तरी काय कामाचें ? अशाच रीतीनें व असे अनुभव पाहून सामुदायिक शेतींत शिरणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आणि पुढील दोनतीन वर्षांत रशियांतील सर्व शेती सामुदायिक तत्त्वावर येऊन बसेल असा कांहींचा अदमास आहे. मात्र तसें झालें म्हणजे खेड्यांचें खेडेपण जाऊन शहरें अधिक बनतील. जवळच्या दोनतीन गांवांनीं मिळून सामुदायिक शेती केली म्हणजे तें एक शहरच बनून नव्या इमारती रस्ते वगैरे सर्व प्रकार तेथें होणार. आणि शेतकऱ्यांचें रूपांतर हळुहळू प्रोलेटेरियन कामगारांत होणार !"

रशियांतील औद्योगिक संघटनेचा आढावा थोडक्यांत खालीं दिल्याप्रमाणें आहे. अत्यंत एकीकृत असे ट्रेड यूनियन संघ १५४ असून त्यांतील सभासदांची संख्या १ कोटी ८० लक्ष आहे. सामुदायिक शक्तीनें शेतकी करणारे संघ २ लक्ष ४० हजार आहेत व त्यांतील सभासदांची संख्या ३ कोटी आहे, साध्या मच्छीमार कोळ्यांचेहि १५०० संघ असून त्यांतील लोकांची संख्या ३ लक्ष आहे. याशिवाय संकीर्ण जातीचे सहकारी संघांतील लोकांची संख्या ३ लक्ष आहे. ज्यांची संघटना अनिश्चित आहे अशा सहकारी मंडळ्या २० हजार आहेत. याशिवाय शरीराला एखाद-दुसरें व्यंग असल्यामुळें ज्यांना भर दिवस किंवा भरपूर काम करतां येत नाहीं, अशा लोकांनीं आपल्या तात्पुरत्या कामाकरितां सोयीप्रमाणें सहकारी मंडळ्या बनविलेल्या असतात त्या वेगळ्याच. अशा रीतीनें सुमारें ५ कोटी लोक सामुदायिक पद्धतीनें उद्योगधंदा करीत असतात व आपल चरितार्थ चालवितात.

हे संघ सर्व प्रकारचे व सर्व दर्जाचे आहेत. त्यांत निवळ निरक्षर

मजुरापासून उत्कृष्ट प्रकारची बुद्धि व कला अंगीं असलेल्या लोकांचाहि समावेश होतो. या संघांत काम केल्यानें कामकऱ्यांना मिळणाऱ्या मजुरीचे दर एकच किंवा ठराविक नसतात. आणि मिळकत एकसारखी नसल्यामुळें कामकऱ्यांच्या राहणी राहणींतहि पुष्कळ फरक उच्च-नीच असा सहजच पडतो. म्हणजे कम्यूनिझमच्या राज्यांत सर्व जनता एकाच मापानें मोजली जाते अशी जी समजूत आहे ती खरी नाहीं. गुणांतील श्रेष्ठपणा व कनिष्ठ-पणा, काम करण्याची ताकद, चिकाटी व कौशल्य यांपैकीं प्रत्येक कारणानें कामकऱ्यांचा परामर्ष वेगवेगळ्या रीतीनें घेतां येतो. रशियांत 'साम्य' प्रस्थापित झालें आहे याचा अर्थ "ढवळा नंदी व श्यामकर्ण वारू, घाणेरी व गलाब, कावळा व कोकीळ या सर्वांच्या कपाळावर एकच लेबल म्हणजे गुण-वर्णनाची चिठ्ठी लावली जाते, आणि त्यांना चारापाणी एकाच मापानें देण्यांत येतें, अशी जी समजूत आहे ती भ्रामक आहे. कम्यूनिझममध्यें झाली तरी मनुष्यांतील स्वाभाविक विषमता कोण कसा काढून टाकील ?" असें कम्यूनिझमचे पुरस्कर्तेच स्वतः मुद्दाम जोरानें प्रतिपादतात !

महायुद्धापूर्वीं मजुरादिकांना जी मजूरी मिळत असे ती हल्ली दिवसें-दिवस वाढते आहे, यांत मात्र शंका नाहीं. आणि मजूरी वाढली म्हणजे राहणी आणि मुखसोयींची आवड ही देखील वाढणारच हें उघड आहे. तथापि या उच्चनीचपणांत दिसून येणारा भेद हा केवळ कमीअधिक श्रीमंतीमुळें किंवा सामाजिक दर्जामुळें केलेला नसतो. कोणताहि लहान-मोठा कारखाना शहरांत असो किंवा बाहेरगांवीं असो, त्यांतले डायरे-क्टर, मॅनेजर, शास्त्रज्ञ, तज्ज्ञ, प्रवीण, हरकामे, हिशेबनीस, कारकून, मजूर फार काय पण पहारेवाले यांना पगार किंवा प्राप्ति कमीअधिक असो, परंतु ते सर्व एकाच घटनेचे साधारण सभासद असें मानले जातात; मग ही घटना एखादा कारखाना असो किंवा ट्रेड यूनियन किंवा सहकारी मंडळ, किंवा शेतकी संघ किंवा मच्छीमार संघ असो. अंतिम स्वरूपांत संस्थेचें हित तेंच तिच्यांतील प्रत्येक सभासदाचें हित असें समजलें जातें. आणि अशा अनेक घटना मिळून एखादी मोठी सामुदायिक घटना बनली तरी त्या परस्परांचाहि वरीलप्रमाणेंच संबंध राहतो.

कोणी कोणाशीं हक्काकरितां वाद घातला किंवा चढाओढ केली

तरी तींत व्यक्तीच्या फायद्याची दृष्टि नसते. कामाचे तास बदलून घेणें, कामाचे ठिकाणीं कामकऱ्यांना सुरक्षितता व यथायोग्य त्या सुखसोयी मिळवून देणें, आजार अडचणींत कामकऱ्यांना घरबसल्या डॉक्टरवैद्यांची मदत किंवा इस्पितळांत पडून राहण्याची सोय करून देणें, यांतच ती स्पर्धा व चढाओढ होते. (सोशल) इन्शुअरन्स करून घेणें, कामगारांना राहण्याच्या सोयीवार जागा, त्यांच्या मुलांचें शिक्षण, तसेंच एकंदर संघांतील कामगारांच्या सुट्या, सण, करमणुकी, खेळांच्या क्रीडांच्या विश्रांतीच्या जागा या सर्वांत सर्व संघ मिळून लक्ष घालतात ते एका विवक्षित संघाकरितां नव्हे किंवा त्यांतील व्यक्तीकरितां तर नव्हेच नव्हे.

वरील ५ कोटींपैकीं निम्याहून कमीच लोक नोकर म्हणून काम करीत असतील; पण निम्याहून अधिक लोक हे सुद्धां संघटनेंतच मालकी हक्कानें काम करतात. म्हणजे ते ज्या वस्तू निर्माण करतात त्या विकून येणारे पैसे ते आपापसांत वांटून घेतात. प्रथम कारखानदारीचा खर्च, मग सरकारी कर, हे वजा जातां उरेल तो नफा ते यथाप्रमाण वांटून घेतात.

दिसतांना ही व्यवस्था आपल्याइकडील ' जॉइंट स्टॉक कंपन्या ' म्हणजे ' समाईक भांडवल मंडळ्यां ' सारखी दिसते. पण त्यांत फरक हाच कीं, या रशियन समाईक भांडवल कंपन्यांमध्यें, इकडील भागीदारांप्रमाणें घरबैठा फायदा व्याज डिव्हिडंड यांच्या रूपानें घेणारा मात्र कोणी नसतो, तर स्वतः प्रत्यक्ष काम करणारा असतो. आमच्याइकडील कंपन्यांचा शेअरहोल्डर म्हटला म्हणजे हातांत डिव्हिडंड वॉरंट टपालवाल्यानें आणून दिलें म्हणजे मग ' अरे होय कीं! आपला अमुक कंपनींत शेअर आहे नाहीं का? ' अशा आठवणीनें जागा व्हावयाचा! पण पुष्कळ वेळां कंपन्या शेअर-होल्डरांना व्याज मुळींच देत नाहींत या अनुभवानें कधीं काळीं डिव्हिडंड वॉरंट हातीं पडलें म्हणजे, ' अरे वा! यंदां आपल्या कंपनीला डिव्हिडंड देतां आलें कीं! असे उद्गार काढावयाचे! डिव्हिडंड वसूल न केल्यामुळें कालांतरानें कंपनीनें ती रक्कम आपल्या खातीं परत जमा केली अशीं उदाहरणें सांपडणार नाहींत असें नाहीं. बरें, डिव्हिडंड वसूल केलें तरी ती रक्कम बहुधा इतकी किरकोळ असावयाची कीं ती पानसुपारीकडे खर्च होऊन जावयाची. हा झाला एक प्रकार, म्हणजे

किरकोळ रकमांच्या भागीदारांचा; व हे भागीदार मूळ शेअर घेतांनाच जवळ जवळ पैसे दान केले अशा समजुतीनेंच ते देतात. त्यावर नफा न येणें ही प्रकृति व येणें ही विकृति.

पण आमच्या इकडील भांडवलशाही कंपन्यांत अगदीं दुसऱ्या टोंकाचेहि असे कांहीं भागीदार असतात. ते म्हणजे मॅनेजिंग एजंटस्. त्यांचे सगेसोयरे, स्नेही, गुप्त प्रभावळींतील लोक किंवा कांहीं वजनदार डायरेक्टर, अशा प्रकारच्या भागिदारांचे शेअर शेंकड्यावारी किंवा हजारोंवारी असतात. या भागिदारांनीं अर्थात् त्यांत पुष्कळ पैसा घातलेला असतो हें खरें. म्हणून डिव्हिडंड मिळेल तेव्हां त्यांनाहि खूप पैसा मिळतोच. पण नफा वांटून देतां आला नाहीं अशा स्थितींतही पगार, कमिशन, भत्ता वगैरे अनेक रूपांनीं त्यांना बराच पैसा मिळतो. म्हणजे नफा वांटला असतां दुप्पट लाभ; नाहींतर एक-पट तरी खरा.' पण या दोन्ही टोंकांच्या भागिदारांमध्यें एक गोष्ट साधारण अशी आढळेल ती ही कीं या दोघांचाहि कंपनीशीं संबंध फक्त डिव्हिडंड घेण्यापुरता. कंपनीच्या प्रत्यक्ष कामाची माहिती किती थोड्या शेअर-होल्डरांना असते हें आम्हीं सांगावयास नको. आणि स्वतः शेअरहोल्डर मेल्यावर त्याचे शेअर जेव्हां वारसाहक्कानें त्यांच्या मुला–माणसांकडे जातात तेव्हां मग तर कांहीं बोलावयासच नको. डिव्हिडंड वॉरंट देईल ती रक्कम आभाळांतून पडली असें त्यांना वाटतें. कंपनीच्या कामासंबंधीं त्यांचें ज्ञान शून्यावर शून्याइतकें असतें.

म्हणून फरक दाखवावयाचा तो हा कीं, हिंदुस्थानांत भांडवलशाहीचा एक खेळ अशा समाईक भांडवलांत कारखान्यांतून चालतो. पण रशियांत जे समाईक कारखाने चालतात त्यांत समाईक भांडवलापेक्षां समाईक श्रम व कामगिरी यांनाच महत्त्व असतें.

---

# १२. रशियांतील आर्थिक अंतर्व्यवस्था (२)

उद्योगधंदे व धनोत्पादन या दोन गोष्टींत रशियामध्यें गेल्या शंभर वर्षांत जें घडून आलें नाहीं तें अवघ्या दहा—बारा वर्षांत सोव्हिएट सरकारनें घडवून आणलें असें तज्ज्ञ ग्रंथकार लिहितात. घडून आलें तें हेंच कीं, पूर्वीं शेतकी हा एकंदर आर्थिक उद्योगाचा व उलाढालीचा मध्यबिंदु होता तो जाऊन त्या ठिकाणीं कारखाना हा मध्यबिंदु झाला. कारखाना म्हणजे मनुष्य-कृतीनें सृष्ट पदार्थापासून नवीन धनोत्पादक वस्तु निर्माण करण्याचें कार्य-क्षेत्र. शेतकीचें प्रमाण घटत जाऊन कारखानदारीचें प्रमाण रशियांत किती वाढलें आहे याचे आंकडे गेल्या लेखांत दिलेच आहेत. या कारखानदारीच्या वाढीचा एक परिणाम असा झाला आहे कीं, खेडेगांवांना जें पूर्वीं ग्रामीण स्वरूप होतें तें जाऊन त्यांनाहि नागरिक स्वरूप येऊं लागलें आहे.

ग्रामीण व नागरिक यांतील भेद हिंदुस्थानामध्यें आपणाला आतां दिसून येऊं लागला आहे. तो हाच कीं, ग्रामीण जीवनांत मनुष्याच्या आचारविचारांत जो एक प्रकारचा साधेपणा असतो तो नागरिक जीवनांत नसतो. शेतकरी मनानें साधाभोळा, पेहरावानें घामट व बावळट असतो. याच्या उलट कारखानदारीशीं संबंध आलेला मनुष्य कृत्रिम स्वभावाचा छानछोकीची आवड असणारा, थोडासा अधिक कपटी व हिकमती पण कर्तृत्ववान् असतो. हा भेद रशियांत आतां दिसून येऊं लागला आहे. पूर्वीं रशियन शेतकरी हा साधेपणांत हिंदी शेतकऱ्यांचा सख्खा भाऊ होता. पण आतांचा नवा रशियन कारखानी कामकरी (यालाच प्रोलेटेरियन असें म्हणतात) हा तसा साधा राहिला नाहीं. त्याच्या हातून धनोत्पादन अधिक होऊं लागलें त्या प्रमाणानें त्याची मजूरी व मिळकत आणि त्याची राहण्याची पद्धति अधिक सुधारली.

एकाच कारखान्याच्या केंद्रांत श्रमसायास, अन्नपाणी, उपजीविकेचीं इतर साधनें, खेळ, करमणुकी या सर्वांची एकत्र सोय केलेली असते. त्या-करितां त्याला कारखान्याच्या आवारांतून बाहेर जावें लागत नाहीं. एव-ढेंच नव्हे पण राष्ट्रीय राज्यकारभाराचीं मूलतत्त्वें म्हणजे व्यवस्था, शिस्त, न्याय आणि दंडन या सर्वांचें शिक्षण त्याला कारखान्यांतच मिळतें. हें

शिक्षण केवळ शिकाऊ किंवा दिखाऊ असें नसतें. तर त्या कारखान्यापासून सोव्हिएट सरकारच्या मध्यवर्ति केंद्रापर्यंत राजकीय जीवनाचा एकच अखंड धागा जोडलेला असून, आपण कारखान्यांत म्हणजे कारखान्यांतील समितींत जें करूं किंवा सुचवूं त्याचा अंशतः तरी परिणाम मुख्य सरकारावर झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी त्याची समजूत करून दिलेली असते व ती त्याला पटलेली असते. व्यवस्थेचा जो नमुना खालीं कारखान्यांत दिसून येईल तोच प्रायः सोव्हिएट सरकारच्या वरिष्ठ कारखान्यांतून व कचेऱ्यांतून दिसून येईल असें सांगतात.

कम्यूनिझम म्हटली म्हणजे मुख्य कल्पना समानतेबरोबर अल्प-संतुष्टत्वाची येते. पण वास्तविक या दोन्ही कल्पना आजच्या रशियांत खऱ्या नाहींत. प्राचीन कम्यूनिझममध्यें संपत्तीविषयीं तुच्छताबुद्धि व तिरस्कार हीं दिसून येत; आणि मितव्यय, अल्पसंतुष्टता हे सद्‌गुण मानले जात. परंतु रशियांतील अर्वाचीन कम्यूनिझममध्यें हीं तत्त्वें नाहींत. अल्पसंतुष्टता ही व्यक्तिमात्रापुरती इष्ट किंवा आवश्यक मानली तरी, एकंदर समाजाच्या दृष्टीनें संपत्तिविषयक महत्त्वाकांक्षेला कम्यूनिस्ट पार्टीनें मुळींच मर्यादा घातलेली नाहीं. ही संपत्ति सुधारलेल्या युगांत उपलब्ध होणाऱ्या नवीन नवीन सर्व साधनांनीं शक्य तितकी अधिक उत्पन्न करावी अशीच सोव्हिएट सकारची योजना आहे.

कम्यूनिस्ट लोक मानवी श्रमांच्या बरोबरीनें यांत्रिक शक्तीला मान देतात व पूज्य मानतात. शुद्ध ज्ञानापेक्षां ते विज्ञानाला अधिक महत्त्व देतात. बोलून चालून कम्यूनिस्ट हे जडवादी असून तत्त्वज्ञानाकडे त्यांचें सर्वस्वीं दुर्लक्ष आहे. कम्यूनिस्ट हे समाजसुखवादी भौतिक कर्मयोगी असून निरपेक्ष नीति, अंतिम सुख, अंतिम श्रेय यांच्या विचारांत लक्ष घालीत नाहींत व वेळ खर्चीत नाहींत. सुखाच्या बाबतींत त्वरित दान व महापुण्य हा एकच मंत्र ते जपतात. या बाबतींत रशियानें अमेरिकेवरहि ताण केली आहे. तथापि एक फरक असा कीं, यूरोप अमेरिका खंडांत भौतिक सुधारणा व तज्जन्य संपत्ति यांची उपासना कारखानदारीच्या विधीनें सपाटून चालली असली तरी, त्या उपासनेची फलश्रुति म्हणजे संपत्तीवरील स्वामित्व, तिचा उपयोग व उपभोग हीं सर्व व्यक्तींच्या आधीन व व्यक्तींच्या

लागीं राहणें हेंच त्या उपासकांचें उद्दिष्ट असतें. पण कम्यूनिस्ट रशियांत या सर्व संपत्तीचा उपयोग व उपभोग व्यक्तीच्या लागीं नसून समाजाच्या लागीं असला पाहिजे असें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. म्हणून रशियांत भौतिक सुखवाद असला तरी, व अल्पसंतुष्टता नसली तरी, तीं दोन्ही यूरोप व अमेरिका या खंडांतल्याप्रमाणें नाहींत. पश्चिमेकडील या खंडांतील लोक रशियांत हिंडून फिरून पाहूं लागले तर त्यांना कारखानदारीचे प्रचंड उद्योग आपल्या देशांतल्यासारखेच आढळून येतील. पण कारखानदारीनें उत्पन्न होणाऱ्या संपत्तीच्या पुढील व्यवस्थेंत व विभागणींत इकडे तिकडे फार मोठा फरक आहे, ही गोष्ट कारखान्याच्या हिशेबी खात्याच्या कारभारांत किंचित् लक्ष घातलें तरच त्यांना आढळून येईल.

आतां समानतेविषयीं पाहतां असें दिसून येईल कीं, कामकऱ्यांच्याम जुरीपासून कारखानदारींतील वरिष्ठ बक्षिसांपर्यंत एकमापी समानता फारच थोडी आढळून येईल. मात्र विषमता आहे ती कोणत्या तत्त्वावर हेंहि त्याबरोबरच लक्षांत ठेवलें पाहिजे. या बाबतींत कम्यूनिस्ट रशिया व अमेरिका यांत फारसा फरक दिसणार नाहीं. मजुराला कमींत कमी वेतन किती मिळालेंच पाहिजे या बाबतींत रशियानें इतर कोणत्याहि देशांपेक्षां अधिक लक्ष घातलें आहे व तें मिळावें असा आग्रह धरला आहे. परंतु यापुढें, जसें काम व जितकें काम तशी मजूरी व तितकी मजूरी हेंच तत्त्व कम्युनिस्ट रशियानेंहि स्वीकारलें आहे. म्हणजे कामकऱ्यांचें ज्ञान, कौशल्य, शरीरसामर्थ्य व कर्तृत्व यांच्या हिशेबी कोष्टकाप्रमाणेंच मजूरांना मजुरी देण्यांत येते. सुमारें ३५ निरनिराळे दर्जे मजूरीच्या बाबतींत प्रत्येक कारखान्यांत प्रायः आढळून येतात. पैकीं कनिष्ठ प्रतीच्या तीन दर्जांत मजुराला कमींत कमी मजूरी किती पडावी व त्याचें प्राणधारण कसें व्हावें इतक्यापुरतीच दृष्टि असते. पण पुढें चार ते बारा या दर्जांत हस्तकामाच्या मातब्बरीच्या पायऱ्या लावलेल्या असतात. आणि तेरा ते पस्तीस या दर्जांत कारागिरींतील शिक्षणकौशल्य व कर्तृत्व यांच्या पायऱ्या कल्पून बसविलेल्या असतात. अर्थात् खालीं नंबर १ च्या दर्जाचा मजूर व वर शेवटीं नंबर ३५ च्या दर्जाचा कामकरी यांच्या मिळकतींत किती तफावत असेल याची सहज कल्पना करतां येईल. ही उघड उघड विषमताच होय.

प्राचीन कम्यूनिझममध्यें प्रत्येक कामकऱ्याकडून त्याच्या हातून होईल तें काम घ्यावें व त्याची गरज असेल त्या मानानें त्याला मजूरी किंवा सामुदायिक संपत्तीचा उपभोग घेऊं द्यावा असें तत्त्व प्रचलित होतें. रशियांतील आजच्या कम्यूनिझममध्यें हें तत्व शिल्लक राहिलेलें नाहीं. श्रमपात्रतेप्रमाणेंच मनुष्य काम करणार हें केव्हांहि उघड आहे. तें प्रमाण लोकांनीं किंवा त्यानें स्वत: वाढवावें म्हणून वाढत नाहीं. परंतु त्याची गरज ही त्याच्या पात्रतेच्या व्यस्त प्रमाणांत असूं शकते. ती पुरविली जावी हें जुनें तत्त्व होतें. परंतु वरील तत्त्ववचनाचा हा पहिला भाग रशियांत अमलांत असला तरी समाजीन व्यक्तीच्या गरजेप्रमाणें त्याला संपत्तीची वांटणी द्यावी हा त्या तत्त्वाचा दुसरा भाग अमान्य करण्यांत आलेला आहे. मात्र युद्धाच्या वेळीं अमलांत असलेले दर्जे अलीकडे थोडेथोडे बदलण्यांत येत आहेत. तसेंच हा फेरबदल धंदेवारीनेंहि सुरू आहे. कोणत्याहि धंद्याचा कारखाना घेतला तरी त्यांत दर्जाचें कोष्टक एकच असें न ठेवतां, विणकामाच्या कारखान्यांत वेगळें, लोखंड पोलाद कारखान्यांत वेगळें, खाणीच्या धंद्यांत वेगळें असें तारतम्य लावण्यांत येतें. शिवाय विज्ञानकौशल्य, किंवा कर्तृत्व किंवा बुद्धिमत्ता, विशेषत: धोका व जबाबदारी, हीं लक्षांत घेतलीं म्हणजे हीं दर्जाचीं व मजुरीचीं कोष्टकें गुंतागुंतीचींच होणार हें उघड आहे. या गुंतागुंतीचा अर्थच हा कीं, पात्रतेप्रमाणें काम आणि कामाप्रमाणेंच मजुरी असा केला पाहिजे. याचेंच नांव विषमता.

दुसरीहि एक समजूत याबरोबरच झाडून टाकली पाहिजे. ती ही कीं मानव व्यक्ति या नात्यानें स्त्री व पुरुष यांच्यामध्यें कम्यूनिस्ट रशियांत कांहीं अधिकारभेद मानण्यांत येत नाहीं, म्हणून कामकरी या नात्यानेंहि स्त्रिया व पुरुष यांच्या योजनेंत किंवा मजुरींत, मिळकतींत, बक्षिसांत भेद मानला जात नसेल! पण ही समजूत चुकीची आहे. स्त्रिया व पुरुष यांना कोणतीहि पात्रता मिळविण्याला समान संधि दिली जावी हें तत्त्व रशियानें मान्य केलें असलें तरी सृष्टिधर्माप्रमाणें आणि आजपर्यंतच्या परंपरेचा परिणाम म्हणून, स्त्रिया व पुरुष यांच्या पात्रतेंत जो भेद आज प्रत्यक्ष विद्यमान आहे तो कम्यूनिस्ट रशिया अमान्य करीत नाहीं. फार तर स्त्रियांचे विशिष्ट सृष्टिधर्म लक्षांत घेऊन त्यांना गर्भारपणीं, बाळंतपणीं,

व त्यानंतरहि कांहीं काळपर्यंत विशेष सवलती देण्यांत येतात. एरवीच्या दुखणाईत स्थितींतहि पुरुष कामगारांच्या बरोबरीनें त्यांना आरोग्याच्या सोयी, औषधपाणी वगैरे सर्व कांहीं देण्यांत येतें. त्यांत विषमता नाहीं. परंतु धडधाकट स्थितींत स्त्रीच्या हातून एखाद्या पुरुषाच्या इतकें किंवा तितक्या उंची दर्जाचें काम न झाल्यास स्त्रीदाक्षिण्यामुळें तिला पुरुषाच्या बरोबरीनें मजुरी दिली जाते असें होत नाहीं.

कारखानदारीच्या वाढीबरोबर रशियांत सर्वसामान्य मजुरीचीहि वाढ होत चालली आहे. १९२४ सालीं सर्वसामान्य मजुरीचा दर महिन्याला ३९ रुबल होता, तो १९२६ सालीं ५७ झाला. १९२८ सालीं ७० झाला. १९३० सालीं ८३ झाला व १९३२ सालीं ११५ वर येऊन बसला. हल्ली यंत्रें बसविण्याच्या कारखान्यांत जास्तींत जास्त मजुरी महिना १४३ रुबल्स या सरासरीच्या दरानें पडते. उलट सर्वांत कमी मजुरीचा दर ७० रुबल हा लिननच्या कारखानदारांना मिळतो. मोठ्या धंद्यापैकीं सुमारें १५ धंद्यांत महिना १०० रुबलच्या वर व ६ धंद्यांत १०० रुबलच्या खालीं इतकी मजुरी सरासरीनें मिळते.

वर दर्शविलेल्या वेतनांतील विषमतेचा विषाद स्वतः प्रोलेटेरियन हा मानीत नाहींच; पण तत्त्ववादी कम्यूनिस्टहि मानीत नाहीं. या विषमतेमुळेंच मजुरांना—कामकऱ्यांना आपली पात्रता वाढविण्याला उत्तेजन मिळतें असें प्रतिपादण्यांत येतें ! पण संपत्तिविषयक विषमता काढून टाकण्याचा जो प्रयत्न कम्यूनिस्ट रशियांत केला जात आहे तो मजुरी व मेहनताना यांच्या बाबतींत नसून कारखानदारीच्या नफ्याच्या वांटणींतूनच मुख्यतः आहे. आणि याच बाबतींत कम्यूनिझम व भांडवलशाही पद्धति यांच्यांत मुख्य फरक पडतो. एक ग्रंथकार म्हणतो कीं, कम्यूनिझममध्यें मजुरींत विषमता असली तरी कम्यूनिझमनें मरण दिलें आहे तें मजुराला नव्हे तर भांडवलशाहींतील दलालांना व उचल्यांना.

समानतेच्या स्थितींत मनुष्याला श्रम व काम करण्याला उत्तेजन कसें मिळणार ? या प्रश्नाचें एक उत्तर मजुरीच्या दरांतील विषमतेनें वर दिलेंच आहे. पण याशिवाय वरवरच्या दर्जाच्या नोकरींत पगाराखेरीज ज्या नाहीं त्या प्रकारच्या आर्थिक सवलती कामकऱ्यांना मिळतात

कोणाला सुखसोयी पूर्ण असलेली कचेरीची जागा, कोणाला पगारी सेक्रेटरीची मदत, कोणाला मोटारगाडी व ड्रायव्हर, कोणाला आठवड्याच्या शेवटच्या दिवसांत विश्रांति घेण्याकरितां गांवाबाहेर एखादें लहानसें घर, कोणाला अधिक काम केल्याबद्दल भत्ता इत्यादि. तज्ज्ञ लोकांना, इंजीनियरांना चांगलाच पगार देण्यांत येतो, इतका कीं, रशियाबाहेरच्या इतर देशांत मिळत नसेल. या विशेष सवलतीशिवाय कामांतील यश व चढाओढ किंवा चुरस हें वेगळें उत्तेजनच होय. ही चुरस पुष्कळ वेळां कम्यूनिझमच्या तत्त्वाच्या प्रेमापेक्षांहि कामकऱ्यांना अधिक कार्य-प्रवृत्त करते असें सांगतात. आपल्यासारखेंच इतर कामकरी लोक, ठराविक तासापलीकडे काम करून स्वतःकरितां भत्ता न घेतां, त्या कामाच्या फल-श्रुतीचें उदक सरकारच्या म्हणजे समाजाच्या हातावर सोडतात हें पाहून, कम्युनिझमचें तत्त्व सकृद्दर्शनीं न पटणाऱ्या अशाहि कामकऱ्याला थोडाबहुत परार्थाचा धडा मिळतोच. आणि सरकार झालें तरी अशा रीतीनें झालेल्या लाभाचा फायदा, कोणा ठराविक वर्गांना किंवा अधिकाऱ्यांना न देतां, तो समाजांतील सर्व व्यक्तींच्या हिताकरितां समानता बुद्धीनें खर्च करितें हें पाहून, त्या शिकवणींत भरच पडते.

निःस्वार्थीपणाची चढाओढ करून शेवटीं आपल्या राष्ट्राचा फायदा करून देणें, ही गोष्ट युद्धासारख्या विशेष राष्ट्रीय संकटाच्या वेळीं पुष्कळ लोकांकडून घडलेली कोणत्याहि देशांत पाहावयास सांपडतेच. युद्धानंतरहि इंग्लंडसारख्या देशांत, कांहीं विशेष मनोवृत्तीचे लोक केवळ राष्ट्रीय कर्ज फिटावें म्हणून मरणसमयीं आपली सर्व किंवा जिवंतपणीं आपली कांहीं मिळकत देऊन टाकतात ही गोष्टहि अनुभवसिद्ध आहे! पण जी गोष्ट देशाभिमान प्रज्वलित करणाऱ्या संकटाच्या वेळीं घडते, ती गोष्ट शांततेच्या काळांत मोठ्या प्रमाणावर घडणें म्हणजे मनुष्यस्वभावाचा तो एक अपूर्व व उदात्त चमत्कारच म्हणावयाचा! पण रशियांत अशा गोष्टी आज म्हणजे केवळ शांततेच्या काळांतहि घडत आहेत, असें कित्येक ग्रंथकार सांगतात. आणि यांत गुप्त जबरदस्ती किंवा भय यांचा खरोखरच जर कांहीं संबंध नसेल तर सोव्हिएट रशियाला ती गोष्ट भूषणास्पदच ठरेल.

व्यक्तिदृष्ट्या निःस्वार्थी कामाची हौस, आणि सामुदायिक रीत्या

आपलें सरकार बलिष्ठ व्हावें याची इच्छा, हे दोन हेतू रशियन कामकऱ्यांना आज प्रवृत्त करीत आहेत. पण याच्या मागें जाऊन पुन्हां एकदां स्वार्थी हेतु शोधावयाचा तर तो हा म्हणतां येईल कीं, प्रत्येक कामकऱ्याचा असा दृढ विश्वास आहे कीं, सोव्हिएट सरकार मला कधींही उपाशी मरूं देणार नाहीं. रशियन सरकारनें जर बेकारीचा प्रश्न खरोखरीच सोडविला असेल व एवढ्या रशियांत आज एकाहि मनुष्याची उपासमार बेकारीनें होत नसेल तर कामकऱ्याला सामुदायिक स्वामित्वाचें तत्त्व पटण्याचा बराच संभव आहे. रशियांतील कारखाना हा एक पिंड, आणि समाजाधीन असें रशियन सरकार हें त्या पिंडांनीं रचलेलें ब्रह्मांड, हा संबंध खरा धरल्यास राष्ट्राचें उदाहरण कारखान्याला व कारखान्याचें उदाहरण राष्ट्राला असें परोपकारित्व संभवतें.

राष्ट्राचें व कारखान्याचें प्रत्येक पाऊल, सामुदियक जीवनाचा हेतु डोळ्यांपुढें ठेवूनच, पडत असावें असें पाहणारांना भासतें. आतां ज्यांना हा हेतु सुचत नाहीं व पटत नाहीं त्याचें रशियांत काय होतें ? याचें उत्तर हेंच कीं, शाळेंतील चलाख मुलांबरोर पाऊल न पडतां रेंगाळणाऱ्या चुकार मुलाला जशा छड्या खाव्या लागतात, त्याप्रमाणें कम्यूनिझमच्या कक्षेबाहेरील लोकांना, कम्यूनिस्टांच्या निंदास्पद हास्यापासून वरिष्ठ राजकीय सत्तेच्या अत्याचारी जुलमापर्यंत, जुलूमजबरदस्ती सोसून आपलें जीवन दुःसह करून घ्यावें लागतें. रशियन पक्षपाती ग्रंथकार प्रथम कामकऱ्यांच्या निःस्वार्थीपणाची स्तुति करीत करीत शेवटीं सरकारी जुलूमजबरदस्तीवर येऊन ठेंचाळतातच ! पण मग ते राजकीय तत्त्वज्ञानाचा आश्रय करून सफाईनें म्हणतात कीं, " समाजाचें न ऐकणाऱ्या व्यक्तीला व समाजाची शिस्त बिघडविणाऱ्या बंडखोराला कोणत्याहि देशांत अशी शिक्षा होणारच, त्यांत काय विशेष आहे ? राष्ट्रांतील प्रभावी नवमताशीं समरस व्हावें आणि मग आत्मप्रसाधनाचें सुख अमर्याद भोगावें. " दिसतांना हें थोडेंसें चमत्कारिकच दिसतें. कारण निंदेला जुलमाला भिऊन, प्रथम व्यक्तीनें आपली इच्छाशक्ति गवसणींत घालावयाची. पण इच्छाशक्ति दाबून टाकल्यावर खरें आत्मप्रसाधन कसें होणार ? पण बळकट छपराखालीं लावलेल्या झाडांनीं छपरापर्यंत वर जातां येईल. तितकें वाढावें आणि

तशाच स्थितींत फुलाफळांचा संभार नटवावा, हें कदरदान माळ्याच्या बागवगीच्यांत घडतेंच कीं नाहीं ? रशियांतील कम्यूनिझमचें गूढ उकलण्यांत खरा बिकट मुद्दा आहे तो हाच कीं, कम्यूनिझमच्या नांवानें घडणाऱ्या सुधारणेच्या अपूर्व गोष्टींपैकीं जुलुमानें किती घडतात ? आणि इच्छा-स्वातंत्र्यानें किती घडतात ! मात्र याचा पुरावा दोन्ही बाजूंचा आढळतो यांत शंका नाहीं.

---

# १३. रशियांतील समाजास्थिति (१)

रशियांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीची माहिती दिल्यावर आतां सामाजिक व धार्मिक परिस्थितीविषयीं थोडीशी माहिती देण्याचें योजिलें आहे. रशियांतील राजकीय क्रांतीचें बाहेरच्या जगाला फारसें आश्चर्य वाटत नाहीं. कारण, येऊन जाऊन या क्रांतींत जें घडलें आहे तें इतकेंच कीं, रशियन झारची अबाधित एकतंत्री सत्ता नष्ट होऊन त्या जागीं पूर्ण लोकसत्ताक राज्य स्थापलें गेलें आहे. परंतु जुलमी राजसत्ता ही जशी शेंकडों वर्षें जगाला परिचित आहे, तशीच लोकसत्ताक राज्यपद्धतिहि निदान शेंदीडशें वर्षें तरी जगाला परिचित झाली आहे. या दुसऱ्या बाबतींत रशिया जगाच्या इतिहासांत आणखी एक पाऊल पुढें गेला आहे इतकेंच काय तें. म्हणजे राज्यसत्तेऐवजीं कोठें सरदारांची सत्ता, कोठें व्यापारी वर्गाची सत्ता, कोठें शिष्ट सुशिक्षित पुढाऱ्यांची सत्ता असे लोकसत्तेचे प्रकार दिसून आले होते; परंतु रशियांत आतां एकदम कनिष्ठ वर्गाच्या प्रोलेटेरियन लोकांच्याच हातीं सर्व राज्यसत्ता गेली आहे. हा लोकसत्ता प्रकारांपैकीं सर्वांत ताजा नमुना म्हणतां येईल.

राज्यपद्धतीच्या क्रांतीपेक्षां रशियांत झालेली आर्थिक क्रांति ही निःसंशय अधिक आश्चर्यकारक अशी जगाला वाटत आहे यांत शंका नाहीं. जमीन व

धनोत्पत्तीचीं सर्व साधनें हीं देशांतील लोकांच्या सामुदायिक मालकीचीं असावीं, व्यक्तिमात्राच्या मिळकतीला व धनसंचयाला फारच संकुचित मर्यादा असावी, श्रीमंतींत औरस परंपरा राहूं नये, काम करील त्यानें आनंदानें जगावें, पण काम न करील त्यानें वाटल्यास खुशाल मरावें, तथापि बेकारी म्हणून उरूंच नये, आणि समाजांतील एकंदर मालमिळकत इतरांबरोबर समान हक्कानें आपली असून तिचा उपभोग समानतेनें इतर कोणाहिबरोबर आपणालाहि घेण्याचा अधिकार असावा—या गोष्टी जगाला आज केवळ अपरिचित नव्हेत तर काय? आणि अपरिचित म्हणूनच आश्चर्य-कारक. परंतु हा अपरिचितपणा हळुहळू नाहींसा होऊं लागला आहे. आणि रशियांतील प्रयोग यशस्वी झाला असें खरोखरच पटलें तर उरलेलें जगहि या नव्या आर्थिक पद्धतीचा व जीवनक्रमाचा स्वीकार करणार नाहीं कशावरून?

पण रशियांतील राजकीय व आर्थिक क्रांतीपेक्षांहि तेथील धार्मिक व सामाजिक क्रांति ही जगाला अधिक आश्चर्यकारक वाटत आहे यांत शंका नाहीं. आजवर जगानें उराशीं प्रेमानें बाळगून जतन करून ठेविलेल्या दोन गोष्टी म्हणजे धर्मभावना आणि कौटुंबिक पद्धतीचा संसार. या दोन्ही गोष्टींत कम्यूनिस्ट रशियानें एवढी मोठी क्रांति घडवून आणली आहे कीं, कम्यूनिझमची निंदा करणारे टीकाकार हेंच मर्मस्थान असें समजून, त्यावरच टीकेचा पहिला हल्ला करतात. कम्यूनिझमच्या आर्थिक अंगाची चर्चा कर-तांना हे टीकाकार थोडाबहुत तरी तोल संभाळतात. परंतु धर्मभावना व कुटुंबपद्धति यांतील क्रांति त्यांना इतकी भयंकर वाटते कीं, त्यांनीं कितीहि प्रयत्न केला तरी या मुद्द्यावर लिहितां बोलतांना आपली शांत वृत्ति ते टिकवूं शकत नाहींत. पण प्रस्तुत लेख लिहिण्यांत आमचा हेतु कम्यू-निझमच्या स्वरूपाच्या नवमतवादाविषयीं व क्रांतीविषयीं, गुणदोषचर्चेपूर्वी होईल तितकी साधार माहिती देणें हाच असल्यामुळें, या मुद्द्यासंबंधानें फक्त माहिती तेवढी देण्याचा आमचा निश्चय आहे.

रशियांत कम्युनिस्टांनीं राजकीय व आर्थिक बाबतींत व्यक्तिमात्राचें जें स्वातंत्र्य सर्वस्वीं हरण केलें आहे, त्याची भरपाई करून देण्याकरितांच कीं काय त्यांनीं त्याला सामाजिक बाबतींत पूर्ण स्वैराचाराचें स्वातंत्र्य

ठेविलें आहे! आतां सामाजिक नीतीला अनेक अंगें असतात. त्यांपैकीं कांहींचे संबंधानें कम्यूनिस्टांनीं बरेच कडक निर्बंध ठेविले आहेत हें खरें. उदा०–मद्यपान, जुवेबाजी इत्यादि. परंतु ह्या नीतीपैकीं जें एक प्रमुख अंग स्त्री-पुरुषसंबंधावर अवलंबून असतें त्याविषयीं कम्यूनिस्टांनीं सर्वस्वीं मोकळीक ठेविलेली आहे. ही सामाजिक नीति तीन गोष्टींनीं सांभाळली जाते. मनाची लज्जा, जनाची लज्जा, व सरकारी निर्बंध. पैकीं कम्यूनिस्टांच्या राज्यांत या नीतीचें पालन सर्वस्वीं व्यक्तिमात्राच्या विवेकबुद्धीकडे सोंपविलें आहे. कायद्याचे निर्बंध असले तर फारच थोडे आहेत. आणि जनलज्जा हा पदार्थ आज कम्यूनिस्ट रशियांत मुळींच उरलेला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आणि हे तीनहि प्रकार कसे आहेत त्याचीच थोडीशी माहिती ह्याखालीं देत आहों.

कम्यूनिस्टांच्या तत्त्वज्ञानांत स्वैराचाराला संमति नाहीं असें प्रतिपादितांना इकडील कम्यूनिस्ट लोक लेनिन वगैरे महात्म्यांच्या वचनांचा व मतांचा आधार देतात. तो पुराव्याच्या शास्त्राच्या दृष्टीनें ग्राह्यच ठरतो. कोणत्याहि पंथाच्या तात्त्विक संस्कृतीविषयीं अनुमान करावयाचें तर त्या पंथांतील आचार्य, महात्मे व शिष्ट हे काय म्हणतात हें जमेस धरल्याशिवाय कसें चालेल ? व केवळ त्या दृष्टीनें पाहतां स्वैराचार हा कम्यूनिझमचें अवश्य अंग किंवा अवश्य परिणाम असें कोणालाहि यथार्थतेनें म्हणतां येणार नाहीं. पण दुर्दैवानें या विचारसरणीला प्रतिकूल अशा दोन गोष्टी पुढें येतात. पहिली ही कीं, कम्यूनिस्ट रशियांतील आजची प्रत्यक्ष लोकस्थिति स्वैराचारमय आहे याविषयीं भरपूर पुरावा मिळतो. आणि याहून अधिक दुर्दैवाची गोष्ट ही कीं, मार्क्सचें तत्त्वज्ञान एकदां स्वीकारलें म्हणजे हा स्वैराचार त्याबरोबरच येतो व स्वीकारावा लागतो. म्हणजे इतका त्या तत्त्वज्ञानाचा व स्वैराचाराचा निकट संबंध आहे,–असें हिंदुस्थानांतील कम्यूनिस्ट म्हणविणारांपैकींच कांहीं उघडपणें प्रतिपादितात, याला काय करावें ?

आम्हांला पूर्ण माहीत आहे कीं, हिंदुस्थानांतील कम्यूनिस्ट म्हणविणारे सर्वच लोक स्वैराचाराचे पुरस्कर्ते किंवा भोक्ते आहेत असें नाहीं. त्यांतील कांहीं थोड्यांचें चारित्र्य हिंदुस्थानाला मान्य असलेल्या नीतीच्या

उच्च ध्येयाला धरून आहे. त्या थोड्यांनीं आपला विशिष्ट धर्म सोडला नाहीं किंवा जागतिक धर्मासारखा व्यापक कां होईना, पण धर्म म्हणून कांहीं वस्तु पूज्य मानिली आहे. पण वर जे दुसऱ्या प्रकारचे म्हणून लोक सांगितले त्यांनीं लज्जा हा पदार्थ बहुधा कोळून प्यालेला असतो. निदान तो कोळून प्याल्याप्रमाणें रशियांतील विद्यमान स्वैराचाराचें गुप्त किंवा प्रगटहि समर्थन ते करीत असतात. अर्थात् सामाजिक नीतीच्या दृष्टीनें व धर्मभावनेच्या दृष्टीनें कम्यूनिस्टांमध्यें बरे वाईट, काळे गोरे, असा भेद व विवेक करण्याला वास्तविक पुष्कळ जागा आहे. कम्यूनिस्टांच्या टीकाकारांनीं हा भेद व हा विवेक करणें न्यायाचें होईल.

वाळल्याबरोबर ओलेंहि जाळणें भूतदयेच्या दृष्टीनें पाप होय, परंतु हा भेद, हा विवेक स्पष्ट करून दाखविण्याची जबाबदारी कम्यूनिस्टांच्या टीकाकारांपेक्षां स्वतः कम्यूनिस्ट म्हणविणारांवरच अधिक पडत नाहीं काय ? त्यांनीं ही जबाबदारी ओळखण्याची व पार पाडण्याची खबरदारी घेतली असती तर अन्यायानें चालणारा आंधळ्याकोशिंबिरीचा खेळ पुष्कळसा वांचला असता. या खेळांत एकाचे डोळे बांधावयाचे व मग त्यानें इतरांपैकीं वाटेल त्याला यदृच्छेनें हात लावून नेमकें ओळखून काढलें तर बरें. नाहीं तर तो फसला किंवा चुकला असा प्रकार होतो. कम्यूनिस्ट लोकांनीं आपलें नवीन मत प्रतिपादितांना किंवा जगापुढें मांडतांना आपल्या तत्त्वज्ञानाच्या खऱ्या मर्यादा विशद करून न मांडल्यामुळें विरोधी बुद्धीच्या टीकाकारांना आयतीच सबब सांपडते, व विवेकी टीकाकारांची फसगत होते.

असो; सामाजिक नीतीसंबंधानें कम्यूनिस्ट रशियांत कायद्याचीं बंधनें फार थोडीं आहेत. जनाची लज्जा मुळींच नाहीं. जी काय असेल ती सर्व व्यक्तिमात्राच्या मनावर असते. हें जें वर म्हटलें तें कसें काय तें पाहूं. रशियांतील विद्यमान परिस्थिति डोळ्यांनीं पाहून आलेल्या मॉरिस हिंडस नांवाच्या ग्रंथकारानें जें लिहिलें आहे त्याचाच अनुवाद मधून मधून आम्हीं याखालीं देत आहों. हिंडस हा ग्रंथकार स्वतः जन्मानें रशियन आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो म्हणतो, " रशियांत स्त्रीपुरुष व्यवहारामध्यें निषेध, निर्बंध व संशय यांचा इतका अभाव आहे कीं, तो पाहून प्रेक्षक नुसता आश्चर्यचकित होतो, इतकेंच नव्हे तर

त्याला स्वतःच लाजेनें मान खालीं घालावी लागते!" लैंगिक विषयावर मुद्दाम व्याख्यानें होतात तेथें, किंवा सांसर्गिक रोगांविषयीं सप्रयोग शिक्षण देण्यांत येतें तेथें त्या विषयासंबंधानें कोणताहि विषय अश्लील म्हणून वर्ज्य केला जात नाहीं. शरीररचनेचे सर्व भाग खुले खुले दाखविले जातात. आगगाड्यांतून रात्रीं झोंप घेऊन प्रवास करण्याच्या कंपार्टमेंट-मधून स्त्री व पुरुष यांना कोणताहि भेद न ठेवतां एकत्र जागा देण्यांत येतात. आणि अशाविषयीं कोणी परदेशाच्या माणसानें आश्चर्य दर्शविलें तर त्याला म्हणतात, "परकी बायकांना भिणारे असले तुम्ही कसले पुरुष!"

घरांत, शाळेंत, वसतिगृहांत, हॉटेलांत पडदपोशी अशी कांहीं नसते. कोणत्याहि स्त्रीनें किंवा पुरुषानें कोणत्याहि पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या खोलींत दिवसा रात्रीं केव्हांहि जाण्यायेण्याला कोणाचाच प्रतिबंध नसतो. कॉलेजच्या वसतिगृहांतून स्त्रीपुरुष असा भेद केला जात नाहीं. ज्याला त्याला स्वतंत्र खोली असते. पण या खोल्या स्त्रियांच्या, या खोल्या पुरुषांच्या असा भेद नसतो. अमेरिका व फरान्स या देशांत कामुकते-वर निर्बंध कमी असें मानण्यांत येतें. तथापि त्या देशांत विशेषतः फरान्समध्यें, अविवाहित तरुण मुलींबरोबर बाहेर जातांना कोणी मैत्रीण किंवा घरची पाठराखीण असल्याशिवाय पुरुषाच्या संगतींत तरुण मुलींनीं जाऊं राहूं नये असा एक संकेत आहे. पण रशियांत यांतलें कांहीं नाहीं. मात्र हें सर्वच्या सर्व स्वातंत्र्य केवळ कम्यूनिझममुळेंच रशियांत शिरलें असें नव्हे. कम्यूनिस्टपूर्व रशियांत या–स्त्रीपुरुष सहवासाची पुष्कळच तयारी आधींपासून झालेली होती. तथापि ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं, कम्यूनिस्टांनीं हें स्वातंत्र्य जाणून बुजून आणखी पुढें ढकललें. आणि नवमत-वादाचा माथा सामाजिक तत्त्वज्ञानानें उजळ केला. नीति ही सनातन राहूंच शकत नाहीं. असें लेनिनचेंच म्हणणें आहे. गरीबांची पिळवणूक दूर करण्याला नवनीतीचा प्रसार अवश्य आहे असें तो म्हणतो. स्त्रियांच्या हक्कांच्या वाढत्या कल्पनांच्या दृष्टीनें नव्या स्वैराचाराचें समर्थन करतां येईलहि; पण त्यांत श्रीमंतांकडून गरिबांच्या होणाऱ्या पिळवणुकीचा काय संबंध येतो हें कळत नाहीं!

रशियन नवमतवादाच्या कायद्यांत व्यभिचार हा गुन्हा नाहीं. मात्र

त्यामुळें घटस्फोट मागतां येतो. आणि कायद्यानें जबरी संभोग, किंवा लग्नाचें आमिष दाखवून स्त्रीला वश करणें व नंतर फसविणें या दोन गुन्ह्यांना कडक शिक्षा सांगितलेली आहे. 'दारान् अपत्याय' असें ध्येय पूर्वेकडील देशांत मानिलें जातें. आज रशियांत वंशवृद्धि व विवाह यांचा कांहींच संबंध मानला जात नाहीं. विवाह हा तर कामनातृप्तीकरितांच मुख्यतः होय. पण त्या तृप्तीकरितांहि विवाह करण्याची रशियांत गरज नाहीं! कम्यूनिस्ट रशियांत वेश्याव्यवसाय बंद केला असें अभिमानानें सांगण्यांत येतें. परंतु विवाह न करतां कोणत्याहि स्त्री-पुरुषानें वाटेल तितका थोडा काळ किंवा वाटेल तितका पुष्कळ काळ संसार करावा याला समाजाची पूर्ण संमति असल्यावर वेश्याव्यवसायाला जागाच राहात नाहीं. अशा संसाराचें समर्थन खऱ्या प्रेमानें करतां येईल कदाचित्! पण असे सर्व संसार शुद्ध प्रेमानेंच होतात असें म्हणणें कांहीं तरीच बोलल्यासारखें होय.

कम्यूनिस्टांचें म्हणणें असें कीं, " आजवर पुरुषांनीं अन्यायानें अधिकार गाजविले त्याचें उट्टें फेडण्याचा एकच मार्ग हा कीं, स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याच्या कामीं यापुढें कोणतीच मर्यादा ठेवण्यांत येऊं नये. पुरुषांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग आजवर केला तसाच करण्याची मोकळीक स्त्रियांना दिल्याशिवाय न्यायाच्या तराजूचीं पारडीं सारखीं होणार नाहींत! पुरुषांनीं स्त्रियांविषयीं साशंक राहणें हा त्यांच्यावर जुलूम असून, आजवर श्रीमंतांनीं गरिबांची केली तशीच पुरुषजातीनें संशयवृत्तीची कदर स्त्रियांवर राखून त्यांचीहि पिळणूकच केली. म्हणून ज्या कारणांकरितां मजुरांची पिळणूक थांबवावयाची त्याच न्यायबुद्धीनें ही स्त्रियांची पिळणूकहि थांबविली पाहिजे! कुमारिका व्रताचें स्तोम जुन्या लोकांनीं माजविलें त्यांत पुरुषांचा व संपत्तिमान् जनतेचा स्वार्थ होता. स्त्रीदाक्षिण्याची सबब पुढें करून स्त्रियांना दिसण्यांत देवता बनविल्या. पण त्या पावित्र्य-बुद्धीनें नव्हे. देवाच्या अंगावरचे दागिने कोणी चोरूं नये किंवा मूर्ति पळवून नेऊं नये, म्हणून देवळाचें गर्भागार ही राखीव वास्तु ठरवून कुलूप लावावें व मूर्तीला कोंडून घालावें, त्याच न्यायानें पुरुषजातीनें त्यांना जनानखान्यांत किंवा गोषांत घालून त्यांच्या डोक्यावर दुर्बळतेचा छाप मारला. आणि गर्भागारांच्या कुलुपाची किल्ली पुजाऱ्यानें आपल्या कडोस-

रीला ठेवावी, त्याप्रमाणें सरदारी पेशाचें स्तोम माजवून स्त्रियांचें संरक्षण करण्याचा अधिकार आपणाकडे घेऊन, त्यांना दास्य दिलें व आपल्या मर्दानी गुणांच्या बिरुदावलींत भर घातली ! पुरुष सद्‌गुणी राहात असतील तर ते जसे शेवटीं मनाच्या लज्जेनेंच राहात असतील, तसेंच स्त्रियांना सद्‌गुणी राहावयाचें असेल तर त्यांनीं आपल्या इच्छेनें व मनाच्या लज्जेनें वाटल्यास राहावें. पण त्यांनीं तसें राहावें अशाविषयीं नियंत्रण घालण्याचा अधिकार पुरुषवर्गाला किंवा जनतेला किंवा सरकारलाहि असतां कामा नये. " असें कम्यूनिस्टाचें म्हणणें आहे.

देहरचनेच्या–देहधर्माच्या बाबतींत सृष्टीनें स्त्रीवर्गाच्या विरुद्ध जें कार-स्थान केलें त्याच्या विरुद्ध दाद मागण्याची जागा कोठें असती तर कम्यू-निस्टांनीं ती मागून कड पोंचविली असती. पण पुरुषांवर गर्भधारणेची व बाळंतपणाची आपत्ति कांहीं केल्या येऊं शकत नाहीं. म्हणून कम्यूनिस्टांचा नाइलाज झाला आहे ! मात्र आपल्या हातीं आहे तेवढें तरी करावें, म्हणून स्त्रियांना त्यांनीं कायद्यानें अशी सवलत दिली आहे कीं, गर्भधारणा न होण्याचीं सर्व साधनें त्यांनीं खुशाल अमलांत आणावीं. किंवा त्यानेंहि न भागलें तर त्यांनीं राजरोस रीतीनें गर्भपातहि करावा ! अशा गोष्टी न झाल्यास बरें असें त्यांना फक्त एका कारणामुळें वाटतें. तें हेंच कीं परचक्रा-पासून राष्ट्राचें रक्षण व्हावें आणि कम्यूनिझमचा प्रसार जगभर करतां यावा याला मनुष्यबळ लागतें. आणि स्त्रियांनीं जर संततिनियमन व गर्भपात करण्याचें आरंभलें तर हें मनुष्यबळ कोठून मिळणार ? रसायनशाळेंत जर मनुष्याची उत्पत्ति रासायनिक क्रियेनें करितां आली, तर संततिनियमन व गर्भपात याविरुद्ध कम्यूनिस्ट पुढारी जो केव्हां केव्हां उपदेश करितात तोहि मग त्यांनीं केला नसता. कामुक वृत्तीविषयीं देखील कम्यूनिस्ट पुढारी जी प्रतिकूलता दाखवितात व निषेध प्रदर्शित करतात तोहि कम्यूनिझमचें ध्येय साध्य होण्याच्या हेतूनें. नीतिमत्तेच्या हेतूपेक्षां कम्यूनिझमचें ध्येय साध्य करण्याचा हेतु उच्चतर आहे असें कम्यूनिस्ट मानतात. मात्र लेनिनसारखे कांहीं लोक असेंहि सांगतात कीं, खऱ्या कम्यूनिस्टाला कार्यप्रवृत्त होण्याला किंवा आपल्या कर्तव्यांत गढून जाऊन स्वतःला विसरण्याला स्त्री व मदिरा

यांच्या निशेची आवश्यकता नाहीं. खरा कर्मयोगी कम्यूनिस्ट हा या दोहों-पासून अलिप्त राहूं शकेल.

---

# १४. रशियांतील समाजस्थिति (२)

पूर्वसंगतीकरितां पुनः एकवार रशियांतील समाजस्थितीचें वर्णन करतों, तें असें:-कामनापूर्तीच्या दृष्टीनें कम्यूनिस्ट रशियांत आज विवाहित व अविवाहित असा भेद नाहीं. विवाहितांना संसार करतां येतो, तसाच सर्व प्रकारें अविवाहितांनाहि करतां येतो. या संसारांत प्रजोत्पत्ति होऊं द्यावी कीं नाहीं हें प्रत्येकाच्या किंवा उभयतांच्या मर्जीवर सर्वस्वीं अवलंबून आहे. अविवाहित स्थितींत प्रजा झाल्यास तिला आपल्याजवळ ठेवून वाढविण्याचा हक्क स्त्रीला असतो. मात्र या कामीं ह्या प्रजेच्या पोटा-पाण्याची तरतूद करण्याची जबाबदारी जनक पुरुषावरहि असते. असें असतां विवाह होतात याचें कारण स्त्री-पुरुष सहवासांत थोडेंबहुत स्थैर्य लाभलें तर तें व्यावहारिक दृष्टया इष्ट वाटतें म्हणून. रोज स्त्रीनें नवा पुरुष भोगण्याची इच्छा धरली व ती सफळ झाली तर वैचित्र्यवासनेची अमर्याद पूर्ति होईलच. त्याला कायद्याचें बंधन नाहीं व समाजाची हरकत नाहीं. पण एकीकडे जशी वैचित्र्याची आवड तशीच दुसरीकडे स्वामित्वाची ओढ असूं शकते. अर्थात् हें स्वामित्व उभयपक्षीं होय. या स्वामित्वाचा हेतु हाच कीं, जोंवर विवाह अंमलांत असेल तोंवर, विवाहित स्त्री ही विवाहित पुरुषाची राखीव मिळकत, आणि विवाहित पुरुष ही विवाहित स्त्रीची राखीव मिळकत, असा हक्क सांगण्याचा अधिकार कायदा देतो. अविवाहित स्थितींत स्वैर समागमाला व्यभिचार हा शब्दच लागूं शकत नाहीं! तो विवाहित स्थितींत लागू पडतो व तेव्हां त्याला कांहीं वाईटपणाचा अपकृत्याचा अर्थ उत्पन्न होतो. तथापि कायद्यानें हें अपकृत्य गुन्ह्याच्या सदरांत दाखल

केलेलें नाहीं. त्याला फक्त दिवाणी स्वरूप ठेविलें आहे. पण या स्वरूपांतहि, पति किंवा पत्नी यांनीं व्यभिचार केल्यास त्या तिऱ्हाइताकडून नुकसानभरपाई मागतां येत नाहीं. फक्त या कृत्यामुळें विवाहबंधन तोडून टाकण्याचा हक्क पतिपत्नींना प्राप्त होतो. पण घटस्फोटाला असल्या बाह्योपचाराचीहि गरज ठेविलेली नाहीं.

पतिपत्नींपैकीं कोणा एकालाहि जर असें वाटूं लागलें कीं ज्या प्रेमाच्या कारणानें विवाह केला तें कोणत्याहि एकपक्षीं आतां उरलें नाहीं, तर त्याला किंवा तिला तिच्याविरुद्ध किंवा त्याच्याविरुद्ध घटस्फोट मिळवितां येतो 'माझें तुझ्यावरील प्रेम उडालें' हें म्हणणें जसें घटस्फोटाला योग्य कारण होऊं शकतें तसेंच 'माझ्यावरील तुझें प्रेम पूर्वींसारखें नाहीं' असा संशय किंवा संशयाचा नुसता बहाणाहि पुरतो. तोंडानें प्रेम आहे म्हटलें आहे, नाहीं म्हटलें नाहीं! या 'आहे नाहींचा' संबंध कोणत्याहि प्रत्यक्ष वर्तनाशीं असलाच पाहिजे असें नाहीं. हें लक्षांत घेतलें तर 'घटस्फोट' या शब्दांत जो गूढ गर्भितार्थ आहे तो रशियांत नसून घटस्फोटाला काडीमोड हा शब्द अधिक सार्थ ठरतो. घटस्फोट या शब्दांत दंपतींतील एकाचा मृत्यु, ह्या मृताची उत्तरक्रिया, व तींत मडकें फोडून जुना संबंध तुटला इतका लाक्षणिक अर्थ आहे. पण ही भानगड न ठेवतां रशियांत सरळ व्यावहारिक बुद्धीनें विवाहबंधन तोडणें हें शब्दशः काडी घेऊन ती मोडण्याइतकें सोपें केलेलें आहे. विवाहानें राखीव म्हणून स्वाधीन झालेली मिळकत नकोशी वाटूं लागली तर ती टाकून देण्याला कोणाची हरकत नसावी हें अगदीं उघड आहे. निर्जीव मिळकतीला, मनुष्याला म्हणजे आपल्या धन्याला टाकून देतां येत नाहीं. पण विवाहांतील राखीव मिळकत हे जीवमान स्त्री-पुरुष असल्यामुळें ह्या मिळकतीला धन्याला टाकून देतां येतें. काडीमोड ही गोष्ट लग्नविधीइतकीच रशियांत सोपी व सोयीची करून ठेवण्यांत आली आहे. तोंडाकडे तोंड वळलें कीं वाटल्यास लग्न व तोंडाकडून तोंड फिरलें कीं वाटल्यास काडीमोड! आज अविवाहित स्थितींत, उद्यां विवाहित स्थितींत व परवां काडीमोड झाल्याच्या स्थितींत स्त्री-पुरुष सारख्याच उजळ माथ्यानें एकत्र राहूं किंवा नांदूंहि शकतात.

विवाहाचें बंधन व काडीमोडीची मोकळीक यांतून उत्पन्न होणारे

आणखीहि कांहीं बारीक श्लेष म्हणजे हक्क व जबाबदाऱ्या आहेत. पण इतक्या खोल पाण्यांत शिरण्याचें कारण नाहीं. सामान्य स्थिति वर दर्शविल्याप्रमाणें आहे. वैवाहिक स्थितींतील संततिनियमनाचा अधिकार हा बोलूनचालन हक्काचाच होय. अविवाहित स्थितींतील संततिनियमना-सारखें दूषणहि त्याला नाहीं. तीच गोष्ट गर्भपाताची. तात्पर्य, प्रत्यक्ष संतति झाल्यास, होऊं दिल्यास, तिच्या पालनपोषणाची जबाबदारी ही मात्र विवाहितांप्रमाणें अविवाहितांनाहि चुकत नाहीं; व कायद्याचें बंधन म्हणून कांहीं असेल तर तें यापुरतेंच आहे. पण तीहि जबाबदारी उरूं नये अशी इच्छा रशियन स्त्री-पुरुषांना होत असून, पुढेंमागें तीहि निघून जाण्याचा संभव आहे. मग ती जबाबदारी आईबापांऐवजीं समाजावर पडावयाची आहे.

कम्यूनिस्ट तत्त्वाप्रमाणें कुटुंब हा समाजाचा मूळ घटक नाहीं व्यक्ति तर नाहींच नाहीं. म्हणजे समाजाला समष्टीशिवाय दुसरें स्वरूप कांहींच उरत नाहीं. असें ठरल्यावर व्यक्तिसंयोगानें उत्पन्न झालेली समाजाची वाढ हा खुद्द समाजाचाच अवयव झाला. त्या अवयवाची व्यवस्था समाजदेहीनेंच लावणें क्रमप्राप्त. शरीरांतील हातापायाचें प्रत्येक बोट वेगवेगळें, तरीं त्यांना वाढणारीं नखें वेगवेगळीं, पण त्या नखांच्या जिव्हाळीपर्यंत पोसण्यास लागणारें रक्त हें सर्व एकाच संचयांतून एकाच व्यवस्थेनें पुरविलें जात नाहीं काय ? याच विचारसरणीनें हेंहि अनुमान निघतें कीं, विवाहित किंवा अविवाहित दंपतीपासून उत्पन्न झालेली प्रजा ही समाजाचीच असल्यामुळें, समाजानें म्हणजेच सरकारानें त्यांच्या अन्नपाण्याची, पालनपोषणाची व्यवस्था केली पाहिजे. दुसरा कोण करणार ? म्हणून निराश्रित मुलांची म्हणा किंवा आईबापांनीं आपली जबाबदारी समाजावर टाकलेल्या मुलांची म्हणा, सर्व व्यवस्था आपल्या खर्चानें करण्याकरितां रशियांत वसतिगृहें उघडलीं जातील असा पुढेंमागें संभव आहे. मेनकेनें शकुंतलेला रानांत टाकून दिलें तेव्हां तिचें पालनपोषण पक्ष्यांनीं केलें ही भूतदयेची गोष्ट झाली. परंतु वरील प्रकारचीं शिशु-वसतिगृहें निर्माण झाल्यावर आईबापांनीं मुलें वाढविण्याचा त्रास कां सोसावा? व्यक्तीची मिळकत तीच समाजाची;

याचा बरोबर प्रतिसिद्धांत समाजाची मिळकत तीच व्यक्तीची हाच नेमका ठरत नाहीं काय ?

यावर कोणी शंका घेईल कीं, अशा रीतीनें अपत्यसंगोपनाची जबाबदारी टळली तर संततिनियमन बंद पडेल व प्रजेची वाढ बेसुमार होईल. पण ती शंका व्यर्थ आहे. कारण वरील शिशुवसतिगृहांची तजवीज परभ्पर झाली तरी, मूल जन्मण्यापूर्वी आईला तें आपल्या उदरांत नऊ महिने बाळगून आपले शरीररस त्याला द्यावे लागतात, व प्रत्यक्ष प्रसूतीच्या वेदना व उपाधी सोसाव्या लागतात. या व्यक्तिगत आपत्ती टाळण्याकरितांच संततिनियमन व गर्भपात या कायदेशीर सोयीसवलतींचा फायदा रशियन स्त्रिया घेत राहतीलच. या सवलतींचा उपयोग करूनहि त्या फलद्रूप झाल्या नाहींत तरच, अनिच्छेनें व निरुपायानें होणाऱ्या संततीकरितांच, ही शिशुवसतिगृहांची सोय समजावी. व तितकी व्यवस्था समाजानें केलीच पाहिजे. ही व्यवस्था झाल्यावर अपत्यप्रेम म्हणून कांहीं खरी चीज आहे कीं नाहीं याची खरी कसोटी लागणार आहे! कृमिकीटकांपासून हिंस्र श्वापदांपर्यंत सर्व प्राणिमात्र आपल्या अपत्यांचें संगोपन कांहीं कालपर्यंत करतात. यावरून अपत्यप्रेम हा सृष्टिधर्मांतला एक स्थायी धर्म असावा असें आज मानलें जातें. पण कोणी सांगावें कीं सुधारलेला रशियन मनुष्यप्राणी या नियमाला अपवाद उत्पन्न करूं शकणार नाहीं म्हणून ? तसें झालें तर अपत्यसंगोपन करणाऱ्या मनुष्येतर प्राण्यांनाच ते रानटी म्हणून हंसण्याची पाळी येईल !

क्रांति म्हटली म्हणजे मग तिची मर्यादा कोण कोठें घालूं शकणार ? उत्क्रांतीनें होणाऱ्या गोष्टी खळखळ न करतां स्वाभाविक म्हणून जर तुम्ही मान्य करतां तर क्रांतिकारक मनुष्यानें केलेल्या गोष्टीहि तशाच मान्य कां करूं नयेत ? कारण क्रांति झाली तरी ती उत्क्रांति करणाऱ्या मनुष्याच्याच मनांतून निघालेली असते. फरक इतकाच कीं, उत्क्रांतीची गति विलंबित तर क्रांतीची गति द्रुत, अति द्रुत, अति–अति द्रुत असेल. मृदंग तबला वाजविणारा सराईत निपुण मनुष्य ठरीव कालांत तालाची दुगण चौगण करतोच कीं नाहीं ? शिशु-वसतिगृहांच्या सरकारी आश्रमाची सोय झाल्यावर जें खरें जातिवंत म्हणून अपत्यप्रेम असेल तेवढेंच उरेल. कर्तव्यमूलक

म्हणजे जुलुमाचें जें अपत्यप्रेम दिसतें तें आपोआप नाहींसें होईल ! यांत कसची हानि ? एखाद्या घरधन्याला घराभोंवती बाग करण्याचा नाद असतो. पण दुसऱ्या एखाद्याला तो नसतो. ज्याला तो नाद असतो तो झाडें लावतो, वाढवितो, त्यांना फुलेंफळें आणवतो व त्यांचें सौंदर्यसुख घेतो. अशाच रीतीनें सरकारी शिशुवसतिगृहांची सोय झाल्यावरहि कांहीं कम्यूनिस्ट आईबापांना मुलांचे बगीचे घरांत लावण्याचा नाद कां राहणार नाहीं ? पण असें जें होईल तें सर्व इच्छास्वातंत्र्यानें असें समजावें. साहित्यशास्त्रांतहि वत्सल रस हा एक रस म्हणून कोणी शास्त्रकार मानतात, कोणी मानीत नाहींत, तसेंच या दुसऱ्यांप्रमाणें कम्यूनिझमच्या परिणत तत्त्वज्ञानामुळें अपत्यवत्सलतेचा स्थायी भाव आज जो स्वाभाविक म्हणून मानला जातो, तो उद्यां कृत्रिम व केवळ इच्छानुवर्ती असा मानला जाणार नाहीं कशावरून ? खाजगी मिळकतीसंबंधानें देखील अशीच समजूत कम्यूनिस्ट रशियाबाहेर होतीच कीं नाहीं ? खाजगी मिळकतीचा मोह अपत्यप्रेमाइतकाच दुस्तर समजला जात असतां, मार्क्सच्या शिकवणीनें समंजस लोक तो सोडून देऊं शकतात. तर अपत्यप्रेमाची भावनाहि सोडून देण्याला ते कां शिकणार नाहींत ?

खुद्द आईबापांचें अपत्यप्रेम हें असें ऱ्हास पावल्यावर उलट अपत्यामधील मातृ–पितृप्रेम किती उरणार हें उघडच दिसत आहे. आधींच म्हणतात कीं प्रेम हें पाण्यासारखें वरून खालीं वाहणारें आहे; तें खालून वर चढणारें नाहीं. तशांतूनहि जन्मापासून आईबाप आणि मुलें यांची अशी ताटातूट झाली म्हणजे मग त्या मुलांना आपल्या आईबापांचा लळा कसा लागावा ? पशुपक्ष्यांत देखील आपल्या पायानें हिंडूंफिरूं लागण्याला, आपल्या श्रमानें पोट भरण्याला आणि आपल्या बळानें आत्मसंरक्षण करण्याला, पिलें समर्थ झालीं म्हणजे तीं दूर निघून जातात आणि आपल्या मातापितरांची ओळखहि विसरतात. मग आपल्या अगदीं बाळपणीं त्या आईबापांनीं आपलें पालनपोषण केलें याविषयीं कृतज्ञता कोठून राहणार ? शिवाय वडिलार्जित धन व स्वास्थ्य हें एक कारण मुलांनीं आईबापांना व घराला चिकटून राहण्याला असतें. पण कम्यूनिस्ट रशियांत सगळें कांहीं ज्याच्यात्याच्यापुरतें व ज्याच्या त्याच्याबरोबरच असा दंडक असल्यामुळें,

वडिलार्जित धन हें जें कौटुंबिक लोभाचें एक कारण तेंहि उरत नाहीं. या स्थितींत पितृपूजा ही भावना कशी टिकणार ?

जुन्या जगांत भांडवलशाही, सरंजामी, इनामदारी इत्यादि आर्थिक पद्धति वाईट मानल्या तरी त्यांत समाजधारणा व परंपरासंरक्षण करण्याची एक शक्ति होती. अशाच प्रकारची एक शक्ति कुटुंबव्यवस्थेंत व परंपरेंतहि होती. तिजमध्यें वरील पद्धतीचे आर्थिक दोषहि नव्हते. आणि संस्कृति म्हणून जर कांहीं स्पृहणीय वस्तु मानली तर ती कुटुंबव्यवस्थेच्या अबाधित परंपरेनेंच जगांत पुष्कळशी राखली गेलेली आहे असें आढळेल. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें कुटुंबांतील स्त्री, पुरुष व मुलें यांच्या तिरंगी फारकतीनें सगळी कुटुंबव्यवस्थाच ढासळून पडली, म्हणजे मग जुन्या पद्धतीनें संस्कृतिसंरक्षण होणें अशक्य होणार हें उघड आहे. रशियांत हल्लींच तरुण पिढी जुन्या पिढीला जितक्या तुच्छ बुद्धीनें वागवीत आहे तितकी ती दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळणार नाहीं.

किंडरगार्टन, शाळा, क्लब, कारखाना, खेळ व क्रीडा यांचीं स्थळें, ट्रेड यूनियन्स व कामकरी संघ, या सर्वांमधून एकच प्रकारचें शिक्षण दिलें जातें; व तें हें कीं जनक आईबापांचें घर हें मुलांचें खरें घर नव्हे. तें वरील निरनिराळ्या संस्थांत वाटलें गेलें आहे; व त्या सर्वांतून मिळून समष्टिरूप समाजांत सांठविलें गेलें आहे. घर म्हटलें म्हणजे वेगळी चूल आली व तिचा कारभार अर्थात् जाणार स्त्रीकडे. पण तिच्यावरच या चुलीचा मक्ता कां लादावा ? शिवाय सामुदायिक धनोत्पादन जर अधिक लाभदायक व सहकारी व्यवहारांत जर अधिक बचत होते, तर हल्लीं स्वतंत्रपणें दर घरटीं जें घरकाम होतें, त्यांतील होईल तितकें सामुदायिक पद्धतीनें कां करूं नये ? आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या समाजाविषयींच्या वाढत्या जिव्हाळ्याचा लाभ कां करून घेऊं नये ? अशी विचारसरणी सहजच प्रभावी होते. त्याचा परिणाम असा दिसून येतो कीं, राहणें सामुदायिक, स्वयंपाकपाणी सामुदायिक, भोजन सामुदायिक, धुणावळ सामुदायिक, शिशुसंगोपन सामुदायिक, शिक्षण, खेळ, क्रीडा, करमणूक हीं सगळीं सामुदायिक, मिळून बहुतेक सर्व सामुदायिकच ! सामुदायिक होऊंच शकत नाहींत असे जे अगदीं थोडे आवश्यक व्यवहार तेवढेच पृथक्

राहावयाचे. रशियन शहरांतून हिंडणाऱ्या पुष्कळ गाड्यांतून ताज्या अन्नासुद्धां सामुदायिक व्यवहाराचीं साधनें दिवसभर नेण्याआणण्यांत येत असतात. घरचा व्यवहार इतका संक्षिप्त झाल्यामुळें नवीन घरें बांधतात तीं सुद्धां तीन–चार खोल्यांहून अधिक मोठीं असत नाहींत. अशा रीतीनें केवळ एका स्त्री-पुरुष प्रेमाच्या तात्पुरत्या भावनेखेरीज कुटुंबव्यवस्थेला दुसरा आधार किंवा कारण कांहींच रशियांत उरलेलें नाहीं.

हें प्रेम देखील किती चंचल असेल याची कल्पना सहज करतां येईल. रशियन कम्यूनिस्ट स्त्री-पुरुषांपेक्षां पक्ष्यांतील जोडपींहि कदाचित् अधिक कायम टिकत असावीं ! कम्यूनिस्टांचें म्हणणेंच असें आहे कीं, ज्याला प्रेम म्हणून म्हणतात त्यांत मनोभावनेपेक्षां शारीरिक कामुकतेच्या वासनेचाच भाग अधिक आहे. निष्ठावंत प्रेमभावना ही मनुष्याच्या सुधारणेची व उत्कर्षाची खूण असेल अशी समजूत जुन्या लोकांनीं करून दिली आहे ती खोटी आहे !! प्रेमसंबंधाची ही नवी कल्पना यूरोप व अमेरिका या खंडांतहि हळुहळू रुजूं लागली आहे, व कम्यूनिस्ट तत्त्वज्ञानानें तिला अधिक बळकटी येण्याचा संभव आहे. या नवमतवाद्यांचें म्हणणेंच असें आहे कीं, स्त्री व पुरुष यांच्या संबंधांत आज हजारों वर्षें जो कृत्रिमपणा माजून राहिला आहे त्यांतूनच या प्रेमनामक कृत्रिम भावनेचा जन्म झालेला आहे. हे जुने संबंध सर्व मोडून टाकले व स्त्री व पुरुष यांमध्यें अधिकारभेद म्हणून कोणताहि मानला नाहीं, म्हणजे प्रेमाची लिबलिबित कल्पना नष्ट होईल, संपत्तिमानांना जें रिकामपण लाभतें त्यांत त्यांना कांहीं खेळ करमणूक हवी असते ती या प्रेमानें आजवर पुरविली गेली. पण त्या प्रेमाचें मूळच स्त्रियांच्या दुर्बलतेंत व जन्मसिद्ध अशा गौण कनिष्ट हक्कदारींत होतें. प्रेम म्हणजे पुरुषांचा उपकार व स्त्रीची कृतज्ञता ! पण नव्या समतेच्या युगांत पुरुषानें पुरुष म्हणून स्त्रीवर उपकार करण्याला वावच उरत नाहीं, व त्याबरोबर कृतज्ञता बुद्धीचें कारण नाहींसें झालें ! आपल्या शरीराचा एखादा भाग दुखण्याखुपण्यानें नाजूक झाला म्हणजेच त्याच्यावरून हळुवारपणें हात फिरविणें हा उपकार होतो. पण पूर्ण आरोग्याच्या स्थितींत असलेल्या शरीरभागावर हात फिरवितांना अनुकंपामूलक नाजूकपणा कोण ठेवतो ?

स्त्रीपुरुषांचें नातें समान झालें म्हणजे दोघांमधील व्यवहार डाव्या-उजव्या हातांनीं एकमेकांनीं एकमेकांना नखांनीं खाजवून, खरवडून, ओरखाडून कंडू शमविण्याचा इतकाच काय तो उरतो. नव्या रशियन वाङ्मयांत वरील प्रकारचे विचार निरनिराळ्या रूपांनीं अवतीर्ण झालेले आढळतात. अद्भुतरम्य किंवा दिव्य म्हणून ज्या प्रेमाची उपासना पूर्व कालीं करण्यांत येई त्याच्या मुळांत उभय पक्षीं आर्थिक स्वार्थच अधिक होता असें कुशलतेनें दाखविण्यांत येत असतें! या नवीन कल्पनांमुळें कांहीं अकल्पित परिणाम रशियांत झालेले दिसतात! एक परिणाम हा कीं, रशियांत बालविवाह अधिक होऊं लागले आहेत. मात्र बाल याचा अर्थ अगदीं आपले इकडीलप्रमाणें घ्यावयाचा नाहीं. नवऱ्यानें बायकोच्या पोटाला घालणें हें त्याचें कर्तव्य असें मानलें गेल्यास स्त्री परावलंबी होते· व पुरुषहि स्वावलंबी होईपर्यंत लग्नाची जबाबदारी घेऊं इच्छित नाहीं. पण रशियांत कोणीच कोणावर अवलंबून राहूं इच्छित नाहींत. पुरुषांप्रमाणें स्त्रीनेंहि काम करूनच आपलें पोट भरावयाचें आहे. यामुळें इतर देशांतील स्त्रियांना वैधव्य ही आपत्ति वाटते तशी ती रशियांत वाटत नाहीं. दुसरा एक परिणाम सहजच होतो कीं, आपल्या इकडील किंवा यूरोपांतील नवमतवादी वाङ्मयांत प्रेमविषयक कवनें, लघुकथा, कादंबऱ्या यांचा धुडगूस घातला जातो तसा रशियन वाङ्मयांत दिसून येत नाहीं. स्पष्टच आहे; जी गोष्ट निषिद्ध तिच्याविषयीं भावना अतृप्त राहिल्यानें ती वाङ्मयासारख्या निरनिराळ्या मार्गांनीं प्रकट होते. रशियांत हा निषेधच नसल्यानें भावना अतृप्त कां राहतील? व अशा रीतीनें त्या बाहेर तरी कां पडतील? यामुळें रशियांतील दुकानांतून आकर्षक स्त्रियांच्या मूर्ति ठेविल्या जात नाहींत. नाटकगृहांवर किंवा सिनेमा-थिएटरांवर जाहिरातीवजा जीं चित्रें लावतात त्यांत स्त्रियांचीं चित्रें नसतात. त्याचप्रमाणें आपल्याइकडील प्रमाणें मासिक पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर स्त्रियांचीं चित्रें घालण्याचें कारण उरत नाहीं!! विद्यमान महाराष्ट्रांतील मासिकाचा वाचक रशियांत गेला, आणि त्यानें पाहिलें कीं, रशियन मासिका-वर सुंदर तरुणीचें चित्र नाहीं तर तो म्हणेल कीं, "किती रुक्ष, नीरस, अरसिक हा रशियन कम्यूनिस्ट!" पण त्याला काय माहीत कीं, या हिंदी

वाचकापेक्षां रशियन कम्यूनिस्ट किती तरी अधिक रसिक व रंगेलहि आहे !! आपल्या वासनापूर्तीचीं ऐनजिनसी साधनेंच त्याला हवीं तशीं सुलभ असतात. मग त्यानें चित्रदर्शनानें आपली भूक शमविण्याचें काय कारण ? इतकेंच नव्हे तर एक ग्रंथकार लिहितो कीं, "एखाद्या बोलपटांत किंवा नाटकांत मध्यवर्ती कल्पना म्हणून स्त्रीविषयक कारस्थान जर कोणी रंगविलें, तर श्रोते प्रेक्षक विरोधी टाळयांचा गजर करून त्याचा धुव्वा उडवून देतील. अचकटविचकट गोष्टी किंवा कथानकें लिहिणें यांत कला आहे असें रशियन वाचक मानीत नाहीं. तसेंच कलेच्या नांवाखालीं स्त्री-पुरुषांच्या नग्न चित्रांचें किंवा पुतळयांचें प्रदर्शन रशियांत करीत नाहींत. नग्न स्त्रीचें चित्र दाखविणें हा आपला अपमान व अपराध होतो असें रशियन स्त्रिया मानतात. अर्थात् हा एक फायदाच म्हणावयाचा!

---

# १५. कम्यूनिस्ट हा असा असतो!

मॉरिस हिंडस यानें रशियन कम्यूनिझमवरील आपल्या ग्रंथाचें नांव "मुळासकट उलथून टाकलेली मानवजाती" असें ठेविलें आहे. पण मुळासकट असें म्हणण्याऐवजीं "मुळें तोडून नवीन लागण केलेली मानव जनता" हें वर्णन अधिक समर्पक होईल. कारण राजकीय, आर्थिक व सामाजिक या तीनहि बाबतींत, पूर्वपरंपरा नष्ट करून, मुळें तोडलेली ही जनता, कम्यूनिस्ट लोकांनीं, नवी वाढण्याकरितां रक्ताच्या ओल्या चिखलांत लाविली आहे. आणि ते असा हक्क सांगतात कीं, "आम्ही तिच्या मुळाशीं आतां असें नवीन खत व औषधी पाणी घातलें आहे कीं, या मुळचा तुटलेल्या जनतेला आमच्या मताच्या नव्या मुळचा आम्हीं फुटवूं शकतों; आणि पुढें जो वृक्ष होणार त्याला येणारीं पानें, फुलें व फळें हीं सर्व आम्ही योजलेल्या नव्या रक्तवर्ण संस्कृतीचीं असतील." हा

उद्योग रशियांत साधला व चिरंतन झाला तर कम्यूनिस्टांना विश्वकर्मे ही पदवी देण्याला हरकत नाहीं. मात्र वरील दोन गोष्टी घडल्या तर त्या घडल्या असा शेरा यथार्थपणें देण्याला अजून किती तरी काळ जावा लागेल! आणि तोंपर्यंत आजच्या प्रयोगांत किती फेरबदल होतील हें कोणी सांगावें? यावर, "कम्यूनिस्ट क्रांति तुम्हांला मनापासून आवडत नाहीं, असें म्हणण्याची तुमची छाती नाहीं म्हणून तिचें आजचें यश नाकबूल न करतां, भावी प्रतिक्रियारूप शाप तिला देऊन, तुम्ही मनांतील द्वेषाचें समाधान करीत आहां," असें कोणी कम्यूनिस्ट कदाचित् म्हणेल. पण प्रतिक्रिया हा सृष्टिधर्मच असल्यामुळें, व ती नेहमीं चांगल्याकरितांच होत असते, यामुळें कम्यूनिस्ट प्रयोगाच्या चिरकालित्वाविषयीं आम्हीं प्रगट केलेल्या संशयाला द्वेषबुद्धीचा शाप असें कोणी म्हणण्याचें कारण नाहीं.

राजकीय, आर्थिक व सामाजिक या तिन्ही बाबतींत रशियांत आज केवढें परिवर्तन झालें आहे याचें वर्णन पूर्वीच्या प्रकरणांत आलेंच आहे. पण हें परिवर्तन जुलूमजबरदस्तीनें घडवून आणलेलें आहे म्हणूनच केवळ आम्हांला या प्रयोगाच्या चिरंजीवित्वाविषयीं संशय वाटतो. ही क्रांति क्रमिक विकासानें झाली असती तर अशी शंका वाटण्याचें कारण नव्हतें. आणि क्रमिक विकासानें घडणाऱ्या गोष्टींतहि जर, अतिशयोक्ति घडली असतां प्रतिक्रिया होते, तर जुलूमजबरदस्तीनें घडवून आणलेल्या सुधारणेंत ती होईलच हें अनुमान तर्कशुद्ध आहे असें आम्हांला वाटतें. या जुलूमजबरदस्तीचा स्पष्ट पुरावा अनेक ग्रंथांतून मिळतो.

मॉरिस हिंडसच्या मतें आजचा रशियन कम्यूनिस्ट हा पराकाष्ठेचें धाडस आणि द्वेषबुद्धि यांनीं पुरेपूर भरलेला आहे. कम्यूनिस्ट म्हणतो, 'क्रांतीच्या काळांत हे दोन गुण तुमच्यापाशीं नसतील तर तुमची अडगळ मात्र होईल. क्रांतिकारकांच्या पायांत तुमच्या लुडबुडीनें अडथळा मात्र होईल. म्हणून ही अडगळ निष्ठुरपणें दूर फेंकून दिली जाईल.' या धाडसी बुद्धीचा मद कम्यूनिस्टांवर इतका चढलेला असतो कीं, कम्यूनिस्ट हा आपले आईबाप, बहिणभाऊ, इष्टमित्र हे कोणीहि ओळखत नाहीं. क्रांतिकारकाच्या हातापायां पडून त्याची आई, रडूं अश्रू ढाळूं लागली तर 'भांडवलशाहींतल्या मेणचट भावनेनें तिला पछाडलें आहे

असें म्हणून तो तिला पायानें दूर लोटील. तो प्रत्यक्ष आपल्या भावाला गोळी घालण्याला मागेंपुढें पाहणार नाहीं.'

असल्या वृत्तीला सद्‌गुणाचें नांव देऊन, त्याचें चटकदार वर्णन ज्यांत केलें आहे, अशा किती तरी लघुकथा कम्यूनिस्ट वाङ्मयांत आढळतात. अशा एका लघुकथेंतील एक वीर म्हणतो, "अनत्याचाराचें एवढें स्तोम काय माजवितां? खरा कम्यूनिस्ट बहाद्दर तोच कीं, जो थेट सूर्याकडे पापणीची चलबिचल न होतां रोखून पाहील, किंवा रक्ताचा पूर पाहून त्याच्या संवेदनातंतूला एवढासाहि धक्का बसणार नाहीं!" कम्यूनिस्टांच्या मनांत प्रेमाला जागा असेलच तर ती आपल्या क्रांतिकार्याच्या यशाविषयींच्या प्रेमालाच असावयाची. असा दगडासारख्या कठीण हृदयाचा कम्यूनिस्ट रशियांत कसा निर्माण झाला याविषयीं कित्येकांनीं मोठें आश्चर्य प्रगट केलें आहे. पण गोष्ट घडली आहे खरी! त्याचें मन अशा कांहीं अतर्कित भावनेनें वेडावून गेलें आहे कीं, तिजपुढें जुनी परंपराच काय, पण स्वतः त्याच्या आयुष्यांतील स्नेह व ममता यांचे विषय, स्वतःच्या जन्माच्या संवयी व जन्माचा स्वभाव, यांवरहि त्याच्या ध्येयवादित्वानें जय मिळविला आहे. मात्र त्याच्यातर्फें सांगण्याची गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, तो आपल्या या ध्येयवादित्वापुढें आपलें व्यक्तिहितच काय पण प्राणहि कस्पटासमान मानतो. आपण स्वतः अवध्य व अजिक्य आहों अशी त्यानें मनाची समजूत करून घेतली आहे. आपण जवळ जवळ सर्वज्ञ आहों असा आत्मविश्वास तो प्रगट करतो.

"आजकालचे शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, मुत्सद्दी मला हंसतील तर हंसोत, माझ्या वृत्तीला वेडेपण म्हणोत, माझे मार्ग अन्यायाचे ठरवोत, धार्मिक बुद्धीचे लोक मजवर शापांचा कितीहि वर्षाव करोत, किंवा ज्योतिषी माझ्या नाशाचीं भविष्यें वर्तवोत. पण शेवटीं मीच सर्वांना पुरून उरणार आहें. माझ्या हल्ल्यापुढें सगळे चीत होतील" असें तो ठांसून सांगतो. जो कोणी कम्यूनिस्ट नसेल त्याची गणना तो वेड्यांत व मूर्खांत करील. कोणाची बुद्धिमत्ता त्याला नाकबूल करितां येत नसली तर तो म्हणेल, "अरे हा तर लुच्चेगिरीचा अर्क दिसतो. कम्यूनिझमचीं तत्त्वें मनांतून पटलीं असतां न पटण्याचा बहाणा करतो काय? म्हणून त्याला सर्वांच्या आधीं

नाहींसा केला पाहिजे. " एखाद्या मनुष्याचें नांव घेऊन, कोणी " हा फार मोटा माणूस आहे " असें म्हटलें तर कम्यूनिस्ट लगेच प्रश्न विचारील " पण आधीं सांगा कीं याला कम्यूनिझम मान्य आहे काय ? तसें नसेल तर याचें मोठेपण तें कसलें ? "

" इतिहासांतील प्रवाही शक्तींचा सर्व ताबा माझ्या हातीं आहे " असें कम्यूनिस्टाला वाटतें. " दुसऱ्या एखाद्या देशांतील परिस्थिति व परंपरा तुझ्या रशियांतल्या सारखी कम्यूनिझमला अनुकूल नव्हती किंवा नाहीं. " असें कोणी म्हटलें तर कम्यूनिस्ट म्हणतो, " छे ! असें कसें होईल ? येथून तेथून जग हें एकच. " जें रशियांत घडलें तें इतर कोठेंहि घडलेंच पाहिजे असें तो प्रतिपादितो. जर कोणी म्हटलें कीं, " अरे पण हो, जरा दमानें घे. तुझा साम्यवाद जर खरा तर परिस्थितीनें लोकांना हळुहळू पटेलच. त्याची आज एवढी घाई कां ? निदान डोईफोड जुलूम जबरदस्ती कां ? तर यावर कम्यूनिस्ट म्हणेल, " आहे ठाऊक जगांतील लोकांची वृत्ति ! त्यांच्या पायांतल्या बेड्या कोणी तोडून 'हं, तूं सुटलास आतां धांव मार, पळून जा' असें सांगितलें तरी तो फिरून त्या बेड्याच हातांत घेऊन कुरवाळीत राहील. म्हणून त्यानें तोंडाच्या शब्दानें न ऐकलें तर त्याला चाबकानें मारून पळवून लावलें पाहिजे. कम्यूनिस्टाच्या समतावादांत मतसहिष्णुता बसतच नाहीं. मतभेद हा हाडवैरासारखा तो मानतो. त्याच्या मताविषयीं नुसती शंकाहि प्रगट करणें म्हणजे स्वतःवर संकट ओढवून घेणें आहे !

मात्र जनतेच्या नांवानें बोलतां बोलतां तो स्वतःचा व्यक्तिगत अभिमान व अहंकार विसरून गेला असावा असा भास होतो ! म्हणूनच कदाचित् इतर देशांतील सामान्य राजकीय पुढाऱ्यांप्रमाणें रशियन कम्यूनिस्ट पुढारी हे आपली ज़ाहिरात करीत नाहींत. किंवा आपलें तोंड लोकांनीं नीट पाहावें म्हणून त्यांवर कृत्रिम उजेड पाडीत नाहींत. ते वर्तमानपत्राच्या बातमीदारांना मुलाखती देत नाहींत. अमेरिकन वर्तमानपत्राचे प्रतिनिधी, वाळूंतूनहि तेल काढावें त्याप्रमाणें असेल नसेल तेथून बातमी काढण्यांत मोठे पटाईत अशी त्यांची ख्याति आहे. पण त्यांनीं देखील कम्यूनिस्ट

पुढाऱ्यांपुढें हात टेकले म्हणतात. वाईट इतकेंच वाटतें कीं, इतका आत्मनिरपेक्ष मनुष्य बेछूट, क्रूर, निर्दय असावा !

त्याचे नीतिसिद्धांतहि विकृत असतात. कम्यूनिस्ट व्यक्तीनें प्रतिपक्षीय व्यक्तीचा खून केला तर, सगळें कम्यूनिस्ट जग मिळून त्याला उघड शाबासकी देतें. पण जर का एखाद्या कम्यूनिस्टाचा खून झाला तर मात्र सगळे कम्यूनिस्ट जग अत्याचार अत्याचार म्हणून खुनी इसमावर शापाचा वर्षाव करितें ! जर्मन सोशियालिस्ट पक्षानें जर्मन सरकारला एखादें आरमारी जहाज नवें बांधण्याला संमति दिली तर 'सोशियालिझमचे शत्रू' पुरे देशद्रोही असा डांगोरा त्यांच्या नांवानें कम्यूनिस्ट पिटतात. पण रशियन सैन्याकरितां एखादा प्रचंड चिलखती रथ बांधण्याकरितां रशियांतील कारखानदारांनीं आपल्या पगारांतून एकेक रुपया वर्गणी कापून दिली तर ते मात्र क्रांतियुगांतील संत साधू ठरतात. अमेरिकेंत सँको व व्हॅंझिटी या खुनी कम्यूनिस्टांना शिक्षा देणारा न्यायाधीश हा अन्यायाचा मूर्तिमंत पुतळा ठरतो. पण इंग्रज इंजिनियरांना ते निरपराधी असतां फितुरीच्या आरोपावरून, पण केवळ संशयानें, दोषी ठरवून गोळ्या घालून मारण्याची शिक्षा बोल्शेव्हिक न्यायाधीशानें दिली म्हणजे तो न्यायनिष्ठुर रामशास्त्री ठरतो ! जर्मन शायडेमान किंवा इंग्रज रॅम्से मॅक्डोनाल्ड हे मूळचे सोशियालिस्ट असतां, ते कम्यूनिझमच्या टोंकाला न गेले म्हणून त्यांना पाजी, हारामखोर असें कम्यूनिस्टांकडून ठरविण्यांत येतें. पण यांनीं स्वतः कार्ल मार्क्सची अस्सल शिकवण सोयीप्रमाणें बदलून घेतली तरी हे मात्र सच्चे कम्यूनिस्ट राहतात !

जो वर्गकलह मान्य करीत नाहीं तो कम्यूनिस्टांच्या मतें इतिहास विषयाच्या अभ्यासांत ठोंब्या किंवा ठोकळा रतो ! या क्षणीं कम्यूनिस्ट मतें न पटणारा जो कोणी असेल तो आपला सर्वस्वीं शत्रू असें ते मानतात. सोशियालिझमच्या तत्त्वांना धरून गेल्या पन्नास साठ वर्षांत इंग्लंडांतील शांततावादी फेबियन सोसायटीच्या लोकांनीं सोशियालिझमच्या तत्त्वांची जी प्रगति करविली, ती सर्व मातींत गेली ! इतकेंच नव्हे तर "हे मूर्ख लोक नुसतें गप्प बसायला काय घेतील" असा प्रश्नहि कम्यूनिस्ट विचारण्याला कमी करीत नाहींत! एक वेळ प्रांजळ भांडवलशाहीवाला पुरवला;

पण हे अर्धवट, बावळट, निरुपद्रवी सोशियालिस्ट नकोत. शत्रूपक्षांत त्यांची गणती पहिल्या नंबरी असें म्हणण्याला कम्यूनिस्ट कमी करीत नाहींत. बरें, याच्या उलट ट्रॉट्स्की घ्या. तो स्टॅलिन प्रभृति कम्यूनिस्टांनाहि मवाळ ठरविण्याइतका जहाल आहे. नुसत्या रशियांतली चूल न फुंकीत बसतां सगळ्या जगाला एकदम आग घालावी असा कट्टा उत्पातबहाद्दर! काय त्याची बुद्धिमत्ता व काय त्याचें कर्तृत्व? रशियांत क्रांति घडवून आणण्याचे वेळीं जें प्रचंड सैन्य उभें करावें लागलें तें ट्रॉट्स्कीनेंच बनविलें. आमच्या इकडे शालिवाहनाची गोष्ट सांगतात कीं, त्यानें दिवाळीच्या खेळाकरितां बनविलेल्या मातीच्या शिपायांत प्राणसंचार करवून त्याच्या जोरावर राज्य व आपला शक हीं स्थापित केलीं. त्याप्रमाणें १९१७–१८ च्या अराजकाची राख फुंकून फुंकून त्यांतून रशियन सैन्याचे जळजळीत निखारे ट्रॉट्स्कीनेंच बाहेर काढले. तरीहि आज त्याच्या नशिबीं हद्दपारीच! तो स्टॅलिनच्या तडाक्यांत सांपडेल तर हातीं येईल त्या पहिल्या बंदुकींतल्या गोळ्यांनीं त्याचा प्राण घेतला जाईल!

तुम्हांला निष्ठुर व महत्त्वाकांक्षी कम्यूनिझम हवी ना? मग त्या दृष्टीनें ट्रॉट्स्की काय वाईट? त्याला स्टॅलिनचें उत्तर हें कीं, आम्हीं घालून दिलेल्या मर्यादेच्या पुढें तो जातो! म्हणजे एकूण "अनाचारस्तु मालिन्यं, अत्याचारस्तु मूर्खता"! स्टॅलिन–कम्यूनिस्टनें ओढलेल्या रेघेच्या अलीकडे राहील तो मवाळ कुचकामाचा. आणि त्या रेघेच्या पलीकडे जाईल तो भयंकर म्हणून तोहि त्याज्यच! बाहेर दिसायला सर्व ठीक आहे, पण रशियांत मतभेदाला केसाइतकीहि जागा विद्यमान पुढारी ठेवीत नाहींत. मतभेद प्रगट करणें यासारखें धारिष्ट दुसरें नाहीं; किंवा यासारखा गुन्हा दुसरा नाहीं. प्रतिपक्षीयाच्या कपाळीं सैबिरियांतील काळेंपाणी ठेवलेलेंच. जगांत दुसऱ्याचा जीव घ्यावयाला इतका तयार तो केव्हांहि स्वतःचा जीव द्यायला तयार असतोच असें नाहीं. पण या कामी रशियन कम्यूनिस्टानें इतर क्रांतिकारकांवर ताण केलेली आहे. तो जितका जीव घेण्याला तितकाच देण्याला तयार असतो.

कम्यूनिस्ट हा व्यक्तिस्वार्थरहित म्हटला तरी तो फक्त आर्थिक लाभाकरितां. पण बाकीच्या गोष्टींत आपण कम्यूनिस्ट पार्टीचे सभासद या

सन्मानाच्या व अधिकाराच्या जागेचा पूर्ण फायदा घेऊन तो इतरांविषयींची आपलीं वैरें उगवून घेण्याला कमी करीत नाहीं. पार्टीबाहेर असलेल्या लोकांवर वाटेल तो जुलूम करण्याचा जणूं कांहीं त्याला मक्ताच मिळालेला आहे. पण तो तरी तसें कां करणार नाहीं ? समता प्रस्थापित करण्याच्या उद्योगाला कम्यूनिस्ट पार्टीनें प्रथम विषमता हातीं धरूनच सुरवात केलेली आहे. समतेचा त्याचा अर्थच असा आहे कीं कामकरी वर्गाला इतर सर्व वर्गांच्या डोक्यावर नेऊन बसवावयाचें व त्याच्या लाथांनीं इतर सर्व वर्गांना बडवून काढावयाचें ! भांडवलवाला हा निवळ भांडवलवाला म्हणून अस्पृश्य चांडाल होय. त्याच्या अंगालाहि कुजक्या सडक्या संपत्तीची घाण येते ! त्याच्या मनांत भूतदया असूं शकत नाहीं ! तात्पर्य, तो माणूस म्हणण्याच्या लायकीचा नाहीं ! यामुळें त्याचें काय वाटेल तें करण्याकरितां कम्यूनिस्ट जनतेच्या तो स्वाधीन करण्यांत आला आहे असें या पार्टीनें कम्यूनिस्ट जगाला फर्माविलें आहे.

कम्यूनिस्ट पार्टीची शिस्त फार कडक, हा पार्टीचा दोष असला तरी ती शिस्त कम्यूनिस्ट खुषीनें पाळतो हा त्याचा गुणच म्हटला पाहिजे. या शिस्तींतील पहिलें कलम असें कीं, कम्यूनिस्ट म्हणविणारानें स्वत:साठीं द्रव्यसंचय करतां कामा नये. त्याची मिळकत अधिकांत अधिक दरमहा सव्वादोनशें रुबल्स याहून अधिक जास्ती असतां कामा नये. अगदीं वरच्या दर्जाच्या कम्यूनिस्ट पुढाऱ्यांनाहि याहून अधिक पगार नव्हता व नाहीं. लेनिन, ट्रॉट्स्की, झिनोव्हिएफ, लिटव्हिनॉफ, चिचेरीन व स्टॅलिन इत्यादि प्रमुख लोकांनाहि इतकाच पगार मिळे किंवा मिळतो. अलिकडे हा नियम थोडा शिथिल करण्यांत आला आहे असें म्हणतात. एंजीनिअर, अत्यंत कुशल कारागीर, वाङ्मयलेखक यांना बरीच प्राप्ति असते. पण प्राप्तीच्या मानानें करवसुलीहि तितकीच मोठी असते.

पार्टीच्या द्रव्यनिधीकरितां वाढत्या प्रमाणावर अर्ध्या टक्क्यापासून तीन टक्क्यांपर्यंत मासिक वर्गणी पार्टीच्या सभासदानें दिलीच पाहिजे. वाङ्मयलेखकांना प्राप्ति पुष्कळ म्हणून त्यांच्या संबंधानें नियम असा आहे कीं, दरमहा सव्वादोनशें रुबल्सपेक्षां जी अधिक प्राप्ति त्यांना होते तिचा चवथा हिस्सा त्यांनीं पार्टीला दिला पाहिजे. याशिवाय मधून

मधून पार्टीच्या हुकुमानें स्पेशल वर्गण्या होतच असतात. आज लेनिनचा पुतळा उभा राहावयाचा आहे, किंवा रशियन लष्कराला विमान नजर करावयाचें आहे, एखाद्या खेडेगांवच्या शाळेला नवीन पियानो बक्षिस द्यावयाचा आहे, परदेशांतील दुखणाईत कम्यूनिस्टांना औषधोपचाराची योजना करावयाची आहे, रशियाबाहेर एखाद्या देशांत संपवाल्यांना मदत करावयाची आहे, कम्यूनिझमचा मतप्रसार करावयाचा आहे, किंवा अनाथालय बांधावयाचें आहे–अशा या नाहीं त्या शेंकडो निरनिराळ्या कामांकरितां वर्गणीचा हुकूम सुटला कीं, कोणाहि कम्यूनिस्टाला ती नाहीं म्हणण्याची सोय नाहीं.

कम्यूनिस्टांच्या मिळकतींत कमजास्तपणा असो; पण त्याबरोबरच त्यांजवर पार्टीचा कर अशा तारतम्यानें बसविला जातो कीं, कमी मिळविणाऱ्याप्रमाणें पुष्कळ मिळविणारानेंहि जेमतेम हातातोंडाची गांठ पडण्यावर संतुष्ट राहिलें पाहिजे. खाजगी द्रव्यसंचय करण्याची हाव बाळगतां कामा नये. यांत कोणाची सबब सहसा ऐकली जात नाहीं. आणि ज्यानें खोटे हिशेब ठेवून पार्टीला फसविण्याचा बेत केला असेल त्याचें टाळकें चांगलेंच सडकलें जातें. अशा अपराधाकरितां सभासदाला पार्टीतून काढून टाकण्यांत येतें. आणि असें झालें म्हणजे मग पुढील सर्व आयुष्य त्याला जिकीरींत किंवा विपत्तींत काढावें लागतें. पुढारी सांगतील तें समाजसेवेचें काम फावल्या वेळीं बिनवेतन करणें हें कम्यूनिस्टाचें कर्तव्य समजलें जातें. वरून हुकूम आला म्हणजे शीक म्हटलें शिकलें पाहिजे, शिकीव म्हटलें शिकवलें पाहिजे, व्याख्यान दिलें पाहिजे, संशोधन केलें पाहिजे, फार काय जोखमीच्या जागीं पहारा करावयालाहि उभ राहिलें पाहिजे, शिस्तीच्या तावडींत सांपडलेला कम्यूनिस्ट आज येथें असेल तर उद्यां कोठें असेल हें सांगतां येणार नाहीं. आणि तेंहि जवळ आसपास नव्हे तर जगांत वाटेल त्या ठिकाणीं जाण्यास खांद्यावर पडशी टाकून असलें पाहिजे. कधीं वाहावें जीवन, कधीं पलंगीं शयन. पण दुसऱ्यापेक्षां पहिल्या अनुभवाचे दिवसच अधिक. कित्येक कम्यूनिस्ट आपल्या या अधिकाराच्या जागेचा फायदा घेऊन खाजगी कामें साधून घेतात. पण पार्टीच्या अधिकाऱ्याकडे अशी कागाळी गेली, आणि चौकशींत गुन्हेगारी सिद्ध झाली, तर त्या कम्यूनिस्टाला जबर शिक्षा

होते. लांचलुचपत हा फार मोठा गुन्हा समजला जातो. ज्या अपराधाकरितां इतराला कैदेची शिक्षा मिळेल त्याकरितां कम्यूनिस्टाला कदाचित् देहांत शासनहि होईल. मात्र ही अखेरची शिक्षा गुन्हेगारीनें खरा गुन्हा घडून शिवाय वरती पार्टीच्या हिताचें विशेष नुकसान झालें असेल तेथेंच देण्यांत येते.

कम्यनिस्टानें ख्यालीखुशालीचे ढंग फारसे करतां कामा नये. पार्टीच्या कामाकरितां त्यानें आपला वेळ व शक्ति यांची इतर कार्यांतून बचत करीत राहिलें पाहिजे. थोडीशी रशियन दारू त्यानें घ्यावी, पण तो दारू पिऊन झिंगला किंवा बेफाम झाला तर तें मात्र केव्हांहि खपावयाचें नाहीं. कारण पार्टींत नसलेले लोक त्याकडे हात दाखवून म्हणतील "हात्तेच्यारे ! मग आमच्यांत आणि कम्यूनिस्टांत फरक तो काय ?" अर्थात् दारू पिणें किंवा न पिणें ही ज्याच्या त्याच्या इच्छेची गोष्ट, पण पार्टीची बेअब्रू ही कांहीं त्याच्या इच्छेची गोष्ट होऊं शकत नाहीं. सच्च्या कम्यूनिस्टानें जुगार खेळतां कामा नये. नाचावर बहिष्कार घालण्याइतकी कम्यूनिस्ट पार्टी सोंवळी नाहीं. तरी पण "यापेक्षां अधिक चांगलीं पार्टीच्या हिताचीं कामें करण्याचीं अडून राहिलीं आहेत बरें का?" असा इषारा त्याला देण्यांत येईल. असल्या पागलपणाच्या गोष्टी जे कोणी कम्यूनिस्ट नाहींत अशांनींच कराव्या. व्यसनाधीनतेनें त्यांचा नाश न होणें ही कम्यूनिस्ट पार्टीच्या हिताचीच गोष्ट होय. म्हणून रशियांत जरी व्यसनांना बंदी नाहीं, तरी त्यांत सांपडण्याला कम्यूनिस्टांना मात्र बंदी आहे. पण हेंहि लक्षांत ठेवावें कीं, व्यसनापेक्षां धर्माचारांना कम्यूनिस्टांना अधिक बंदी आहे. त्यानें धर्मावर सर्वांगीण बहिष्कार नुसता पुकारला पाहिजे असें नाहीं तर आचारलाहि पाहिजे. कोणी कम्यूनिस्ट म्हणेल कीं, "घरीं आईबाप आहेत, ते जुन्या मताचे पडले म्हणून घरीं धर्मविधि होतात, त्याला मी काय करूं मी स्वतः ते कांहीं करीत नाहीं." पण हें चालावयाचें नाहीं. त्याला पार्टीच्या अधिकाऱ्याकडून असें सांगण्यांत येतें कीं, "असले आईबाप तूं टाकून दिले पाहिजेस. फार काय जरूर तर तूं आपलें नांवहि कायदेशीर रीतीनें बदलून घे. म्हणजे आईबापांच्या या वेड्या धर्मनिष्ठेचा तुला दुरूनहि संपर्क लागणार नाहीं." धर्माच्या पाशानें आपण कम्यूनिस्ट जर

बांधून गेलों तर आपणा कम्यूनिस्टांना सगळ्या जगाच्या उलाढाली करावयाच्या त्या कशा होतील? कम्यूनिस्टाला एकच पाश योग्य; व तो कम्यूनिझमच्या कार्यसिद्धींत पडला तर–गळफांस!

---

# १६. प्रयोग साधणार कीं फसणार ?

आज रशियांत कम्यूनिझमचा जो प्रयोग सुरू आहे त्यासारखा व तेवढ्या प्रचंड प्रमाणावर दुसरा प्रयोग आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासांत झालेला नाहीं. कम्यूनिझमचा पूर्वेतिहास सांगतांना प्राचीन व अर्वाचीन काळीं झालेल्या कांहीं कांहीं प्रयोगांचा उल्लेख आम्हीं केला होता. पण ते प्रयोग कुटुंबसंस्था, धर्मसंस्था यांच्यावर आधारलेले होते; आणि फारच अल्पप्रमाण होते. आधार जिव्हाळ्याचा व व्यवहारक्षेत्र लहान, यामुळें वास्तविक ते यशस्वी व्हावे व चिरकाल टिकावे असें सकृत्‌दर्शनीं वाटण्यासारखें आहे. परंतु ते फार काळ टिकले नाहींत, यावरून सहजच प्रश्न असा सुचतो कीं, रशियांतील कम्यूनिझमचा हा प्रयोग तरी कसा व किती दिवस टिकेल ? अर्थात् अशा प्रश्नाचें उत्तर ज्याची जशी दृष्टि असेल तसेंच तो देणार.

कम्यूनिझमविषयीं ज्याला कौतुक किंवा सहानुभूति वाटत नसेल तो म्हणणार "या जुन्या दाखल्यावरूनच काय तें पाहा. कुटुंबवत्सलेतचा जिव्हाळा आणि धर्मनिष्ठा याचा खंबीर आधार असतां जो प्रयोग यशस्वी झाला नाहीं, तो केवळ तात्त्विक आर्थिक ध्येयाच्या आधारावर यशाला कसा चढेल ? आणि अजून काय झाले आहे! प्रयोग सुरू होऊन अवघीं १८ वर्षेंच झालीं. रशियांतील प्रयोगांत एवढ्यांतच किती कुरबुरी झाल्या, किती मतभेद झाले, किती जुलूमजबरदस्ती झाली, किती कत्तली झाल्या, किती रक्तपात झाला! खुद्द

मार्क्संच्या ब्रह्मसूत्रावर किती निरनिराळीं भाष्यें झालीं हेंहि लक्षांत घ्या म्हणजे तुम्हींच म्हणाल कीं, हा कम्यूनिझमचा प्रयोग म्हणजे आळवावरचें पाणी आहे. तें सांडून जाण्याला वेळ लागणार नाहीं. आणि तें सांडून गेलें म्हणजे रशियन समाजाचें आळवाचें पान फिरून कोरडें तें कोरडेंच. शिवाय प्रतिक्रिया म्हणून किती तरी देशांत आज फॅसिझमचा जोर होऊं लागला आहे. तात्पर्य, हा प्रयोग आत्मगुणानें टिकाऊ नाहीं व परिस्थितीमुळें टिकणार नाहीं."

याच्या उलट ज्याला या प्रयोगाविषयीं कौतुक व सहानुभूति वाटेल तो म्हणेल, "पूर्वींचे प्रयोग टिकले नाहींत यावरून रशियांतील प्रयोगाविषयीं कांहीं रास्त अनुमान करतां येणार नाहीं. तुम्हींच म्हणतां कीं जुन्या प्रयोगांना कुटुंबसंस्था व धर्मनिष्ठा यांचा आधार होता. पण आतां कुटुंबसंस्थेंत किती फेरबदल झाले आहेत. म्हणजे कुटुंबाचें महत्त्व जाऊन तें संबंध देश किंवा राष्ट्र यांतील समाजाला आलें आहे. कुटुंबाचा विस्तार समाजांत झाला त्याच प्रमाणानें लोकांच्या सामुदायिक कल्पनेचाहि विकास झाला आहे."

एकानें म्हणावें, "रशियांत अवतरलेल्या कम्यूनिझमला अद्यापि 'प्रयोग' हीच संज्ञा आहे." शत्रू व मित्र दोनहि हा एकच शब्दप्रयोग वापरतात. फक्त फरक पडतो तो व्याकरणदृष्ट्या. 'प्रयोग' हा कर्ता म्हटला तर त्याला क्रियापद कोणतें लावावयाचें याविषयीं कम्यूनिझमचे मित्र म्हणतात, "प्रयोग झाला, होऊन गेला, यशस्वी झाला. आतां त्याच्याविषयीं कांहीं बोलण्याचें उरलें नाहीं. तो रशियांत स्थिरपद झाला, इतकेंच नव्हे तर थोडें थांबा म्हणजे तो हळुहळू सर्व जगाला व्यापून टाकील."

याच्या उलट कम्यूनिझमचे शत्रू म्हणतात, "हां! प्रयोग होतो आहे व तो आम्हीं पाहतों आहों. पण अजून काय झालें आहे? प्रत्येक नव्या गोष्टींत कांहीं गुण असतातच. तसें या प्रयोगांत कम्यूनिझमचें दिसून आलें. पण त्या गुणांबरोबर दोषहि प्रगट झाले त्यांची काय वाट ? आणि न जाणो पुढील काळीं दोषच गुणांपेक्षां अधिक प्रबळ झाले तर रशियांतील लोकच कंटाळतील आणि म्हणतील—झाला एवढा प्रयोग पुरे झाला. आतां थोडासा फेरबदल करूं या. असला अभिनव प्रयोग यशस्वी

झाला असें म्हणण्याला अजून किती तरी काळ लोटावा लागेल ! कम्यूनिझमहून कमी चमत्कारिक किंवा लोकविलक्षण अशा कल्पना जनतेच्या अंगवळणीं पडण्यापूर्वी शतकेंहि लोटावीं लागलीं. पण त्यापूर्वींच कित्येकांना अकाल मृत्यूनें गांठलें. कम्यूनिझमची हळद प्याल्याबरोबर आपलें तोंड गोरें झालें अशा भ्रमानें रशियानें वाटेल तर आपलें तोंड आरशांत पाहावें. पण अशी हळद प्याल्याबरोबर गोरेपण येत नसतें. रशियाच्या तोंडावरचे काळे डाग अजून किती तरी दिसत आहेत. आणि एखादे वेळीं रंग पालटला तरी तोंडावरचे देवीचे वण सहसा बुजत नाहींत ना ! हे वण मनुष्यस्वभावानें मुळांत केलेले असतात. आणि मनुष्यस्वभाव बदलणें ही गोष्ट अशी दहा पंधरा वर्षांत थोडीच घडून येणार ? कोणी सांगावें कीं, या कम्यूनिझमविरुद्ध रशियांतच प्रतिक्रियेला सुरवात होणार नाहीं म्हणून ? आणि मग रशियाला म्हणावें लागेल कीं, आधीं आपलें घर सांभाळ, जग जिंकण्याची गोष्ट दूरच राहिली ! ”

‘ प्रयोग झाला, ’ आणि ‘ प्रयोग होत आहे ’ या दोन वाक्यांत किती तरी अंतर आहे ! मग प्रयोग टिकेल कीं नाहीं या प्रश्नाचीं उत्तरें तर दोन वेगळीं पडतील आणि त्यांतहि अशीच तफावत दिसून येईल यांत काय आश्चर्य ? प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडत असलेल्या गोष्टीबद्दलहि पाहणाऱ्याच्या इच्छेनुसार मतभेद होतो. मग भविष्यकाळाविषयीं उलट कसें दडपून विश्वासानें ठासून बोलतां येईल हें सांगावयासच नको. कम्यूनिझमचा जो प्रयोग आज प्रत्यक्ष रशियांत चालू आहे त्यांतील हकीकतीचीं उलट सुलट वर्णनें पाहावयाचीं तर इटाली व जर्मनी या फॅसिस्ट देशांत लोक कसे बोलतात व खुद्द रशियांत कसे बोलतात हें पहावें. कम्यूनिस्ट चांगली तेवढीच बाजू जगापुढें मांडतो, व ती मोठी करून दाखवितो. कम्यूनिस्टाच्या दहशतीमुळें आधीं कोणी उघड बोलत नाहीं. व बोललें तर तें दडपून नाहींसें करण्यांत किंवा त्याला कांहीं तरी कारण लावून तें पाण्याहून पातळ करण्यांत कम्यूनिस्ट मोठे दक्ष असतात !

उलट कम्यूनिझमचे शत्रू तिच्याविरुद्ध स्वतः तर वाटेल ते खोटेनाटे आरोप करतीलच, पण खुद्द रशियांतून कम्यूनिझमला प्रतिकूल असा एखादा अधिकारयुक्त उद्गार बाहेर पडला तर त्या एकाचे एकशेंएक

करतात. आणि चित्रपटांतली अंगुष्ठमात्र आकृति सिनेमाच्या पडद्यावर शेंकडोपट मोठी करून दाखवितात, त्याप्रमाणें त्या उद्गाराचा डंका वाजवितात. प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टींची जर ही स्थिति तर उद्यां काय घडेल याचें भविष्य वर्तविणारे काय करतील हें काय सांगायला पाहिजे? तर्कशास्त्राच्या चौकटींत जखडून बसलेलीं अनुमानें जर इच्छानुबंधी असूं शकतात, तर भविष्यकथनाबद्दल बोलावयालाच नको!

खुद्द रशियांत हा प्रयोग हळुहळू मागें पाऊल घेईल याला समर्थनपर पहिलें कारण कम्यूनिझमचे शत्रू देतात तें नैसर्गिक प्रतिक्रियेचें. खाजगी मिळकत, मनुष्याचें व्यक्तित्व, या गोष्टी मनुष्यस्वभावांतच असल्यामुळें रशियन समाजाचें मन कम्यूनिझमचा कांहीं दिवस अनुभव घेतल्यावर उलट दिशेला वळेल. मनुष्यस्वभाव किंवा निसर्ग आपला स्थितिस्थापकत्वाचा गुण प्रगट करील. तिऱ्हाईत दृष्टीनें वस्तुस्थिति पाहण्याकरितां गेलेल्या युरोपियन प्रवाशांनीं, ग्रंथकारांनीं कांहीं अभिप्राय असे लिहून ठेविले आहेत कीं, त्यावरून कम्यूनिझमला बिनबोलका असा बराच विरोध खुद्द रशियांत रशियन लोकांकडूनच आढळतो. याविषयीं दहा पांच उतारे तरी सहज देतां येतील. पण ते देऊन आम्हीं जागा अडवीत नाहीं. याहून महत्त्वाची दुसरी टीका अशी कीं, सरळ आपल्या गुणानें झालेल्या क्रियेविरुद्ध प्रतिक्रिया होणें हेंहि जर सृष्टिनियमानुसार घडतें, तर रशियांत झालेला कम्यूनिझमचा प्रयोग हा बोलून चालून तरवारीच्या धारेवर व दंडुक्याच्या जोरावर कम्युनिस्टांनीं घडवून आणला. पण जुलुमाचा रामराम फार वेळ टिकत नाहीं!

जनता ही काय बोलून चालून परप्रत्ययनेय. जो कोणी तिचा कान पकडून किंवा तात्कालिक लाभाचें आमिष दाखवून खुणावील तिकडे ती सहज जावयाची. पण कानावरचा हात काढवून रग कमी करणारा दुसरा कोणी भेटला, तर कृतज्ञताबुद्धीनें त्याच्याहि मागून ती जावयाची! आणि रशियन जनतेच्या मनांतील स्वाभाविक प्रतिक्रियेचे जितके पुरावे आढळतात, त्याहून पुष्कळच अधिक पुरावे कम्यूनिस्ट पार्टीच्या दहशतीचे व जुलूमजबरदस्तीचे आढळतात यांत मात्र शंका नाहीं. तिरकमठा वांकविलेला होता तोंवर त्यावरून बाण सोडून शिकार करतां आली. पण तिरकमठ्याची दोरी

शिथिल केली तर शिकार नाहीं, आणि शिथिल न करितां ताण तितकाच ठेवला तर धनुष्याची कांबिट मोडण्याचा मात्र संभव! असा दुहेरी पेंच कम्यूनिझमच्या पायांत आज आहे असें तिचे टीकाकार प्रतिपादतात.

पण खुद्द रशियांत कम्यूनिझम टिकून राहो वा न राहो, तथापि ती जगभर पसरेल कीं नाहीं याविषयीं मात्र तिच्या मित्रांनींहि बऱ्याच साधार शंका प्रगट केलेल्या आढळतात. म्हणून त्याविषयीं थोडें लिहूं. स्वतः कम्यूनिस्ट तर 'रशियन क्रांति' असें मर्यादित बोलतच नाहींत. तर, 'आंतरराष्ट्रीय क्रांति' 'विश्वक्रांति' अशा शब्दांनींच ते बोलतात. आणि खऱ्या कम्यूनिस्टांना मनापासून तसेंच वाटतें यांत शंका नाहीं. कम्यूनिझमनें जर मनुष्य खरा सुखी होतो तर ती नाकारील अशी मूर्ख जनता कोणत्या देशांत असेल? म्हणून त्यांना तिचा लाभ करून देण्याकरितां आज जगाशीं युद्ध करावें लागलें तरी आम्ही करूं; अणि त्यांत पाप नाहीं. कारण या एका युद्धानें पुढें अखंड शांतीच जगाला सतत मिळणारी आहे. म्हणून आम्ही युद्धाला उभे राहिलों तर दूर नजरेनें आम्हांला तुम्ही शांततावादीच म्हणा असा हक्कहि ते सांगतात.

पण दुसरे कोणी काय म्हणतात ते पहा. ते म्हणतात, "आजचे जहाल क्रांतिकारक एका पिढींत नाहींसे होतील. धनोत्पादनाच्या मार्गाला रशिया लागल्यामुळें त्या कार्यक्रमाला मनःस्वास्थ्य अवश्य आहे असेंच रशियाला वाटूं लागेल. परराष्ट्रांच्या स्नेहाची मातबरी व उपयोग लक्षांत येऊन, सोशियालिस्ट सोव्हिएट सरकार कम्यूनिस्ट पार्टीला वरचढ होईल. रशियानें शांततावादी अशा 'केलॉग पॅक्ट' नांवाच्या तहनाम्यावर सही केली, किंवा राष्ट्रसंघाचें सभासदत्व स्वीकारलें, तेव्हांच आपलें धोरण अतिक्रमणाचें नाहीं असें रशियानें जगाला कळविलें कीं नाहीं? आणि केलॉग पॅक्टमध्यें भांडवलशाही राष्ट्रांचा कांहीं कावा आहे असें सामान्य कम्यूनिस्टहि म्हणत असतात! कित्येकांच्या मतें रशियानें या तहनाम्यावर सही करण्याकरितां आपणहून आगंतुकीहि केली! अफगाणिस्थानांतून अमीर अमानुल्ला याच्याविरुद्ध बंड झालें तेव्हां रशियन सरकारानें अमीराला मदतच केली. अस्सल कम्यूनिस्टांनीं एखाद्या एकतंत्री राजाच्या हातीं सत्ता राहावी म्हणून मदत करावी याचा अर्थ काय?"

दुसरी गोष्ट रशियानें जगभर कम्यूनिझम पसरविण्याची उत्कट इच्छा

धरली तरी इतर देशांत स्थानिक जनतेच्याहि मनाची तशीच उत्कट इच्छा पाहिजे ! एवढेंच नव्हे तर ती इच्छा सफल होण्यासारखे आणीबाणीचे प्रसंगहि रशियांतल्याप्रमाणें आयते लाभावयास हवेत. पण ते हुकुमी कोठून मिळणार ? घातपात करून खून करून परदेशांत असे आणीबाणीचे प्रसंग कृत्रिम रीतीनें उत्पन्न करणें हें कार्यसाधक न होतां कार्यविघातक ठरावयाचें. लेनिनचें तत्वज्ञान असल्या कृत्रिम क्षोभाला विरोधी आहे. व्यक्तिशः खून व अत्याचार करणें ही गोष्ट लेनिनला नापसंत होती. मुळांत चांगला आधार असल्याशिवाय उगीच बंड उठविण्याकरितां म्हणून बंड करावयाचें हें लेनिनला संमत नव्हतें. कोणाहि कम्यूनिस्टाला आज इतर एखाद्या देशांत क्रांतीला अनुकूल असा सद्यःफलदायी आणीबाणीचा प्रसंग आला आहे असें वाटत नाहीं. तेलाला चांगला कढ आल्याशिवाय त्यांत मोहरी टाकली तर तिचा स्फोट कसा होणार ?

अगदीं हाताजवळचा अफगाणिस्थान व चीन ! पैकीं अफगाणिस्थानांत सोव्हिएट सरकारनें काय केलें हें वर सांगितलें. चीनांत त्यांनीं डाव टाकून पाहिला, पण तो फसला. भांडवलशाहीच्या दोषांच्या अतिशयोक्तीनें आपलें काम आपोआप साधणार असा कम्यूनिस्टांचा सिद्धांत व पूर्ण विश्वास आहे खरा. पण क्रांतीच्या उठावणीचे प्रयत्न असे फसलेले पाहिले म्हणजे, कम्यूनिस्टांना भांडवलशाहीला उद्देशून, लहान मुलें मारामारींत म्हणतात तसें " आणखी एक मार म्हणजे सांगतों " असें म्हणत बसावें लागणार ! किंवा भांडवलशाहीचे शंभर अपराध भरावे म्हणून तिच्या नांवानें एकेक खडा रांजणांत टाकीत काळ कंठीत बसावें लागणार असें दिसतें. दरम्यान आपली तरवार धार लावण्याकरितां दगडावर घाशीत बसण्याला मात्र त्याला भरपूर अवधि आहे. घरची क्रांति सुखरूप आहे असें कम्यूनिस्टांना वाटत असल्यामुळें, क्रांतीची लढाई बिघडली असें जेव्हां कम्यूनिस्ट म्हणतात तेव्हां फक्त परदेशांतील पिछेहाटीविषयींच ते बोलतात. मात्र रशियांतील क्रांतीची ज्योत अखंड जागति ठेविली पाहिजे, आणि ती तशी ठेवूं तर समुद्रांतील खडकावरील दीपगृहाप्रमाणें जगाला त्याचा उपयोग होईल अशा आस्थेनें ते वागत आहेत ! मूर्तिभंजक येतोसा पाहून पुजारी देवाच्या मूर्ति दडवून ठेवील, पण फुटण्याच्या आपत्तींतून वांचवील. त्याप्रमाणें रशियांतील क्रांति

रक्षण करून जगविण्याचा कम्यूनिस्टांचा निश्चय आहे एवढें मात्र खरें. आणि हा बचावाचा विचार ज्या कम्यूनिस्टांच्या मनांत येतो, त्यांच्या मनांत परराष्ट्रांशीं सलोखा ठेवून शांतता राखण्याचें धोरण सहजच प्रभावी होतें.

मँच्यूरियांत जपान चढाई करीत असतां रशियानें गम खाल्ला हा या धोरणाचाच पुरावा असें कित्येक म्हणतात. १९२६ सालीं विलायतेंत संप झाला तेव्हां रशियन कम्यूनिस्टांनीं पन्नास लक्ष डॉलर्स ब्रिटिश ट्रेड युनियनिस्ट लोकांच्या मदतीला पाठविले. त्याचेंहि कारण म्हणून कांहीं लोक असें सुचवितात कीं, ट्रेड युनियनवाले हे शांततावादीच असावयाचेच. म्हणून त्यांना जी मदत ती शांततेच्या कार्यालाच मदत होय ! आणि या शांततेच्या काळांत आपण एक कार्य मात्र अखंड करीत राहावयाचें. तें भांडवलशाहीला शिव्याशाप देण्याचें ! रशियाबाहेर इतर देशांत चिथावणी करणारे उत्पाती कम्यूनिस्ट आहेतच, ते चिथावणीचें काम करतील.

परराष्ट्रांत क्रांति व्हावयाची तर तेथें पुढारीहि तसेच लागतात. तसे ते न मिळाले तर रशिया तरी काय करणार ? जर्मनींत १९२३ सालीं शाईडेमन, इंग्लंडांत मॅक्डोनाल्ड, हेंडरसन यांनीं लेनिनला दगा दिलाच कीं नाहीं ? या परदेशांतून आज मजूर संघाची चळवळ वरीच परिणत झाली आहे. तथापि एक वेळ भांडवलशाही पत्करली पण हे बावळट, मेणचट, सोशल डेमोक्रॅट नकोत, तेच तर घाण करतात, अशा भावनेनें कम्यूनिस्ट त्यांचा तिरस्कारच करतात. त्यांना नीच, हलकट, भ्याड, थुंकी झेल-णारे वगैरे वाटेल तीं विशेषणें लावतात. कारण काय तर ते तत्वतः उत्क्रांतिवादी आहेत क्रांतिवादी नाहींत! मजूरसंघाच्या चळवळीपेक्षां अस्सल राष्ट्रीयत्वाच्या चळवळीच त्यांना अधिक बऱ्या वाटतात. पण युरोपांत फिनलंड, एस्टोनिया, लिटेव्हिया येथें सोशियालिस्ट चळवळ असतांहि तिनें रशियन क्रांतीच्या वेळीं पेट घेतला नाहीं !

तात्पर्य, इतर देशांत लागावी तशी आग लागलेली नाहीं असें म्हणून शांत राहून चिमटे घेण्याच्या कारवाया करूनच रशियन कम्यू-निस्टांना आज समाधान मानून घ्यावें लागत आहे. या परदेशांतून क्रांति व्हावयाची तर ती युद्धाच्या प्रसंगानेंच होईल. पण, तें युद्धहि भांडवल-शाहि आपल्या अभिलाषबुद्धीनें घडवून आणीतच आहे. मग आपणहून

युद्धाच्या पापाचे धनी कां व्हा ? " अशी आज तरी रशियाची वृत्ति दिसते. ट्रॉट्स्की व स्टॅलिन यांच्यांतील तंटयांत स्टॅलिनच्या खुनाचा प्रयत्न हा आरोप पुढें आला खरा. पण स्टॅलिनचें शांततावादी धोरण व ट्रॉट्स्कीचें युयुत्सु धोरण यांच्यांतील फरक हाच त्या भांडणाच्या मुळाशीं खरा असावा असा पुष्कळ जाणत्या लोकांचा तर्क आहे !

---

# १७. आतां थोडी चर्चा

गेल्या सोळा प्रकरणांत सोशियालिझम व कम्यूनिझम यांची पूर्वपरंपरा इतिहासांत काय आढळते आणि आज रशियांत प्रत्यक्ष स्थिति काय आहे, याची शक्य तितकी साधार माहिती दिली. आणि ही लेखमाला आतां आंवरती घ्यावी म्हणून, उपसंहारादाखल, या विषयाची थोडीबहुत चर्चा करून आपलें स्वतःचें मत सांगण्याचा आमचा विचार आहे.

या लेखमालेला " तिरंगी नवमतवाद " हें जें नांव आम्हीं दिलें त्यांतील तिरंगी व नवमत हे शब्द सार्थ असेच योजले आहेत. ' तिरंगी ' या विशेषणानें, राजकीय, आर्थिक व सामाजिक अशा सोशियालिझम कम्यूनिझमच्या तीन बाजू दर्शविण्याचा हेतु होता, म्हणून या तीनहि बाजूंची माहिती लेखांत दिली आहे. ' नवमत ' या शब्दाचें थोडें अधिक स्पष्टीकरण करणें अवश्य दिसतें. कारण नवमत हा शब्द हल्लीं इतक्या निरनिराळ्या अर्थांनीं वापरला जातो कीं, त्याच्या निश्चित मर्यादा ठरविणें कठिण आहे.

जुन्याची मर्यादा कोठें संपते व नव्याची सुरुवात कोठें होते हें सांगणें (इंद्रधनुष्यांतील एक रंग कोठें संपतो व दुसरा कोठें सुरू होतो हें सांगण्याइतकेंच) दुरापास्त आहे. नवें व जुनें यांची अखंड सांखळीच असते. ही गोष्ट राजकीय, आर्थिक व सामाजिक या तीनहि

बाबतींत दिसून येते. या प्रत्येक बाबतींतील लोकमत चळ आणि प्रगतिपर असें इतर कोणत्याहि देशांत असतें, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि तें अनुभवाला आलेलें आहे. पैकीं राजकीय विषयांत, जुन्या एकतंत्री संस्थानी राज्यपद्धतीपासून, प्रातिनिधिक पद्धतींतून, पुढें डेमॉक्रसी किंवा लोकशाही हिच्या अंगणांत आमचा प्रत्यक्ष प्रवेश झाला आहेच. तथापि प्रत्यक्ष घरांत शिरून राहून मालकी हक्कानें नांदण्याच्या स्थितीला शोभेल अशी स्वातंत्र्याची भावना ( व कल्पना ) ही हिंदी लोकांच्या मनांत उदित झाली आहे. यामुळें राजकीय ध्येयाच्या बाबतींत तरी नवमत असें कोणतेंच आमच्यापुढें यावयाचें राहिलें नाहीं. नाहीं म्हणावयाला रशियांतील "कामकरी वर्गाची डिक्टेटरशिप" ही कल्पना मात्र अपरिचित, म्हणून नवमतदर्शक म्हणतां येईल. पण रशियांतील आर्थिक व सामाजिक स्थिति आम्ही या लेखमालेंत वर्णिली ती या देशांतील लोकांना पूर्वीं ऐकूनहि माहीत नव्हती. म्हणून नवमताखालीं त्या दोहोंचा अंतर्भाव अगदीं यथार्थपणें करतां येतो.

महाराष्ट्रांत सामाजिक बाबतींत प्रगतिपर विचार आज पन्नास वर्षें मांडले जात आहेत. हे विचार मांडणारांना 'सुधारक' असें रूढ नांव होतें व अजूनहि तेंच चालतें. परंतु या लोकांना नवमतवादी असें नांव कोणी दिलें नव्हतें. याचें कारण असें कीं सुधारक ज्या सुधारणा म्हणून सुचवीत त्या, विद्यमान स्थितीच्या पुढें एक पाऊल टाकणाऱ्या असल्या तरी, तिला सर्वस्वीं सोडून नव्हत्या. पण नवमत या नांवाखालीं हल्लीं वावरणाऱ्या पुष्कळशा कल्पना इतक्या मूलग्राही व विद्यमान समाजस्थितीला इतक्या सोडून आहेत कीं, त्यांना सुधारणा हा सौम्य शब्द लावणें बरोबर होणार नाहीं.

एक दोन उदाहरणें घेऊं, म्हणजे हें कदाचित् अधिक स्पष्ट होईल. गेल्या पन्नास वर्षांतील समाजसुधारकांनीं असंमत वैधव्य नसावें असें म्हटलें, प्रौढ विवाह व्हावा म्हटलें, पोटजातींत विवाह व्हावा असें म्हटलें, किंवा कोणत्याहि हिंदुजातिजातींत विवाह व्हावा म्हटलें, किंवा कांहीं विशेष परिस्थितींत घटस्फोट मिळावा असेंहि म्हटलें, तरी विवाह-संस्था ही राहावी असेंच त्यांनीं गृहीत धरलें होतें. पण विवाहसंस्थाच अजीबात

नष्ट व्हावी, किंवा विवाहापूर्वींहि स्त्रीपुरुषांनीं एकत्र राहून संसार करावा, ही हिंदु समाजाची 'सुधारणा' न म्हणतां त्याला 'नवमत' हेंच नांव देणें योग्य होईल. लैंगिक स्वैराचाराची ही कल्पना इतकी मूलभूत व एकांतिक आहे कीं, तिला नवमत म्हणण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

जी गोष्ट सामाजिक परिवर्तनाची तीच आर्थिक परिवर्तनाचीहि होय. उदाहरणार्थ, आर्थिक व्यवहारांतील कांहीं बाबी सामुदायिक स्वरूपाच्या व फायद्याच्या असूं शकतात, हें समाईक भांडवलाच्या कंपन्यांवरून, किंवा त्या तशा असणें इष्ट व फायद्याचें आहे हें सहकारी पतपेढ्यांवरून, आपल्या परिचयाचें झालें आहे. कांहीं आर्थिक व्यवहाराचीं खातीं सरकारी मालकीचीं यापूर्वींच झालीं आहेत हें लोकांना माहीत आहे. सुपर इन्कमटॅक्स बसविल्यानें नफेबाजीचा थोडा तरी कान कापला जातो व तो पैसा राष्ट्राच्या तिजोरींत पडतो, हें लोकांना पटलें आहे. फॅक्टरी अॅक्ट व त्याखालचे नियम झाल्यानें कामकरी वर्गाच्या पिळवणुकीला थोडाबहुत आळा पडतो आणि कारखानदारांच्या लोभी वृत्तीला नियंत्रण घातलें जातें, तें भूतदयेच्या किंवा मानवी हक्कांच्या दृष्टीनें इष्ट व न्याय्य असतें हें लोकांना परिचयाचें होऊन पटलेंहि आहे. आज वारसाहक्कानें संपत्तीचें संक्रमण होत असतांना त्यावर सरकार जो कर घेतें तो उद्यां वाढण्यासारखा असून तसें झाल्यास अर्नाजित अशा संपत्तीच्या मालकीला अधिक आळा बसेल हें लोकांना उघड दिसतें. या सर्वांना आर्थिक सुधारणा, किंवा सोशियालिस्ट तत्त्वाच्या दिशेच्या सुधारणा असेंहि म्हणतां येईल. परंतु देशांतील सर्व जमीन विनमोबदला सरकारच्या मालकीची व्हावी, खाजगी मिळकत किंवा नफ्याचा व्यवहार म्हणून कांहींहि उरूं नये, ही कल्पना मात्र इतकी मूलग्राही, एकांतिक व व्यापक आहे कीं, तिला नवमत या नांवानें संबोधल्याशिवाय गत्यंतरच राहात नाहीं. म्हणूनच रशियांतील विद्यमान सामाजिक व आर्थिक परिस्थितीची माहिती देण्याचे कामीं नवमत हाच शब्द आम्हीं मुद्दाम वापरला.

नवमत या शब्दाच्या गळ्यांत नसते भलभलते अर्थ बांधले जातात अशी कित्येकांची तक्रार असते. तसेंच कम्यूनिझम व कांहीं प्रकारचे नवमतवाद यांचा अवश्य संबंध नसतां तो जोडून वड्याचें तेल वांग्यावर काढण्यांत येतें अशीहि तक्रार ऐकूं येते. परंतु नवमत शब्दाचा अर्थ

अद्यापि एखाद्या मराठी शब्दकोशांत अधिकृत असा लिहून ठेवण्याइतका रेखीव, कोरीव किंवा रूढ झालेला नाहीं. अशा स्थितींत कोणाचा कोणाला उपसर्ग लागू नये असें वाटत असेल तर ज्यानें त्यानें आपण आपला शब्द कोणत्या अर्थानें योजतों हें स्पष्ट करून सांगावें इतकाच मार्ग उरतो.

खुद्द कम्यूनिझममध्येंच काय येतें व काय येत नाहीं याविषयीं स्वतः कम्यूनिस्ट पंथांतच मतभेद दिसून येतो. आणि कम्यूनिझमहून अधिक व्यापक असा जो सोशियालिझम हा शब्द त्याच्या व्याप्तीसंबंधानें तर पुष्कळच गोंधळ आढळून येतो. वास्तविक सोशियालिझम व कम्यूनिझम यांचा मुख्य व प्रत्यक्ष संबंध आर्थिक व्यवहाराशीं येतो. आणि तितक्यापुरतेच ते शब्द वापरून, हल्लींच्या स्थितींत काय काय फेरबदल व्हावयाला पाहिजेत असें कोणी नक्की सांगितलें, तर घोंटाळा होण्याचें कांहींच कारण नाहीं. आर्थिक स्थिति बदलल्यामुळें तिचे जे राजकीय किंवा सामाजिक परिणाम होतील ते 'आनुषंगिक' मानतां येतात. आणि विशेष जोराचें मतप्रतिपादन न करतांहि त्यांचा निर्वाह होऊं शकतो. पण प्रत्यक्षांत तसें घडत नाहीं. चित्रकाराला (यथादर्शनशास्त्राचें) परस्पेक्टिव्हचें ज्ञान नसेल तर तो जसें चित्र काढील, म्हणजे दूरचें व जवळचें हें सारखेंच प्रमाणबद्ध असें तो रेखाटील, त्याप्रमाणें विवेक न ठेवतां सोशियालिझम कम्यूनिझम यांचें प्रतिपादन चौफेर करणारांचें होतें.

जुन्या काळीं या तत्वांचे जे लहानसहान प्रयोग झाले त्यांत, दूरचे जवळचे, अवश्य अनावश्यक, परिहार्य अपरिहार्य, यांची खिचडी केव्हां झाली असली तरी ती लोकांच्या डोळ्यांवर फारशी आली नाहीं. किंबहुना हे लहानसान प्रयोग करणारे लोक किंवा समित्या यांची इच्छा, आपलें स्वातंत्र्य आपणापुरतें राहावें व लोकांकडून आपणाला उपद्रव होऊं नये, अशी असल्यामुळें त्यांनीं एक प्रकारच्या गुप्त मंडळ्यांचेंच स्वरूप राखलें होतें. पण नवे सोशियालिस्ट नवे कम्यूनिस्ट यांचें तसें नाहीं. त्यांच्या कार्यक्षेत्राचा व्याप मोठा. त्यांची महत्त्वाकांक्षाहि तशीच मोठी. आपणाला दुसऱ्याकडून उपद्रव होऊं नये याऐवजीं आपण दुसऱ्याला उपद्रव कसा करूं या चिंतेंतच ते असतात. कारण त्यांचें मत असें आहे कीं, नुसत्या आपल्या

देशांतच काय, पण मानवजातीचा जगभर अखंड सांधा व रांधा असल्यामुळें, सगळ्या जगांतच जेव्हां सोशियालिझम किंवा कम्यूनिझमचीं तत्त्वें अंमलांत येतील, तेव्हांच जगांतल्या एखाद्या कोपऱ्यांतल्याहि प्रयोगाला यशस्वी होण्याला खरा वाव मिळेल! शिवाय या प्रचंड उद्योगांत फक्त आर्थिक सुधारणेची दृष्टि न ठेवतां, आनुषंगिक राजकीय व सामाजिक परिणाम हीं देखील आपल्या मतसिद्धांताचीं अवश्य अंगें होत, अशीहि त्यांनीं आपली समजूत करून घेतली आहे.

नव्या आर्थिक तत्त्वज्ञानाला यश मिळण्याकरितां धर्म व समाज-परंपरा यांत प्रथमच हात घातला पाहिजे असें नाहीं. एखादें राष्ट्रीय सरकार सोशियालिस्ट आहे; पण तें अमेरिकेप्रमाणें प्रजेच्या धर्मांत मुळींच हात घालीत नाहीं. किंवा जर्मनींतल्याप्रमाणें सर्व धर्मांना सारखीच मदत करतें, अशी कल्पना शक्य आहे. यूरोपांत अनेक निष्ठावंत धर्माधिकारी आज सोशियालिझमचे चहाते असल्याचें आढळतें, याचा अर्थच हा कीं, सोशियालिझमचें तत्त्व व कोणत्याहि प्रकारची धर्मनिष्ठा यांच्यामध्यें अवश्य वैर असलेंच पाहिजे असें नाहीं. तसेंच कुटुंबसंस्था व विवाहसंस्था यांज-मध्यें कोणच्याहि प्रकारचा बिघाड न करतां सोशियालिझमची घटना बनूं शकेल; अपत्यपालनासंबंधानेंहि तीच गोष्ट समजावी, देशांतील राज्यघटना केवळ डेमोक्रॅटिक पद्धतीची असूनहि त्यांत सोशियालिझम नांदूं शकेल. म्हणजे ती नांदण्याला रशियांतल्याप्रमाणें कामगार वर्गाची झोटिंग-शाहीच (डिक्टेटरशिप) प्रस्थापित झाली पाहिजे असें नाहीं. रॉडबर्टस नामक एका कट्टया सोशियालिस्टानें तर असेंहि म्हटलें आहे कीं, "देशांत राज्याच्या शिरोभागीं राजसंस्था कायमची असली तरी त्यामुळें सोशिया-लिझम अशक्य होते असें नाहीं!" फ्रेंच तत्त्ववेत्ता ऑगस्टस कॉंट यानें किंवा प्लेटोनें कल्पिलेल्या सोशियालिस्ट राष्ट्रांत राज्यसूत्रें व्यक्तितंत्रच ठेवलीं आहेत! सोशियालिझम म्हटली म्हणजे तिच्या आघाडीला क्रांति किंवा अत्याचार यांच्या निशाणाचा हत्ती चालूं लागलाच पाहिजे अशी जी समजूत दिसते तीहि सकारण नाहीं. या क्रांतीच्या व अत्याचाराच्या समर्थनार्थ मार्क्सचें उदाहरण नेहमीं देण्यांत येतें. पण त्यामुळें कोणताहि नियम सिद्ध होत नाहीं. कारण त्याच्याइतक्याच उत्कट भावनेचे इतर

कांहीं सोशियालिस्ट असे आहेत कीं, त्यांना सोशियालिझमचा अवतार शांततेच्या मार्गानें होणें शक्य वाटतें. फक्त शांततेच्या मार्गांत एकापेक्षां दुसऱ्याचें पाऊल कदाचित् अधिक जलद पडेल. मार्क्सचे कट्टे अनुयायी म्हणविणारे असेहि कित्येक तन्मतवादी क्रांति व अत्याचार यांविषयीं उदासीन असतात. कारण सोशियालिस्ट लोकांमध्यें देखील जे विचारी आणि भूतदयाप्रेरित असतात, कम्यूनिस्टांप्रमाणें ज्यांच्यामध्यें द्वेषबुद्धि व असूया यांचा संचार झालेला नसतो, ते सर्व, खासगी संपत्ति एकच हात मारून जप्त करून टाकावी असें म्हणत नाहींत. ज्यांची संपत्ति काढून घ्यावयाची त्यांना इतर रीतीनें कांहीं नुकसानभरपाई किंवा मोबदला देणें योग्य असें ते म्हणतात.

सोशियालिझमचें मुख्य तत्त्व हें कीं, राष्ट्रांतील विविध संपत्तीची वांटणी, विभागणी, शक्य तितक्या समानतेनें व्हावी. पण यांतून देशांत खाजगी मिळकत म्हणून राहूंच नये, हें कसें निष्पन्न होतें ? देशांतील सर्व जमीन ही राष्ट्राच्या मालकीचीच असावी या तत्त्वालाहि अपवाद मान्य करणारे सच्चे सोशियालिस्ट आढळतात. कारण जमिनीचे तुकडे लहानसहान पण मालकीचे असले तर ते सोडून देऊं नयेत अशीच बहुतेक सर्व देशांतील जनतेंत प्रवृत्ति आढळते. आणि या प्रवृत्तीमुळेंच एकांतिक सोशियालिझमची प्राणप्रतिष्ठा रशियाबाहेर अद्यापि कोठेंहि झाली नाहीं. आणि जमिनीची खाजगी मालकी म्हटली म्हणजे खाजगी वहिवाट ही आलीच. मग छोटे मोठे मालक आपल्या स्वतःच्या इच्छेनें व अधिक फायदा होतो म्हणून, सामुदायिक वहिवाट मशागत करोत भले ! खाजगी मालकी व वहिवाट अशी अबाधित राहूं देऊन देखील अर्नाजित किंवा अन्यायार्जित असे जे लाभ, ते खाजगी मालकांच्या पदरांत पडूं न देतां सरकारला मिळावे अशी व्यवस्था करणें शक्य आहे असें कांहीं सोशियालिस्ट मान्य करतात. व्याज व भाडें हीं सोशियालिझममध्यें पूर्वीसारखीं सर्व खाजगी मालकीचींच न राहोत, पण व्याज व भाडें हे धनोत्पादनाचे प्रकारच सर्वस्वीं नष्ट होतील असेंहि नाहीं. ज्याला गिल्ड सोशियालिझम म्हणतात तोहि वास्तविक सोशियालिझमचाच एक प्रकार आहे.

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, सोशियालिझम म्हटली म्हणजे ती नक्की अमूक एका रेखीव छापाची असलीच पाहिजे असें होत नाहीं.

आणि रशियांतील कम्यूनिझम हाच सोशियालिझमचा अत्यंत परिणत किंवा अत्यंत इष्ट असा प्रकार आहे असें तर मुळींच होत नाहीं. डॉ. टाऊसिग (अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ) म्हणतो, " जगांत व्यक्तित्व किंवा मानुषता हिची अत्यंत परिणती व्हावी हेंच मनुष्याचें सर्वोत्तम सुख असें जर आपण एकदां मान्य केलें, तर हें सुख त्याच्या पदरांत अमुकच एका आर्थिक घटनेनें पडेल असें ठांसून सांगण्यापूर्वी कोणीहि शंकितच झालें पाहिजे व त्यानें आपल्या म्हणण्याचा दहा वेळ उलटसुलट विचार केला पाहिजे." सोशियालिझमची मुख्य बाजू म्हणजे आर्थिक पुनर्घटना. तिच्याविषयींच जर जाणते लोक असे पर्याय मान्य करतात, तर तिच्या राजकीय, समाजिक व धार्मिक अंगासंबंधानें मतभेद किती शक्य आहे हे न सांगतांहि लक्षांत येण्याजोगें आहे.

प्रथम सोशियालिझमच्या राजकीय अंगासंबंधानें विचार करतां हें दिसून येईल कीं हिंदुस्थान हें जोंपर्यंत ब्रिटिशांच्या अंकित आहे, स्वतंत्र होणार नाहीं, तोंपर्यंत खुद्द इंग्लंडांत सोशियालिझमची जी मजल जाईल तिच्या पलीकडे हिंदुस्थानांत ती जाणें शक्य नाहीं. इंग्लंडांत सोशियालिझमचा पुरस्कार ज्या फेबियन सोसायटीनें केला ती एकांतिक विचाराची नव्हती. ती उत्क्रांतिवादी व शांततावादी होती. आणि आजमितीसहि तिच्यांतून निघालेला मजूर पक्ष किंवा सोशियालिस्ट पक्ष हा देखील तसाच आहे. केवळ प्रतिभाशक्तीनें मनोरथ हवे तितके भरधांव किंवा उंच हांकणारे एच. जी. वेल्ससारखे सोशियालिस्ट तत्त्ववेत्ते अजून 'रशियन' कम्यूनिस्ट मताचे नाहींत. पूर्वी एका लेखांत स्टॅलिन व वेल्स यांच्या मुलाखतींचा उल्लेख आम्हीं केला होता तो वाचकांच्या लक्षांत असेलच. त्यांत वेल्सचें म्हणणें " सोशियालिझम शक्य तितकी उत्क्रांति मार्गानेंच पदरांत पाडून घ्यावी " असें होतें. रशियन कम्यूनिझमची सर्वांगीण माहिती देणारा हजारबाराशें पानांचा ग्रंथ सिडने व बियाट्रिस वेब यांनीं लिहिला. हीं पतिपत्नी तरी स्वतः ब्रिटिश कम्यूनिस्ट पार्टीचे सभासद झालीं आहेत कीं नाहीं हें आम्हांस माहीत नाहीं. पण आम्हांला हें माहीत आहे कीं, मि. मॅक्स्टन यांचा जो संघटित कम्यूनिस्ट पक्ष म्हणून इंग्लंडांत आहे, त्यानें

विलायतेंतील सोशियालिस्ट पक्षाकडे त्याच्या संघटनेंत प्रवेश मिळविण्याचा अर्ज केला पण तो फेटाळला गेला!

आतां केवळ तत्त्वप्रतिपादनाच्या दृष्टीनें विलायतेंत कम्यूनिस्ट पक्षाला थारा नाहीं म्हणून हिंदुस्थानांत कम्यूनिझमच्या तत्त्वांचा मतप्रसार कोणीच करूं नये असें अनुमान निघत नाहीं. परंतु या तत्त्वांचा अंमल व्हावयाचा तर हिंदुस्थान हें प्रथम ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पाशांतून मुक्त होऊन स्वतंत्र झालें पाहिजे हें मात्र उघड आहे. शिवाय, उद्यां खुद्द इंग्लंडांत क्रांति होऊन तेथें पूर्ण सोशियालिझम प्रस्थापित झाली तरीहि कदाचित् त्याचा फायदा अंकितावस्थेंतील हिंदुस्थानाला मिळेलच असें नाहीं! कारण आपल्या स्वतःच्या देशांत रिपब्लिकची राज्यघटना व स्वातंत्र्य भोगणारीं अनेक राष्ट्रें आपल्या अंकित असलेल्या वसाहती किंवा डिपेंडन्सीज यांना कसें वागवितात हें प्रसिद्ध आहे. त्यावरून बोध हाच घ्यावा कीं, हिंदुस्थानांतल्या इतर खास अडचणींचें आज कांहीं कोणी न बोललें तरी, इकडे नुसती सोशियालिझमहि प्रस्थापित व्हावयाची तर त्याची पहिली अट इंग्लंड-पासून हिंदुस्थान स्वतंत्र झालें पाहिजे! मग नंतर येथील जुन्या परंपरेंत वाढलेली जनता आणि सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट पुढारी हे आपापसांत काय बनेल तें पाहून घेतील!

असें असल्यामुळें, आज स्वातंत्र्याला ठावठिकाणा नसतां, एकांतिक सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट मतांची घोषणा इकडे करणें म्हणजे गाडीला घोडा जुंपण्याऐवजीं घोड्याला गाडी जुंपण्यासारखें विपरीत आहे! म्हणून हें स्वातंत्र्य पदरांत कसें पडेल याचाच विचार आधीं झाला पाहिजे. हें स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं आजवर फक्त वरच्या वर्गानींच लक्ष घातलेलें आहे. यांच्या जोडीला शेतकरी, मजूर, कामकरी या वर्गाला त्यांत लक्ष घालावयाला पाहिजे. आणि हें करतांना त्यांच्या देशाभिमानाप्रमाणें स्वार्थी बुद्धीचाहि उपयोग करून घ्यावयाचा तर, आजची त्यांची दुःखद स्थिति कशी नष्ट होईल व त्यांना अधिक सुखाचे दिवस कसे लाभतील याचें आमिष व मार्ग इतर रीतीनें दाखविणें हें सर्वस्वी रीतीचें होईल. हिंदुस्थानसारख्या गरीब देशांतहि आज आर्थिक विषमता इंग्लंड अमेरिकेसारखी नसली तरी बरीच

आहे. ती अवश्य कमी केली पाहिजे. धनिक वर्गाचा, जमिनदार वर्गाचा, कारखान्यांच्या मालकांचा, जो खरा जुलूम होत असेल तो मजूर कामकऱ्याच्या नजरेला आणून देऊन तो दूर करण्याला त्यांना प्रवृत्त केलें पाहिजे व त्या कामीं त्यांना साहाय्यहि केलें पाहिजे. मजूर कामगार वगैरेंचें वेतन, कामाचे तास, नोकरींतील सुखसोयी, गृहस्थिति, आरोग्य, शिक्षण या सर्व बाबतींत मालकांच्या खर्चानें व सरकारी कायद्यानें जितक्या अधिक सुधारणा होतील तितक्या करून दिल्या पाहिजेत ; व याकरितां लोकपक्षानें कायदेमंडळांत शिरून अधिकारग्रहण केलें पाहिजे. तात्पर्य, या मजूर कामकरी वर्गांत शिरून, त्यांना आपण मनुष्य आहोंत, आपणाला जन्मसिद्ध व मूलभूत कांहीं हक्क आहेत, आणि राजकीय स्वातंत्र्य हें आपल्या फायद्याचेंच आहे ही गोष्ट त्यांना समजून पटवून देऊन, त्यांना स्वातंत्र्याच्या चळवळींत अंशभागी करणें हें राष्ट्रकार्य होय. परंतु तें करून वरील मार्गानें कांहीं यश मिळविण्यापूर्वींच सामाजिक व धार्मिक बाबतींत त्यांचा बुद्धिभेद करून त्यांना बुजविणें, आणि आर्थिक बाबतींत खाजगी मिळकतीचा हक्क सर्वस्वी नष्ट होऊन सरकार हेंच एक सर्व मिळकतीचें मालक बनेल, तुमचें म्हणून कांहीं उरणार नाहीं असें ध्येय-दृष्टीनें का होईना, त्यांना सांगणें म्हणजे त्यांचा तर बुद्धिभेद होतोच व ते घोटाळूनहि जातात; पण स्वातंत्र्याच्या सामुदायिक चळवळीलाहि तें घातक होतें.

---

## १८. राज्यसंस्थाविषयक खरें ध्येय कोणतें ?

जगाच्या जीवनांत क्रिया व प्रतिक्रिया यांचें द्वंद्व किती जोरानें व बलदहि चालूं शकतें याचें एक प्रत्यंतर गेल्या २५ वर्षांत चांगलेंच आलें आहे. महायुद्धापूर्वीं म्हणजे १९१२–१३ सालीं व्यक्तिस्वातंत्र्याचा सिद्धांत

जवळ जवळ पूर्णतेला पोंचल्यासारखा वाटत होता. परंतु आज पाहावें तर त्याविरुद्ध इतकी प्रतिक्रिया झालेली दिसते कीं, व्यक्तिस्वातंत्र्य हें जणूं कांहीं जगाला माहीत होतें कीं नव्हतें, असें होऊन झोटिंगशाहीचा अंमल सर्वत्र सुरू झाला आहे. राजकीय व आर्थिक बाबतींत रशिया-मध्यें कम्यूनिस्ट सरकारनें झोटिंगशाही स्थापून व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध प्रतिक्रियेची कड पोंचवली. पण कम्यूनिझम १७–१८ वर्षांची होऊन वयांत येण्यापूर्वींच जगभर फॅसिझमनें उचल करून कम्यूनिझमविरुद्ध प्रतिक्रिया केली. मात्र कम्यूनिझमची व फॅसिझमची प्रतिक्रिया मिळून परिणाम झाला तो अखेर व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश करण्यांतच झाला! १९ वें शतक हें उदारमतवादित्वाकरितां कीर्ति पावलें, तर आतां २० वें शतक हें कृपणमतवादित्वाकरितां कीर्तिपावणार असें दिसतें !

अशा घडामोडींना उद्देशून पुष्कळ भोळे लोक, असा प्रश्न विचारतात कीं, "या प्रतिक्रियाभूत कम्यूनिझम व फॅसिझम (झोटिंगशाही) यांपैकीं तुम्हांला कोणची पसंत आहे?" आणि हा प्रश्न विचारणारे जणूं कांहीं असें गृहीतच घेऊन चालतात कीं, दोन विरोधी प्रश्न किंवा समस्या उपस्थित झाल्या म्हणजे त्यांपैकीं कोणत्या तरी एकांत अंतर्भूत झालेल्या सिद्धांताचा स्वीकार उत्तर देणारा करणारच, किंवा त्याला करावाच लागतो! अशा विरोधी प्रश्नांच्या किंवा समस्यांच्या जोडीला इंग्रजींत 'डायलेमा' म्हणतात. मराठींत तद्वाचक 'शृंगापत्ति' हा शब्द रूढ झाला आहे व तो थोडासा सार्थहि आहे. कारण परस्परविरोधी असे प्रश्न म्हणजे तीं मारक्या बैलानें उगारलेलीं दोन शिंगें अशी कल्पना करतां येते. आणि या कल्पनेंतून निघालेली भोळी समजूत अशी कीं, त्या दोन शिंगांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी शिंगाचा आघात सोसावाच लागणार!

पण ही समजूत चुकीची असते. हुंदाडणारा बैल दोन शिंगें रोखून आला म्हणून त्यांतल्या कोणत्या तरी एकानें स्वतःला भोंसकून घेणें हें आपलें कर्तव्य आहे असे कोणी तरी मानतो कां? तो प्रयत्नानें दोन्ही शिंगाचा मार चुकवितो. किंवा त्या पाशव बैलासारखा हाहि मानव बलिवर्द असेल तर, तीं दोन्ही शिंगें धरून उलट बैलाचीच मान मुरगाळूं शकेल. असल्या शृंगापत्तीचीं दुसरीहि उदाहरणें मौजेचीं

म्हणून देतां येतात. कोंकणांतील देवाचा कौल घेतल्याशिवाय कोणी कांहीं करीत नाहीं. पण देवालाहि फसविणारे लोक असतात. आणि अशा लोकांपैकीं एकाचें उदाहरण देऊन सांगतात कीं, त्यानें देवाला शृंगापत्तींत घालून असा कौल लावला कीं, "अमुक एक झाड मला नडतें आहे व तें मी तोडणारच. तर देवा कौल दें कीं तें मी जमिनीबरोबर तोडूं कीं मुळासकट खणून तोडूं ?" कोंकणचा देव कोंकणच्या लोकांपेक्षां अधिक भोळा ! म्हणून तो प्रायः या शृंगापत्तींत सांपडून दोहोंपैकीं कोणत्या तरी एका प्रश्नाला होय असा कौल देतो. म्हणजे झाड कसें तरी तोडण्याला हवी ती परवानगी देतो. पण दोन्ही शिंगें धरून बैलाला उलथून टाकण्या-प्रमाणें, कौल मागणाऱ्या भक्ताच्या दोन्ही प्रश्नांना देवाला नकार देतां येण्यासारखा आहे. तो धूर्त असेल तर एकहि फुलाचा कळा पडूं देणार नाहीं.

साक्षीदाराची उलट तपासणी करतांना चतुर वकील असेच शृंगा-पत्तीचे प्रश्न विचारतात व म्हणतात, "होय किंवा नाहीं" एवढेंच उत्तर दे. पण शहाणा साक्षीदार म्हणतोच कीं होय आणि नाहीं हीं दोन्ही कांहीं मर्यादेंत खरींच आहेत; नुसतें होय किंवा नुसतें नाहीं असें उत्तर मी देऊं शकत नाहीं. असाच एक गंमतीचा प्रश्न तर्कशास्त्रावरील पुस्तकांत देतात. तो असा, "तूं हल्लीं दारू पिण्याची सोडली आहेस किंवा नाहीं ? " याचें उत्तर नाहीं असें दिलें तर मी आजहि दारू पितों असें ठरणार. होय असें उत्तर दिलें तर आज सोडली तरी मी पूर्वीं पीत होतों असें कबूल करावें लागणार ? पण चाणाक्ष मनुष्य या प्रश्नाचें उत्तर होय किंवा नाहीं असें एकेरी न देतां म्हणेल, "प्रश्न खोडसाळ आहे ; व त्याचें माझें उत्तर हेंच कीं मी दारू जर कधींच पीत नव्हतों तर ती हल्लीं सोडण्याचा किंवा न सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. "

शृंगापत्तीच्या संकटाची अडचणीची इतकी फोड करून सांगण्याचें कारण हें कीं, उदारमतवाद व व्यक्तिस्वातंत्र्यवाद यांच्या जिवावर उठलेले दोनहि राक्षस—म्हणजे कम्यूनिझम व फॅसिझम (झोटिंगशाही). मग यां-पैकीं कोणता राक्षस तुला खाऊं दे ? असें विचारल्यामुळें कांहीं लोक गोंध-ळून जातात ; व या दोहोंपैकीं कोणता राक्षस अधिक बरा याचा विचार मनांत करूं लागतात. पण या मर्खपणाच्या विवेकांत जे पडतील ते

संशयानें नाशच पावतील. पण आम्हीं तशा संशयाला बळी पडणारे नाहीं. म्हणून आम्हीं स्पष्ट व ठासून सांगूं शकतों कीं, आम्हांला तुमची कम्यूनिझमहि मान्य नाहीं आणि तुमची फॅसिझमहि मान्य नाहीं. या दोनहि राज्यशासनपद्धति आम्हांला सारख्याच अनिष्ट वाटतात! त्या दोहोंनीं आपापल्या परीनें व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध प्रतिक्रिया केलेली असून, उलट स्वतः त्यांचीहि अतिशयोक्ति होऊं लागलेली असल्यामुळें त्यांच्याहि विरुद्ध प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा आमचा दृढ विश्वास आहे.

जगाच्या इतिहासाकडे पाहूं लागल्यास असें दिसून येईल कीं, एकंदरीनें या इतिहासाचें पर्यवसान व्यक्तिस्वातंत्र्याचा उदय होण्यांतच झालेलें आहे. इतिहासकालाच्या प्रारंभीं व्यक्तिस्वातंत्र्याच्या अगदीं उलट स्थिति होती. म्हणजे मनुष्य हा अगदीं जंगलांतच एकाकी राहात नसेल तर, तो घरचा किंवा बाहेरचा तरी गुलामच होता. घरीं कुटुंबांत बापाचा गुलाम, आणि बाहेर जाती-जमातीच्या मुख्याधिकाऱ्याचा किंवा धर्मगुरूचा गुलाम होता. ही त्याची स्थिति हळुहळू बदलून त्याला मानवजन्मसिद्ध असे कांहीं स्वतंत्र अधिकार असूं शकतात या कल्पनेचा क्रमानें उदय झाला. पूर्वीं त्याची जबाबदारी जन्मसिद्ध होती. किंवा दास्यत्व जन्मसिद्ध होतें. पण पुढें स्वतंत्र रीतीनें जगाशीं संबंध ठेवण्याचा अधिकार ( मग करारानें होवो, इतर रीतीनें होवो ) त्याला प्राप्त झाला. खरें अंतिम साध्य हें कम्यूनिस्टांच्याहि मतें व्यक्तिस्वातंत्र्य हेंच होय. दरम्यानची झोटिंगशाही ही केवळ संक्रमणावस्थेंत उपयोगी पडणारा एक उपाय म्हणून अवलंबिलेला आहे! कारण कम्यूनिस्ट तत्त्वज्ञानांत झालें तरी असेंच प्रतिपादिलें जातें कीं, अंतिम स्वरूपांत राज्यसंस्था व व्यक्तिनियंत्रण हीं सुकून सुकून जाऊन शेवटीं अदृश्य व नामशेष होतील. आज प्रोलेटेरिएटची म्हणजे कांहीं विशिष्ट वर्गाची झोटिंगशाही अमलांत आहे. पण ती साध्य किंवा ध्येय म्हणून नव्हे तर फक्त तात्पुरतें साधन म्हणून. उलट फॅसिस्ट डिक्टेटरहि असेंच म्हणतो कीं, या कम्यूनिझमनें फाजीलपणा केला, अतिशयोक्ति केली, म्हणूनच केवळ झोटिंगशहाला हातीं दंड धरावा लागला; पण तोहि त्याला कायमचा धरावा लागणार नाहीं. या दोहोंचाहि अर्थ हाच कीं, अखेर व्यक्तिस्वातंत्र्य हेंच ध्येय असल्याची भूमिका

तत्त्वज्ञान्याचीच आहे असें नाहीं, तर राजकारणाचा व्यवहार करणारी कम्यूनिस्ट व फॅसिस्ट झोंटिंगशाही यांचीहि आहे असें म्हणतां येईल. या व्यक्तिस्वातंत्र्याच्या परिणतीभोंवतीं जें तत्त्वज्ञान गोळा झालें त्यालाच सामुदायिक रीतीनें उदारमतवादित्वाचा सिद्धांन ( लिबरॅलिझम ) म्हणतात. आणि आज त्याविरुद्ध कम्यूनिस्ट किंवा फॅसिस्ट झोंटिंगशाही यांनीं कुरघोडी केली असली तरी, ती केवळ प्रतिक्रियारूप म्हणून तात्पुरती आहे, कायमची नाहीं असेंच समजलें जातें. आमचें मत असें आहे कीं, व्यक्तिस्वातंत्र्याचें ध्येय हेंच इष्ट व साध्य असून तें प्रभावी झालें पाहिजे, आणि तें पदरीं पडण्याचा सर्वांत साधा असा जो डिमॉक्रसी नामक राज्यपद्धतीचा प्रकार तोहि टिकला पाहिजे.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, व्यक्तिस्वातंत्र्याच्या वाढीबरोबरच राज्यसंस्थेचीहि वाढ झालेली आहे. यामुळें राष्ट्राच्या फायद्याकरितां व्यक्तिस्वातंत्र्यावर उलटचा दिशेनें कांहीं नियंत्रणहि पडूं लागलें आहे. पण तें नियंत्रण कांहीं तत्त्वानुसारच घातलें जातें. आतां संघटित व परिणत अशा राज्यसंस्थेंत प्रजा व्यक्तीचें स्वातंत्र्य हें, कवि आपल्या काव्यांतून मुक्त कंठानें व भावनेच्या उद्रेकांत गाऊन वर्णन करतात तशा प्रकारचें स्वातंत्र्य असूं शकत नाहीं. कदाचित् तें चांगल्या अर्थाच्या पण केवळ कल्पनागम्य अराजकांतच लाभावयाचें ! परंतु एकंदरीनें पाहतां दोन हजार वर्षांपूर्वी समाजांतील व्यक्तीला जें स्वातंत्र्य होतें त्यापेक्षां तें आजच्या परिणत राज्यसंस्थांतहि पुष्कळच अधिक लाभलें आहे. सकृत्दर्शनीं नवी पद्धति म्हणजे लोकसत्ताक राज्यपद्धति असतां तींत व्यक्तिस्वातंत्र्याचें नियंत्रण बेसुमार झालें असेंहि क्वचित् कोठें दिसेल. पण अशा ठिकाणीं त्या वेळेपुरतें खऱ्या लोकसत्तेचें तत्त्व नष्ट होऊन, लोकशाही ही नांवाची उरली होती. पण तिचीं सूत्रें कोणा तरी शिरजोर झोंटिंगाच्या हातीं गेलीं होतीं असेंच आढळून येईल ! ही गोष्ट एका बाजूला स्वित्सर्लंडसारखें राष्ट्र व दुसऱ्या बाजूला जर्मनी इटली यासारखें राष्ट्र घेऊन पाहिलें म्हणजे चांगली लक्षांत येते.

व्यक्तीकरितां समाज किंवा समाजाकरितां व्यक्ति असा प्रश्न आज कांहींसा उपस्थित होऊं लागला आहे हें खरें. तथापि, पूर्वी राजाकरितां प्रजा असें जें अमलांत होतें तसें हल्लीं समाजाकरितां व्यक्ति या म्हणण्यानें

ध्वनित होत नाहीं. कारण पूर्वीचा राजा हा कधींहि प्रजेचें प्रतिबिंब नव्हता. पण अलीकडील समाज व राज्यसंस्था हीं राष्ट्रांतील लोकांचें प्रतिबिंब होय असें मानण्यांत येतें व तें खरेंहि आहे. म्हणून राष्ट्राकरितां व्यक्ति कीं व्यक्तीकरितां राष्ट्र? असे अडचणीचे प्रश्न घालून वर दर्श-विल्याप्रमाणें कोणी शृंगापत्ति उत्पन्न केली तर, तिचा परिहारहि वर दर्शविलेल्या पद्धतीनेंच करतां येतो. तो असा कीं राष्ट्र व व्यक्ति या जोडीपैकीं कोणतेंहि एक दुसऱ्याकरितां आहे असें एकेरी उत्तर न देतां, दोन्हीहि परस्परावलंबी व परस्पर पूरक आहेत असें तिसरेंच उत्तर देतां येतें. समाजहित हें व्यक्तिहितापेक्षां अधिक श्रेष्ठ मानण्याकडे जगाची प्रवृत्ति आज असो. तथापि उलटपक्षीं ज्या सरकारी कायद्यांच्या योगानें समाजहिताकरितां व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा पडते, ते कायदे करणें किंवा न करणें याविषयीं मत देण्याचा अधिकार बहुधा प्रत्येक राष्ट्रांतील जनतेला मिळाला आहे! म्हणून मनुष्यमात्र हा एका अर्थानें ही मर्यादा आपली आपणच घालून घेतो असें म्हणतां येतें. आणि असें झालें म्हणजे मग मनुष्याला आपल्या स्वातंत्र्याला मर्यादा पडल्याची तक्रार करतां येत नाहीं.

आधुनिक डेमॉक्रसीचें किंवा लोकशाही पद्धतींचें हें स्थूल वर्णन झालें. आणि अशा क्रमानें राष्ट्रांतील लोक आपल्या स्वातंत्र्यावर व हक्कांवर जर नियंत्रण घालीत गेले, तर त्याला झोटिंगशाहीची प्रगति असें म्हणतां येणार नाहीं. परंतु आज रशियांत किंवा जर्मनींत किंवा इटलींत तशी स्थिति नाहीं. रशियापुरतें बोलावयाचें तर तेथें सर्व राष्ट्राची मिळून सर्व राष्ट्रावर झोटिंगशाही आहे असें भासविण्यांत येत असलें तरी, इटलींतील फॅसिस्ट पार्टी व जर्मनींतील नाझी पार्टी यांच्यासारखीच कम्यूनिस्ट पार्टीची झोटिंगशाहीच रशियामध्यें आज जुलूम करीत आहे हें निर्विवाद होय.

म्हणून पूर्वपदावर येऊन आम्ही म्हणतों कीं, या तिन्ही प्रकारांतील एकहि आम्हांला इष्ट वाटत नाहीं. खऱ्या डेमॉक्रसीची लोकशाहीची प्रीति व परिणति ही एकच गोष्ट आम्हांला इष्ट वाटते. आतां कोणी म्हणेल कीं डेमॉक्रसीची लोकशाहीची पद्धति अलीकडे कमकुवत ठरली म्हणून तिचा पाडाव होत आहे व झोटिंगशाही प्रबल होत आहे त्याला तुम्ही काय करणार? त्याला आमचें उत्तर असें कीं, होय, खरेंच आहे कीं,

याला आम्हीं कांहीं करूं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील लोक मिळून कांहीं करूं शकत नाहींत. किंबहुना ज्या युरोपियन राष्ट्रांत डेमॉक्रसी पूर्वीं चांगली नांदत होती त्या राष्ट्रांतील उदारमतवादी स्वातंत्र्यप्रिय लोकहि आज कांहीं करूं शकत नाहींत. रशियांतील कम्यूनिझमची चर्चा करतांना आम्ही कोणी हिंदुस्थानांतील लोक प्रयत्नानें ती नष्ट करूं शकतो, किंवा सुदृढ करूं शकतो, या भावनेनें बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं. अर्थ असेल तर तो, राजकीय दृष्टचा कम्यूनिस्ट डिक्टेटरशिप ही इष्ट कां अनिष्ट याविषयीं मत देण्यापुरतेंच बोलण्यांत आहे. म्हणून आम्हीं म्हणतों कीं, रशियांतील विद्यमान राज्यपद्धति सर्वस्वी अनिष्ट आहे. ती व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट करणारी आहे. उदारमतवादित्वाला पायबंद घालणारी आहे. याकरितां ती आम्हांला नको. हरप्रयत्नानें तिच्या कल्पनेला आपण विरोधच केला पाहिजे.

हिंदुस्थानाला उद्यां स्वातंत्र्य मिळावयाचें तें मिळालें, पण कम्यूनिस्ट झोटिंगशाहीच डोक्यावर बसली, तर तें स्वातंत्र्य तरी काय कामाचें ? असें म्हणणारेहि कांहीं लोक निघतील. पूर्वीं किंवा आज देशी संस्थानिक जुलमानें राज्य करतात, तसेंच हिंदुस्थानांत कम्यूनिस्ट पार्टी राज्य करणार असेल तर त्यांत फारसा फरक राहणार नाहीं. तथापि निदान स्वातंत्र्य पदरांत पडेपर्यंत या प्रश्नाला फारसें व्यावहारिक महत्त्व उरत नाहीं. स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानांतील वरिष्ठवर्ग, मध्यमवर्ग, कनिष्ठवर्ग किंवा भांडवलशाही व शेतकरी कामकरी वर्ग, हे काय करावयाचें तें तेव्हां आपलें आपण पाहून घेतील ! आजचा वाद उभयपक्षींहि तात्त्विकच आहे. कारण हिंदुस्थानांतले कम्यूनिस्ट काय किंवा उदारमतवादी डेमोक्रॅट काय, दोघांच्याहि डोक्यावर इंग्रज सरकार व त्याची साम्राज्यशाही बसून मिरें वांटीत आहे. तथापि वाद तात्त्विक असला तरी त्यांत इष्टानिष्ट विवेक प्रगट करावा लागतोच व तसा तो आम्ही केला आहे.

रशियांत व्यक्तिस्वातंत्र्य हें सामाजिक बाबतींत दिसून येत असलें तरी, राजकीय व आर्थिक बाबतींत तें किती कमी आहे आणि जुलूम व दडपशाही यांनींच राज्य कसें चालू आहे, याचें स्थूल दिग्दर्शन या लेखमालेंत आम्ही पूर्वीं केलेंच आहे. तें आमच्या मनचें नसून आधारभूत

ग्रंथांवरून केलें आहे. अशा सर्व ग्रंथांवर खोटे व आपमतलबी असा शेरा कम्यूनिस्टांनाहि मारतां येणार नाहीं. आतां हा जुलूम व ही जबरदस्ती मान्य करून, आज रशियाच्या व उद्यां सर्व जगाच्या कल्याणाकरितां ती अवश्य आहे असें वाटेल तर कोणी म्हणावें व त्या ग्रंथांवर मखलाशीचा शेरा करावा ! पण ही जुलूमजबरदस्ती मान्य केल्यावर तात्पुरत्या फॅसिस्ट झोटिंगशाहीला तरी त्यांना कोणत्या अधिकारानें नांवें ठेवतां येतील ? येऊन जाऊन अधिकार हाच कीं, जुन्या युगांत गरीब लोकांवर जुलूम झाला, आतां त्याचें उट्टें म्हणून गरीब लोकांनीं श्रीमंत लोकांवर जुलूम करण्याचे दिवस आले आहेत ! असे दिवस यावयाचेच असतील तर ते खुशाल येवोत. त्यांना आम्हीं नैसर्गिक प्रतिक्रियेच्या सदराखालीं घालूं. पण अशा कोणत्याहि अनिवार्य घटनेनें ध्येयवादी मनुष्याचें तोंड बंद होणार नाहीं. उदारमतवादी, ध्येयवादी हेंच म्हणत राहील कीं, क्रिया व प्रतिक्रिया यांच्या द्वंद्वानें चाकाच्या धांवेप्रमाणें वरचें टोंक खालीं येऊन खालचें वर जावो. पण असें खालवर परिवर्तन होत असतांहि गाडा हा कांहीं जागच्या जागींच स्थिर राहात नाहीं. तो चाकाला मिळालेल्या मुळांतील गतीनें पुढेंच मजल मारीत असतो. त्याप्रमाणें प्रथम राज्यसत्तेचा जुलूम, त्यामागून लोकसत्तेचा जुलूम, व त्यामागून झोटिंगशाहीचा जुलूम अशीं परिवर्तनें होत आलीं असलीं तरी राजकीय समाजशास्त्राचें होकायंत्र व्यक्तिस्वातंत्र्याच्या उत्तर ध्रुवाकडेच आपलें बोट दाखवीत राहणार. आणि सर्व सत्प्रवृत्त, विचारवंत, राजकारणप्रिय लोक हें असें घडत राहावें हीच आशा करणार !

---

# १९. आर्थिक व्यवहार व व्यक्तिस्वातंत्र्य

डेमॉक्रसी किंवा शुद्ध पद्धतीची लोकशाही हिच्या ध्येयावर आमचा विश्वास आहे. आम्हांला उदारमतवादित्वाची आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या

प्रगतीची मनीषा असल्यामुळें, कम्यूनिस्ट पद्धतीची झोटिंगशाही किंवा फॅसिस्ट पद्धतीची झोटिंगशाही मान्य नाहीं हें मागील प्रकरणांत सांगितलें. प्रस्तुत प्रकरणांत रशियांतील कम्यूनिस्ट आर्थिक पद्धतीहि आम्हांला मान्य नाहीं व ती कां हें सांगण्याचा विचार आहे.

ही पद्धति मान्य नसण्याचें कारण असें कीं ती जगाच्या जुन्या रहाटीला व नैसर्गिक विकासाला विसंगत विरोधी असून अन्यायाचीहि आहे. सरकारी सत्ता हें साधन हातीं असलें, व समाजाचें हित हें निमित्त तोंडानें लावतां आलें, म्हणून समाजांतील खाजगी मिळकतीची संस्था नष्ट करावी आणि त्याबद्दल जुन्या मालकांना कांहीं मोबदलाहि देऊं नये यांत न्यायबुद्धि कशी दिसून येते कळत नाहीं. जुन्या व्यक्तिस्वातंत्र्य पद्धतीनें व चढाओढीनें भांडवलशाहीची वाढ होऊन, आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणावर झाली आहे ही गोष्ट कोणालाहि मान्य करावीच लागेल. पण खाजगी मिळकत सर्वस्वीं नष्ट करण्याहून इतर अनेक न्यायाचे उपाय ही विषमता घालविण्याला उपयोगी पडण्यासारखे आहेत. श्रीमंत हे फार श्रीमंत आणि गरीब हे फार गरीब असें झालें असेल तर, श्रीमंतांना कमी श्रीमंत करून गरीबांना कमी गरीब कांहीं उपायानें करतां आलें तर तीच न्यायाची प्रतिक्रिया व गुणकारक उपाय ठरेल. पण क्रमानें प्राप्त झालेली श्रीमंती मुळापासून नष्ट व्हावी म्हणून कोणाचीहि सर्व संपत्ति सरकारजमा करणें, यानें स्वतः त्याला अन्याय तर होतोच पण त्यामुळें गरीबांची गरीबी हटकून कमी होते असें नाहीं.

मालकी हक्क आणि द्रव्यसंचयाची परिणति ही जशी क्रमानें वाढत गेली तशीच ती क्रमानें हटवितां येण्यासारखी आहेत. आणि कोणतीहि नवी गोष्ट अशा क्रमाक्रमानें घडून आली तर कोणताहि उत्पात घडलासा वाटत नाहीं आणि हळूहळू झालेलें परिवर्तन दुःसह होत नाहीं. कम्यूनिस्ट क्रांतींत प्रथम अविचारीपणानें कित्येक वर्गांना तुडवून बुडविण्यांत आलें, हें पाप कम्यूनिस्टांना पदरीं घ्यावें लागलेंच; पण आपली नवी पद्धति अव्यवहार्य आहे असें लौकरच लक्षांत येऊन त्यांना आपल्या तत्त्वाची पीछेहाट करावी लागेल. आणि निदान कांहीं मर्यादेपर्यंत तरी खाजगी मिळकत राहूं दिली पाहिजे हा धडा शिकावा लागला.

सायुदायिक धनोत्पादनाच्या सिद्धांताचीहि तीच गत झाली. पूर्वीच्या एक दोन प्रकरणांत रशियांतील नवीन आर्थिक घटनेची माहिती देतांना कम्यूनिष्टांच्या बाजूचें म्हणणें व त्याविषयीं कांहीं उदाहरणें मुद्दाम आम्हीं दिलीं. पण त्याला दुसरीहि एक बाजू असून, या सामुदायिक पद्धतीनें रशियांतील लोकांवर किती आपत्ती आल्या, त्यांना किती दुःख सोसावें लागलें, व बंडें होण्यापर्यंत बाजू गेली हेंहि ग्रंथांतरीं वाचावयास मिळतें. फक्त एकाच ग्रंथाचा आधार द्यावयाचा तर डॉ. इवॉल्ड अॅमेंड यांचें 'ह्यूमन लाइफ इन रशिया' (रशियांतील मनुष्यजीवन) या यंदाच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचाहि देतां येईल. या पुस्तकांत रशियांतील भयंकर दुष्काळाचें वर्णन साधार व सचित्र दिलें आहे. आणि त्या दुष्काळाचें कारण अवर्षणादि नसून तें स्टॅलिनप्रभृतींनीं घिसाडघाईनें व फाजील अहंकारानें सामुदायिक उत्पादनाचा प्रचंड प्रयोग हटवादानें केला हेंच होय असें स्पष्ट लिहिलें आहे. यासंबंधीं प्रथम इंग्रजींतच कांहीं वाक्यें देतों म्हणजे शंका राहणार नाहीं.

"All serious observers of conditions in Soviet Russia are of one opinion as to the causes of Russian famine. In their view the real cause is to be found not in any natural events, but in the fiasco of the collective system, which was introduced with such excessive haste. The foundations of all the thousands of collective farms have collapsed. The experiment which consisted in forcibly detaching the pensantry from their soil, and converting them into proletarian workers on a large scale State concern, has failed........ In the work of collectivization one factor of production failed completely, viz. the human factor. Soviet agriculture, based as it was on mechanization, was wrecked by the backwardness of the Russian peasants."

कम्यूनिस्ट मताचे पक्षपाती या ग्रंथावर विकारवशतेचा आक्षेप घेणार हें उघड आहे. पण सिडने व बियाट्रिस वेब यांच्या पुस्तकांतील अनुकूल माहिती जर ग्राह्य मानावयाची, तर डॉ. अॅमेंड यांच्या पुस्तकांतील

माहिती, ती प्रतिकूल असली तरी कां ग्राह्य धरूं नये हें कळत नाहीं. वेब पतिपत्नी यांनीं कम्यूनिझमची माहिती घेण्याकरितां जसा रशियन कागदपत्रांचा आधार घेतला आहे, तसाच डॉ. ॲमेंड यांनींहि तो घेतला आहे. पण वेब पतिपत्नींनीं रशियांत वास्तव्य केलें असलेंच तर तें फार थोडे दिवस. उलट डॉ. ॲमेंड यांनीं रशियांत पंधरा सोळा वर्षें राहून, स्वतः रशियन जनता–दुःखनिवारणाचें परोपकारी कार्य केलेलें आहे. विद्यार्थिदशेपासून सबंध रशिया देशांत त्यांनीं परिभ्रमण केलेलें आहे; व महायुद्धाच्या अखेरीपर्यंत ते रशियन सरकारचे प्रजाजन होते.

आपल्या म्हणण्याच्या पुष्टचर्थ डॉ. ॲमेंड यांनीं सरकारी कम्यूनिस्ट कागदपत्रांतील उतारे व प्रवदासारख्या कम्यूनिस्ट वर्तमानपत्रांतील उतारे ठिकठिकाणीं दिले आहेत. मग अशा गृहस्थाचा पुरावा मान्य करावा, कीं उडत्या पाखरापेक्षांहि अधिक द्रुत गतीनें रशियन भूमीवरून भरारी मारून येणाऱ्या भाई मसानी यांच्या पुस्तकांतील पुरावा मान्य करावा! एका बाजूला अशीं वर्णनें आढळतात कीं, कम्यूनिस्टांनीं अवघ्या १७ वर्षांत कुजलेल्या रशियाचें नंदनवन बनविलें, आणि त्यांतील जनता स्वातंत्र्याचें अमृत पिऊन यक्षगंधर्वासारखें जीवन आक्रमीत आहेत, तर दुसऱ्या बाजूला अशीं साधार वर्णनें आढळतात कीं, यांत्रिक प्रगतीवर विश्वास ठेवणाऱ्या अमेरिकेशीं स्पर्धा करून, कम्यूनिस्ट रशियानें जुलमानें सरकारजमा केलेल्या खाजगी भांडवलावर सरकारी भांडवलशाही उभी केली. कल्पनातीत गगनभेदी असे कारखाने उभारले पण त्यांतून उत्पादनकार्य यथाप्रमाण किंवा यथापेक्ष झालें नाहीं; सामुदायिक शेतकीपद्धति जनतेवर पुष्कळशी लादल्यानें तिकडूनहि फजीति झाली. त्याहून लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं या नवीन प्रयोगांत लाखों रशियन लोक किड्या–मुंग्यांसारखे उपासमारीनें मेले असतां, त्यांचें दुःख निवारण करण्याचे प्रयत्न कम्यूनिस्ट सरकारनें काय केले तें देव जाणे, पण देशांतील दुष्काळाची व उपासमारीची बातमी बाहेर पडूं नये याकरितां जंग जंग पछाडले! परदेशांतून रशियांत येऊन सहज फेरफटका करून परत गेल्यावर पुस्तकें लिहिणारांसंबंधानें डॉ. ॲमेंड म्हणतो कीं, “असले प्रवाशी कम्यूनिस्ट प्रयोगाच्या बाहेरच्या दृश्यावर, विशेषतः रशियाच्या प्रचंड सरकारी कारखानदारीवर नजर देऊन भुलून जातात! आणि

कित्येक तर या फेरफटक्यांत आपला व्यापार रशियाशीं कसा वाढेल याचेंच तेवढें निरीक्षण करतात ! पण रशियन जनतेंत राहून नांदून तिची खरी अंतःस्थिति काय आहे याचें बारकाईनें कोणीहि निरीक्षण करीत नाहीं. ”

परका प्रवासी आला असतां त्याला कोणीकडे हिंडूनफिरवून आणावें, व त्याच्या नजरेला नक्की कोणत्या गोष्टी पाडाव्या, याचें कम्यूनिस्ट सरकारनें पक्कें धोरण ठरवून ठेवलें आहे. शिवाय मतप्रसाराचें स्वतंत्र खातेंच रशियन सरकारनें ठेवलें असून, आपल्याला अनुकूल माहितीचा झिरपा-देखील दिसून येऊं नये अशी खबरदारी घेतलेली आहे. या दृष्टीनें डॉ. ॲमेंड यांच्या पुस्तकांतील नंबर ५ चें प्रकरण वाचण्यासारखें आहे. परंतु विषयांतर होईल म्हणून हा मुद्दा येथें इतकाच सोडून देतों.

आम्हांला येथें सांगावयाचें तें हेच कीं, आर्थिक बाबतींत रशियानें जी क्रांति केलेली आहे ती अन्यायपूर्ण असून मनुष्यस्वभावालाहि धरून नाहीं. आमच्या मतें राजकीय जीवनाप्रमाणें आर्थिक जीवनांतहि व्यक्तिस्वातंत्र्य हाच प्रगतीचा खरा पाया आहे. तथापि राजकीय स्वातंत्र्याप्रमाणें आर्थिक, स्वातंत्र्यहि बोकाळूं दिलें असतां, त्याची अतिशयोक्ति होऊं दिली असतां, वाईट परिणाम होतात. म्हणून या स्वातंत्र्यालाहि व्यापक समाजदृष्टीनें कांहीं निर्बंध घालणें इष्ट ठरतें. शिवाय आम्हीं मागील प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें, व्यक्तित्वाच्या परिणतीबरोबरच समष्टिरूप जीवनाचीहि परिणति होत असल्यामुळें त्याला हितकर असे निर्बंध व्यक्तिस्वातंत्र्यावर घालावे लागतात. पण या परस्परविरोधी गोष्टींचा मेळ घालण्याला जसें राजकारणी जग शिकलें आहे तसेंच आर्थिक व्यवहारी जगहि शिकत आहे. सोशियालिझमच्या तत्त्वाचा उदय हा याच शिक्षणाचा परिणाम होय. आणि हीं तत्त्वें क्रमानें अनसरून परिणतेला पोंचवलीं तर, आज विरोधी दिसणाऱ्या वर्गहिताचा मेळ घालतां येईल.

ॲरिस्टॉट्ल् यानें सुवर्णमध्य या तत्त्वाची जी मांडणी केली तिला एकेरी एकांतिक विचाराचे लोक हंसतात, व त्याची थट्टाहि करतात. परंतु आमच्या मतें खऱ्या प्रगतीचें बीज शक्य तितका सुवर्णमध्यबिंदु गांठण्यांतच असतें. “ सैतानाशीं तडजोड कसली ? ” अशी म्हण म्हणून तडजोडीच्या व समन्वयाच्या पद्धतीला विरोध करणारे लोक असतात. पण सैतान हा

देखील ईश्वराच्या दरबारांतलाच मूळ एक अधिकारी सरदार किंवा दूत होता हें विसरतां येत नाहीं. त्याच रीतीनें भांडवलशाहीनें घुमाकूळ घातला असला तरी भांडवलाशिवाय आर्थिक व्यवहार चालत नाहीं, हें " कम्यूनिस्ट रशियालाहि कळून चुकलें आहे. तसेंच त्याला हेंहि कळून चुकलें आहे कीं, सर्व समाजाच्या नांवानें आर्थिक व्यवहार करण्याचा आव घातला तरी, सामुदायिक धनोत्पादन हें अखेर स्वतंत्र व्यक्ति किंवा व्यक्तींचे गट यांच्यावरच सोंपवावें लागतें. समष्टिरूप समाजाचें आकलन मनानें करतां येत असलें तरी ती फारच फार अवजड अशी वस्तु आहे. यामुळें अधिकारविभागणीच्या पद्धतीनें तिच्या शक्तीचा उपयोग केला तरच त्याचें कार्य परिणामकारक होऊं शकतें.

शरीर हा एक शब्द झाला ; पण शरीराचें म्हणून कार्य व्हावयाचें तें शरीराच्या प्रत्येक अंगाकडून, अवयवाकडून अधिकारभेदाप्रमाणें करून घ्यावें लागतें ; व त्या अधिकारापुरता त्या अंगाचा अवयवाचा अहंकार किंवा कर्तृत्वाचा अभिनिवेश मान्य करावा लागतो. समाजांतील सर्व व्यक्तींचा मिळून सामुदायिक असा कांहीं एक वेगळाच परिणाम होत असला तरी कोणत्याहि कार्यारंभाचा उगम व्यक्तिगत स्फूर्तींतूनच होत असतो. म्हणून आर्थिक व्यवहारांत, समाजाच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें कां होईना, पण व्यक्तीला स्वातंत्र्य द्यावेंच लागतें व या स्वातंत्र्यांत कार्याची निवड, त्या कार्यापासून होणाऱ्या लाभावर स्वामित्वाचा हक्क, व आपल्या भावी पिढ्यांच्या द्वारानें समाजहित साधण्याचा अधिकार, या तीन गोष्टींचा अवश्य अंतर्भाव होतो. तसेंच समाजांतील आर्थिक व्यवहारांत श्रमविभागाचें तत्त्व मान्य करावें लागतें, आणि तें मान्य केल्यानंतर त्यांतून निष्पन्न होणाऱ्या इतर कित्येक आनुषंगिक गोष्टीहि मान्य कराव्या लागतात.

कोणत्याहि सामुदायिक पद्धतींत हा दोष असतोच कीं जें सर्वांचें काम तें कुणाचेंच नव्हे. सामुदायिक धनोत्पादनाच्या रशियन प्रयोगांत हा दोष स्पष्ट दिसून आला आहे. त्यासंबंधानें डॉ. अॅमेंड यांच्या ग्रंथांतील खालील उतारे वाचण्यासारखे आहेत. स्टॅलिन म्हणतो, " ज्याची त्याला कामाची जबाबदारी वाटेनाशी झाली यामुळें अधिकारी नेमनहि सामुदायिक

उत्पादनाचें काम नीट झालें नाहीं." याचा अर्थच आपलेपणा नाहीं म्हणजे व्यक्तिशः जबाबदारी नाहीं !

" It seems to have been realised at the eleventh hour that the root evil of the Communist economic apparatus has hitherto been the removal, indeed the extirpation, of personal responsibility, initiative and interest. On this point the entire Russian Press is at one, though only in admitting details. Daily the cry grows louder for an entire removal of the Soviet system by the introduction of a new and responsible concrete staff........ The call is now for the abolition of the colleges, committees etc., whose functions are to be taken over by responsible individuals.... Stalin himself has declared that ninety per cent of agricultural collapse is due to the breakdown of the organisations and economic system as it has existed hithereto, in other words to communization! This remarkable utterance of Stalin disposes of the false statements as to the cause of the collapse of agriculture–such as the bad harvest, intrigues of Kulaks, sabosteurs and enemie- of Government. Under the pretext on fighting the Kulaks they ( Communists ) have raged a ruthless war against a large section of the rural population, who refuse to give up their small private property and to enter the collective farms. "

# २०. मालकी हक्काचा विकास

संपत्तीच्या उत्पादनाचीं अशीं दोन टोंकें आहेत कीं तीं व्यवहारांत कधींहि पाहावयाला सांपडावयाचींच नाहींत. एक टोंक हें कीं ज्याला जितकें उपभोगतां येईल तितकेंच त्यानें एकटयानें निर्माण करावें व उपभोगावें. दुसरें टोंक हें कीं सर्व समाजानें मिळून आपल्या योजनेप्रमाणें हवें तितकें निर्माण करावें आणि समाजाच्या हिताकरितां त्याचा उपभोग, विक्री, संग्रह इत्यादि हव्या त्या रीतीनें करावा. या दोनहि गोष्टी अव्यवहार्य ठरतात.

अगदीं रानटी स्थितींतला शिकारी घेतला तरी त्याच्या एकटयाच्यानें हवी ती शिकार हटकून होईलच असें नाहीं. शिकारीचें सावज एकानें हुसकावें अडवावें, दुसऱ्यानें बडवावें असेंच बहुधा करावें लागतें. यामुळें अनेकांचा संबंध आला. बरें समजा एकटया शिकाऱ्यानें एखादें सावज मारलें तर तें सगळें त्याला एकटयाला थोडेंच खातां येतें? यामुळें रानटी स्थितींतहि संपत्ति निर्माण करण्याच्या व उपभोगण्याच्या कामीं कुटुंब हाच कमीत कमी घटक ठरत नाहीं काय? एका कुटुंबांतलीं माणसें कां होईनात पण त्यांनीं एकत्र मिळून काम करणें ही स्वभाविक स्थिति होय आणि त्यांतच श्रमविभागाचें तत्त्व सिद्ध झालें.

दुसरें टोंक म्हणजे सर्व समाजानें मिळून हव्या त्या, हव्या तितक्या संपत्तीचें उत्पादन करविणें. एका कुटुंबाप्रमाणें सर्व समाज एका हुकमतींत असल्याशिवाय ही गोष्ट होणें शक्य नाहीं. हुकमत एक झाली आणि उत्पादनाची स्थूल योजना आगाऊ ठरली, तरी तिचें प्रत्यक्ष व तपशीलवार सूक्ष्म कार्य लाखों लोकांनीं निरनिराळ्या ठिकाणीं करावें लागणार; व तें योजनेप्रमाणें होत आहे अशी समजूत करून समाधान मानून घ्यावें लागणार. पण हें सामुदायिक कार्य योजनेप्रमाणें व्हावयाचें म्हटलें तरी त्यांत श्रमविभागहि आलाच. एखाद्या सावजाच्या साध्या शिकारींत जर वर सांगितल्याप्रमाणें, एकानें अडवावें व दुसऱ्यानें बडवावें हा श्रमविभाग आला, तर सर्व समाजाकडून म्हणून होणाऱ्या कार्यांत तो हजारों लाखोपटीनें आलाच कीं नाहीं?

गुणाप्रमाणें ज्यानें त्यानें आपापलें निरनिराळें कार्य करणें हेंच सोईचें व फायद्याचें असतें. आणि तेंच तें काम मनुष्य करीत गेला म्हणजे त्यांत तो अधिकाधिक प्रवीण होतो. शिकारींत अडविण्याचें काम एकाला अधिक साधेल तर बडविण्याचें कामच दुसऱ्याला अधिक साधेल. आणि तींच तीं कामें करीत गेल्यानें दोघेहि आपापल्या कामांत प्रवीण होऊन जातील. पण याच बुद्धिगुणामुळें कांहीं कांहीं कामें प्रत्येक मनुष्य वेगवेगळ्या ठिकाणीं बसून इतर कोणाची मदत घेऊन पण आपल्या एकट्याच्या फायद्याकरितां करूं शकेल. आणि तीं तो करूं लागला म्हणजे तो एकच प्रकारचा माल इतका तयार करूं शकेल कीं त्याला तो दुसऱ्यांना विकावा द्यावाच लागेल; स्वतः त्याचा त्यानेंच तो सरवावा पुरवावा असें होऊं शकणार नाहीं. शिकारींत भाग घेणारे दोघेजण म्हणजे अडविणारा व बडविणारा हे मिळून तें सावज भाजून शिजवून खाऊन उरेल तें फेकून देतील ही कल्पना ठीक आहे. पण प्रत्यक्ष खाण्याच्या उपयोगी पडणाऱ्या वस्तूसंबंधानेंहि ती लवकरच फोल ठरते. समजा, एकट्या, माळ्यानें आपल्या लहानशा वाडग्यांत कोणाची मदत न घेतां जर मक्याचीं कणसें किंवा कांकड्या पिकविल्या तर तो तरी त्या सगळ्या एकटाच खाऊं शकेल काय? तो माल फार तर एखादा महिनाभर थोडथोडा त्याला खातां येईल, पण उरेल तो विकावा लागेल किंवा अदलाबदलींत घालून दुसरे जिन्नस घ्यावे लागतील. कारण तयार केलेला माल नुसता नासून कोणीच टाकीत नाहीं.

खाण्याच्या पदार्थांची जी गोष्ट ती इतर प्रकारें उपभोगण्याच्या वस्तूंचीहि आहे. समजा कुंभार एकटा बसून किंवा बायकोची मदत घेऊन मडकीं करतो. तर तो करील तीं सगळीं मडकीं त्याच्याच संसाराच्या उपयोगी पडावीं हें शक्य आहे काय? माळी क्रमानें रोज दोन चार कांकड्या किंवा कणसें काढील, तीं खाईल, आणि अशा रीतीनें त्याचा माल तोच स्वतःच्या उपयोगाला लावून कालांतरानें संपवील ही कल्पना तरी करवते. पण कुंभारानें रोज एकदोन मडकीं केलीं तरी त्याच्या संसाराला सर्व वर्षभर मिळून फार तर दहावीस मडकींच लागणार. मग बाकीचीं शेंकडों मडकीं त्यानें एक करूं तरी नयेत, किंवा केलीं तर तीं इतर मालाच्या

मोबदल्यांत विकावीं व आपल्या इतर गरजा भागवून घ्याव्या हेंच सिद्ध होतें. पैकीं दुसरी गोष्ट अखेर मान्य करावी लागते. नाहीं तर एकाच माणसानें करतां येईल तो माल चार दिवस आपल्या गरजेपुरता करावा, आणि बाकी सर्व दिवसभर स्वस्थ आळशी बसावें, हें म्हणणें असमंजस-पणाचें ठरेल.

श्रमविभागाचा हा अवश्य परिणाम समजावा कीं एकादें काम एखाद्याला करतां येऊं लागलें म्हणजे तो त्या कामांतून इतका माल तयार करणार कीं, ज्यानें त्यानें आपला माल आपण करावा आणि फक्त आपणच तो उपभोगावा हें म्हणणें मुळींच टिकत नाहीं. आणि हें म्हणणें सोडून दिलें म्हणजे अदलाबदल, खरेदीविक्री करणें ओघानेंच आलें. आणि तयार केलेल्या मालाची मालकी व विकून आलेल्या किंमतीच्या फायद्याची मालकी कोणाची हा प्रश्न ओघानेंच येतो. त्याचें उत्तर असेंचा द्यावें लागतें कीं या तयार केलेल्या मालावर, आणि तो विकून आलेल्या दुसऱ्या मालावर किंवा नगदी पैशावर, माल तयार करणाराचाच पूर्ण स्वामित्वाचा हक्क राहणार. दुसऱ्या कुणाचा ? मनुष्य हा एकंदर समाजाचा आद्य घटक खरा. आणि तो समाजांत राहिल्यानेंच त्याचा माल त्याला करतां विकतां आला खरा. पण या मालावर –किंमतीवर–‘ नफ्यावर ’ प्रथमदर्शनी तरी, तो माल तयार करणाऱ्याचा व्यक्तिशः खाजगी अबाधित हक्क मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. नफ्यावरचा हा खाजगी हक्क मानावयाचा कीं नाहीं हाच सोशियालिस्ट कम्यूनिस्ट, व इतर म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यवादी–व्यक्तिस्वामित्ववादी यांच्या दरम्यान वादाचा प्रश्न आहे.

मनुष्य स्वतःच्या श्रमानें जो माल उत्पन्न करील तो माल तरी त्याचा व्हावा यावर उभय पक्षांचें एकमत आहे. पण मग त्या मालाचें त्यानें काय करावें, म्हणजे त्या मालावर त्या उत्पादकाचा कोणत्या स्थितींत व किती दूरवर हक्क पोंचतो याविषयीं मतभेद आहे. स्वतःच्या श्रमानें करून स्वतःच उपभोगतां यावी अशी वस्तु एक असेल तर स्वतः न केलेल्या पण स्वतःच्या उपभोगाला अवश्य असणाऱ्या अशा इतर वस्तू शेंकडों असतात.

आणि त्या अनेक मार्गांनीं मनुष्याला उपभोगाला मिळण्यासारख्या असतात. पण अशा वस्तूंवर मनुष्याचा मालकी हक्क राहूं नये म्हटलें कीं सर्वच आटोपलें. आजतारखेला जगांत मनुष्याच्या उपभोगांत असलेल्या वस्तुवर्गांची यादी केली तर त्यांत त्यानें स्वतःच्या श्रमानें निर्माण केलेल्या वस्तु कितीशा आढळतील ? आणि ही गोष्ट मोठमोठ्या सुधारलेल्या शहरांतील लोकांची नव्हे तर अगदीं खेड्यांतल्या खेड्याचीहि आढळेल ! कारण या सर्व वस्तू आजच्या पिढीच्या पूर्वींच्या अनेक पिढ्यांनीं निर्माण केल्या होत्या आणि त्या पिढ्या कधींच नामशेष होऊनहि गेल्या. मग त्या वस्तू आजच्या पिढीच्या व्यक्तिगत खाजगी मालकीच्या जर नव्हत तर इतर कुणाच्या मालकीच्या ? त्या वस्तूंचें काय करावयाचें? म्हणून आजचा कायदा व व्यवहार सोशियालिस्ट कम्यूनिस्टांची उपपत्ति मान्य करीत नाहीं. मूळ कोणाचेहि श्रम त्या वस्तूंच्या उत्पादनाला कारणीभूत झालेले असोत, पण आज विद्यमान काळीं त्या वस्तू कोणाच्या ताब्यांत आहेत व त्या त्याच्या अबाधित वहिवाटीला उपभोगाला किती दिवस आहेत इतकेंच कायदा पाहतो आणि कायद्याची ही दृष्टि मान्य करावीच लागते. कारण जोंवर अराजक नाहीं, राज्यसंस्था आहे, तोंवर ती संस्था कायद्यानेंच जगणारी आहे. आजचा कायदा पुढें राज्यसंस्थेनें बदलला तर गोष्ट वेगळी! पण तो कायदा बदलण्याची शक्ति असणारें राज्यसंस्था यंत्र कोणाच्याहि हातीं असलें तरी, व तें चालवून त्यानें कायदा बदलला तरी, त्याचा व्यवहार कितपत होईल ही अडचण लक्षांत घ्यावी लागते आणि म्हणून कम्यूनिस्ट उपपत्तींत मालकी हक्क हा सर्वस्वीं श्रमावर अवलंबून असला पाहिजे असें म्हटलेलें आढळलें तरी, आज प्रत्यक्ष रशियांतहि, कांहीं प्रमाणांत का होईना, श्रमाशीं संबंध नसलेल्या अशा मिळकतीवर, जनतेंतील व्यक्तींचा खाजगी अबाधित हक्क मान्य करण्यांत आला आहे. आज रशियांतील मुख्य राजधानीच्याच काय पण एकाद्या खेडेगांवच्याहि रस्त्यांतून हिंडून कोणी घरवाल्याला विचारलें कीं, 'बाबा' तूं राहतोस तें घर तूं बांधलेंस काय?" तर तो उत्तर देईल 'मी विकत घेतलें आहे; किंवा आपल्या पैशानें कामकरी लावून बांधून घेतलें आहे; किंवा मला तें वारसा हक्कानें मिळालें आहे.' हीं दुसरीं तीनहि उत्तरें

विद्यमान स्थितीचीं दर्शक असून कम्यूनिस्ट उपपत्तीला विरोधी आहेत. याच खेड्यांत घरवाला सोडून कोणा एखाद्या दुकानदाराला प्रश्न विचारला कीं, "बाबा, तूं दूकानांत बसून विकतोस ते सर्व पदार्थ तूं आपल्या श्रमानें तयार केले आहेस काय?" तर त्यालाहि 'नाहीं' असेंच म्हणावें लागेल. तो स्वतः अगदीं साध्या मालाचा कारखानदार असून त्याच्याच मालाचें तें दुकान असेल तर, त्याला हे जिन्नस मी आपल्या कारखान्यांत केले आहेत असें कल्पनेनें म्हणतां येईल. पण एक साध्या पदार्थांचा कारखाना म्हटला तरी त्यांत प्रायः स्वतः कारखानदाराखेरीज इतर किती लोकांचे श्रम कामास आले असतील याची कल्पना करतां येते.

अगदीं साधें मिठाईचें दुकान घेतलें तरी त्यांतील मालापैकीं "दूध किंवा खवा एकाकडून विकत घेतला, साखर दुसऱ्याकडून घेतली, कढई तिसऱ्याकडून विकत आणली, कोळसा चवथ्याकडून घेतला आणि मी फक्त हातानें पेढे बनविले." इतकेंच त्याला म्हणतां येईल. अशा रीतीनें इतर तिघांच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या पदार्थांच्या साहाय्यानें हलवायानें पेढे करून विकले तर त्याला थोडासा नफा होतोच; व तो जगांतील विद्यमान व्यवहारशास्त्राप्रमाणें त्या हलवायाच्या खाजगी मालकीचा होतो. या सर्वांचा अर्थ हाच कीं, स्वतः हातानें केलेली मजूरी आणि त्या मजुराच्या उपभोगाची मिळकत यांचा प्रत्यक्ष संबंध फार थोडा येतो हें क़बूल करावें लागेल.

अगदीं प्राथमिक स्थितींतील मिळकत घेतली तरी तिचें स्वामित्व ताब्यानें, जुलुमानें, जबरदस्तीनें किंवा वहिवाटीनें उपभोगानेंहि मिळालेलें आढळतें. केवळ श्रमानेंच तें मिळविलें होतें असें फारसें आढळत नाहीं. याविषयीं एक गंमतीची गोष्ट कांगण्यासारखी आहे. एक ग्रंथकार लिहितो,

परवां सहज वादांतील मौज करावी म्हणून एका स्नेह्याच्या शेतावर गेलों; व भांडणाचा आविर्भाव आणून म्हणालों, 'ही जमीन माझी आहे. तूं चालता हो.' तो म्हणाला, 'तूं येण्यापूर्वीं येथें कोण उभा होता? एवढ्यावरूनच ही जमीन कोणाची हें तुला कळायला पाहिजे होतें.'

त्यानंतर आमचें खालीलप्रमाणें संभाषण झालें.

मी—तूं ही जमीन आपली म्हणतोस ती तूं कोणाकडून मिळविलीस?

शेतकरी मित्र—माझ्या बापाकडून

मी—तुझ्या बापानें ती कोणाकडून मिळविली ?

शे. मि.—त्याच्या बापाकडून, म्हणजे माझ्या आजाकडून.

मी—तुझ्या आजानें ती कोणाकडून मिळविली ?

शे. मि.—माझ्या पणज्याकडून

मी—तुझ्या पणजानें ती कोणाकडून मिळविली ?

शे. मि.—माझ्या पणज्याचा पणजा येथें आला व त्यानें वसाहत केली. तेव्हां त्याला या जमिनीकरितां लढावें लागलें. त्यानें या जमिनीकरितां या जमिनीवर आपलें रक्त सांडलें आहे. माहीत आहे ?'

मी—पण लढण्यांत यश मिळविण्याशिवाय म्हणजे बळी तो कानपिळी याशिवाय त्याला दुसरा कांहीं हक्क होता काय ?

शे. मि.—पहिल्या वसाहतीच्या वेळीं इतर हक्क असतात वाटतें ? कुस्ती करणें व मारणें हाच खरा पहिला हक्क.

तेव्हां शेवटीं मी म्हणालों, 'तर मग आतां असें समज कीं, मी नवी वसाहत करावयाला आलों आहें. ही जमीन मला पाहिजे आहे. तूं येथून निमूटपणें गेलास तर ठीक. नाहीं तर चल मी कुस्तीला तयार आहें. त्या जुन्या कुस्तीची आज आपण नवी आवृत्ति काढूं. मी तुला एका क्षणांत लोळवीन. पण माझ्या रक्ताचा थेंब जमिनीवर पडणें हाच खरा हक्क असें जुन्या दाखल्यावरून तूं म्हणशील तर ही पहा, मी सेफ्टी पिन घेऊन माझ्या दंडांतील रक्ताचा एक थेंब येथें पाडतों!' असें म्हणून मी अंगरखा काढून ठेवला आणि सदऱ्याच्या बाह्या वर सारून मनगट पुढें करून उभा राहिलों. या प्रत्यक्ष प्रयोगानें त्याला मिळकतीच्या मालकीचें मूळ शास्त्र चांगलें समजलें. मग आम्हीं दोघे हंसलों व तो म्हणाला, 'तूं मला कुस्तींत लोळवशील हें खरें; पण आज आठ पिढ्यांच्या वहिवाटीनें ही जमीन माझ्या मालकीची राहिल्यानें कायदा ती माझीच म्हणेल, आणि चार शिपाई आणून मी तुला हांकून देईन!'

प्राथमिक स्थितींत हाताच्या जोरावर मिळेल तें व त्याच जोरावर संभाळतां येईल तें, तीच मिळकत व तोच मालकी हक्क होता. त्या हक्कानेंच अन्न, पाणी, निवाऱ्याची जागा, हत्यारें, आयुधें, गुरें, जमीन, गुलाम, स्त्रिया व

त्या स्त्रियांपासून झालेली संतति या सर्वांवर मालकी हक्क मान्य केला जात होता. जुन्या काळीं जमिनीशिवाय स्थावर अशी मिळकत फार थोडी होती. घरें म्हणजे फार तर राहुट्या किंवा पालें. ती जंगमच म्हणावयाची. विंचवाचें बिऱ्हाड पाटीवर म्हणतात. खरोखर ती म्हण गोगलगायीला लागली पाहिजे. कारण तीच आपलें घर पाठीवर घेऊन हिंडते व वेळ पडल्यास त्या घरांत शिरून सुरक्षित बसते. पक्षी आपलीं घरटीं बांधतात, त्यांच्यावरील मालकीचा हक्क इतर पक्षी मान्य करतात; एका पक्षानें बांधलेल्या घरट्यांत दुसरा पक्षी कधींहि जाऊन राहावयाचा नाहीं. म्हणूनच कावळ्याच्या घरट्यांत शिरून आपलीं अंडीं तेथें कावळ्याकडून उबविणाऱ्या कोकिळेला निंदास्पदता प्राप्त झाली आहे !

कुटुंबनिर्मितीपर्यंत ताबा व वहिवाट यांवरच मालकी हक्क अधिष्ठित होता. पण पुढें कुटुंबसंस्था सुरू झाल्यापासून कुटुंबवात्सल्य किंवा प्रेम हा एक नवा आधार मालकी हक्काला मिळूं लागला. रोमन इतिहासांत अगदीं सुधारल्या काळीं देखील स्त्रीच काय पण प्रौढ मुलगाहि गुलामाप्रमाणें बापाची जंगम मिळकत मानली जात असे. पण मिळकत व मालक यांचें तादात्म्य सिद्ध होणें हें स्वाभाविक; यामुळें घरमालक व घर यांच्या तादात्म्यापेक्षांहि मालक बाप मेल्यावर त्याचा मुलगा मालक होणें हें तादात्म्य, वहिवाट + प्रेमसंबंध या जोड हक्कानें, प्रस्थापित झालें असें म्हणतां येईल.

अलीकडील दोन हजार वर्षांच्या काळांत स्त्री, मुलें हे नवऱ्याचे बापाचे गुलाम ही कल्पना जगांतून नष्ट होऊन हळुहळू समाईक कुटुंबव्यवस्था यूरोपांत सर्वस्वीं नष्ट झाली. पण उलट स्थावर जंगम मिळकतीचा व्याप व पसारा अधिक वाढला. ख्रिस्ती शकापूर्वीं सुमारें दोनशें वर्षें रोमन व्यक्तीची स्थावर मिळकत भोंवतीच्या आवारापलीकडे मालकी हक्कानें नसे, व असे तीहि पाऊण एकरापेक्षां अधिक नसे. अगदीं याच्या उलट आतां स्थिति आहे. आज व्यक्तीचे मालकी हक्क तुटक झाले आहेत व एका व्यक्तीला मालकीची जंगम किंवा स्थावरहि मिळकत किती असावी याला सीमा उरलेली नाहीं. श्रम व मिळकत यांचा संबंध तर तुटलाच, पण प्रत्यक्ष वहिवाटीचा संबंधहि मागें पडून मालकीचे

तात्त्विक हक्कहि निर्माण झाले. मूळ सर्व मिळकत बळाच्या जोरावर मिळविलेली; पण ती आतां कायद्याच्या शास्त्रानें पुनीत होऊन राहिलेली आहे. मूळच्या बळजबरीचें पाप धुवून निघालें. आणि विस्मरणानें नाहीसें होत नाहीं असें पाप तरी कोणतें? नदीच्या पात्रांत सर्व कांहीं शुद्ध होतें त्याप्रमाणें कालाच्या ओघांतहि सर्व शुद्ध होतें.

मिळकतीचे प्रकारहि कालांतरानें इतके विविध व सोपे झाले आहेत कीं, एक चेकबुक खिशांत असलें म्हणजे त्याच्या साहयानें शेंकडों प्रकारची मिळकत वहिवाटतां सांभाळतां येते व मोबदल्यानें देतां घेतां येते. कांहीं प्रकारची मिळकत तर अगदीं परतंत्रपणें वाढते किंवा कमी होते. स्थावर मिळकतीची किंमत ही विकावयाला निघेल तेव्हांच ठरणार. पण सरकारी कर्जरोखे किंवा मोठ्या कंपन्यांचे शेअर यांमध्यें जी मिळकत गुंतलेली असते तिचा चढउतार नेहमीं सुरू असतो. म्हणून एकानें थट्टेनें असें म्हटलें आहे कीं, " मी संध्याकाळीं श्रीमंत आहें कीं गरीब आहें हें मला विचारूं नका ; सांगतां येणार नाहीं. उद्यां ताजें वर्तमानपत्र वाचीन आणि त्यांत रोखे, शेअर यांचे जे भाव निघतील त्यांवरून मी सांगेन कीं, श्रीमंत झालों कीं गरीब झालों ! " दुसऱ्या एकानें याच गोष्टीला अनुलक्षून म्हटलें आहे कीं, " आजकालची संपत्ति म्हणजे चित्रकार लोक देवतांच्या तोंडांभोंवतीं जीं तेजोवलयें रंगवितात त्यांसारखी आहे. त्या तोंडाची किंमत त्या तेजोवलयाच्या उज्वलतेनें किंवा फिकेपणानें करावयाची असते."

तात्पर्य, व्यक्तिगत मालकीच्या मिळकतीला असलेलें हें स्वरूप आणि त्या मिळकतीला मिळालेला कायदेशीर आधार यांमुळें ती आज दृढमूल होउन बसलेली आहे. इतकी कीं, भूत जसें झाडाला सोडून जात नाहीं तसा व्यक्तीच्या मालकीचा हा हक्क मनुष्य मेल्यानंतरहि त्याच्या मागें उरतो. म्हणूनच वारसाईनें मिळालेली मिळकत वडिलार्जित म्हणतात, स्वकष्टार्जित म्हणत नाहींत. व्यक्तीच्या अबाधित हक्कामुळेंच स्वार्जित मिळकतीची विल्हेवाट मृत्यूपत्र नांवाच्या अशा एका दस्तऐवजानें करतां येते कीं, त्या दस्तऐवजाचा अंमल खरा त्याच्या मृत्यूनंतरच व्हावा. यापलीकडे मालकी हक्काची अबाधितता ती काय उरली? ही अबाधितता निदान जमिनीसंबंधानें तरी यूरोपखंडांत इतकी अतिशयोक्तीला पोंचविली गेली

कीं, कायद्याला शेवटीं त्या हक्काला मर्यादा घालून, पुढील पिढ्यांना त्यांची विल्हेवाट विक्री, मोबदला वगैरे करून वाटेल तशी व्यवस्था लावण्याचा हक्क निर्माण करून द्यावा लागला. मनुष्याचा निर्वंशच होईल म्हणजे त्याला कोणी वारस उरणार नाहीं तरच ती मिळकत सरकारकडे जाते. आतां अशा बेवारशी मिळकतींनीं सरकारचा फायदा व्हावा म्हणून वारसांचे वर्ग कायद्यानें हटवीत हटवीत आणले आहेत. परंतु आपल्याला वारस नाहीं ही गोष्ट लक्षांत येणारा मनुष्य मृत्यूपत्र करून किंवा हयातींतच बक्षीसपत्र, दानपत्र करून, ट्रस्ट डीड करून आपणाला सरकारनें लुबाडण्याची संधि बुडवूं शकतो.

अशा रीतीनें, मनुष्याचा निर्वंश झाला व त्याची मिळकत बेवारस ठरली म्हणजे मग ती सरकारला मिळणें यांत जी कल्पना अंतर्भूत आहे ती सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट हे वाढवून पुढें आणीत आहेत. आणि असें प्रदिपादीत आहेत कीं, हा वारसाई हक्क बुडविला जावा, इतकेंच नव्हे तर मनुष्याच्या हयातींत देखील आपल्या मालमत्तेवरील त्याची सत्ता राहिलीच तर अत्यंत मर्यादित राहावी. म्हणजे अगदीं प्राथमिक समाज स्थितींतल्याप्रमाणें मनुष्यानें श्रम करून आपल्या उपभोगापुरतेंच उत्पन्न करावें. विक्री करून, भाड्यानें देऊन, नफा करण्याकरितां, व्याजानें वाढ होण्याकरितां किंवा आपल्या पश्चात् ती दुसऱ्याला मिळण्याकरितां, संपत्तीचें उत्पादन करतां कामा नये. अर्थात् हें म्हणणें कितपत न्याय्य किंवा शास्त्रशुद्ध आहे याचा विचार वाचकांनीं करावा.

खाजगी मालकीच्या विकासाची माहिती थोडी विस्तारानें सांगितली त्याचा हेतु हाच कीं, ही परिणति हजारों वर्षांच्या अवधींत स्वाभाविक क्रमानें झालेली आहे हें लक्षांत यावें. आज या हक्काची अतिशयोक्ति झालेली असेल आणि समाजाच्या हिताच्या दृष्टीनें या अतिशयोक्तींतून निघालेल्या भांडवलशाहीला आळा घालणें इष्ट असेल तर ती गोष्ट अवश्य करावी. पण तो आळा घालण्याला खाजगी मिळकतीचा व नफ्याचा हक्क सर्वस्वीं मुळासकट नष्ट करण्याचें कारण नाहीं. नखें वाढलीं तर तीं कापावीं, हात तोडूं नये. केस वाढले तर ते कापावे मान कापूं नये. व्यक्ति-स्वातंत्र्य बोकाळलें तर त्याला मर्यादा घालावी पण व्यक्तित्व नष्ट करूं नये.

एका अन्यायाचें परिमार्जन दुसऱ्या अन्यायानें करणें हा न्याय नव्हे. नवमत प्रवर्तनांतहि अन्याय तो अन्यायच. त्याची व्याख्या कशी बदलणार ?

---

# २१. रशियांत खरा साम्यवाद आहे का ?

हातीं राज्यसत्ता आलेली पाहून कम्यूनिस्ट रशियन सरकारानें सर्व खाजगी मिळकत जप्त केली, म्हणजे सरकारी ठरविली. परंतु येवढ्यानें साम्यवादाचा प्रयोग सिद्धीस गेला असें म्हणतां येणार नाहीं. समाजसत्ता-वादाचें झालें तरी अंतिम ध्येय समानता प्रस्थापित करणें हेंच आहे कीं नाहीं ? मग ती रशियांत प्रस्थापित झाली काय ?

समता प्रस्थापित होण्याचे मुख्य मार्ग दोन. प्रथम एकदां केव्हां तरी ऐनजिनसी सर्व मिळकत सर्वांना सारखी वांटून देणें. तसें कांहीं रशियांत घडलें नाहीं. तसें घडलें असतें तर काय हास्यास्पद प्रकार झाला असता याचें दिग्दर्शन आम्ही पूर्वीं एका प्रकरणांत केलेंच आहे. कोट्याधीशाला लुटावयाला दरवडेखोर आले. 'श्रीमंतांविरुद्ध गरीब' असा परोपकाराचा बहाणा त्यांनीं केला. तेव्हां कोट्याधीशानेंहि उत्तर दिलें कीं 'माझी सर्व संपत्ति देशांतील सर्व लोकांना सारखी वांटून दिली तर माणशीं दोन दोन डॉलर्सच येतील ! तेव्हां तुम्हां दोघांच्या वांट्याचे हे दोन डॉलर्स घेऊन जा. क्रोडोपतीला लुटून शेवटीं आपल्या एकेकाच्या वांटणीला दोनदोनच डॉलर्स येणार या गणितानें साम्यवादावर जो प्रकाश पडतो तोहि रशियन क्रांतीनें गरीब लोकांच्या मनावर पडला नसेल. कारण श्रीमंतांच्या जमिनी व त्यांचा पैका हीं जरी रशियन सरकारनें जप्त केलीं, तरी तीं सर्व गरिबांना सारखीं वांटून दिलीं नाहींत. श्रीमंतांऐवजी सरकारच स्वतः गबर होऊन बसलें.

त्यानें गरिबांना इतकाच संदेश सांगितला कीं, 'तुमच्या वांटणीची ठेव आमच्याजवळ आहे. तिचा ऐनजिनसी ताबा तुम्हांला देणार नाहीं. फक्त तिचा उपयोग तुम्हाला करूं देऊं. त्या उपयोगाच्या वेळीं जरूर तर तुमच्या हिश्शापेक्षां अधिक अंशाचाहि उपयोग कदाचित् तुम्हांस मिळेल' तात्पर्य साम्यसिद्धांतांचा हा प्रयोग समाजसत्तेनें रशियांत केला नाहीं.

साम्यसिद्धांताचा प्रयोग करण्याची दुसरी एक रीत अशी असते कीं, मूळ ऐनजिनसी मिळकतीचीच वांटणी न होवो पण राष्ट्रांत जें एकंदर वनोत्पादन होईल तें वर्षांतून एकदां किंवा वेळोवेळीं सर्वांना सारखें वांटून द्यावयाचें. तशीहि गोष्ट रशियांत घडलेली नाहीं. ती घडणें व्यवहार्यहि नाहीं. कारण ही वांटणी वर्षांतून एकदां करावयाची तर वर्षभर लोकांचा निभाव कसा लागावा? बरें मजुरीच्या बटवड्याप्रमाणें दर महिन्याला किंवा दर आठवड्याला ती करावयाची म्हटलें तर, एकंदर राष्ट्राच्या उत्पन्नाचा हिशेब दर महिन्याला किंवा दर आठवड्याला कसा करितां येणार ? पण कम्यूनिस्ट असला साम्यवादाचा अव्यहार्य प्रयोग न करण्याइतके व्यवहारचतुर होते व त्यांनीं तो प्रयोग केलाहि नाहीं.

साम्यवादाचा आणखी तिसरा एक अर्थ असा असतो कीं ज्याला जशी नड असेल तसें त्याला द्यावयाचें. ज्याला जें देणें योग्य तें त्याला द्यावें ही न्यायतत्त्वाची एक स्थूल व्याख्या आहे. या दृष्टीनें जरी रशियांत प्रयोग होत असता तरी तो साम्यवादाचाच प्रयोग म्हणतां आला असता. पग हा प्रयोग तरी कम्यूनिस्ट रशियांत होत आहे का? याचेंहि उत्तर नाहीं असेंच द्यावें लागेल. अशा प्रयोगांत फार अडचणीचे प्रश्न उत्पन्न होतात. ते कसे तें पाहूं.

समजा, एखादें अविभक्त कुटुंब आहे. त्यांत दोन मुख्य मिळविते दोन दुय्यम न मिळविते पण काम करणारे, आणि दोन न मिळविते व न काम करणारे म्हणजे केवळ पोष्य आहेत. पण पोष्य असणारीं माणसेंहि प्रेमसंबंधामुळें ममतेमुळें मिळविणाऱ्या माणसांच्या बरोबरीचीं हक्कदार ठरतात. मिळविणारा घरधनी स्वतः भाकरी खाईल, पण न मिळविणाऱ्या लहान मुलांना ममतेमुळें गाईचें दूध प्यायला देईल. घरधनी स्वतः गाईचें दूध प्याला तर त्यांत मोठेंसें बिघडणार नाहीं. पण तो भाकरी खाऊनच

निभवील. ती लहान मुलांना सोसणार नाहीं म्हणून भाकरी व गाईचें दूध हे दोन्ही पदार्थ आपण आपापल्या परीनें भूक भागविणारे असले तरी, एकाची जी ' नड ' तीच दुसऱ्याची असे नसल्यामुळें, अधिक किंमतीचें गाईचें दूध न मिळवित्या मुलाला व कमी किंमतीची भाकरी मिळवित्या घरधन्याच्या वांट्याला आली तरी तो कौटुंबिक किंवा सामाजिकहि न्यायच झाला व साम्यवादाचा प्रयोग झाला. पण अशा—म्हणजे नडीप्रमाणें वांटणीच्या—तत्त्वावर तरी रशियांत आर्थिक व्यवहार होत आहे काय असें विचारलें तर ' नाहीं ' असेंच उत्तर द्यावें लागेल. तो खरोखर तसा होत असता तर दुष्काळांत लाखों रशियन लोक उपासमारीनें कां मरते ? हे लोक बाहेर मरत असतां मोठमोठ्या शहरांतील रशियन लोक स्वतःपुरतें खाऊनपिऊन चैन करीत होते कीं नाहीं ? रशियन सरकार पाण्यासारखा पैसा खर्च करून, उद्योगधंद्याची वाढ करण्याकरितां म्हणून, अनेक ठिकाणीं यंत्रांचे राक्षसी डोलारे उभे करीत होतेंच कीं नाहीं ? तात्पर्य, साम्यवादाचें हें तत्त्वहि कम्यूनिस्ट रशियांत अनुभवाला आलेलें नाहीं.

यानंतर चौथा एक प्रकार पाहूं. तो म्हणजे ' लायकीप्रमाणें ' मनुष्याला वेतन देणें. या दृष्टीनें मात्र रशियांत आज स्थिति अमलांत आहे असें म्हणतां येईल. पण त्यांत मौज ही कीं, ही गोष्ट एकट्या रशियांतच घडत आहे असें कां म्हणावें ? पूर्वीच्या एका प्रकरणांत आम्हीं आंकडे देऊन दाखविलें आहे कीं, सरकारी किंवा सामुदायिक रशियन कारखानदारींत पगार—वेतनाचे, म्हणजे व्यक्तिशः केलेल्या श्रमांबद्दल मोबदला देण्याचे, किती तरी निरनिराळे वर्ग किंवा दर्जे आहेत. मग इतर देशांत ते तसे कोठें नाहींत ? भांडवलशाहीवाल्या यूरोप अमेरिकेंतहि असेच दर्जे व वर्ग असतात. तेथेंहि ठराविक वेळेंत केलेल्या श्रमांची किंमत त्यांच्या धनोत्पादक गुणाप्रमाणें वेगवेगळीच मानतात. मग रशियांत साम्यतेचा हा जो प्रयोग होत आहे तो भांडवलशाही समाजांतहि होतच आहे असें कां म्हणूं नये ?

साम्यवादाचें एक अप्रत्यक्ष कार्य हें म्हणतां येईल कीं, समाजांतील श्रेष्ठ कनिष्ठ हा भाव न मानतां कोणालाहि कोणत्याहि योग्यतेला चढण्याची सारखीच संधि व परवानगी मिळावी. श्रेष्ठ म्हणून विशेष सवलत

आणि कनिष्ठ म्हणून विशेष निर्बंध असा प्रकार होऊं नये याचा अर्थ इतकाच कीं हा भेद स्वत: सरकारनें करूं नये. परंतु हा भेद सरकारनें केला नाहीं म्हणून समाजाच्या खाजगी व्यवहारांत तो सांपडणार नाहीं अशी जामिनकी कोणींच देऊं शकत नाहीं ! म्हणून असले विषमतेचे प्रकार सरकारची इच्छा नसतांहि कोठेंहि आपोआप घडतच असतात. या साम्य (?) तत्त्वाप्रमाणें भांडवलशाही देश व कम्यूनिस्ट रशिया याची तुलना केली असतां दोहोंच्या स्थितींत किंचित् फरक असलाच तर तो क्रांतीच्या समर्थनार्थ घोषणा करण्याइतका मोठा आहे असें फारसें म्हणतां येणार नाहीं.

इंग्लंडचें उदाहरण घेतलें तर आज वाटेल त्या इंग्रजाला राजा होतां येणार नाहीं ही गोष्ट खरी. पण वाटेल त्या मजुराच्या लहान मुलाला मी शेवटीं इंग्लंडचा मुख्य प्रधान होईन (किंवा निदान कां होणार नाहीं ?) असें खास म्हणतां येईल. रॅम्से मॅक्डोनल्डसारखे लोक यापूर्वीं अशा कनिष्ट वर्गांतून उदयाला येऊन मुख्य प्रधान झालेच कीं नाहीं ? महायुद्धानंतरचीं ब्रिटिश प्रधानमंडळें तपासून पाहिलीं तर त्यांत सुशिक्षित पदवीधर फारच थोडे आढळतील. कोळशांचे हिरे झालेलेच पुष्कळ. इंग्लंडांत आज कोणत्याहि धर्मपंथाला सरकारी नोकरींत मज्जाव नाहीं. किंवा ज्यू लोकांसारख्या निंद्य मानलेल्या वंशजांना मज्जाव नाहीं. उलट पूर्वीं ऑक्सफर्ड, केंब्रिज विद्यापीठें आणि पब्लिक स्कूल्स यांतून शिकलेल्या अथवा ' निळ्या रक्ताच्या ' कॉन्झर्वेटिव्ह लोकांना पार्लमेंटांत त्वरित प्रतिष्ठा पावण्याची जीं सवलत होती ती उरलेली नाहीं. त्या सर्व जुन्या भिंती व तट आतां कोसळून पडले आहेत. इंग्लंडांत लष्करी नोकरी आतां केवळ श्रीमंतांकरितां उरलेली नाहीं. लॉर्ड रॉबर्टस् हा मूळचा साधा शिपाई असतां शेवटीं मुख्य सेनापति झाला ! " शाळेंतल्या किंवा रस्त्यावरच्या कोणच्याहि मुलानें आपल्या पिशवींत फील्ड मार्शलचा 'दंड' (बेटन) आहे असें खुशाल मानावें " ही जी म्हण डेमोक्रॅटिक इंग्लंडांत पडली आहे ती खरीच आहे. अमेरिकन प्रेसिडेंटाचें पद कोणाहि अमेरिकनानें मिळवण्याची आकांक्षा धरावी. जर्मनी ,इटलीचे सूत्रधार हिटलर, मुसोलिनी हे मूळ किती कनिष्ठ वर्गांतले होते ! कोणाहि रशियन मनुष्याला स्टॅलिन होण्याचा जितका संभव तितकाच 'यूरोप अमेरिकेंत,

म्हणजे भांडवलशाही देशांत, साधा मनुष्य रिपब्लिकचा अध्यक्ष होण्याचा संभव आहे.) दोघांनाहि दोहों ठिकाणीं तितकीच सवलत आज आहे.

तात्पर्य, सर्वांना सारखी संधि हें सोशॅलिस्ट तत्त्व भांडवलशाही देशांतहि आज पुष्कळच प्रस्थापित झालें आहे आणि उद्यां तर आणखी कितीतरी रूढ होईल ! मुद्दा हा कीं, खाजगी भांडवलशाही नष्ट करणें, नफेबाजी नष्ट करणें, हे पराक्रम बाजूला ठेवले असतां, प्रत्यक्ष व्यवहारांत साम्यवादाचें असें कोणचें तत्त्व रशियांत अमलांत आहे कीं जें सोशियालिझमचें तत्त्व सामान्यपणें मान्य केलेल्या अशा दुसऱ्या एखाद्या देशांत नाहीं ? रशियांत आज ‘ बेकारी ’ नाहीं असें सांगण्यांत येतें. हें सर्वस्वी खरें असेल तर प्रत्येक रशियनाला आज ‘ जगण्याची ’ (पण फक्त जगण्याचीच) समान संधि दिली जात आहे असें म्हणतां येईल. पण जगण्याची समान संधि देणें हीच का साम्यवादाची परिसीमा समजावयाची! आणि ती तरी रशियांत खरोखर पोंचली होती काय ? दुष्काळांत उपासमारीनें मेलेले रशियन काम करण्याला नाकबूल होते काय ? मेलों तरी चालेल पण श्रम करणार नाहीं असें म्हणत ते मेले काय ? तसें नव्हतें तर कम्यूनिस्ट सरकारनें त्यांना दुष्काळी कामें काढून कां वांचविलें नाहीं ? देशांत धान्य कमी पिकलें तर बाहेरून कां आणविलें नाहीं ? प्रचंड राक्षसी यांत्रिक कारखाने उभारण्याकडे जो पैसा खर्च झाला त्यांतला कांहीं परदेशाहून धान्य आणण्याकडे सहज खर्चतां आला असता.

तात्पर्य, आर्थिक बाबतींत साम्यवादाचा कोणता विशेष सिद्धांत कम्यूनिस्ट रशियानें अमलांत आणला हें कम्यूनिझमचे पक्षपाती मतप्रचारक लोकांना समजावून देतील तर बरें होईल. आम्हांला तर रशियांत साम्यवाद इतकाच पदरांत पडलेला दिसतो कीं, आर्थिक बाबतींत सर्व लोकांनीं एकसारखेंच सरकारच्या तोंडाकडे पाहून त्याच्यावर अवलंबून राहावें ! मात्र त्याचा मोबदला म्हणून सामाजिक बाबतींत वाटेल तो स्वैराचार करण्याच्या समानतेचा हक्क उपभोगावा !

रशियांतील कम्यूनिस्टांनीं सर्व राजकीय सत्ता आपल्या हातीं केंद्रीभूत केली आणि या अर्थानें समाजसत्तावाद सिद्ध केला, तथापि साम्यवाद सिद्ध केला नाहीं हें विशेष रीतीनें आम्ही लोकनिदर्शनाला

आणूं इच्छितों; यांचें कारण असें कीं साम्यवाद या शब्दाची भुरळ पडून रशियांतील स्थितीसंबंधानें इकडील भाविक लोकांनीं भलत्याच कल्पना केलेल्या आढळतात. बर्नार्डशॉसारखे कादंबरीकार साध्या सोशियालिझमचें ध्येय रंगविताना साम्यवादाच्या इतक्या अद्‌भुत कल्पना लेखणींतून प्रसवतात कीं, त्यांचा गंभीरपणें विचार करण्यालाहि इंग्लंडांत कोणी तयार नसतो. विक्षिप्त नाटक्यानें वर्णन केलेली सोशियालिझम असें म्हणून तुच्छतापूर्वक ते बाजूला टाकून देतात. परंतु ' मार्क्स, लेनिन, स्टॅलिन हे कांहीं नाटककार कादंबरीकार नव्हत. म्हणून त्यांनीं जर राजकीय सत्तेच्या आधारावर रशियांत साम्यवाद सिद्ध केला असेल तर ती कांहीं नवलकथा नव्हे, तेथें खरोखरच, समतेचें तत्त्व सर्वांगपूर्ण सिद्ध झालें असलें पाहिजे ' असा युक्तिवाद करणारे कांहीं लोक आढळतात. हा भ्रम मात्र दूर करणें अगत्याचें ठरतें. समाजसत्तावादाचा प्रतिशब्द म्हणून साम्यवाद हा शब्दहि योजला जातो ! परंतु कम्यूनिस्ट सरकार लष्करी सामर्थ्यावर सोटेशाही प्रस्थापित करूं शकलें तरी, ज्या तत्त्वाला समता, साम्य हे शब्द लावतात तें तत्त्व सिद्ध करूं शकलें नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे आणि खरोखर हें साम्य, ही समता जर व्यक्तिमात्रांत प्रस्थापित करतां येत नाहीं तर राजकीय दृष्ट्या सोटेशाही गाजवून व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यानें काय साधलें? मग त्यापेक्षां आपली डिमॉक्रेसीची पद्धत काय वाईट ! कारण डिमॉक्रसीचा उद्देशहि साम्य–समता प्रस्थापित करण्याचाच असला तरी, ती गोष्ट विकासवादाच्या तत्त्वावर, म्हणजे हळुहळू मनुष्यस्वभाव बदलून, समाजाला टिकेल व झेपेल अशी करून घेऊं इतकीच डिमॉक्रसीची न्याय्य महत्त्वाकांक्षा असते; पण रशियांत पाहावें तों साधन मात्र वाटेल तें निषिद्ध योजावयाचें आणि साध्य तर पदरांत पडत नाहीं, अशी अर्धबाटगी स्थिति झालेली आहे.

खुद्द कम्यूनिस्ट पुढाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन त्यांनीं हळुहळू प्रतिक्रिया सुरू केली आहे. रणांगणावर पराभव पावलेलें सैन्य दिसण्यांत शत्रूकडे तोंड ठेवतें पण पावलापावलानें माघार घेत असतें, त्याप्रमाणें रशियन कम्यूनिस्टांची आजची स्थिति आहे. ही गोष्ट लक्षांत न घेतां

कित्येक लोक रशिया, कम्यूनिझम, क्रांति, समता, साम्य, समाजसत्ता इत्यादि शब्द पोपटपंचीसारखे बडबडत नसत्या कल्पना, नवमतवाद चित्ताकर्षक असतो म्हणन, लोकांत आज पसरवीत आहेत. याकरितां कम्यूनिस्ट रशियांतहि आज साम्यवाद सिद्ध झाला नाहीं, व्यवहारांत उतरला नाहीं, हें हांक मारून लक्ष वेधन सांगावें लागतें. कम्यूनिस्ट भाष्यकार पतिपत्नी वेब यांच्या ग्रंथावरूनहि वरील गोष्ट सिद्ध होते. आनुवंशिक परंपरा आणि सामाजिक परिस्थिति यांनीं घडविली जाणारी विषमता ही कोणालाहि दूर करतां येणार नाहीं, असेंच कार्ल मार्क्स, लेनिन यांचें मत होतें. हे पतिपत्नी ग्रंथकार लिहितात, "सुशिक्षित म्हणविणारे देखील कांहीं भोळे लोक असें समजतात कीं, कम्यूनिस्ट पक्षानें समतेच्या कल्पनेवर आपला समाजसत्तावादाचा पाया रचिला, पण हा शुद्ध भ्रम आहे. श्रमाचें बक्षीस किंवा स्वार्थत्याग या बाबतींत कम्यूनिस्ट हें समतेचें तत्त्व मानीत नाहींत." दोन वर्षांपूर्वी स्टॅलिननें समता व विषमता हीं तत्त्वें लावून कम्यूनिझमचें पृथक्करण केलें. त्यांत तो म्हणतो, "व्यक्तिजीवन किंवा व्यक्तीच्या गरजा भागविणें या गोष्टींत समानता साधणें आणि विषमता घालविणें हें अशक्य आहे. आम्हीं जी समता स्थापिली ती फक्त वर्ग-विषमता घालवून, भांडवलशाही बुडवून आणि त्यांची संपत्ति हरण करून! धनोत्पादनाच्या साधनांत आम्हीं व्यक्तिमात्राला स्वामित्व उरूं दिलें नाहीं; तर सर्व व्यक्तींना समाजावर अवलंबी करण्यांत समता साधली. व्यक्ति-मात्रानें आपल्या शक्तीप्रमाणें श्रम करावे हें त्याचें कर्तव्य आहे, आणि त्या श्रमाच्या मानानें त्याला मजूरी मिळावी हा त्याचा हक्क आहे. परंतु हे श्रम व ही मिळकत नेहमीं विषमच राहणार. सामाजिक वर्ग मोडावयाचे, पण व्यक्तिव्यक्तींतील वैषम्य तर घालवावयाचें नाहीं अशीच कम्यूनिझमची शिकवण आहे."

मग प्रश्न इतकाच कीं, व्यक्ति–स्वातंत्र्यवादी आणि डिमॉक्रसीवाले तरी या व्यवस्थेला कोठें प्रतिकूल आहेत? जी गोष्ट खाजगी मालमत्ता नष्ट करून साधते ती व्यक्तीच्या लोभबुद्धीवर योग्य तीं नियंत्रणें घालण्यानें कां साधूं शकणार नाहीं? विषमता म्हटली म्हणजे एक प्रकारें मर्यादा पडलीच. आणि समान मर्यादेच्या कक्षेंत जितके लोक सांपडले त्यांचा वर्गच बनतो

कीं नाहीं? मग आम्हीं विषमता संभाळून वर्गपद्धति मात्र बुडविली या बढाईंत कांहींच अर्थ राहात नाहीं. वर्गावर्गांत कलह म्हटला तरी तो अंतिम स्वरूपी व्यक्तिव्यक्तींतील कलहच अनुभवास येतो. आणि कम्यूनिस्ट पद्धतीप्रमाणें विषमता उरूं दिली तरी तेवढ्यानें सनातन द्वेषबुद्धि ही शिल्लक उरतेच. आज आपण वरिष्ठ वर्ग म्हणतों त्यांत किती तरी कनिष्ठ लोक आढळतात! तसेंच कनिष्ठ म्हणतों त्यांत वरिष्ठ आढळतात! आणि मध्यम वर्ग हा शब्द ज्यासंबंधानें आपण योजतों त्याची व्याप्ति ठरविणें ही तर गोष्ट फारच कठीण होते. विकासवाद्यांचें म्हणणें असें कीं, हे नामधारी कनिष्ठ व वरिष्ठ वर्ग हळुहळू बुडवून तुम्ही दिवसेंदिवस मध्यम वर्ग मोठा विस्तृत करीत गेलां तर त्याला आमची मान्यता मिळेल. पण आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्यावर व स्वामित्वावर जें बंधन तुम्ही घालूं पाहतां तें आडमुठेपणाचें आहे. त्याला न्यायाची भूमिका नाहीं, आणि व्यावहारिक यशहि नाहीं. येऊन जाऊन सामाजिक स्वैराचारांत मात्र समता व पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य प्रस्थापित केल्याचा बहाणा व घोषणा रशियन कम्यूनिस्टांनीं प्रथम केली! त्यांतहि आतां प्रतिक्रिया होऊं लागली आहे. तथापि तो वेगळाच विषय म्हणून सोडून देऊं.